
फटफटीवरून
भारतभ्रमण
अशोककुमार
स्वामीनारायण



ज्यांनी मला मुलाप्रमाणे मानून मातेची ' ममता ' दिली.

त्या माझ्या

पू ' बा '

श्रीमती रुक्मिणीबेन बाबुभाई

सुरतवाला

यांसी

सादर सप्रेम अर्पण

फटफटीवरून भारतभ्रमण

इस दिलकी कश्मको पूछे बिना छूए न कोई
दिलके अरमानोंका गिला खोलके देखे न कोई
— L.P.S.

लेखक

अशोककुमार स्वामीनारायण

[८-००]

आठ रुपये फक्त

सुरतवाला पब्लिशर्स

२७८ रविवार पेठ, पुणे २.

प्रकाशक :
सुरतवाला पब्लिशर्स
२७८ रविवार पेठ,
पुणे २.

पहिली आवृत्ती : मार्च १९७०


मुखपृष्ठ :
चित्रकार दिनानाथ दलाल
✦ संगम मुद्रणालय

✦ छायाचित्र :
लोकसंग्रह मुद्रणालय

मुद्रक :
गोपाळ मोकाशी, एम्. ए.
रचना मुद्रणालय,
५६५ शनवार पेठ,
पुणे ३०.

अनुक्रमणिका

● अशी खुण असलेले स्थळें छायाचित्रांचे आहेत.



लेखक श्री. **अशोककुमार स्वामीनारायण श्री. यशवंतराव चव्हाण व श्री. बाळासाहेब देसाई यांच्या समवेत.**

श्री. **आचार्य अत्र्यांनी** स्वत: मुलाखत घेऊन दै. मराठामध्यें लेखकाचा परिचय दिला होता. ता. (४-५-६९) तो अंक गृहमंत्री श्री. **यशंवतराव चव्हाण** वाचीत असतांना.

शिक्षण मंत्री,

महाराष्ट्र राज्य

सचिवालय, मुंबई ३२

३ मार्च १९७०



श्री. अशोककुमार स्वामीनारायण ह्यांचे ' फटफटीवरून भारतभ्रमण ' हे पुस्तक नाविन्यपूर्ण वाटले. त्यांचा फटफटीवरून भारतभ्रमण करण्याचा उपक्रम जितका स्तुत्य आहे, तितकाच आपल्याला आलेले अनुभव ग्रथित करण्याचा उपक्रम स्तुत्य आहे.

मुंबईसारखं मोठं शहर जसं पायी किंवा बसनं हिंडल्याशिवाय कळत नाही तसच एवढा मोठा भारत फटफटीवरून फिरून आल्यामुळे अधिक जवळून परिचित झालासं वाटतं.

वाटेत भेटलेली माणसं आणि स्थानं ह्यांच्याविषयी लेखकांच्या संवेदनाक्षम मनावर उमटलेली भाववलयं मनोवेधक वाटतात. आपणही त्यात नकळत सहभागी होऊन गेल्यासारखे वाटते.

त्यांनी पाहिलेली सुंदर शिल्पं जशी मनात आकर्षण निर्माण करतात, तसा ' एम आय कुक यु ' वाला चिकट अभ्याही अविस्मरणीय आहे.

एकूण पुस्तक छानच जमलय ! अभिनंदन ! !

(म. [illegible] चौधरी)



लेखक श्री. **अशोककुमार स्वामीनारायण** यांची पद्मभूषण प्रो. **ना. सि. फडके** यांचे घरी स्व. आचार्य अत्रे यांच्याशी भेट झाली असतांना घेतलेला फोटो.

दोघा थोर साहित्यिकांनी **अशोककुमार** यांस प्रेमाशिर्वाद दिले

दिनांक १६–३–१९६९.



स्वागत !

सामान्य मराठी वाचकांना कथा कादंबऱ्या वाचण्याची सर्वांत अधिक ओढ असते असा समज रूढ आहे. तो खराही आहे. तथापि मला आढळून आले आहे की, प्रवासवर्णन, चरित्र, आत्मचरित्र या साहित्यप्रकारातही सामान्य वाच-

कांना विशेष गोडी वाटते. आत्मचरित्रपर लिखाण वाचण्यास सामान्य वाचक विशेष उत्सुक असतात. बहुधा याच कारणानं कथा किंवा कादंबरी प्रथम पुरुषात लिहिलेली असेल तर ती वाचकांना विशेष आवडते. प्रवासवर्णनाचं आकर्षण वाचकांना वाटतं याचं कारणदेखील हेच असावं, की त्याचं स्वरूप आत्म-कथनासारखंच असतं.

ते कसंही असो, एवढं खास की, प्रवासवर्णन हा साहित्यप्रकार मराठीत पूर्वी जसा दुर्लक्षित होता तसा आता राहिलेला नाही. त्याचे वाचक आता वाढले आहेत. प्रवासवर्णन लिहीणारे लेखकही वाढले आहेत. पूर्वीपेक्षा एकूण मराठी समाजाला प्रवासाची गोडी अधिकाधिक वाटू लागलेली आहे. आणि प्रवासात जे जे पाहिलं, ऐकलं त्याचं वर्णन करणारं लिखाण लिहिण्याची हौसही समाजात वाढलेली आहे. केवळ हौसेसाठी केलेली सारीच प्रवासवर्णनं चांगली असतात असं नाही. त्यांपैकी बहुतेक सामान्य दर्जाची असतात. परंतु मध्येच असं एखादं प्रवासवर्णन वाचायला मिळतं की ते लिहिणारी व्यक्ती साहित्य-क्षेत्रात पहिलंच पाऊल टाकीत असते, परंतु तिच्या लिहिण्यात दर्जेदार साहित्याचे गुण आढळतात.

माझे तरुण मित्र श्री. अशोककुमार स्वामीनारायण यांनी 'फटफटीवरून भारतभ्रमण' या नावाचे जे पुस्तक लिहिलं आहे ते अशांपैकीच आहे.

फार पूर्वी असा एक काळ होता की, प्रवासाच्या फार थोड्या सोई उपलब्ध होत्या. आगगाडी एवढंच प्रवासाचं साधन होतं. साधी काशीयात्रा करायची म्हटलं तरी ते इतकं अवघड कर्म होतं की काशीयात्रा करून माणूस सुरक्षित परत आला की ती परमेश्वराची मोठी कृपा समजली जात असे; आणि यात्रा करून परत आलेला माणूस त्या आनंदाप्रीत्यर्थ इष्टमित्रांना मिष्टान्न भोजन देत असे. आता काळ फार फार बदललेला आहे. प्रवासाची साधनं आणि सोई कल्पनेपलीकडे वाढल्या असल्यामुळं प्रवासात धोका असा फारसा राहिला नाही. आणि 'आम्ही दिल्लीला जाऊन आलो', 'रामेश्वरला जाऊन आलो' असं सांगणाऱ्या माणसाविषयी कुणाला फारसं कौतुक वाटण्याचं कारण उरलं नाही. प्रवासवर्णन वाचण्यात वाचकाला गोडी केव्हा वाटते ?— तर जी स्थळं

लेखक पाहून आला ती अपरिचित असतील तर; विशेष रमणीय असतील तर; किंवा लेखकानं जो प्रवास केला त्यात साहसाचा, धोक्याचा; धैर्याचा, आणि पराक्रमाचा काही भाग असेल तर.

श्री. स्वामीनारायण यांच्या प्रवासवर्णनात हे दोन्ही गुण आहेत. विमानानं आरामशीर केलेल्या प्रवासाची हकिकत वाचण्यात विशेष काही अर्थ वाटत नाही. उलट प्रवास दूरचा नसला, नजिकचाच असला तरी तो करण्यात अडचणींवर मात करण्याचा— म्हणजेच धोक्याचा, साहसाचा काही भाग असेल तर त्या प्रवासाचं वर्णन वाचण्यात अधिक गोडी वाटते.

अशी गोडी श्री. स्वामीनारायण यांच्या या पुस्तकात वाचकाला खचितच वाटेल. फटफटीवरून भारताच्या साऱ्या भागात दौरा काढण्याची कल्पनाच काहीशी साहसी आहे; आणि ती धैर्यानं, निश्चयानं, पार पाडण्यात अभिमानास्पद विक्रम आहे. श्री. स्वामीनारायण यांनी एकूण तेवीस हजार मैलांचा प्रवास पाच महिन्यांत केला. या प्रवासात त्यांना किती अडचणी आल्या, त्या अडचणींतून मार्ग काढताना त्यांच्या अंगचे कोणकोणते गुण कसोटीला लागले, ज्या स्थळांना त्यांनी भेटी दिल्या त्या स्थळांची निसर्गशोभा कशी होती, माणसांचे आणि माणसांच्या विचारसरणीचे किती परोपरीचे नमुने त्यांना आढळले, देशाच्या सद्यःस्थितीवर प्रकाश पाडणारे कोणते अनुभव त्याना मिळाले, या साऱ्या गोष्टी श्री. स्वामीनारायण यांच्या पुस्तकात वाचकाला वाचावयास मिळतात; आणि त्यामुळं वाचकाचं नुसतं मनोरंजनच होत नाही, तर त्याच्या ज्ञानातही भर पडते... शिवाय स्वामीनारायण यांची मातृभाषा मराठी नसूनही आणि लेखनाचा पूर्वानुभव त्यांना नसूनही त्यांचं लिहिणं सफाईदार आणि शैलीदार झालेलं आहे. आपली पहिली साहित्यकृती हातात घेऊन देवी शारदेची पूजा करण्यासाठी आलेल्या या तरुण उत्साही लेखकाचं शारदेच्या दरबारात स्वागत करताना मला फार आनंद होतो.

श्री. स्वामीनारायण यांच्या या पुस्तकाचं मराठी वाचक स्वागत आणि कौतुक करतील याविषयी मला शंका नाही.

वाघाला रक्ताची चटक लागावी त्याप्रमाणं साहसी प्रवासाची श्री. स्वामीनारायण यांना आता चटक लागलेली आहे. जो विक्रम केला तेवढ्यावर ते संतुष्ट राहतील असा संभव नाही. ज्याप्रमाणं भारताचा दौरा केला त्याप्रमाणंच सबंध जगाला प्रदक्षिणा घालण्याचा विक्रम करण्याची त्यांना इच्छा होणं अगदी साहजिक आहे. जगप्रवासाची योजना त्यांच्या मनात सध्या घोळत आहे.... या अधिक मोठ्या साहसातही त्यांना यश मिळावं असं मी इच्छितो.


ना. सी. फडके

'दौलत',
पुणे



श्री. **अशोककुमार** : "··· आपण तरुण पिढीचे पालक आहात."
श्री. **नानासाहेब** : "····मं··· आम्ही चापट मारल्यास सहन करण्याची वृत्ति जोपासली पाहिजे....!"

श्री. **नानासाहेब परुळेकरांना** लेखक भेटले असतां त्यांनी प्रवासाबद्दल विचारपूस केली व लेखनासंबंधी सूचना व शुभचिंतन व्यक्त केले.



प्रस्तावना

मे १९५८ मधील गोष्ट. उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये विद्यार्थ्यांसाठी ' सकाळ ' ने योजलेल्या सायकल स्पर्धेचा प्रसंग होता. तीत भाग घेणाऱ्यांनी सायकलने प्रवास करून देश पहावा त्यासाठी ' सकाळ ' तर्फे मदत रकण्यात येत होती. परंतु नुसता प्रवास न करता त्या बरोबर त्यांनी लेख लिहावेत, ' सकाळ ' मध्ये त्यांना प्रसिद्धी देऊन विद्यार्थ्यांना लेखनाच्या मार्गावर लावता यावे असा तो प्रयत्न होता. स्पर्धेत सामिल झालेल्या विद्यार्थ्यांत अशोककुमार एक होते. कालांतराने सायकल जाऊन त्यांच्या हाती स्वतःची मोटरसायकल आली. विद्यार्थ्यांच्या स्पर्धेत प्रवासाचा पल्ला अडीचशे पाचशे मैलांचा, तर अशोककुमार यांनी स्वतःच्या हिंमतीवर आणि मोटरसायकलीच्या मदतीने सारा देश पालथा घातला, त्यातून त्यांचे हे पुस्तक निर्माण झाले. मोठ्या गोष्टींचा उगम लहानात कुठे आणि कसा असतो याचे हे एक उदाहरण आहे.

अशोककुमार यांचा प्रवास एकंदर पाच महिन्यांचा, एकशे एकावन्न दिवस झाला. तेवीस नोव्हें. १९६७ ला ते पुण्याहून निघाले, एक महिन्याने तेवीस डिसें. रोजी त्यांनी कन्याकुमारी गाठली, त्यानंतर एक महिन्याने तेवीस जाने. १९६८ रोजी सिक्किमची राजधानी गंगटोक येथे ते गेले, तेवीस फेब्रुवारीस दिल्ली, तेवीस मार्चला काश्मीरची राजधानी श्रीनगर आणि तेवीस एप्रिल १९६८ रोजी पुण्याला ते परत आले. प्रवासात असताना विस्तीर्ण देश, त्यांतील विविधता, समाज, त्याचे जीवन आणि निरनिराळ्या देशातील आणि थरांतील त्या त्या ठिकाणच्या थोर व्यक्ति पहाताना किंवा त्यांचा परिचय करून घेतांना " कोणी कडे वळू, काय पाहू, काय सांगू, कोणत्या दिशेला जाऊन या पवित्र मातृभूमिची प्रशंसा करू " अशी गोड अडचण अपल्या मनापुढे उभी असल्याचे वर्णन श्री. अशोककुमार यांनी केले, त्याची काहीशी प्रचीति पुस्तक वाचताना भासू लागेल.

अशोककुमार यांचे लिखाण सोप्याभाषेत आणि असे चटकदार झाले आहे कि पुस्तक वाचताना ते प्रसंग जणू आपण पहातो आहोत, असे माणसाला वाटावे. एकदा पुस्तक हातांत घेतल्यावर अथपासून इतिपर्यंत वाचून पूरे केल्याशिवाय त्याला राहावणार नाही. अशोककुमारांना निसर्ग पाहिला, त्याचप्रमाणे त्या त्या भागातील समाजात मिसळून गेले. त्यांची दृष्टि केवळ वनश्री आणि प्रेक्षणिय स्थळे पाहाण्यापूरती मर्यादित नसून पाच महिन्याच्या काळात देशाच्या जास्तीतजास्त धावता अभ्यास करता येईल तो करण्याची होती.

कोचिन आता पश्चिम किनाऱ्यावरील एक बंदर आणि आयात निर्यातिचे मोठे केंद्र होण्याच्या मार्गावर लागले आहे. या शहराची अल्पावधित पूरी कल्पना यावी व ती आपल्या दप्तरात असावी म्हणून अशोककुमारांनी काय केले, ते त्यांच्याच शब्दांत दिलेले बरे. ते म्हणतात " ... मी येथील सिटी इंजिनियरच्या ऑफिसात गेलो, याला भेटलो त्याला भेटलो, पण नकाशा काही कोणाला सापडला नाही ' अखेर वैतागून बाहेर पडलो..." हे एक उदाहरण तेथे नमूद करण्याचे कारण अशोककुमार यांची अभ्यासू दृष्टि वाचकांच्या ध्यानांत यावी आणि अभ्यास करू म्हणणाऱ्याला साधनांच्या अभावामुळे या देशात

पदोपदी वैताग कसा उभा रहातो याची कपल्ना अशोककुमार यांच्या एका लहानशा उदाहरणावरून वाचकांना यावी.

सदर पुस्तकांत विविधता आणि निरीक्षण आणि ते देखिल हिन्दुस्तात सारख्या खंडप्राय देशभर पडरलेले वाचकांना पहावयास मिळेल. सर्वसामान्य जनतेला पुस्तक संग्राह्य होईल, इतकेच नव्हे तर, शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बक्षिस देण्यासाठी, वाचनालयांतून ग्रंथसंग्रहात, लग्न मुंजीच्यावेळी आहेर आणि भेट म्हणून असे हे पुस्तक उपयुक्त व मोलाचे आहे. ते लिहिल्याबद्दल अशोक-कुमार यांचे मी अभिनंदन करतो.

ना. भि. परुळेकर
सकाळ, पुणे

माझी मनीषा

सैर कर दुनिया की गाफिल, झिन्दगानी फिर कहाँ ?
झिन्दगी गर कुछ बची तो नौजवानी फिर कहाँ ?

माझ्याप्रमाणे अनेकांच्या मनांत असे विचार डोकावून गेले असतील. परंतु श्री अशोककुमार त्यांना मूर्तस्वरूप देण्यास खऱ्या अर्थाने प्रवृत्त झाले आहेत. शब्दचित्राद्वारे इतरांनाही आनंद प्राप्त करून देण्याचे श्रेय त्यांच्या लिखाणाद्वारे त्यांना मिळाले. महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी, साहित्य सम्राट पदमभूषण प्रो. ना. सी. फडके व थोर चिंतक पद्मभूषण डॉ. नानासाहेब परुळेकर या सर्वांनी प्रशंसा केल्यामुळे पुस्तकावर " उत्कृष्ट " हा शिक्कामोर्तब झाला आहेच. वाचकांनी " लोकमान्यता " मिळवून दिल्यास उपकृत होईन.

लेखकाच्या सद्गुणांचे एक अंग म्हणजे छायाचित्रिकरण. " रॉली फ्लॅक्स ' नेच घेतले असावेत ", " माझे मते उत्तम ' याशिका ' वापरला असेल. " अशा तर्कांचा पाऊस अनेक तज्ञांकडून झाला. परंतु हे सत्य आहे की साध्या आग्फा क्लिक III ने हे काढले आहेत. एका कुतुबमिनारचे ३०... खजुराहो मंदिरांचे १८०... सांची स्तूपाचे २५ हून अधिक.... काश्मिरच्या निसर्गाचे २०० हून अधिक असा संग्रह पाहिला की एका वस्तुचे विविध दृष्टीकोनातून निरीक्षण करण्याच्या कौशल्याची कल्पना येते.

लेखनाच्या जोडीला छायाचित्रांची निवड एक पेचप्रसंगच म्हणावा लागेल. अप्रसिद्ध पण उत्कृष्ट स्थळ असावे असे ठरले. पुस्तक प्रसिद्ध करावे अशी सूचना अनेक सुशिक्षितांकडू आली. त्या व्यतिरिक्त माझ्या अनेक तरुण मित्रांना प्रेरणा मिळावी या भावनेने मी प्रकाशनाची जबाबदारी स्वेछेने स्विकारली. चित्रांचा संग्रह इत्यादीवरून तुलनात्मक दृष्ट्या किंमत कमी आहे हे वाचकांना पटेल.


" छपाई " घाईने उरकण्यात काही ठिकाणी मुद्रणदोष राहिले आहेत. त्यामुळे मुद्रण दोष आढळल्यास वाचकांनी विशाल अंतःकरणाने क्षमा करावी ही विनंती.

आम्हास ज्यांनी ज्यांनी सहकार्य दिले त्या सर्वांचा मनःपूर्वक आभारी आहे.

वाचकांना हे पुस्तक उपयुक्त होवो हीच माझी मनीषा !

पुणे, **सुरेशचंद्र सुरतवाला**

१७-३-७०



लेखक श्री. **अशोककुमार स्वामीनारायण** यांनी प्रवास करून व लेखमाला लिहून राष्ट्रिय एकात्मतेस हातभार लावला म्हणून पुणे महानगरलिकेनें त्यांचा सत्कार केला. लेखक भाषण करीत असून (डावीकडून). पु. म. न. पा. चे सचिव श्री. **जाधव**, महापौर भाई **कडू** व उपमहापौर श्री. **तेज पारवानी** मागे श्री. **बिबवे**

पुणें महानगरपालिकेतर्फे सत्कार-समारंभ

मा. अशोककुमार स्वामीनारायण,

मा. सभासद महानगरपालिका अधिकारी,

आसेतुहिमाचल प्रवास करणारे श्री. अशोककुमार यांचा पुणे महानगर-पालिकेच्या वतीने सत्कार करतांना आम्हांस अत्यंत आनंद वाटत आहे.

सर्व भारतभर संचार करावा, देशातील कानाकोपऱ्यांतील विविध थरांतील नागरिकांच्या भेटी घ्याव्या, त्यांच्या विभिन्न चालीरीती आणि संस्कृती यांचा अभ्यास व परस्पर सामंजस्य निर्माण करून प्रेम वाढवावे, हा अशोककुमार यांच्या प्रवासाचा मुख्य हेतू होता. त्यांनी जवळ जवळ २३ हजार मैलांचा प्रवास स्वतःच्या मोटरसायकलवरून केलेला आहे. या प्रवासात सुमारे ३,००० निरनिराळ्या थरांतील नागरिकांशी त्यांचा संबंध आला. यामध्ये अगदी सामान्य कामगार ते नामदार मंत्री यांचा समावेश होता.

श्री. अशोककुमार यांच्या प्रवासाबाबत थोडा पूर्वेतिहास सांगितल्यास ते अस्थानी होणार नाहीं.

श्री. अशोककुमार यांना त्यांच्या लहानपणापासून प्रवासाची फार आवड आहे. लहानपणीच सर्व भारतभर संचार करण्याचा त्यांनी निश्चय केला होता, व त्या-प्रमाणे त्यांनी अनेक ठिकाणी जाऊन तो कृतीतही आणला आहे. सन १९५७ सालात सर्व राज्यभर त्यांनी दुचाकीवरून प्रवास केला आहे; व संधी येताच शेवटी त्यांनी वरीलप्रमाणे स्वयंचलित दुचाकीवरून प्रवासास सुरुवात केली.

श्री. अशोककुमार हे उंचीने ठेंगू आहेत. मोटरसायकलवर बसल्यावर घडपणे त्यांचे दोन्ही पाय एकदम जमिनीस टेकत नाहीत. त्यांनी नेलेल्या मोटरसायकल

आणि सामानाचे वजन त्यांच्या चौपट होते. अशा परिस्थितीत हजारो मैल प्रवास करताना त्यांना किती त्रास झाला असेल याची कल्पना येते.

प्रवासात असताना त्यांना वाटेत ऊन, पाऊस व वाऱ्याला तोंड द्यावे लागले आहे. त्याचप्रमाणे अत्यंत उष्ण व तितक्याच थंड हवेतूनही मार्ग काढावा लागला आहे. प्रवासात असताना चाकातील हवा गेली, यान्त्रिक बिघाड झाला, तर आडरस्त्याला दुरुस्त्या करून त्यांना पुढे जावे लागले आहे. जेथे रस्ता अत्यंत निकृष्ट आहे तेथे मोटरसायकल हातांत घेऊन चालावे लागले आहे. नदी, नाले, जंगले तुडवावी लागली आहेत. कित्येक वेळेला सबंध रात्रभर प्रवास ते करीत असत. रस्त्याने डोंगरातून जाणारे अवघड घाटही त्यांनी लीलया पार केले आहेत. त्यांच्याच बोलण्यात असे आले आहे की, कितीही खडतर प्रवास केलेला असो, त्यांचे उद्दिष्ट त्यांच्या दृष्टिक्षेपात आले म्हणजे त्यांना सर्व श्रमांचा विसर पडून ते ताजेतवाने होत असत.

हिमालयाची शुभ्र उत्तुंग शिखरे, दऱ्याखोऱ्या, तेथील नद्या पाहून त्यांच्या नेत्रांचे पारणे फिटले आहे. प्रवासात असताना विषम हवामानात साधे कपडे घालून प्रवास करणाऱ्या सामान्य जनांच्या वाट्यास येणारी दुःखे त्यांनी अनुभवली आहेत. परंतु या सगळ्या हालअपेष्टांतून त्यांनी आपला प्रवास पूर्ण केलेला आहे.

या प्रवासात ते खेडेगावातून सामान्य नागरिकांकडे वस्ती करून राहिले होते. या लोकांच्या स्मृती कायम राहाव्या म्हणून या सुखद स्मृतींचे टिपण त्यांनी छायाचित्रे घेऊन केले आहे. त्यांनी ‘बाबा’लोकांशी गट्टी केली असून काही लोकांशी आठवणी चिरकाल राहाव्यात म्हणून पत्रव्यवहारही सुरू केला आहे.

हा प्रवास करून मा. अशोककुमार स्वामीनारायण यांनी काय मिळविले ?— असा प्रश्न उपस्थित केल्यास ‘खूप’ असे एकाच शब्दात उत्तर देता येईल. आज निरनिराळ्या राज्यांत भावनात्मक ऐक्य असावे असे वरपासून खालपर्यंत सर्व नेते वक्तव्य करीत आहेत. हे कार्य न बोलता श्री. अशोककुमार स्वामी-नारायण यांनी करून दाखविले आहे. निरनिराळ्या राज्यांतील नागरिकांशी विचारांची देवाण घेवाण करून त्यांनी परप्रान्तातील हजारो नागरिकांशी स्नेहसंबंध जोडले आहेत. श्री. अशोककुमार स्वामीनारायण यांची भारतातील निरनिराळ्या

राज्यांतील काही नागरिकांची एक 'प्रवासविषयक' यंत्रणा उभारून तिच्यामार्फत एकमेकांच्या राज्यांतील नागरिकांचा प्रवास घडवून आणणे, प्रवासास योग्य ते मार्गदर्शन, साहाय्य करणे, निरनिराळया राज्यांतील स्नेहभाव प्रस्थापित करून तो वृद्धिंगत करावा अशी इच्छा आहे. यामुळे निरनिराळया राज्यांतील नागरिकांच्या मनात एकमेकांबद्दल प्रेम व आपुलकी निर्माण होईल, एकमेकांच्या अडीअडचणी समजावून त्या दूर करण्याचा प्रयत्न होईल, त्यांच्या विचारांची पातळी उंचावेल, आणि देशाच्या ऐक्यालाही ते आवश्यक ठरेल.

श्री. अशोककुमार यांच्या या उपक्रमाला आमचे मनापासून आशीर्वाद आहेत.

श्री. अशोककुमार यांनी प्रवासातील हकीकतींचे टाचण करून ते पुण्यातील 'रविवार सकाळ' या प्रसिद्ध साप्ताहिकाद्वारे ते प्रसिद्ध करीत आहेत. हे प्रवासवर्णन अत्यंत आकर्षक व वाचनीय झाले आहे. आपणांस आलेले अमोल अनुभव त्यांनी रसिक जनांसमोर खुले केले आहेत. श्री. अशोककुमार यांच्या या उपक्रमाने येथील अनेक तरुण अशा प्रकारचे उपक्रम हाती घेतील अशी आम्हांस आशा आहे. नुकताच येथील येरवडा प्रिंटिंग प्रेसमधल्या काही कामगारांनी सायकलीवरून दिल्ली-- व परत पुणे, अशा तऱ्हेचा प्रवास पूर्ण केला आहे, तोही कौतुकास्पद आहे.

श्री. अशोककुमार स्वामीनारायण यांच्या या साहसाबद्दल व राष्ट्रीय कामगिरीबद्दल पुणे महानगरपालिकेतर्फे आम्ही त्यांचे हार्दिक अभिनंदन करून आमच्या भावनांचे प्रतीक म्हणून त्यांस हा पुष्पहार व गुच्छ अर्पण करीत आहोत.

१७-३६८- दिगंबर शांताराम कद्रू

सत्कारास उत्तर

सन्माननीय महापौर भाई श्री. कड्ड, उपमहापौर श्री. तेजवानी, महानगरपालिकेचे सन्माननीय सदस्य, व उपस्थित नागरिक बंधु–भगिनी या सर्व थोरांचा प्रेमाशीर्वाद मागून मी माझ्या भाषणाला शुभारंभ करू इच्छितो.

आपल्या सामर्थ्यापलीकडचे एखादे कार्य करावयाचे असल्यास वडीलधाऱ्या मंडळींचा आशीर्वाद आवश्यक असतो. आपल्यापैकी बहुसंख्य माझ्यापेक्षा वयाने ज्येष्ठ आहेत; तेव्हा आपल्या सर्वांसमोर व्यासपीठावरून भाषण करणे ही माझ्या मते थोडी कठीण कामगिरी आहे. त्यातूनही अशा प्रशस्त जागेत भाषण करण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग. यापूर्वी मी शाळा व कॉलेजमध्ये भाषणें दिली आहेत, परंतु तेथे बहुसंख्य समवयस्क श्रोते असल्याकारणाने काळजीचे विशेष कारण नव्हते. या प्रसंगी माझ्या तोंडून काही आयोग्य बोलले गेले असे वाटल्यास आपण सर्वांनी औदार्य दाखवून क्षमा करावी, अशी मी नम्र प्रार्थना करतो.

समारंभाच्या शेवटी सहसा आभार प्रदर्शनाचे कार्य असते, अशी प्रथा आहे. परंतु हे क्रान्तिकारी युग लक्षात घेऊन मी ती प्रथा मोडण्याचे थोडे धाडस करीत आहे. मी मोटरसायकलवरून मातृभूमीचे दर्शन स्वकष्टाने व स्वखर्चाने जरी घेतले असले तरी त्यामागे अनेकांच्या सहकार्याचा मोठा वाटा आहे. माझे परममित्र श्री. सुरेशचंद्र बाबुभाई सुरतवाला यांनी माझ्या व्यापाराची व इतर वैयक्तिक खाजगी बाबींची काळजी स्वतः वाहिली नसती तर माझा प्रवास यशस्वी होणे अशक्य होते. तसेच त्यांच्या मातोश्री श्रीमती रुक्मिणी बाबुभाई सुरतवाला यांनी मातेचे प्रेम देऊन सर्व सोय करून आशीर्वादासह प्रेमळ निरोप दिला नसता तर मी निश्चिंतपणे प्रवास करू शकलो

नसतो. माझ्या प्रवासकाळात अनेक देशबांधवांनी मला आपुलकी दिली व काही मंत्र्यांनी व राज्यपालांनी आशीर्वाद दिले– त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

माझ्या प्रवासाची सर्वप्रथम बातमी दिली असेल तर ती दैनिक केसरीने. नंतर पुण्याच्या सर्व वर्तमानपत्रांनी बातमी प्रसिद्ध केली. पुण्याचे त्या वेळचे महापौर श्री. नानासाहेब गोरे हे निरोपसमारंभास उपस्थित राहिले व त्यांनी मार्गदर्शनपर भाषण करून मला उपकृत केले. डॉ. रमेशचंद्र शहा यांनी माझा प्रवास सफल होण्याकरिता बरेच कष्ट घेतले. जगात अनेक प्रशंसनीय गोष्टी घडत असतात, परंतु त्या पडद्याआड राहिल्या म्हणजे त्यांची किंमत शून्यवत राहते. माझ्या कार्याला सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे बहुमोल कार्य कोणी केले हे आपणा सर्वांना ठाऊक आहेच. डॉ. नानासाहेब परुळेकर यांच्याबद्दल अनेक वर्षांपासून माझ्या मनात फार मोठा आदर आहे. 'सकाळ'च्या वाढदिवसाच्या समारंभी त्यांनी माझ्या कार्याचा आपल्या तोंडून गौरव केला, व "आम्हांला तुमच्यासारख्या धाडसी तरुणांची फार गरज आहे." असे सांगून प्रेमाशीर्वाद दिला. राष्ट्रपतींनी त्यांना पद्मभूषण हा किताब बहाल केला, तेव्हा मी पुष्पहार अर्पण करून शुभेच्छा व्यक्त करण्यास गेलो असता, मुद्दाम वेळ काढून त्यांनी माझ्या लेखमालेबद्दल चर्चा केली, व लेखनासंबंधी मार्गदर्शन केले. सकाळचे सहसंपादक श्री. मुणगेकर हे प्रसिद्धिविमुख आहेत. पडद्याआड राहून ते समाजाची बहुमोल सेवा करत असतात. माझ्या लेखमालेला यशस्वी करण्यात त्यांच्या आत्मीयतेचा फार मोठा वाटा आहे.

श्री. नामदेवरावजी मते यांचा तर या सत्कार समारंभाशी मोठा आश्चर्यकारक संबंध आहे. क्षमाशीलता व मनाचा मोठेपणा श्री. नामदेवरावजी मते यांच्यामध्ये मला दिसून आला. गेल्या वर्षीच्या कॉर्पोरेशनच्या निवडणुकीत मी त्यांच्या विरुद्ध प्रचार केला. परंतु या गोष्टीकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करून त्यांनी माझ्या कार्याचा मनापासून गौरव केला. त्यांनी माझ्या सत्कारासाठी ठराव मांडला हे जेव्हा मला समजले तेव्हा फारच आश्चर्य वाटले! त्याहूनही अधिक आनंद मला या गोष्टीचा झाला की, त्यांनी माझ्याबद्दल मनात मुळीच राग न ठेवता फारच आपुलकीची वागणूक दाखविली. या ठरावाचे वर्तमान जेव्हा मेयरसाहेबांच्या कानी गेले तेव्हा ते असे म्हणाल्याचे समजते की, "ज्याप्रमाणे

बागेची शोभा विविध फुलांमुळे असते त्याप्रमाणे अशा तरुण–तरुणींमुळे शहराची शोभा वाढते ! तेव्हा त्यांच्या गुणांचा गौरव अवश्य व्हायला हवा." अशा रीतीने अनेकांच्या सहानुभूती–सहकार्यामुळे व प्रयत्नांचे फळ म्हणून हा सत्कार समारंभ घडून आला आहे. त्या सर्वांचा मी आभारी आहे.

आजचा हा प्रसंग मी भाग्याचा समजतो. परंतु माझे त्याहूनही मोठे जर कोणते भाग्य असेल तर ते म्हणजे माझा या पुण्यनगरीत जन्म झाला. या भूमी-वरून वाहणाऱ्या हवेवर व पाण्यावर मी वाढलो. ही संतांची भूमी आहे, ही शिवाजीमहाराजांसारख्या थोर राज्यकर्त्यांची भूमी आहे, ही साहित्यिकांची भूमी आहे, ही कलाकारांची भूमी आहे, ज्यांनी गीतारहस्यासारखे ज्ञानभांडार निर्माण केले व स्वराज्याचा मंत्र दिला– अशा लोकमान्य टिळकांची भूमी आहे. महात्माजी जेव्हा आफ्रिकेहून भारतात आले तेव्हा त्यांना उपदेश देण्यात आला की, "प्रथम सबंध देशाचे पर्यटन करा... आपले देशबांधव कसे आहेत हे समजून घ्या, व नंतरच राजकारणात प्रवेश करा" हा अत्यंत उपयुक्त उपदेश देऊन बापूजींच्या राजकीय जीवनाचा पाया ज्यांनी भक्कम केला त्या गोखल्यांची ही भूमी आहे. पर्यटनाशी या सत्काराचा संबंध असल्यामुळे सांगतो, ज्यांनी अनेक वेळ सबंध भारताची पदयात्रा केली, त्या संत रामदासांची ही भूमी आहे. या पुण्यनगरीचा मला अभिमान वाटतो. माझ्या प्रवासात मी अनेकांजवळ पुण्याचा मोठेपणा अभिमानाने वर्णिला, आणि आज जाहीर रीत्या माझे प्रेम मी व्यक्त करीत आहे.

आता मी मूळ विषयाकडे वळतो. या खुर्चीवर मी बसलो असता माझी काय अवस्था झाली असेल याची कल्पना आपणाला करवणार नाही. लहान मुलांना मोठ्या खुर्चीवर बसविल्यावर जसे पाय लोंबकळत असतात तसे माझे झाले. मला काही वर्षांपूर्वीचे प्रसंग आठवले. मी नव्याने जेव्हा मोटरसायकल चालवू लागलो तेव्हा दोन्ही पाय एका वेळेला जमिनीवर टेकवू शकत नसल्यामुळे मला फार त्रास व्हायचा. अनेक वेळा गाडीवर तोल जायचा. तेव्हा माझे काही मित्र मला हसायचे;– तसं मला पाहिल्यावर कोणीही सुरुवातीला हसतोच म्हणा... परंतु ते मुद्दाम या गोष्टीवरून हसायचे, आपुलकीच्या भाषेत क्वचित कोणी असेही म्हणत असे, "बाबा रे... तू हा नाद सोड.... मरशील विनाकारण– कोठे

धडक देऊन... " परंतु मला आत्मविश्वास होता, व या आत्मविश्वासाच्या जोरावर मी हे पर्यटन केले; तेव्हा मी नाद सोडावा किंवा न सोडावा हा वादाचा विषय राहिला नाही.

मी जूनअखेर १९६६ ला मोटरसायकल घेतली, व चौथ्याच दिवशी मुंबईला जायला निघालो. सायंकाळची पाच वाजेची वेळ होती. मुंबई–पुणे रस्त्यावर मी पोहोचतो न पोहोचतो तेवढ्यात पावसाळ्यातील पहिला पाऊस सुरू झाला. ' पुढे टाकलेले पाऊल पुढेच पडू द्यायचे... ' या जिद्दीने मी पावसात प्रवास केला. अल्पावधीत सर्वांग भिजले. सूट-केसमध्ये काय झाले असेल याची मी परवा केली नाही. लोणावळा, खंडाळा या भागात पाऊस त्रासदायक होता... घाट उतरणे फार कठीण होते, गाडी नवीन होती, व मी प्रथम खंडाळा घाट मोटरसायकल-वरून उतरत होतो. फारच सावधतेने, परंतु निश्चित होऊन मी प्रवास केला! रात्री मुंबईला पोहोचलो. तेव्हादेखील पावसाचा जोर कमी झाला नव्हता. या माझ्या अनुभवामुळे माझ्या भारत-भ्रमणात मला अनेक ठिकाणी पावसात प्रवास करण्याची पाळी आली, परंतु त्यातून मी सुखरूप प्रकृती सांभाळून प्रवास करू शकलो.

पुढे हिवाळा लागला. एके रात्री उशिरापर्यन्त मी व माझे धंद्यातील भागीदार श्री. सुरेशचंद्र सुरतवाला चर्चा करीत बसलो होतो. आमची चर्चा संपल्यावर रात्री दीड वाजता मी त्यांना सांगितले की, ' अनेक दिवसांपासून कोठे गेलो नाही, तेव्हा दोन दिवस कोठे तरी फिरून यावे असे वाटते. ' त्यांनी तत्परता दाखविली व ते म्हणाले, ' सकाळच्या गाडीने मुंबईला जा व दोन दिवस राहून ये. ' परंतु मी त्याच वेळेला सूट-केस तयार केली व त्याला ' निघतो ' म्हणून सांगितले. मोटरसायकलवर सूट-केस बांधून मी माझ्या एका स्नेह्याला भेटण्यासाठी सोलापूरच्या दिशेने गाडी पळवली. ऐन हिवाळी थंडीत पहाट होईपर्यन्त अंधाऱ्या रात्री क्वचित एखादा ट्रक दिसेल अशा सोलापूर रस्त्यावर मी एकटा प्रवास करीत होतो. सोलापूरला गाडी थांबविली, व मी उभा राहिलो. तेव्हा अक्षरशः दोन-तीन मिनिटे आतड्यापासून कातडीपर्यंत मी नखशिखान्त थरथर कापत होतो. अशात मला कोणी पाहिले असते तर त्याला अतिशय नवल वाटले असते यात शंका नाही.

तिसरा एक प्रसंग असा घडला की, आमच्या मित्रांना मुंबईला मोटरसायकलीवरून फिरण्याची इच्छा झाली. सकाळी ऐन वेळेवर निघताना मोटरसायकलीचे चाक पंक्चर झाले, व इतर दुरुस्ती निघाली. त्यामागे सबंध दिवस गेला, तरी गाडी तयार झाली नाही. म्हणून रात्रीचे दहा वाजता एका मित्राची गाडी घेऊन होती त्या अवस्थेत मुंबईच्या रोखाने सुरू केली. रात्री अकराला आम्ही निघालो, व दुसऱ्या दिवशीच्या रात्री अकरापर्यंत परतण्याचे सुरेशभाईंच्या मातोश्रींना आश्वासन दिले होते. सबंध रात्र थंडीने प्रवास करून पहाटे तेथे पोहोचलो. अर्धा तास विश्रान्ती घेतली. आंघोळ, न्याहारी करून आम्ही तास– दीड तासाने मुंबईत भ्रमण सुरू केले. भर उन्हात सबंध दिवस एकसारखे फिरलो, व सायंकाळी साडेसहाला पुण्याच्या रोखाने निघालो. खोपोलीजवळ गाडी थांबवून आम्ही हॉटेलमध्ये बसलो. दोन बोटांच्या संकेताने दोन चहाचे कप मागविले. तो ते कप आणतो तेवढ्यात आम्ही दोघेही टेबलावर डोके टेकवून शान्त झोपलो होतो ! त्या मुलाने उठविले, चूळ भरून झाल्यावर चहा घेतला व निघालो. वाटेत अनेक वेळा मागे बसलेल्या आमच्या मित्राचे डोके माझ्या डोक्यावर आदळले. वेगाने धावणाऱ्या गाडीवरचा एक हात सोडून दुसऱ्या हाताने त्याला चिमटा घेऊन मी उठवायचो, व न थांबता पुढे व्हायचो. अशा रीतीने घरी आश्वासन दिल्याप्रमाणे रात्री ठीक ११ वाजता अंगणात गाडी आणून उभी केली.

माझ्या भारतभ्रमणाच्या सुरुवातीला हे तीन प्रसंग हेच माझे पूर्वानुभवाचे भांडवल. परंतु या तिन्हींमध्ये तिन्ही ऋतुमानांचा चांगला अनुभव आला होता. स्वतःवरील आत्मविश्वास अनेक पटीने वाढला होता. थोड्याच दिवसांनी माझ्या भारत-यात्रेला मी एकट्याने सुरुवात केली. माझ्या लहान मित्रांना मी असे सांगू इच्छितो की, तुमच्यात असलेल्या योग्य व अयोग्यतेचा तुम्ही चांगला अंदाज बांधला म्हणजे आत्मविश्वास निर्माण होतो.

माझा प्रवास एकंदर पाच महिन्यांचा झाला.... म्हणजे १५१ दिवस. सर्व स्थळांची, मार्गांची कल्पना येथे देणे शक्य नाही. परंतु मी एकदम थोडक्यात ती देतो. २३ नोव्हेंबर ६७ ला मी पुण्याहून निघालो; एक महिन्याने २३ डिसेंबरला मी कन्याकुमारीला होतो. २३ जानेवारी ६८ ला सिक्कीमची राजधानी गंगटोक येथे

होतो. २३ फेब्रुवारी भारताची राजधानी दिल्ली, २३ मार्च काश्मीरची राजधानी श्रीनगर, व २३ एप्रिल १९६८ रोजी मी या पुण्यनगरीत परतलो होतो.

अगदी बोटावर मोजण्याइतकीच प्रेक्षणीय स्थळे सोडली तर मी भारतातील सर्व पाहण्याजोग्या स्थळांना भेट दिली आहे. ‘ रविवार सकाळ ’मधील माझ्या लेखमालेत त्यासंबंधी मी लिहिले, व अजूनही लिहिणार आहे. विविध दृष्टिकोणातून मी प्रवासात अभ्यास केला असल्याकारणाने माझी अवस्था Buridons Ass सारखी झाली आहे. ब्युरिडोन हा एक इंग्लिश लेखक, व ॲस म्हणजे गाढव. त्याने एका गाढवाबद्दल लिहिले आहे. हा गाढव चारा चरायला निघतो... डाव्या बाजूला पाहतो– विस्तीर्ण मैदान हिरव्यागार गवताने व्यापलेले असते, त्या दिशेला एक पाऊल टाकतो. नंतर मागे वळून उजव्या बाजूला पाहतो. तेथे गवत त्याहूनही हिरवे व विपुल प्रमाणात असल्याचे आढळते.... परंतु त्या दिशेला पाऊल टाकल्यावर पुन्हा विचार करून डाव्या बाजूला पाहतो.... व त्याचा विचार बदलतो. अशा रीतीने डावी–उजवी करता करता त्या चार पावलांपुढे तो एक पाऊल टाकू शकत नाही... अतिशय थकतो.... सकाळची संध्याकाळ होते, व तो जमिनीवर ढासळतो ! त्या गाढवाप्रमाणे माझे हाल जरी होणार नसले तरी मी त्याच्याप्रमाणे विवंचनेत पडलो आहे एवढे खरे. काय काय सांगू ? कोणत्या दिशेला जाऊन या पवित्र मातृभूमीची प्रशंसा करू ?– अशी एक गोड अडचण माझ्या डोळ्यांसमोर उभी आहे.

आज प्रान्ताप्रान्तामध्ये जमिनीसाठी, पाण्यासाठी, विजेसाठी, उद्योगांसाठी, कारखानदारीसाठी, भाषेसाठी भांडणे चालू आहेत. वर्तमानपत्रांतून बातम्या वाचणाऱ्या माणसाच्या मनात इतर प्रान्तांबद्दल व तेथील लोकांबद्दल विलक्षण गैरसमज पसरत आहे. त्यामुळे मला असे हमखास सांगवेसे वाटते की, प्रान्ताप्रान्तातील, शहरातील, खेड्यातील, किंवा छोट्या छोट्या वस्त्यांमधील सर्व लोकांमध्ये देशातील सर्व प्रान्तांबद्दल, सर्व लोकांबद्दल... म्हणजे सबंध राष्ट्राबद्दल, नसानसांतून प्रेम वाहात आहे...! मला माझ्या विस्तृत प्रवासात एकही माणूस भेटला नाही की, ज्याने माझ्याकडे देशबांधव या दृष्टीने पाहिले नाही... एकही व्यक्ती अशी भेटली नाही की जिने आपले राष्ट्रप्रेम व्यक्त केले नाही. मला जो अनुभव आला तो मी व्यक्त करीत आहे. ही वाईट परिस्थिती कशामुळे आहे,

ती दूर करण्यासाठी काय करावे हा प्रश्न मोठ्यांचा आहे;– पुढाऱ्यांचा आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, अशा प्रकारची परिस्थिती जास्त काळ राहिली तर सर्व थोर लोकांवरचा तरुण पिढीचा विश्वास त्यांच्यावरून उडणार असे दिसते !

आजच्या परिस्थितीतून विषमता दूर करण्यासाठी मला एक कल्पना सुचली. त्या कल्पनेला घेऊन मी प्रवास करीत होतो. अनेक थोर पुढाऱ्यांसमोर व इतर नागरिकांसमोर मी माझे विचार मांडले, आणि प्रवास संपल्यानंतर अखिल भारतीय युवक संघटनेची स्थापना झाली. कोणत्याही प्रान्ताच्या प्रमुख शहरांमध्ये सर्व प्रान्तांतील नागरिकांचा समावेश असतो, पुण्यातही त्याप्रमाणे आहे. त्या सर्व प्रान्तांतील तरुण–तरुणींना एकत्र आणून साहित्य, कला, क्रीडा, पर्यटन असे काही विभाग करून त्यांना कार्यास प्रवृत्त करणे; राष्ट्रात एक भाषा असणे आवश्यक आहे, त्या दृष्टीने प्रगती होण्यासाठी सर्व भाषेचे विनामूल्य वर्ग चालू करावेत. आपल्या तरुणांना तामिळ, कन्नड, मल्याळम, तेलगू इत्यादी शिकण्यास प्रवृत्त करावे. अर्थात आपली मातृभाषा इतरांस शिकवण्यात सर्वांना अभिमान वाटतो. तसेच त्यांनादेखील नंतर हिन्दी शिकण्यास संकोच वाटणार नाही. दुसरे असे, संघटनेत जितक्या समित्या असतील त्या सर्वांमध्ये सर्व प्रान्तांतील एक एक सभासद असावा असा प्रयत्न करणे. त्यामुळे त्यांना आपोआप त्यांच्यापुढील भाषेच्या अडचणींची कल्पना येईल, व ती दूर करण्यासाठी प्रयत्न करण्याची मनोवृत्ती निर्माण होईल. पुणे, मुंबई, बेळगाव, बेंगलोर, म्हैसूर, कोचीन, त्रिवेन्द्रम, मद्रास, मदुराई, हैद्राबाद, विजयवाडा, भुवनेश्वर, कटक, कलकत्ता, पटना, वाराणसी, लखनौ, दिल्ली, जयपूर, अहमदाबाद इत्यादी मोठ्या शहरांमध्ये अशा प्रकारच्या संघटना सुरू होऊ शकतील. पर्यटन विभागाद्वारा इतर प्रान्तांत पर्यटने आयोजित करून संपर्क साधून अडी-अडचणी समजून घेता येतील. दुसऱ्याच्या अडचणी समजल्यानंतर माणसाचे मन आपोआप उदार होते, व विशाल दृष्टिकोण निर्माण होतो. कल्पना करणे सोपे आहे, परंतु कार्य करणे फार कठीण आहे. आजच्या तरुणांनी भावी पिढीत विषमता दूर होईल असा प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा घ्यावयास हवी, असे मला वाटते.

मी त्रिवेन्द्रमच्या एका होटेलमध्ये बसलो असता मुद्दाम काही विद्यार्थ्यांशी परिचय करून घेतला. बोलता बोलता आपुलकी निर्माण झाली. त्यांना माझ्या-

बद्दल आदर वाटला, व मी निर्धास्त झालो. हळूच मी हिन्दी विरोधाचा मार्मिक विषय काढला. त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर मी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. राष्ट्राची एक भाषा हवी व ती भारतीय हवी, हे त्यांनी कबूल केले. मी त्यांना म्हणालो, "उत्तर भारत, पूर्व भारत, पश्चिम, मध्य भारतातील लोकांनी दक्षिणेच्या कोणत्याही एका भाषेचा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारण्याचा आपला निश्चय जाहीर केला— तर आपण सर्व मिळून एक भाषा सुचवू शकाल का? तामिळ तुम्हांला पटेल का? किंवा मल्याळम त्यांना किंवा म्हैसूर व आंध्रच्या लोकांना पटेल का?" याचे त्यांच्याकडे उत्तर नव्हते. ते विषय समजून न घेताच चळवळी करीत होते, हे त्यांचे त्यांनाच पटले. या विद्यार्थ्यांप्रमाणे इतर ठिकाणीदेखील मला असा अनुभव आला की, लोक शान्त चित्ताने म्हणणे ऐकून घेतात...आपुलकीने दुसऱ्यांची मते समजावून घेतात. अशी शान्त, सौम्य, सोशिक या भारताची प्रजा आहे. वाराणसीमध्येदेखील विद्यार्थ्यांना मद्रासी लोकांना विनामूल्य हिन्दी शिकवून त्यांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करावा असे सांगता त्यांना ते पटले. हा तर भाषेचा प्रश्न आहे. फारसा उग्र नाही. परंतु श्रीनगरमध्ये जो ज्वालामुखी निर्माण होत आहे, त्याची कल्पना करवणार नाही. एका शिंप्याच्या दुकानी काही मुस्लिम तरुणांशी माझे बोलणे झाले. ते म्हणाले, "भारताने हा प्रदेश बळकावला आहे. तो आम्ही आज ना उद्या स्वतंत्र करू." येथे आमचा फार वाद झाला. परंतु दुसऱ्या दिवशी मला जरूर पडली तेव्हा आपल्या हातचे काम सोडून त्यांच्यापैकी एक माझ्याबरोबर आला, व त्याने आपले श्रम व वेळ माझ्यासाठी खर्ची घातले. अशा निर्दोष लोकांची कानाकोपऱ्यांत एक वा दुसऱ्या कारणाने मने भडकविण्याचा जो प्रकार चालला आहे तो राष्ट्राला फार घातक आहे.

काश्मीरच्या हिमाचल प्रदेशच्या, कुमाँव व इतर दऱ्याखोऱ्यांतील लोकांना मुंबई, मद्रास, कलकत्त्याची भव्यता दाखवा, महाराष्ट्रामधील अजंठा, इलोरा दाखवा, म्हैसूरमधील बेलूर, व हळेबीड, म्हैसूरचे पॅलेस दाखवा, केरळचा पाम-वृक्षांनी सुशोभित समुद्र-तट दाखवा. कन्याकुमारी, मदुरा, मीनाक्षी, चिदंबरमचे नटराज मंदिर, पाँडिचेरीचा अरविन्दाश्रम, मद्रासचा मरीना, मुंबईचा मरीन ड्राइव्ह, कलकत्त्याची चौरंगी व बिर्लांचे प्लॅनिटोरियम दाखवा, नागार्जुनसागर-

मारखे धरण व टाटानगर येथील उद्योग दाखवा. त्यांच्या मनात या सर्वांबद्दल प्रेम निर्माण करा. अभिमान निर्माण करा. प्रत्येकाला असे वाटायला पाहिजे– हे 'माझे' आहे, ही माझ्या 'राष्ट्राची संपत्ती' आहे, हा माझा प्रगतिपथा-वरील सुंदर देश आहे;– म्हणजे विषमता दूर होईल. या भागातील लोकांना दार्जिलिंगचा रम्य परिसर पाहता येईल...हिमालयाचे दर्शन करता येईल; अशा नागरिक योजना आखावयास हव्या. म्हणजे त्यांना त्या भागाबद्दल आपुलकी वाटेल. माननीय गृहमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण पुण्याच्या आपल्या भाषणात म्हणाले होते की, "हिमालयावर दुश्मनांची स्वारी झाली तर सह्याद्री धावून जाईल." अशा प्रकारचे सुंदर बोल सर्व नागरिकांच्या तोंडून सहज स्वाभा-विकतेतून आवेशाने निघावेत अशी माझी इच्छा आहे. काश्मीरचा नयनमनोहर, अति विशाल,– बागेची उपमा ज्याला देता येईल असा प्रदेश सामान्य नाग-रिकांना पाहण्याची संधी कशी प्राप्त करून देता येईल याची काळजी घेण्याची फार गरज आहे. हे राष्ट्र माझे आहे, पंजाबी, बंगाली, मद्रासी माझे राष्ट्रबंधू आहेत असे म्हणणे आणि प्रत्यक्षात तेथे जाऊन त्यांच्यामध्ये राहून राष्ट्राचे दर्शन घेणे यात फार फरक आहे.

मुंबई, मद्रास, कलकत्ता इत्यादी शहरे फार मोठी आहेत; तेथे सर्व सुखसोई उपलब्ध आहेत. कामधंदा मिळणे सोपे आहे, पैसा मिळविणे सोपे आहे, उदर-निर्वाह करणे सोपे आहे. अशा सुखवस्तू शहरातील लोकांना हिमालयाच्या परि-सरातील डोंगर व दऱ्याखोऱ्यांच्या प्रदेशात काही दिवस राहण्याची सोय करा, तेथे जावयास प्रवृत्त करा. तेथे लोकांना आपले जीवन जगण्यासाठी किती कष्ट करावे लागतात हे डोळ्याने पाहू द्या....त्यांना कोणत्या चैनीच्या वस्तू उपलब्ध आहेत याचे निरीक्षण करू द्या. माझी खात्री आहे– जो त्या कष्टाळू लोकांचे जीवन पाहून परतेल तो भारतीय चुकूनदेखील हातात मशाल घेऊन आगी लावणार नाही.... तो भारतीय चुकूनदेखील विटा-दगडांचा मारा करणार नाही.... त्याच्या हाताने दुकानांची लूट होणार नाही... विजेचे खांब वाकविले जाणार नाहीत.... आगगाड्यांना आगी लावल्या जाणार नाहीत... उडुपी भारतीयांची हॉटेल्स उद्ध्वस्त होणार नाहीत.... थोडक्यात मी असे म्हणेन की, त्यांची दृष्टी विशाल होईल. आपले देशबांधव राब राब राबतात, परंतु त्यांना जेमतेम दोन वेळ जेवावयास मिळते... भयंकर थंडीत कोडाईकनलसारख्या ठिकाणी अन्नवस्त्रा-

विणे लोक उंदीर–घुशीप्रमाणे मरतात. उत्तरेत सतत बर्फाचा पाऊस पडत असताना, हिमवर्षाव होत असताना, एकट्या दुकट्या झोपड्यांमध्ये दोन दोन, चार चार दिवस ज्यांना डांबून बसावे लागते, सतत विस्तव तेवत ठेवून अंगाचे संरक्षण करावे लागते, जेमतेम वाचविलेल्या कष्टाच्या पैशाने घरात भरलेल्या उपलब्ध वस्तूंवर कित्येक दिवस काढावे लागतात, त्यांचे चित्र त्या आगी लावणाऱ्यांसमोर उभे राहील. चांगल्या ऋतूमध्येदेखील ज्यांना दऱ्याखोऱ्यांतील वाहणारे पाणी भरून दोन-दोन, तीन-तीन मैल चालावे लागते, प्रत्येक जीवनावश्यक वस्तू मिळविण्यासाठी झटावे लागते, राजस्थानसारख्या रणप्रदेशात चार-चार, पाच-पाच मैलांवरून तासन् तास रांगेत उभे राहून पाणी भरून आणावे लागते, हिमाचल प्रदेशासारख्या ठिकाणी जेथे उद्योग नाही– शेती अल्प आहे, बहुतेक प्रदेश जंगलमय आहे,– व तो भाग सरकारने ताब्यात घेतला असून जळाऊ लाकूड विकून उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांच्या उपजीविकेचे साधन हिरावून घेण्यात आले आहे,– लूटमार न करावी तर करावे तरी काय ?– असा त्यांच्यासमोर बिकट प्रश्न उभा आहे... मध्य प्रदेशाच्या छत्रपूर व सागर जिल्ह्यांतील आदिवासींचे जीवन जो पाहील त्याची दृष्टी विशाल होईल. तो विचार करू लागेल,– अरे ! या भागात उद्योगाची गरज आहे.... लोकांना अन्नवस्त्राची सोय करता करता सरकारच्या नाकी नऊ येतात. त्या लोकशाही सरकारची मालमत्ता मी उद्ध्वस्त कशी करू ? पोलिस चौक्यांना आगी लावणे मला शोभेल का ? बसेसना आगी लावणे इष्ट होईल का ? भारताच्या इतर प्रदेशाच्या मानाने मी फार सुखी आहे; मला समाधानाने राहावयास हवे. दंगलीमध्ये सामील होऊन माजलेल्या माणसाप्रमाणे धुमाकूळ घालणे हे राक्षसी कृत्य आहे,– हे त्याच्या मनावर बिंबेल.

तसे पाहिले तर बहुसंख्य लोक इतके गरीब,... अर्थाने आहेतच, परंतु मनाने गरीब आहेत, भोळे आहेत. श्रद्धाळू व समाधानी आहेत. रामेश्वर ते मदुराईच्या रस्त्यावर लुळ्या वृद्धेला मी वाचविल्यावर तिला सांगण्यात आले की, मी भारताचा दौरा करून सर्व तीर्थांची यात्रा करीत आहे. तेव्हा तिच्या डोळ्यांतून पाणी आले; " तू मोठा भाग्यशाली आहेस बाबा... तू देवाघरचा आहेस, काशी-विश्वनाथाचे दर्शन करण्याची माझी इच्छा अजून या वयातही पूर्ण झालेली नाही." असे म्हणून ती माझ्या पाया पडू लागली. त्या वृद्धेची श्रद्धा आठवली की


हृदयाला पीळ पडतो. अल्मोडा येथे बाजारात फिरत असता काही तरुणांशी मी बोलत होतो. एकजण मला म्हणाला, " साहेब अपनी तो झिन्दगी की एक ख्वाहिश है कि मरने के पहले मैं बंबई देख लूँ, बहोत बडा शहर है ना ? " त्याच्याप्रमाणेच श्रीनगरच्या एका हॉटेलमधल्या स्वयंपाकघरात जाऊन मी भट्टीसमोर शेक घेत असताना ती मुले माझ्या अवतीभोवती एकत्र व्हायची. त्यांची सर्वांची हीच मनीषा,— ती व्यक्त करतानादेखील त्यांच्या चेहऱ्यावर इतका आनंद दिसून येत होता...... ज्याचे वर्णन मला करवणार नाही. यांच्या भावनांचा विचार करून येथील लोकांनी आपल्या भाग्याची कल्पना करावी, व समाधानाने राहावे. भगवद्‌गीतेत श्रीकृष्णाने सांगितले आहे, " सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ । " असे असायला हवे असताना व आपग देशबांधव असताना दंगलीचे प्रकार घडावे ही फार दुःखाची गोष्ट आहे !

या गोष्टींचा फक्त उच्चार करणे एवढाच माझा हेतू नाही. माझ्या पुण्याबद्दल मला अभिमान आहे. या शहराने, या शहरातील नागरिकांनी जर या गोष्टी मनात घेतल्या आणि त्याप्रमाणे देशातील विषमता दूर करण्याचा प्रयत्न हाती धरला तर.... आज ना उद्या इतर भागांतील लोक आपले अनुकरण करतील. पुण्याच्या तरुणांनी या कामी प्रयत्न करावे व पुढऱ्यांनी हातभार लावावा अशी माझी नम्र प्रार्थना आहे. मनाचा मोठेपणा सोडला तर इतर सर्व दृष्ट्या मी फार लहान आहे. तेव्हा माझी प्रचंड इच्छा असून मला ते जमणे कठीण आहे. पुण्यातून गटागटाने तरुण सर्व प्रान्तांत भ्रमण करू लागले तर त्यांचे अनुकरण इतर लोक करतील, संबंध वाढतील, प्रेम वाढेल, एकोपा वाढेल. अनेक तरुण माझ्याकडे येतात, व प्रवास करण्याची आपली इच्छा व्यक्त करतात. त्यांच्यासाठी मेयरसाहेबांनी एखादी योजना आखावी अशी माझी त्यांना नम्र प्रार्थना आहे. त्यांना वैयक्तिक रीत्या कष्ट घ्यावे लागणार नाहीत. कारण त्यांचे पी. ए. श्री. भाटवडेकर हे स्कूटरवर नेहमी पर्यटन करीत असतात. त्यात त्यांचा हा आवडीचा विषय आहे; तेव्हा ते अति उत्साहाने कार्य करतील.

अनेक गोष्टी सांगाव्या असे वाटते, परंतु प्रत्येक गोष्टीला मर्यादा असते हे लक्षात घेऊन मी संयम ठेवण्याचा प्रयत्न करतो.

काल मी प्रो. ना. सी. फडके यांचे आशीर्वाद घ्यावयास गेलो होतो. आप्पासाहेबांनी अति प्रेमाने माझ्याशी संभाषण केले, व काही उत्कृष्ट पुस्तके सप्रेम भेट केलीत ! याच वेळेला थोर साहित्यकार श्रीयुत आचार्य अत्रे त्या स्थळी आले होते. आप्पासाहेबांनी माझा परिचय करून दिला, व माझ्या लेखांची प्रशंसा केली. आचार्यांचे मी आशीर्वाद मिळविले. त्यांनी मला मुंबईला येण्याचे आमंत्रण दिले, व जगप्रवास करण्याचा सल्ला दिला. माझे मनोगतच त्यांनी बोलून दाखविले म्हणून मी येथे स्पष्ट करतो. माझ्या मनात तो विचार आहे, व मी त्या दिशेने प्रयत्न चालविले आहेत. महाराष्ट्राचे पर्यटनमंत्री श्री. मधुसूदनजी वैराळे गेल्या महिन्याच्या १२ तारखेला माझ्या घरी येणार होते. परंतु दंगलीमुळे त्यांना येता आले नाही. म्हणून मी त्यांचे पत्र आल्यावर त्यांना मुंबईला भेटलो, व माझी आन्तरराष्ट्रीय प्रवासाची इच्छा व्यक्त केली. "काही अडचणी असल्यास दूर करण्याचा अवश्य प्रयत्न करीन" असे त्यांनी मला आश्वासन दिले आहे, व मी त्याप्रमाणे माझ्यापरीने प्रयत्न करीत आहे. एकंदर दोन लाख मैलांहून अधिक हा प्रवास होईल असा अंदाज आहे. पुण्याचे महापौर, इतर पुढारी, व प्रतिष्ठित नागरिकांच्या आशीर्वादाने मी त्या प्रवासाला लवकरच निघू शकेन, व यशस्वीरीत्या प्रवास करून सुखरूप या पुण्यनगरीत परतू शकेन असा मला आत्मविश्वास वाटतो.

१७–३–६८ जय हिन्द !



त्रिवेंद्रम शहरात **अशोककुमार** प्रविष्ट झाल्यावर, मेट्रो स्टुडिओचे संचालक यांनी स्वयंप्रेरणेने घेतलेला फोटो.

मागे " रेड कॉलेज " ... (विद्यार्थ्यांनी ठेवलेले नांव.) आहे.

दि. २१-१२-६७

प्रवासाचा पूर्वेतिहास.... !

पद्मभूषण डॉ. नानासाहेब परुळेकर यांच्या विशाल अंतःकरणाचे आशीर्वाद लाभले नसते तर हे पुस्तक प्रकाशित करणे शक्य झाले नसते. रविवार सकाळ-मध्ये पूर्वी लेखमाला प्रसिद्ध झाल्यामुळे त्यांच्या संमतीची गरज होती. त्यांनी संमती तर दिलीच, परंतु शुभचिंतनासह शुभाशीर्वादही दिला. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

दैनंदिन जीवनापेक्षा वेगळे व विशेष असे काही माणसाच्या हातून घडले की इतरांना थोडे आश्चर्य वाटते. मला अनेकांनी अनेक प्रश्न विचारले, " का हो, तुम्ही एकटे कसे गेलात ? एवढी हिंमत कशी झाली तुमची ? "

" भीती नाही वाटली ? "

" ... थकवा नाही आला ? "

" .... कंटाळा आला नाही तुम्हांला ! "

" .... "

असले अनेक अनपेक्षित प्रश्न पुढे आल्यानंतर मी स्वतः विचार करू लागलो, व काही ठळक आठवणी डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या.

मी शाळकरी विद्यार्थी झालो नव्हतो तेव्हाची गोष्ट. " ... ह्या रस्त्याने सरळ गेल्यावर खूप खूप लांब आहे.... " हे त्या शिंप्याचे माझी समजूत घालणारे शब्द माझ्या स्मरणात होते. सहज हार जाणे पटणारे नव्हते, म्हणून गुपचूप.... सुरेश, सरोज इत्यादी बालसहकाऱ्यांना घेऊन नवे कपडे स्वतः आणावयास निघालो. तब्बल तीन तास रपेट झाली ... दिवे लागणी झाली... सहकाऱ्यांचे धैर्य खचले, व एकामागून एकाने 'पंचम' लावण्यास सुरुवात

केली. कर्मधर्मसंयोगाने बाबुमियाँ– शिपाई समोरून येताना दिसला. तो आमच्या शोधातच होता. डॉ. स्वामीनारायण यांच्या चिरंजीवाला त्याने ओळखले ! भवानी पेठेतल्या ' रामोशी... 'वरून ' सुभानशा... 'पर्यंत त्याने टांग्यात पोहोचविले. सर्वांचे पालक वाट पाहात तिष्ठत उभे होते.

चौथ्या इयत्तेमध्ये होतो. इतिहासाचा तास होता. डोंगर, दऱ्याखोऱ्यांमध्ये ' चिमुकल्यां 'चे सैन्य घेऊन शिवाजीमहाराजांनी स्वातंत्र्य उभारणीचा पाया कसा रोवला हे विशद करून सांगण्यात येत होते. हातवारे करून आमचे शिक्षक श्री. कडीकर हे शिकवीत होते. त्या दऱ्याखोऱ्या माझ्या डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या. मी इतका प्रभावित झालो की, कधीही रोजचा अभ्यास नियमित न करणारा मी त्या दिवशी घरी आल्यानंतर तो धडा पुन्हा पुन्हा... अनेकदा.... वाचला. त्या ' गुरुजींना.... ' त्यांचे सहकारी आज विसरलेही असतील, पण मी तो प्रसंग आजीवन विसरू शकणार नाही.

१९५० साली माझे ज्येष्ठ बंधू श्री. सुमनभाई त्यांच्या मित्रांसमवेत सायकलीवरून पुरंदरला जावयास निघाले होते. आदल्या रात्री बरोबर घेऊन जाण्याचा कबुली जबाब मिळाल्यानंतरच मी झोपलो. भल्या पहाटे चाहूल लागताच खडबडून जागा झालो... टाळाटाळ करण्याचा प्रयत्न झाला होता... मी हंबरडा फोडला... ! ! ! कुणाची काय बिशाद ? पुण्याबाहेर चार पाच मैल गेल्यावरच हसलो. तो पावसातला प्रवास... चिखलातील परेड... पंक्चरमुळे झालेली पंचाइत... डोंगरमाथ्यावरील शिवालयाजवळ आम्हांस वेढून राहिलेले धुकं.... दव पडून ओल्या झालेल्या लाकडांमुळे स्वयंपाकासाठी पेटविताना झालेला धूर.... रात्रीच्या भयाण अंधारात सायकलींना दिवे नसताना " दिवा " घाटातून केलेला प्रवास... ! म्हणजे... रंगीत तालीमच झाली म्हणायची !

पूर्वी पहाटे पाचला पळत पर्वतीवर पोहोचण्याचा प्रयत्न होत असे. हिवाळ्याच्या थंडीत ते कष्टमय वाटायचे. सबंध रस्त्यावरून थरथर कापत जाणे इष्ट वाटत नव्हते. मला एक कल्पना सुचली. एकदा पहाटे हातात फडके घेऊन खाली रस्त्यावर आलो. समोरील विजेचा खांब हातातील फडक्याने थोडासा पुसून घेतला.... (स्वच्छतेच्या दृष्टीने ते अति आवश्यक होते) अंगावर फक्त हाफ पॅन्ट होती. तशाच अवस्थेत मी खांबाला कडकडून मिठी

मारली. अंगातून एकच वीज चमकून गेली. आतड्यापासून कातडीपर्यंत सर्वांग धडधडू लागले. पण मी प्रयत्नपूर्वक पकड मजबूत ठेवली. हळूहळू सर्वांग शान्त झाले. खांब सोडला. आधी ज्या थंडीने थरकाप उडविला होता तिचा प्रभाव नष्ट झाला. तयार होऊन मी पर्वतीला निघालो. सहज पळू शकलो. चालू लागलो. थंडीवर मी विजय मिळविला होता. पुढे हे नित्याचे झाले. दार्लिलिंग, गंगटोक, नैनीताल, सिमला, मसूरी, धर्मशाला, कुलू, कांग्रा, गुलमर्ग इत्यादी ठिकाणी— जेथे मी गेलो असताना हिमवर्षा होत होती... मला या प्रसंगांची सातत्याने आठवण व्हायची.

आजपर्यंत शेकडो वेळा मी कात्रज घाटावर व त्याच्या डोंगरमाथ्यावर गेलो असेन. सायकलीवरून न उतरता घाटापर्यंत जायचे ही माझी जिद्द असायची. कोणी बरोबर असो वा नसो. बहुसंख्य वेळा मी दिवसा पाऊस झाल्यावर, संध्या होण्यापूर्वी थांबला की मी नेमका तेथे जायचो. आभाळ व विखुरलेल्या ढगांवर पसरलेले विविध रंग.... त्यांचा एकमेकांशी होणारा संगम.... नवरंग निर्मिती.... ढगांचा मंद प्रवाह, त्यामुळे क्षणाक्षणाने बदलणारे आकार व सोनेरी किनार... पावसात न्हालेल्या वसुंधरेला स्पर्शून येणारा मंद,— शीतल अनिल, अंगावर सौम्य शहारा निर्माण करणारी ती गुलाबी थंडी, हे स्मरणीय... सुखद वातावरण सोडून जाताना कष्टाने रक्तवर्ण झालेला सूर्य, या सर्वांचे अवलोकन करताना व अनुभव घेताना मी इतर सर्व विसरायचो.

भूगोलाचा अभ्यास करताना अनेक विद्यार्थी वेगवेगळया प्रदेशांबद्दल तर्क करण्यात मग्न होत असतात. आल्प्समधील बर्फ.... एस्किमोची घरे... आफ्रिकेच्या जंगलातील भयानकता... चेरापुंजीचा पाऊस, व विषुववृत्तावरील उकाडा— वगैरेबद्दल कल्पना करीत असतात. परंतु त्या हवामानाचा अनुभव कसा येणार? आपल्याला सहन होऊ शकेल का? असा मीदेखील विचार करीत असे.

"..... अरे एप्रिलच्या उन्हात तू स्वेटर घालून शाळेत कसा आलास? "

"... कचित, भविष्यकाली 'किलिमांजारो 'ला जाण्याचा प्रसंग पडलाच तर? अधिक उष्णतेची नको का सवय करून घ्यायला? " हे माझे उत्तर व तो प्रसंग आजही माझ्या स्मरणात आहे.

१९५६ साली मुंबईला संगीत कॉन्फरन्स होती. सरकारने बोलाविलेल्या

सर्व उत्कृष्ट कलाकारांचा गायन, वादन, नर्तन वगैरे मिळून १५ दिवसांचा कार्यक्रम रंगभवनात होणार होता, व आझाद मैदानामध्ये बैठकीवर बसून विना-मूल्य ऐकण्याची सोय केली होती. मी जाहिरात वाचली. नुकताच महिनाभर गावोगावी फिरून आलो होतो, तेव्हा पुन्हा मुंबईला जायचा हट्ट करणे इष्ट नव्हते. शिवाय.... "या नादात मुलगा वाया जायचा..." अशी भीती आईला नेहमी वाटत असे, व म्हणून ती संगीतापासून परावृत्त करण्याचाच प्रयत्न करी. जीव नुसता अस्वस्थ झाला होता. बडे गुलामअलीखाँ-साहेबांच्या गायनाने सुरुवात झाली... अशी बातमी वाचल्यावर तर फारच अस्वस्थ झालो.

सबंध दिवस बेचैन होतो... रात्री पाहुण्यांना स्टेशनवर पोहोचविण्याकरिता ११ च्या सुमारास बाहेर पडलो. सोन्या मारुती चौकात काही मित्र सायकलींवर सामान बांधून उभे होते. माझे मित्र अशोक रावळ, मफत महेता, कनु पटेल, सुरेश शहा, इत्यादी मुंबईच्या रोखाने निघाले होते. मी त्या पाहुण्यांना तेथेच रामराम ठोकला. मित्रांना माझी वाट पाहावयास सांगितले, व तडक घरच्या दिशेने पळत सुटलो ... !

जेव्हा जेव्हा धाडस करण्याचा प्रश्न समोर येई तेव्हा घरच्या सर्वांचा एक-मुखाने पाठिंबा मिळत असे. हे माझे मोठे भाग्य मी मानतो. आई, भाऊ, बहीण... सर्वांनी उत्सुकतेने माझे सामान गोळा केले व बॅग भरून दिली. आईने प्रेमाशीर्वाद दिला व थोरल्या भावाने आवश्यक सल्ला दिला. प्रेमळ प्रभा व उषा यांच्या चेहऱ्यांवर धाकट्या भावाबद्दलचे प्रेमाभिमान पाहिले. घराकडे दृष्टिक्षेप केला, व सायकलीवर 'टांग' मारली.

चार दिवसांनी मित्रवर्ग परतायला निघाला. मला आग्रह केला. "...अरे! काल पं. भीमसेन जोशी प्रवेशद्वारासमोर मोटरीतून उतरताच विलायत हुसेन-खाँनी किती प्रेमाने मिठी मारली.... ! पं. ओंकारनाथ ठाकूर गात असताना मध्येच 'बहोत खुब बेटा... बहोत खुब....' असे म्हणून शिष्याच्या डोक्या-वरून किती प्रेमाने हात फिरवीत होते. पं. रविशंकर यांनी केलेला राग-विस्तार........ अरे ! असा पवित्र प्रसंग आणि रंगभवनात रंगलेली मैफल सोडून कोण येणार ? तुम्ही सर्व निघा पुढे.... मी येतो एकटा...... !!!'

पॅरेमाउन्टमध्ये ' देवदास ' लागला होता. दुपारचा खेळ पाहावयास गेलो.

" मितवा ... नहीं आये ... !
लागी रे ये कैसी.... अनबूझ आग ! !

व

" किसको खबर थी....
किसको यकीन था...
ऐसे भी दिन आयेंगे.... ! ! ! "

ही दोन गाणी व कथानक याने मला अकथनीय भावनांच्या प्रचंड प्रवाहात वाहविले. संध्याकाळी पाऊस थांबला होता... रस्ते ओलेचिंब झाले होते. ढगाळ वातावरणाने जणू काही सारे शहर ' सुस्त ' झाले होते... अशात मी बाहेर पडलो ... सरळ वाटेने चालू लागलो. विचार करण्याची शुद्ध नव्हती. व्याकुळ मनाला सान्त्वन देणारे स्थळ माहीत होते... पाउलांचा मार्ग ! किती वेळ गेला.... कसा गेला.... कसे सांगू !

" अरे भाई ! इस अंधेरेमें अकेले क्यों बैठे हो... ? कहाँ जाना है ? " एकाने गदगदा हालवून विचारले. मी शुद्धीवर आलो... ! त्याने आग्रहाने ट्रकमध्ये बसविले. कात्रज घाटातून ट्रक पुण्याकडे निघाला. त्याने घरापर्यंत पोहोचविले. मी जिना चढत असताना घड्याळाने चार ठोके दिले.

आईने विचारले, " काय रे झालं तुला ! " मी निरुत्तर होतो. डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.... ! !

' मे ' १९५८ च्या उन्हाळी सुट्टीमध्ये विद्यार्थ्यांसाठी दैनिक ' सकाळ ' ने ' सायकल–पर्यटन–स्पर्धा ' आयोजित केली होती. सायकलीवर प्रवास करून लेखन करण्यास उत्तेजन देण्याचा हेतू असावा. अनेक विद्यार्थ्यांबरोबर मीदेखील अर्ज केला. माझी निवड झाली. निघण्यापूर्वी ' सकाळ 'तर्फे निरोप समारंभ झाला. डॉ. नानासाहेब परुळेकर यांनी ' मुलांना ' चार शब्द सांगितले. मी गंभीर मुद्रेने सर्व ऐकून घेतले. सर्वांनी कॉफी घेऊन झाल्यावर निरोप घेतला. दुसऱ्या दिवशी दहा विद्यार्थ्यांची नावे व वृत्त ' सकाळ 'च्या पहिल्या पानावर मधल्या कॉलममध्ये होते. माझे अनेकांनी अभिनंदन केले.

सायकलीवरून महाराष्ट्र पर्यटन झाल्यावर मी माझे अनुभव पन्नास पानांमध्ये लिहून ' सकाळ 'ला दिले. त्या वेळचे सहसंपादक श्री. मो. स. साठे यांनी सस्मित अभिनंदन केले.

" अशोक ! कोणत्याही परिस्थितीत तुला आमच्या मॅचला यावं लागेल !! " असा अटळ आग्रह आमचे मित्र श्री. चंपकभाई गांधी, भागीदार– नॅशनल पेपर मार्ट– यांनी धरल्यामुळे, मला नियोजित क्रिकेट मॅचला जाणे अपरिहार्य होते. एम. ई. एस. कॉलेजच्या मैदानावर सामना होता. मी पूर्वसूचना देऊन खेळपट्टी दुरुस्त करण्याचा आग्रह धरला होता. परंतु सोय न झाल्यामुळे तशातच सामना सुरू करावा लागला. मी प्रथम फलंदाज बनलो. त्यासाठीच तर मुद्दाम मला बोलाविले होते. क्षेत्ररक्षकांची धावपळ सुरू झाली.... माझी धावसंख्या वाढू लागली.... टाळ्यांचा कडकडाट वाढू लागला... लोकांची गर्दी वाढली... माझा उत्साह वाढला ! चेंडूवरचे पॉलिश मात्र कमी कमी होऊ लागले.

सामन्याला रंग चढत होता... तेवढ्यात.... अचानक सर्व प्रेक्षक क्रीडांगणाच्या मध्यभागी धावू लागले.... रस्त्यावरचे बघे पटापट मैदानात येऊन त्यांच्यात सामील होऊ लागले, 'अरेरेरे.... च् च् च् च्...' करीत लोक हळहळू लागले. माझ्या डोळ्यांसमोर अंधार पसरला होता. " ....हॉस्पिटल... डॉक्टर... टॅक्सी " वगैरे शब्द कानी पडत होते ! थोड्या वेळाने मी मनात म्हणालो.... " एक डोळा गेला की रे... ! " दूषित धावपट्टीवरून अचानक व अनपेक्षितरीत्या चेंडू उडून माझ्या डोळ्याला लागला होता. चष्मा तुटून; काचा फुटून डोळ्यावर लागल्या होत्या.... माझे दोन्ही हात रक्ताने भरले होते. समोरील डॉ. जोशी यांनी काही दिवसांपूर्वीच दवाखाना चालू केला होता. लागलीच इलाज झाला. एका डोळयावर मोठे बॅन्डेज बांधले. सुदैवाने डोळा वाचला ! कातडीत शिरलेले बारीक बारीक काचेचे तुकडे काढले गेले. सर्वांनी घरी जाण्याचा आग्रह धरला. परंतु मी मैदानाच्या हिरवळीवरच दोनतीन तास पडून राहिलो व सायंकाळी पुन्हा खेळण्याचा आग्रह धरून खेळावयास सुरुवात केली. परंतु एका डोळयाने स्पष्ट दिसत नसल्यामुळे मी अधिक खेळू शकलो नाही !

अशा विविध व विचित्र अनुभवांतून विलक्षण गुणदोष निर्माण झाले. त्या सर्वांच्या संगमातून एक " एकटा पर्यटक " निर्माण झाला हेच खरे !

फटफटीवर निघण्यापूर्वी माझा अनेक ठिकाणी पूर्वी रेल्वे, मोटर, फटफटी, सायकल– असा प्रवास झाला होता. त्यामुळे या प्रवासात मी त्यातील काही स्थळांना पुन्हा गेलो नाही. अर्थातच हा 'प्रवास' जसाचा तसा जनतेपुढे रुजू करण्याच्या हेतूने त्या स्थळांचा मी या पुस्तकात उल्लेख टाळला आहे. मराठी भाषिकांस महाराष्ट्र नवा नाही, त्यामुळे महाराष्ट्र, हैद्राबाद शहर, माउन्ट अबू, जमशेटपूर व जवळील उद्योगकेन्द्रे मी पाहिली असूनही या पुस्तकात नाहीत. प्रामाणिक पर्यटक म्हणून मी स्पष्ट करू इच्छितो की अमरनाथ, बद्रीकेदार व जबलपूर एवढ्या स्थळांना मी अजून भेटच दिली नाही. त्याव्यतिरिक्त पाहण्याजोगे असे भारतात मी पाहण्याचे राहिले आहे असें मला वाटत नाही.

ठराविक शब्दांमध्ये लेख लिहिण्याचे "सकाळ"चे बंधन असल्याकारणाने व प्रवास प्रदीर्घ असल्याकारणाने वर्णन फारच त्रोटक करणे भाग होते. अनेक स्थळांचा तर फक्त उल्लेखच झाला. तरीही या लेखमालेची "सिल्व्हर ज्युबिली" झाली... (एकूण २६ लेख) हे वाचकांच्या ध्यानी असेलच. एरवी स्वानुभव व माहिती मिळून १००० पानी पुस्तक होणे कठीण नाही. सध्याची महागाई लक्षात घेता, व जनतेच्या मान्यतेचा अंदाज घेण्यासाठी आहे त्या स्वरूपातच हे पुस्तक जनताजनार्दनापुढे ठेवणे इष्ट वाटते.

वाचनाचा पहिल्यापासून कंटाळा. परंतु जे वाचनात आले ते मन लावून. मराठीमधील एकही पुस्तक मी पूर्णपणे वाचले नाही. हे व्यक्त करताना मला स्वतःला खेद होत आहे. परंतु सत्य म्हणूनच व्यक्त करावेसे वाटते. मराठी मी शिकलो ते ज्यांची वाणी शुद्ध..... अशा मराठी भाषिक कॉलेज विद्यार्थी व इतर लोकांकडून. शुद्धोच्चारांकडे माझे कटाक्षाने लक्ष असायचे. लक्ष देऊन ऐकता ऐकता मला भाषेचे वळण समजले. येरवी वर्तमानपत्र वगळता वाङ्मयीन वाचन माझे शून्यवत आहे.

लेखन सोप्या भाषेत असावे, 'बड्या' शब्दांचा वापर करण्याचे शक्य तोवर टाळावे. आबालवृद्धांना आकर्षून घेईल व वाचण्यास प्रवृत्त करील अशी शैली असावी. विविध प्रसंगांच्या सूत्रबद्ध प्रवाहाप्रमाणेच अखंडितपणे वाचण्याचा मोह व्हावा व वाचताना इतर गोष्टींचा विसर पडावा असे सुटसुटीत लेखन असावे, निव्वळ करमणूक नसून माहितिप्रद व विशेष विचार मांडणारे लेखन असावे. या सर्व विचारांना समोर ठेवून मी लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. मी माझ्या


विचारांशी प्रामाणिक राहून किती यशस्वी झालो हे वाचकांनी ठरवायचे आहे.

माझी लेखमाला चालू असताना सकाळचे सहसंपादक श्री. मुणगेकर यांनी बहुमोल सहकार्य केले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

डॉ. नानासाहेब परुळेकर यांनी अनेक " समित्या " निर्माण करून समाजाच्य सर्वांगीण विकासासाठी विविध आघाड्या उभारल्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे माझ्यासारख्या अनेकांना व्यक्तिशः प्रोत्साहन देऊन सहकार्य करणे हे होय !

" रविवार सकाळ "मध्ये पूर्वी प्रसिद्ध झालेल्या छायाचित्रांचे ब्लॉक्स आम्हांस सकाळच्या सौजन्याने मिळाले, म्हणुन मी व्यक्तिशः त्यांचा ऋणी आहे.

—अशोककुमार स्वामीनारायण



त्रिवेंद्रम शहरात **अशोककुमार** प्रविष्ट झाल्यावर, मेट्रो स्टुडिओचे संचालक यांनी स्वयंप्रेरणेने घेतलेला फोटो.

मागे "रेड कॉलेज" . . . (विद्यार्थ्यांनी ठेवलेले नांव.) आहे.

दि. २१-१२-६७

प्रवासाचा पूर्वेतिहास.... !

पद्मभूषण डॉ. नानासाहेब परुळेकर यांच्या विशाल अंतःकरणाचे आशीर्वाद लाभले नसते तर हे पुस्तक प्रकाशित करणे शक्य झाले नसते. रविवार सकाळ-मध्ये पूर्वी लेखमाला प्रसिद्ध झाल्यामुळे त्यांच्या संमतीची गरज होती. त्यांनी संमती तर दिलीच, परंतु शुभचिंतनासह शुभाशीर्वादही दिला. त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

दैनंदिन जीवनापेक्षा वेगळे व विशेष असे काही माणसाच्या हातून घडले की इतरांना थोडे आश्चर्य वाटते. मला अनेकांनी अनेक प्रश्न विचारले, " का हो, तुम्ही एकटे कसे गेलात ? एवढी हिंमत कशी झाली तुमची ? "

" भीती नाही वाटली ? "

" ... थकवा नाही आला ? "

" .... कंटाळा आला नाही तुम्हांला ? "

" .... "

असले अनेक अनपेक्षित प्रश्न पुढे आल्यानंतर मी स्वतः विचार करू लागलो, व काही ठळक आठवणी डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या.

मी शाळकरी विद्यार्थी झालो नव्हतो तेव्हाची गोष्ट. " ... ह्या रस्त्याने सरळ गेल्यावर खूप खूप लांब आहे.... " हे त्या शिंप्याचे माझी समजूत घालणारे शब्द माझ्या स्मरणात होते. सहज हार जाणे पटणारे नव्हते, म्हणून गुपचूप.... सुरेश, सरोज इत्यादी बालसहकाऱ्यांना घेऊन नवे कपडे स्वतः आणावयास निघालो. तब्बल तीन तास रपेट झाली ... दिवे लागणी झाली... सहकाऱ्यांचे धैर्य खचले, व एकामागून एकाने 'पंचम' लावण्यास सुरुवात

केली. कर्मधर्मसंयोगाने बाबुमियाँ– शिपाई समोरून येताना दिसला. तो आमच्या शोधातच होता. डॉ. स्वामीनारायण यांच्या चिरंजीवाला त्याने ओळखले ! भवानी पेठेतल्या 'रामोशी...'वरून 'सुभानशा...'पर्यंत त्याने टांग्यात पोहोचविले. सर्वांचे पालक वाट पाहात तिष्ठत उभे होते.

चौथ्या इयत्तेमध्ये होतो. इतिहासाचा तास होता. डोंगर, दऱ्याखोऱ्यांमध्ये 'चिमुकल्यां'चे सैन्य घेऊन शिवाजीमहाराजांनी स्वातंत्र्य उभारणीचा पाया कसा रोवला हे विशद करून सांगण्यात येत होते. हातवारे करून आमचे शिक्षक श्री. कडीकर हे शिकवीत होते. त्या दऱ्याखोऱ्या माझ्या डोळ्यांसमोर उभ्या राहिल्या. मी इतका प्रभावित झालो की, कधीही रोजचा अभ्यास नियमित न करणारा मी त्या दिवशी घरी आल्यानंतर तो धडा पुन्हा पुन्हा... अनेकदा.... वाचला. त्या 'गुरुजींना....' त्यांचे सहकारी आज विसरलेही असतील, पण मी तो प्रसंग आजीवन विसरू शकणार नाही.

१९५० साली माझे ज्येष्ठ बंधू श्री. सुमनभाई त्यांच्या मित्रांसमवेत सायकलीवरून पुरंदरला जावयास निघाले होते. आदल्या रात्री बरोबर घेऊन जाण्याचा कबुली जबाब मिळाल्यानंतरच मी झोपलो. भल्या पहाटे चाहूल लागताच खडबडून जागा झालो... टाळाटाळ करण्याचा प्रयत्न झाला होता... मी हंबरडा फोडला... !!! कुणाची काय बिशाद ? पुण्याबाहेर चार पाच मैल गेल्यावरच हसलो. तो पावसातला प्रवास... चिखलातील परेड... पंक्चरमुळे झालेली पंचाइत... डोंगरमाथ्यावरील शिवालयाजवळ आम्हांस वेढून राहिलेलं धुकं.... दव पडून ओल्या झालेल्या लाकडांमुळे स्वयंपाकासाठी पेटविताना झालेला धूर.... रात्रीच्या भयाण अंधारात सायकलींना दिवे नसताना "दिवा" घाटातून केलेला प्रवास... ! म्हणजे... रंगीत तालीमच झाली म्हणायची !

पूर्वी पहाटे पाचला पळत पर्वतीवर पोहोचण्याचा प्रयत्न होत असे. हिवाळ्याच्या थंडीत ते कष्टमय वाटायचे. सबंध रस्त्यावरून थरथर कापत जाणे इष्ट वाटत नव्हते. मला एक कल्पना सुचली. एकदा पहाटे हातात फडके घेऊन खाली रस्त्यावर आलो. समोरील विजेचा खांब हातातील फडक्याने थोडासा पुसून घेतला.... (स्वच्छतेच्या दृष्टीने ते अति आवश्यक होते) अंगावर फक्त हाफ पॅन्ट होती. तशाच अवस्थेत मी खांबाला कडकडून मिठी

मारली. अंगातून एकच वीज चमकून गेली. आतड्यापासून कातडीपर्यंत सर्वांग धडधडू लागले. पण मी प्रयत्नपूर्वक पकड मजबूत ठेवली. हळूहळू सर्वांग शान्त झाले. खांब सोडला. आधी ज्या थंडीने थरकाप उडविला होता तिचा प्रभाव नष्ट झाला. तयार होऊन मी पर्वतीला निघालो. सहज पळू शकलो. चालू लागलो. थंडीवर मी विजय मिळविला होता. पुढे हे नित्याचे झाले. दार्लिलिंग, गंगटोक, नैनीताल, सिमला, मसूरी, धर्मशाला, कुलू, कांग्रा, गुलमर्ग इत्यादी ठिकाणी— जेथे मी गेलो असताना हिमवर्षा होत होती... मला या प्रसंगांची सातत्याने आठवण व्हायची.

आजपर्यंत शेकडो वेळा मी कात्रज घाटावर व त्याच्या डोंगरमाथ्यावर गेलो असेन. सायकलीवरून न उतरता घाटापर्यंत जायचे ही माझी जिद्द असायची. कोणी बरोबर असो वा नसो. बहुसंख्य वेळा मी दिवसा पाऊस झाल्यावर, संध्या होण्यापूर्वी थांबला की मी नेमका तेथे जायचो. आभाळ व विखुरलेल्या ढगांवर पसरलेले विविध रंग.... त्यांचा एकमेकांशी होणारा संगम.... नवरंग निर्मिती.... ढगांचा मंद प्रवाह, त्यामुळे क्षणाक्षणाने बदलणारे आकार व सोनेरी किनार... पावसात न्हालेल्या वसुंधरेला स्पर्शून येणारा मंद,– शीतल अनिल, अंगावर सौम्य शहारा निर्माण करणारी ती गुलाबी थंडी, हे स्मरणीय... सुखद वातावरण सोडून जाताना कष्टाने रक्तवर्ण झालेला सूर्य, या सर्वांचे अवलोकन करताना व अनुभव घेताना मी इतर सर्व विसरायचो.

भूगोलाचा अभ्यास करताना अनेक विद्यार्थी वेगवेगळया प्रदेशांबद्दल तर्क करण्यात मग्न होत असतात. आल्प्समधील बर्फ.... एस्किमोची घरे... आफ्रिकेच्या जंगलातील भयानकता... चेरापुंजीचा पाऊस, व विषुववृत्तावरील उकाडा— वगैरेबद्दल कल्पना करीत असतात. परंतु त्या हवामानाचा अनुभव कसा येणार ? आपल्याला सहन होऊ शकेल का ? असा मीदेखील विचार करीत असे.

"... अरे एप्रिलच्या उन्हात तू स्वेटर घालून शाळेत कसा आलास ? "

"... कचित, भविष्यकाली ' किलिमांजारो 'ला जाण्याचा प्रसंग पडलाच तर ? अधिक उष्णतेची नको का सवय करून घ्यायला ? " हे माझे उत्तर व तो प्रसंग आजही माझ्या स्मरणात आहे.

१९५६ साली मुंबईला संगीत कॉन्फरन्स होती. सरकारने बोलाविलेल्या

सर्व उत्कृष्ट कलाकारांचा गायन, वादन, नर्तन वगैरे मिळून १५ दिवसांचा कार्यक्रम रंगभवनात होणार होता, व आझाद मैदानामध्ये बैठकीवर बसून विना-मूल्य ऐकण्याची सोय केली होती. मी जाहिरात वाचली. नुकताच महिनाभर गावोगावी फिरून आलो होतो, तेव्हा पुन्हा मुंबईला जायचा हट्ट करणे इष्ट नव्हते. शिवाय.... " या नादात मुलगा वाया जायचा... " अशी भीती आईला नेहमी वाटत असे, व म्हणून ती संगीतापासून परावृत्त करण्याचाच प्रयत्न करी. जीव नुसता अस्वस्थ झाला होता. बडे गुलामअलीखाँ-साहेबांच्या गायनाने सुरुवात झाली... अशी बातमी वाचल्यावर तर फारच अस्वस्थ झालो.

सबंध दिवस बेचैन होतो... रात्री पाहुण्यांना स्टेशनवर पोहोचविण्याकरिता ११ च्या सुमारास बाहेर पडलो. सोन्या मारुती चौकात काही मित्र सायकलींवर सामान बांधून उभे होते. माझे मित्र अशोक रावळ, मफत महेता, कनु पटेल, सुरेश शहा, इत्यादी मुंबईच्या रोखाने निघाले होते. मी त्या पाहुण्यांना तेथेच रामराम ठोकला. मित्रांना माझी वाट पाहावयास सांगितले, व तडक घरच्या दिशेने पळत सुटलो ... !

जेव्हा जेव्हा धाडस करण्याचा प्रश्न समोर येई तेव्हा घरच्या सर्वांचा एक-मुखाने पाठिंबा मिळत असे. हे माझे मोठे भाग्य मी मानतो. आई, भाऊ, बहीण... सर्वांनी उत्सुकतेने माझे सामान गोळा केले व बॅग भरून दिली. आईने प्रेमाशीर्वाद दिला व थोरल्या भावाने आवश्यक सल्ला दिला. प्रेमळ प्रभा व उषा यांच्या चेहऱ्यांवर धाकट्या भावाबद्दलचे प्रेमाभिमान पाहिले. घराकडे दृष्टिक्षेप केला, व सायकलीवर ' टांग ' मारली.

चार दिवसांनी मित्रवर्ग परतायला निघाला. मला आग्रह केला. " ...अरे ! काल पं. भीमसेन जोशी प्रवेशद्वारासमोर मोटरीतून उतरताच विलायत हुसेन-खाँनी किती प्रेमाने मिठी मारली.... ! पं. ओंकारनाथ ठाकूर गात असताना मध्येच ' बहोत खुब बेटा... बहोत खुब.... ' असे म्हणून शिष्याच्या डोक्या-वरून किती प्रेमाने हात फिरवीत होते. पं. रविशंकर यांनी केलेला राग-विस्तार....... अरे ! असा पवित्र प्रसंग आणि रंगभवनात रंगलेली मैफल सोडून कोण येणार ? तुम्ही सर्व निघा पुढे.... मी येतो एकटा...... !!! "

पॅरेमाउन्टमध्ये ' देवदास ' लागला होता. दुपारचा खेळ पाहावयास गेलो.

" मितवा ... नहीं आये ... !
लागी रे ये कैसी.... अनबूझ आग !!

व

" किसको खबर थी,...
किसको यकीन था...
ऐसे भी दिन आयेंगे.... !!! "

ही दोन गाणी व कथानक याने मला अकथनीय भावनांच्या प्रचंड प्रवाहात वाहविले. संध्याकाळी पाऊस थांबला होता... रस्ते ओलेचिंब झाले होते. ढगाळ वातावरणाने जणू काही सारे शहर ' सुस्त ' झाले होते... अशात मी बाहेर पडलो ... सरळ वाटेने चालू लागलो. विचार करण्याची शुद्ध नव्हती. व्याकुळ मनाला सान्त्वन देणारे स्थळ माहीत होते... पाउलांचा मार्ग ! किती वेळ गेला.... कसा गेला.... कसे सांगू !

" अरे भाई ! इस अंधेरेमें अकेले क्यों बैठे हो... ! कहाँ जाना है ? " एकाने गदगदा हालवून विचारले. मी शुद्धीवर आलो... ! त्याने आग्रहाने ट्रकमध्ये बसविले. कात्रज घाटातून ट्रक पुण्याकडे निघाला. त्याने घरापर्यंत पोहोचविले. मी जिना चढत असताना घड्याळाने चार ठोके दिले.

आईने विचारले, " काय रे झालं तुला ! " मी निरुत्तर होतो. डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.... !!

' मे ' १९५८ च्या उन्हाळी सुट्टीमध्ये विद्यार्थ्यांसाठी दैनिक ' सकाळ ' ने ' सायकल–पर्यटन–स्पर्धा ' आयोजित केली होती. सायकलीवर प्रवास करून लेखन करण्यास उत्तेजन देण्याचा हेतू असावा. अनेक विद्यार्थ्यांबरोबर मीदेखील अर्ज केला. माझी निवड झाली. निघण्यापूर्वी ' सकाळ 'तर्फे निरोप समारंभ झाला. डॉ. नानासाहेब परुळेकर यांनी ' मुलांना ' चार शब्द सांगितले. मी गंभीर मुद्रेने सर्व ऐकून घेतले. सर्वांनी कॉफी घेऊन झाल्यावर निरोप घेतला. दुसऱ्या दिवशी दहा विद्यार्थ्यांची नावे व वृत्त ' सकाळ 'च्या पहिल्या पानावर मधल्या कॉलममध्ये होते. माझे अनेकांनी अभिनंदन केले.

सायकलीवरून महाराष्ट्र पर्यटन झाल्यावर मी माझे अनुभव पन्नास पानांमध्ये लिहून ' सकाळ 'ला दिले. त्या वेळचे सहसंपादक श्री. मो. स. साठे यांनी सस्मित अभिनंदन केले.

" अशोक ! कोणत्याही परिस्थितीत तुला आमच्या मॅचला यावं लागेल !! " असा अटळ आग्रह आमचे मित्र श्री. चंपकभाई गांधी, भागीदार– नॅशनल पेपर मार्ट– यांनी धरल्यामुळे, मला नियोजित क्रिकेट मॅचला जाणे अपरिहार्य होते. एम. ई. एस. कॉलेजच्या मैदानावर सामना होता. मी पूर्वसूचना देऊन खेळपट्टी दुरुस्त करण्याचा आग्रह धरला होता. परंतु सोय न झाल्यामुळे तशातच सामना सुरू करावा लागला. मी प्रथम फलंदाज बनलो. त्यासाठीच तर मुद्दाम मला बोलाविले होते. क्षेत्ररक्षकांची धावपळ सुरू झाली.... माझी धावसंख्या वाढू लागली.... टाळयांचा कडकडाट वाढू लागला.... लोकांची गर्दी वाढली... माझा उत्साह वाढला ! चेंडूवरचे पॉलिश मात्र कमी कमी होऊ लागले.

सामन्याला रंग चढत होता... तेवढ्यात.... अचानक सर्व प्रेक्षक क्रीडांगणाच्या मध्यभागी धावू लागले... रस्त्यावरचे बघे पटापट मैदानात येऊन त्यांच्यात सामील होऊ लागले, 'अरेरेरे.... च् च् च् च्...' करीत लोक हळहळू लागले. माझ्या डोळयांसमोर अंधार पसरला होता. " ....हॉस्पिटल... डॉक्टर... टॅक्सी " वगैरे शब्द कानी पडत होते ! थोड्या वेळाने मी मनात म्हणालो.... " एक डोळा गेला की रे... ! " दूषित धावपट्टीवरून अचानक व अनपेक्षितरीत्या चेंडू उडून माझ्या डोळ्याला लागला होता. चष्मा तुटून; काचा फुटून डोळ्यावर लागल्या होत्या.... माझे दोन्ही हात रक्ताने भरले होते.

समोरील डॉ. जोशी यांनी काही दिवसांपूर्वीच दवाखाना चालू केला होता. लागलीच इलाज झाला. एका डोळयावर मोठे बॅन्डेज बांधले. सुदैवाने डोळा वाचला ! कातडीत शिरलेले बारीक बारीक काचेचे तुकडे काढले गेले. सर्वांनी घरी जाण्याचा आग्रह धरला. परंतु मी मैदानाच्या हिरवळीवरच दोनतीन तास पडून राहिलो व सायंकाळी पुन्हा खेळण्याचा आग्रह धरून खेळावयास सुरुवात केली. परंतु एका डोळयाने स्पष्ट दिसत नसल्यामुळे मी अधिक खेळू शकलो नाही !

अशा विविध व विचित्र अनुभवांतून विलक्षण गुणदोष निर्माण झाले. त्या सर्वांच्या संगमातून एक " एकटा पर्यटक " निर्माण झाला हेच खरे !

फटफटीवर निघण्यापूर्वी माझा अनेक ठिकाणी पूर्वी रेल्वे, मोटर, फटफटी, सायकल– असा प्रवास झाला होता. त्यामुळे या प्रवासात मी त्यातील काही स्थळांना पुन्हा गेलो नाही. अर्थातच हा ‘ प्रवास ’ जसाचा तसा जनतेपुढे रुजू करण्याच्या हेतूने त्या स्थळांचा मी या पुस्तकात उल्लेख टाळला आहे. मराठी भाषिकांस महाराष्ट्र नवा नाही, त्यामुळे महाराष्ट्र, हैद्राबाद शहर, माउन्ट अबू, जमशेटपूर व जवळील उद्योगकेन्द्रे मी पाहिली असूनही या पुस्तकात नाहीत. प्रामाणिक पर्यटक म्हणून मी स्पष्ट करू इच्छितो की अमरनाथ, बद्रीकेदार व जबलपूर एवढ्या स्थळांना मी अजून भेटच दिली नाही. त्याव्यतिरिक्त पाहण्याजोगे असे भारतात मी पाहण्याचे राहिले आहे असें मला वाटत नाही.

ठराविक शब्दांमध्ये लेख लिहिण्याचे “ सकाळ ”चे बंधन असल्याकारणाने व प्रवास प्रदीर्घ असल्याकारणाने वर्णन फारच त्रोटक करणे भाग होते. अनेक स्थळांचा तर फक्त उल्लेखच झाला. तरीही या लेखमालेची “ सिल्व्हर ज्युबिली ” झाली... (एकूण २६ लेख) हे वाचकांच्या ध्यानी असेलच. एरवी स्वानुभव व माहिती मिळून १००० पानी पुस्तक होणे कठीण नाही. सध्याची महागाई लक्षात घेता, व जनतेच्या मान्यतेचा अंदाज घेण्यासाठी आहे त्या स्वरूपातच हे पुस्तक जनताजनार्दनापुढे ठेवणे इष्ट वाटते.

वाचनाचा पहिल्यापासून कंटाळा. परंतु जे वाचनात आले ते मन लावून. मराठीमधील एकही पुस्तक मी पूर्णपणे वाचले नाही. हे व्यक्त करताना मला स्वतःला खेद होत आहे. परंतु सत्य म्हणूनच व्यक्त करावेसे वाटते. मराठी मी शिकलो ते ज्यांची वाणी शुद्ध..... अशा मराठी भाषिक कॉलेज विद्यार्थी व इतर लोकांकडून. शुद्धोच्चारांकडे माझे कटाक्षाने लक्ष असायचे. लक्ष देऊन ऐकता ऐकता मला भाषेचे वळण समजले. येरवी वर्तमानपत्र वगळता वाङ्मयीन वाचन माझे शून्यवत आहे.

लेखन सोप्या भाषेत असावे, ‘ बड्या ’ शब्दांचा वापर करण्याचे शक्य तोवर टाळावे. आबालवृद्धांना आकर्षून घेईल व वाचण्यास प्रवृत्त करील अशी शैली असावी. विविध प्रसंगांच्या सूत्रबद्ध प्रवाहाप्रमाणेच अखंडितपणे वाचण्याचा मोह व्हावा व वाचताना इतर गोष्टींचा विसर पडावा असे सुटसुटीत लेखन असावे, निव्वळ करमणूक नसून माहितिप्रद व विशेष विचार मांडणारे लेखन असावे. या सर्व विचारांना समोर ठेवून मी लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. मी माझ्या

विचारांशी प्रामाणिक राहून किती यशस्वी झालो हे वाचकांनी ठरवायचे आहे.

माझी लेखमाला चालू असताना सकाळचे सहसंपादक श्री. मुणगेकर यांनी बहुमोल सहकार्य केले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

डॉ. नानासाहेब परुळेकर यांनी अनेक " समित्या " निर्माण करून समाजाच्य सर्वांगीण विकासासाठी विविध आघाड्या उभारल्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे माझ्यासारख्या अनेकांना व्यक्तिशः प्रोत्साहन देऊन सहकार्य करणे हे होय !

" रविवार सकाळ "मध्ये पूर्वी प्रसिद्ध झालेल्या छायाचित्रांचे ब्लॉक्स आम्हांस सकाळच्या सौजन्याने मिळाले, म्हणून मी व्यक्तिशः त्यांचा ऋणी आहे.

—अशोककुमार स्वामीनारायण

१ : गोलघुमटात गालिबची गझल

अनेक वर्षांच्या कल्पनेचे तांडव

"ताज्या बातम्या...सकाळ..."– असा नित्याचा आवाज कानी पडला व मी अंथरूण सोडले. दाराशी पडलेला अंक घेतला व त्यावरून नजर फिरवू लागलो. रोजच्या सवयीमुळे हे घडले खरे पण वाचनात मुळीच लक्ष नव्हते. गुरुवार ता. २३ नोव्हेंबर रोजी मी अखिल भारताच्या दौऱ्यासाठी मोटारसायकलवर निघणार अशा बातम्या पूर्वीच सर्व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाल्या होत्या. तेव्हा पूर्ण तयारी नसतानादेखील आज पुणे सोडणे आवश्यक होते, त्या काळजीत मी होतो.

रात्री उशीरापर्यंत कामे करीत बसलो होतो, तरीही अर्धवट तयारी झाली होती. झोपही अपुरी होती. पण नाइलाजास्तव मी दिनचर्येला सुरवात केली. काही वस्तूंची खरेदी करावयाची होती व अनेकांच्या भेटी घ्यावयाच्या होत्या. अनेक वर्षांपासून मनात तांडव करीत असलेली कल्पना चारपाच दिवस पुनश्च हैराण करू लागली. मी लवकरात लवकर ती अमलात आणण्याचा निश्चय केला होता; व त्यानुसार अगदी जवळच्या मित्रांशिवाय कोणालाही न कळविता निघणार होतो. परंतु मित्रांनी वर्तमानपत्रांत बातमी दिल्यामुळे अनेकांना हे कळले होते. तेव्हा काही अडथळा निर्माण होऊ नये म्हणून त्याच दिवशी पुणे सोडण्याचा निश्चय होता.

दोन वर्षांपूर्वी मी घेतलेल्या मोटरसायकलीवर मी प्रवास करणार होतो. आदल्या रात्री गाडीत काही दोष आढळून आल्यामुळे मेकॅनिककडे गेलो. प्रत्यक्ष

उभे राहून सर्व दुरुस्ती करून घेतली. गाडीचे काही सुटे भाग व हत्यारे घ्याव-याची होती ते सर्व घेतले. लागणाऱ्या साधनांची व वस्तूंची यादी चाळून पाहिली. त्यानुसार इतर खरेदी केली. परप्रान्तात त्रास होऊ नये म्हणून गाडीवर एक छोटी पाटी लावण्याचा विचार होता ती तावडतोब रंगवून घेतली. वरती लिहिले होते, ' ऑन ऑल इंडिया टूर '. वाचू शकतील त्यांना माझ्याबद्दल सहानुभूती निर्माण होईल व ज्यांना वाचता येणार नाही ते कोणी तरी विशेष व्यक्ती आहे असे समजून उपद्रव करणार नाहीत अशी अपेक्षा होती !

" काहो.... तुम्ही आज निघणार होता ना ? " असा सवाल एका स्नेह्याने वाटेत केला. थोडक्यात बोलून पुढे निघालो तेव्हा दुसरे भेटले, " काय अशोक-कुमार, बेत रद्द झाला की काय ? " असे अनेक लोक बाजारपेठेत अल्पावधीत भेटले. गैरसमज होऊ नये म्हणून उत्तरे देत देत घरी आलो. सोलापूरला पहिला मुक्काम होता. तेव्हा तेथे बाकीची तयारी करून पुढे प्रवास करावा असा विचार करून सामान बांधून मी निघालो.

आदल्या दिवशी महापौर श्री. नानासाहेब गोरे यांच्या हस्ते सत्कार-समारंभ झाला होता. तेव्हा आज निकटवर्ती मित्रमंडळीकडून निरोपसमारंभ स्वारगेट येथे निश्चित केला होता. सर्वांनी अत्यंत आपुलकीने आवश्यक सूचना दिल्या....सुरुवातीचे नारळ फोडले व प्रेमळ निरोप दिला.

एकटाच प्रवास करणार होतो म्हणून सर्वांच्या चेहऱ्यावर काळजी स्पष्ट दिसत होती. मला पूर्ण आत्मविश्वास आहे, हे मी हसत हसत बोलल्यावर त्यांना थोडे बरे वाटले.

दुपारचे साडेचार वाजले होते व सोलापूरला पोहोचावयाचे होते. म्हणून थोड्या घाईने प्रवास सुरू केला. मी पुढे पुढे चाललो होतो. परंतु मन मागे धावत होते. अनेक कामे अर्धवट राहिली होती. कित्येकांना भेटू शकलो नव्हतो. काहींनी स्वतः भेटावयास येऊ नये का ? –असा प्रश्न उद्भवत होता, तर काही अनोळखी सद्गृहस्थ मुद्दाम भेटण्यासाठी, कौतुक करण्यासाठी व आवश्यक सूचना करण्यासाठी घरी येऊन गेले होते.

हर्ष–शोकाचा विचार बाजूला ठेवून प्रवास कसा यशस्वी करता येईल याचा विचार करू लागलो. अनेकांनी एकट्याने प्रवास न करण्याची सूचना दिली होती. पण मी जिद्दीने निघालो होतो.

वाटेतच गाडीचे परीक्षण करून घेतले. घड्याळ लावून व मैलाचे दगड वाचून जास्तींतजास्त वेगाचा अंदाज केला. क्लच, ॲक्सिलरेटर, ब्रेक्स वगैरे चांगले असल्याची खात्री करून घेतली. इंजिनच्या आवाजावरून ते कसे आहे त्याचा अंदाज घेतला. अचानक ब्रेक्स मारल्यावर तोल सांभाळता येतो का ? एकदम वळण आले तर वेग-नियंत्रण कसे करावे, याचा अंदाज घेतला. मागे सामान जास्त असल्यामुळे हे अत्यंत आवश्यक होते. पुढे अनेक घाटांतून प्रवास करावयाचा होता.

परमेश्वराने प्रात्यक्षिक घडविले !

यवत व भिगवणला थोडा वेळ थांबून पुढे प्रवास सुरू केला. संमिश्र भावनांसह नानाविध विचारांमध्ये गर्क असताना अचानक समोर एक घोडेस्वार पाहिला. त्याला रस्ता ओलांडून पलीकडे जावयाचे होते. गाडी वेगात असल्यामुळे मी हॉर्न वाजवून त्याला थांबण्यासाठी हात दाखविला. पण त्याने दुर्लक्ष करून घोडे पळविले. तोपर्यंत मी एकदम जवळ पोहोचलो होतो. अचानक ब्रेक मारून प्रयत्नपूर्वक गाडी थांबविली, पण क्षणार्धात काय झाले असते त्याचा विचार करता - "वाचलो !" असे शब्द आपोआप निघाले. परमेश्वराने हे धोक्याचे प्रात्यक्षिकच घडवून दाखविले, अशी मनाची समजूत घालून मी पुढे निघालो.

वाटेतच सूर्यास्त होऊन अंधार पसरला होता. पळसघाट हा अर्ध्या मैलाचा छोटा घाट वगळता सर्व मार्ग सरळ असल्यामुळे प्रवास वेगाने झाला व मी सोलापूर शहरात पावणेनऊच्या सुमारास प्रवेश केला. काही इष्टमित्रांना कळताच त्यांनी हार्दिक स्वागत केले व स्वयंप्रेरणेने तेथील 'सोलापूर समाचार'मध्ये वर्तमान कळविले.

दैनिक 'सोलापूर समाचार'चे वृत्त वाचून काही लोकांनी सत्कारासाठी आमंत्रणे दिली. लक्ष्मी-विष्णु मिल्सच्या कामगारांतर्फे अत्यंत आत्मीयतेने सत्कार करण्यात

आला. अनेक व्यक्तींनी पण आग्रहाने आमंत्रण देऊन स्वागत केले. लायन्स क्लबचे त्या वेळचे अध्यक्ष श्री. वाकडे यांनी दक्षिण भारताच्या रस्त्यांचा नकाशा व इतर संपूर्ण माहिती असलेली फाइल भेट दिली. 'सोलापूर समाचार'चे संपादक श्री. जक्कल यांनी लेफ्ट. गव्हर्नर श्री. सीलम यांचा माझा परिचय आहे, असे पाहून पांडिचेरीसाठी मुद्दाम पत्र दिले.

सोलापूरहून निघालो तेव्हा माझा आत्मविश्वास दृढ झाला होता. परंतु कोणास ठाऊक का, – सोलापूर सोडताना फारच वाईट वाटले. पुढील मुक्काम विजापूरला होता. भर उन्हात प्रवास चालू होता. वीस मैल प्रवास केल्यावर एक ओढा दिसला. त्यातून पाणी वाहात होते. गाडी थांबवली व पाणी किती आहे याचा अंदाज घेतला. १॥ ते २ फूट पाण्यातून गाडी नेणे जरा कठीण. वाहत्या पाण्यातून गाडी घसरली तर कटू प्रसंग ओढवेल, म्हणून विचार करीत उभा राहिलो. पाच-दहा मिनिटांनी दोन गृहस्थ तेथे आले. त्यांना मराठी वा हिंदी कळत नव्हते; म्हणून संकेताने माझी अडचण सांगितली. त्यांनी ताबडतोब स्वतः ओढ्यात चालून सुरक्षित मार्ग दाखविला. मी प्रथम पायी ओढा ओलांडून आलो व नंतर गाडी नेली.

भीमा नदीवरील सुन्दर पूल ओलांडताच म्हैसूर राज्याची हद्द सुरू झाली. पोलिसांनी गाडी अडविली. मी फक्त समोरील पाटीकडे अंगुलिनिर्देश केला. त्वरित मार्ग खुला करण्यात आला.

विजापूर शहरात डॉ.प्रभाकर शहा यांची अचानक भेट झाली. सर्व ऐकल्यावर ते म्हणाले, 'ट्रॅव्हलिंग ऑल अलोन ? ऑल अलोन ? ऑन मोटार सायकल ? विदाउट कंपनी ?' मी प्रत्येक वेळेला yes असे उत्तर दिले. why चे स्पष्टीकरण ऐकल्यावर त्यांनी फार कौतुक केले. अति आग्रहाने मला भोजनास घरी नेले. डॉ. शाह म्हणाले, "आम्ही आठ दहा तरुण मित्र दीड वर्षापासून स्कूटरवर गोव्याला जाण्याचा विचार करतो, –पण जमत नाही."

गोलघुमटात गालिबची गझल

दुसऱ्या दिवशी मी शहरात फिरावयास निघालो. ऐतिहासिक प्रेक्षणीय अनेक स्थळे असलेले हे शहर फारच मागासलेले वाटले. मराठी भाषा बहुतेकांना येते

असे दिसले. पण त्यांच्या उच्चारांतून अनेक विनोद निर्माण व्हावयाचे. गोल-घुमटामध्ये मी गेलो तेव्हा सुदैवाने दुसरे कोणी नव्हते. मी आवाज लावून गालिबची उर्दू गझल गाऊ लागलो. इतका प्रसन्न झालो की शब्दात सांगता येणार नाही. मी पूर्वी अनेक जुन्या मंदिरांत व दर्ग्यांत गाणी गाइली होती. होत असणाऱ्या प्रतिध्वनीमुळे अशा जागी गावयाची गोडी काही वेगळीच असते. मी नेहमी जात असलेले धनेश्वर महादेवाचे मंदिर आठवले, व अमृतसम भजनांची आठवण झाली. गोलघुमटामध्ये भीमसेन जोशी, अमीरखां वगैरेंची बैठक झाली तर काय गायन रंगेल-- असा गोड विचार मनाला स्पर्शून गेला. परंतु तेथे द्रुतलय चालणार नाही; फक्त विलंबित ! हलक्या आवाजात गझल गाण्यात मी रंगलो असताना कर्कश शिट्या, टाळ्या व आरडा–ओरडा केल्याचा आवाज ऐकू आला. काही लोक आत आले होते, मी कंटाळून बाहेर पडलो.

इतर प्रेक्षणीय स्थळांमध्ये इब्राहिम रोझा, सातमंझिल, तोफमैदान, जुम्मा मशीद, चोवीस कमानी व ट्विन डोम्स पाहिले.

इब्राहिम रोझाच्याबाहेर मला काही मुसलमान भेटले, ते सर्व स्त्री-पुरुष हैद्राबादहून खास गाडीने आले होते. गाडीवरील पाटी वाचून एकाने जवळ येऊन विचारपूस केली. त्याला फारच आनंद झाला. त्या वयस्कर गृहस्थाने इतरांना जवळ बोलावून माझी तारीफ केली. " सच कहता हूँ– अगर आप जैसे कई नौजवान इस तरह मुलक देखने निकले तो मुलकको आबाद होने में ज्यादा वक्त नहीं लगेगा. " असे म्हणून त्याने मला मिठी मारली. सर्व स्त्री-पुरुषांचे आमच्या-कडे लक्ष लागले होते. तो पुढे म्हणाला, " मजहब नहीं सिखाता आपसमें बैर रखना " वगैरे. जाता जाता त्याने मला हैद्राबादला त्याच्या घरी येण्याचा आग्रह केला.

' ट्विन डोम्स ' येथे अनेक फकीर व वेडे स्त्री-पुरुष जमले होते. त्या दर्ग्यामधले पाणी प्याल्याने वेड नाहीसे होते व भूतखेत पण दूर होते असे मानतात. क्षेत्र गाणगापूर येथे मला असाच प्रकार मागे पाहावयास मिळाला होता. शिवापूर येथील दर्ग्याची आठवण आली. ' कमर अली दर्वेश 'च्या घोषणेनंतर वर उंच होणारा मोठा दगड आठवला. भूतयोनीविषयी पूर्वी भगवद्गीतेत-देखील वाचले होते.

विजापूरच्या हॉटेलमधून पुढच्या प्रवासासाठी निघत असताना तेथील मॅनेजरने फारच उत्सुकतेने विचारपूस केली. " व्हेर फ्रॉम यू ? " मला स्मित केल्याशिवाय राहवले नाही. मी उत्तरलो, " पूना. " तो पुढे म्हणाला, " आर यू द मॅन ऑफ पूना ? " मी हसलो. इतर काही प्रश्नांना उत्तरे दिली. अखेर त्याचे इंग्रजी ज्ञान संपुष्टात आल्यावर आमचे संभाषण चालू असताना मध्येच एकाने विचारले, " आप अकेला जा रहा क्या ? " " हां. " " तुमे अ अं बहुतु.... ढेरिंगबाज किया सो दिखता " त्याने मात्र कहरच केला होता. मला हसू आवरेनासे झाले. मूळ इंग्लिश भाषेचा शब्द डेरिंग त्याचा त्याने जो अपभ्रंश केला तो कठीण होता. त्याला मागून 'बाज' लावल्यावर तो अलंकारिक झाला. तसे पाहिले तर पुण्यासारख्या ठिकाणी-देखील सारख्या ' टेस्टदार ' पाट्या पाहावयास मिळतात म्हणा !

विजापूर–गदग मार्गावरील बदामी हे स्थळ प्रेक्षणीय आहे. मुख्य रस्त्यातून आत तेरा मैलांवर आलेल्या या गावात शंभर देवालये आहेत. मदुराईच्या प्रसिद्ध मीनाक्षी-मंदिराचे खऱ्या अर्थाने सौंदर्य पाहावयाचे असल्यास बदामीची देवळे अवश्य पाहावीत. गोपुराची निर्मिती क्रमाक्रमाने कशी होते हे येथे वेग-वेगळ्या कक्षांमधून दाखविले आहे. अभ्यासू व संशोधकांसाठी हे स्थान फारच उपयुक्त मानले पाहिजे.

कामचलावू भाषेचे धडे

केरूर या छोट्या गावी मी थांबलो. येथे एका शिपायाकडून कानडीमध्ये काही वाक्ये शिकून घेतली. नागरी लिपीमधून लिहून घेतल्यावर मी ती त्याला वाचून दाखवीत होतो. अवतीभोवती अनेकांचा समुदाय जमला. सर्व मिळून मला उच्चार शिकवू लागले. गवयी समेवर येतो तेव्हा जसे प्रेक्षक साथ करतात, त्याप्रमाणे मी शेवटचा शब्द बोलत असता सगळे साथ करायचे. आपली भाषा दुसरा कोणी शिकत असल्याचे जाणून सर्वांना अभिमान वाटत होता. त्यांच्या नजरेत कौतुक स्पष्ट दिसत होते.

नरगुंड येथे पोहोचलो तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. दिवा बरोबर लागत नव्हता म्हणून मुक्काम करण्याच्या विचारात होतो. परंतु तेथे राहण्याची कुठेच

सोय नसल्यामुळे गदगला जाऊन मुक्काम करावा, असा विचार केला. रस्ता बरा होता, त्यामुळे गाडी भरधाव जात होती. मी गोड पूर्वस्मृतीमध्ये गुंग झालो होतो. अचानक समोर एक नाला दिसला. वेग कमी करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण नाल्यात वाळूचा थर होता त्यात चाक घसरले व मी खाली पडलो. समोरील काच व बल्ब फुटले होते. मला मार लागला होता. हातातून गाडीची किल्ली वाळूत निसटून पडली होती ती अंधारात सापडत नव्हती. तेवढ्यात शेजारील शेतातून एक आरोळी आली. मी चिंतित झालो. रस्त्यावर येऊन कोणी पाहण्याअगोदर लपावे म्हणून एका झाडाच्या आडोशाला गाडी उभी करून मी बसलो. पुन्हा तसाच आवाज. तितक्याच अंतरावरून आला. विचारान्ती लक्षात आले, एक कोणी तरी शेतकरी जंगली जनावरांपासून पिकाचे रक्षण करण्यासाठी असा आवाज काढीत होता ! आमच्या गावी असा प्रकार मी पाहिला होता.

गाडी चालू होईल किंवा काय ? असा प्रश्न डोळ्यांसमोर पुढे होता. पण विचार करीत बसण्यात अर्थ नव्हता. मी सूटकेसमधून दुसरी चावी काढू लागलो तेवढ्यात एक जीप आली. मी हात दाखवला. थोड्या अंतरावर थांबल्यानंतर संशयाने त्याने भर वेगाने गाडी पुढे नेली. मी पुन्हा माझे प्रयत्न सुरू केले. तेवढ्यात मागून एक ट्रॅक्टर आला. तो थांबवून त्याच्या प्रकाशात गाडीची किल्ली व माझे पडलेले घड्याळ शोधून घेतले. भाषेच्या अडचणीमुळे फार त्रास झाला. दिवा फुटला असल्यामुळे फारच हळूहळू व काही अंतर ढकलीतच मी गदगला रात्री साडेअकरा वाजता पोहोचलो.

प्रसाद लॉजच्या मालकाने गाडीकडे पाहून ओरडूनच नोकरांना बोलाविले. मला म्हणाला, "बोत लग्या क्या ? ॲम्ब्युलन्स बुलाना ?" मला आत नेले व मलम दिले– "तुम ये लगाव.... ताबडतोब अच्छा...." ॲक्सिडेण्टबद्दल विचारपूस केल्यावर म्हणाला, "तुम बडा हुशारी किया; नहीं तो यहाँ का आदमी बोत बुरा– गर्रम !"

दुसऱ्या दिवशी गाडीची दुरुस्ती करून निघालो. वाटेत वीसेक मैलांचा रस्ता अतिशय खराब होता. सबंध रस्त्यावर मोठमोठी खडी टाकलेली होती. अशातून तोल सांभाळून गाडी चालविणे फार त्रासदायक होते. त्यातून गाडी पंक्चर झाली

तर कठीण प्रसंग ओढवणार होता. कालचा अपघात व आजचा हा प्रसंग ! कसा काय प्रवास संपणार कोणास ठाऊक ! काळजी वाटू लागली. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना हिरवळ नाममात्रसुद्धा नव्हती. तसेच वस्तीही शून्य. त्रासातून प्रवास करीत शेवटी चांगल्या रस्त्यावर आलो. तेव्हा अंधार झाला होता.

होस्पेटला पोहोचावयाचे होते. परंतु रात्र फार झाल्यामुळे व रस्त्याची कल्पना नसल्यामुळे कोप्पलला थांबलो. डाक बंगल्याशिवाय राहण्याची सोय नव्हती व तेथे खोली रिकामी नव्हती. शेवटी डाइनिंग हॉलमध्ये झोपण्याची सोय केली. जेवणासाठी बाहेर निघालो. तो वाटेत एक गृहस्थ भेटले. बोलता बोलता ओळख निघाली. थक्कुंडींचे बंधू पुण्यातील स्वस्तिक रबर फॅक्टरीत काम करीत आहेत. माझा त्यांच्याशी मागे संबंध आला होता. त्यांना फारच आनंद झाला.

पहाटे पाचला मी उठलो. थंडीचा प्रतिकार करण्यासाठी व्यायाम सुरू केला. बराच व्यायाम झाल्यावर आंघोळ करून मी होस्पेटकडे निघालो. रस्ता पाहिल्यावर वाटले, " रात्री प्रवास न केला तेच बर झालं. "

● ● ●

२ : हंपीच्या मंदिरांचे भव्य शिल्प

बहुभाषी बाल–मार्गदर्शन

हम्पी व विजयनगर पाहून मला फारच आश्चर्य वाटले. येथे मला एक उत्कृष्ट गाइड मिळाला. वय वर्षे १२ होते. पण त्याने मला बेहद्द खूष केले. घाईमुळे मी काही वेळा पळत असे तेव्हा तोही न दमता पळायचा. " महाराज, यह विठ्ठल मंदिर. यहाँ खम्भेसे... (मध्येच थोडे कानडी बोलून) सरगम निकलता." त्याचे चापल्य पाहून मला फार कौतुक वाटले. इतर अनेक ठिकाणी अशी लहान लहान मुले गाइडचे काम करीत असल्याचे मी पाहिले होते. अशा मुलांना त्यांच्या कामापुरते संभाषण इतर प्रमुख भाषांतून शिकवण्याची सोय केली तर फार बरे होईल, असा विचार मनाला स्पर्शून गेला. सर्व ठिकाणी अशी मुले असतात, त्यांना त्याचा फार उपयोग होईल व लोकांनाही पूर्ण माहिती मिळाल्यामुळे जास्त आनंद लुटता येईल.

मी हम्पीला पोहोचलो तेव्हा ऊन मी म्हणत होते. चोहोकडे डोंगराळ भाग. पायाखाली काळा दगड, व जेथे साधारण माती होती तेथे बारीक काटे– अशा स्थळी तो छोटा ' गाइड ' इरेच्या उघड्या पायांनी माझ्याबरोबर हिंडत होता. " महाराज, ये देखो– वो देखो, उदर वो देखो, उदरकु जाना... " असे त्याच्या हिंदीत तो एकसारखा बोलत होता. माझी फारच करमणूक केली त्याने. स्थळ पाहिल्यावर मी माहिती-पुस्तकावर खुणा करायचे क्वचित एखादे खोडायचे राहिले की तो म्हणायचा, " वाह...महाराज, ये देखा– इधर कट करो. "

पंपापति देवळात अनेक छोटी देवळे आहेत. त्यांतील एका देवळातील भिंतीवर बाहेरील गोपुराची सावली पडते. एका खिडकीतून येत असलेल्या प्रकाशामुळे ही सावली पडते. त्याचे वैशिष्ट्य हे की, सावली ' उलट ' पडते; म्हणजे शिखर सावलीच्या खालच्या भागात दिसते ! विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे सूर्य कोठल्याही दिशेला असला तरी सावली त्या भिंतीवर पडते ! !

असेच आणखी एक आश्चर्य मी पाहिले. देवळाच्या दारांना दोन छिद्रे आहेत. आत पाहिल्यावर काळोख दिसतो. दुसऱ्या छिद्रासमोर इकडच्या फेऱ्या घालायला लागल्याबरोबर आतील भिंतीवर त्याचे उलट प्रतिबिंब पाहावयास मिळाले. त्याव्यतिरिक्त येथे अनेक सुंदर स्थळे आहेत. जवळजवळ ५० स्थळांना मी भेट दिली. विठ्ठल मंदिरातील ' संगीत स्तंभ ' प्रशंसनीय आहे. स्तंभांचे वेगवेगळे समूह असून त्यातून तबला-तरंग, सरगम, जलतरंग, घंटाध्वनी निर्माण होतात. तेथील नृत्यसभागृह प्रेक्षणीय आहे. ' स्टोन—कार 'मधील मोठ-मोठ्या दगडांचे सांधे ओळखता येत नाहीत इतके कौशल्यपूर्ण काम केले आहे. त्याची चाके दगडाची असून दगडाच्याच ॲक्सलवर ती फिरू शकतात.

विजयनगर येथील ' थ्रोन प्लॅटफॉर्म ', ' प्रिन्स बाथ ', ' लोटस महल ', ' वॉचटॉवर ' व ' म्युझियम ' ही उत्कृष्ट स्थळे आहेत.

परतताना तुंगभद्रा प्रोजेक्ट पाहिलेल्या नदीवरील एक दंतकथा ऐकली. वराह अवतारामध्ये विष्णूने दाढेवर जेव्हा पृथ्वी उचलली तेव्हा त्यांना पुष्कळ घाम फुटला व तो घाम पडल्यामुळे या नदीचा जन्म झाला. डोंगरावरील सर्किट हाउसवरून या १॥ मैल लांब बांधाचे दर्शन रमणीय वाटते.

येथून निघून मी हुबळीकडे प्रवासास सुरवात केली. संध्याकाळी पाचला पोहोचलो. शहराचे वातावरण उत्साहवर्धक वाटले. हुबळीमधील एका हॉटेलची व्यवस्था पाहून फार समाधान झाले. पुढे सर्व प्रवासात मला राहून राहून त्याची आठवण यावयाची. सामान्य नागरिकाच्या सोयीसाठी सगळीकडे असे हॉटेल असावे, असे वाटले.

पूर्ण प्रवास झाल्यानंतर सर्वदृष्ट्या विचार करून असे वाटते की, हुबळीचे ते हॉटेल प्रशंसनीय होते. तेथे दोन रुपये दरापासून २५ रुपये दराच्या

वातानुकूलित स्वतंत्र खोल्या भाड्याने मिळतात. सकाळी चार वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत गरम पाणी थंड पाण्याप्रमाणेच मिळण्याची सोय आहे. त्यामुळे मी रात्री आठ वाजतादेखील मनसोक्त आंघोळ करू शकलो. जेवणही अल्प मूल्यात व मध्यम वर्गीयांना पसंत पडेल असे मिळते. इतर कोणत्याही किरकोळ कामासाठी नोकर सतत हजर होता. गाड्या ठेवण्यासाठी छोटे अंगण होते. रक्षक चोवीस तास असे.

हुबळीच्या ' विश्ववाणी ' वर्तमानपत्राचे सहसंपादक श्री. उमादी यांना माझ्या मुलाखतीने फार आनंद झाला. त्यांनी एक चहापानाचा कार्यक्रम घडवून आणला. उमदींनी स्वतः वेळ काढून मला शहरातील काही प्रेक्षणीय स्थळे दाखविली. तेथील प्रसिद्ध पुरुषावीर मठातील श्रीमन्महाराज निरंजन जगद्गुरू श्री. गंगाधर-राज योगीन्द्र स्वामीजींचा परिचय करवून दिला. त्यांनी आत्मीयतेने अशीर्वाद देऊन शुभचिंतन केले ! त्यांच्याशी मी हिंदीमध्ये संभाषण केले. मठाच्या फंडातून चालत असलेल्या शाळा व कॉलेजे इत्यादी शैक्षणिक संस्था पाहिल्या. तेथून मी श्रीमती गंगूबाई हनगळ यांच्या घरी गेलो. नामवंत कलाकारांची भेट घ्यावयाची असाही माझ्या प्रवासातील एक कार्यक्रम होता.

हुबळीहून जोग फॉल्सकडे प्रवास करताना डोंगराळ भागातून जावे लागले. एकसारखे चढउतार व वळणे, उताराच्या शेवटी दोन्ही बाजूंना छोटे तलाव, व आजूबाजूला दाट अरण्य. क्वचितच कोणी माणूस रस्त्यावर दिसे. या भागातील अरण्यात हिंस्र पशू अनेक आहेत, असें ऐकले होते. त्यामुळे नजर एकसारखी दोन्ही बाजूंना फिरत राहावयाची. वृक्षाची उंची पाहून आश्चर्य वाटले. उंच आणि विस्तृत वृक्षांमुळे अधूनमधून सूर्याची किरणे रस्त्यावर पडलेली दिसायची. दुतर्फा वृक्षांमुळे रत्यावर सावली पडत असें. मैल दोन मैलांवर एखादे झोपडे दिसे व जवळपास केळीची छोटी बाग किंवा सुपारीची झाडे दिसत.

चढउतार व वळणामुळे पुढे रस्ता कसा आहे हे कळणे कठीण जात होते. म्हणून गाडीचा वेग आपोआपच कमी होई. मुंदगोळला फळांची दुकाने पाहून फलाहार केला. चार-पाच प्रकारची केळी पाहिली व दुकानदाराशी त्याविषयी चर्चा केली. 'सुगंधी' हे फारच स्वदिष्ट होते. म्हैसूर राज्यात इतर फळे कमी

पाहावयास मिळतात, पण केळी उत्पादन चांगले आहे. सुगंधी, रसबळ, पंचबळ, करमाळी, नेंद्रबळ, म्हैसूरबळ इत्यादी प्रकार नवीन वाटले.

शिरसी येथे संध्याकाळी शाळेतून परतणारी मुले पाहून हांका द्यावयास लागली. त्यांना काही तरी नवीन पाहिल्याचा आनंद वाटत होता. येथील ' मरीकांबा ' देवीचे दर्शन घेतले. भव्य मंदिरात विविध उत्सवांसाठी संग्रहित केलेल्या वस्तू पाहिल्या, व एक नव्या बांधणीचे वैशिष्ट्यपूर्ण देऊळ पाहिल्याचा आनंद झाला.

तसाच प्रसंग आला तर....

अंधार झाला होता, तरी मी जोग-फॉल्सला पोहोचू शकलो नव्हतो. सिद्धापूरला रात्री मुक्काम करण्याचा विचार केला. डाक बंगला डोंगराच्या माथ्याशी होता. चोहोकडे अंधार पसरलेला होता. बंगल्यात कोणीच नव्हते. दिवे फक्त लावलेले होते. पंधरा–वीस मिनिटे वाट पाहिली. कोणीच आले नाही. थंडीने अंगाचा थरकाप उडत होता. तेवढ्यात मागील बाजूच्या जंगलातून वाळलेल्या पानावरनं कोणी तरी चालत असल्याचा आवाज आला. जवळ बॅटरीदेखील नव्हती. चोहोकडे दाट जंगल व मी एकटा मध्ये उभा होतो. क्षणार्धात अनेक बरेवाईट विचार मनात येऊन गेले. चटकन मी प्लॅस्टिक बॅगची चेन ओढून छोटा चाकू काढून खिशात ठेवला. फळे वगैरे कापण्यास उपयोगी म्हणून तो मी बरोबर घेतलेला होता. वेळ वाईटच आली तर.... ! काय होण्याची शक्यता आहे व कसे संरक्षण करावे ह्या विचारात मी चाकू घट्ट धरून उभा राहिलो.

सुदैवाने आवाजाच्या दिशेने एक वासरू बाहेर आले व मला हायसे वाटले !

बंगल्याच्या एका दाराची कडी उघडून दार उघडले. नशिबाने ते आतून बंद नव्हते. मी सर्व सामान आत ठेवले व बाहेरून कुलूप लावून खाली गावात जेवावयास गेलो. मिळेल त्यात समाधान मानून मी वाचनालयात गेलो. तेथील व्यवस्थापकांशी बोललो. येथे असलेल्या काही जगप्रसिद्ध प्रवाशांची पुस्तके पाहिली; व विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी इतर कांही पुस्तके पाहून समाधान व्यक्त केले. तात्दतोब त्याने शेऱ्यांची वही पुढे करून माझे प्रशस्तिपत्र घेतले.

येथे रात्री एक वाजेपर्यंत मी मित्राला पत्र लिहीत बसलो. तेवढ्यात वॉचमन आला व त्याने विचारपूस केली. मी विशेष न बोलता विश्ववाणीची प्रत दाखविली.

कानडी वर्तमानपत्र वाचून तो हसला व निघून गेला. पहाटे उठून थोडे रनिंग केले. गरम इडली, सूळईपुरी व कॉफी घेतली. सूळईपुरी हा पुरणपोळीसारखा प्रकार, पण क्रीमरोलसारखा आकार देऊन तुपातून कडक तळून घेतले होते. हा पदार्थ पुष्कळ दिवस टिकतो. एखादी नवी, अनोखी, निराळी गोष्ट पाहिली की कुतूहलाने तिची माहिती घेण्याची मला आवड आहे. त्याचा प्रवासात उपयोग अनेकदा झाला.

अति उत्कंठेने मी जोग फॉलसला पोहोचलो. पंधरा-वीस मिनिटे एकसारखा धबधब्याकडे बघतच राहिलो. आसपासची झाडी, डोंगर, दरीतून वाहणारी खोल शरावती पाहून मन प्रसन्न झाले. मेहमूद नावाच्या बारा वर्षांच्या गाइडला घेऊन मी धबधब्याच्या तळाकडे निघालो. जसजसा खाली गेलो तसतसा थंड हवेचा परिणाम वाढत गेला. एकदम खाली पोहोचल्यावर मी तुषारांनी भिजलो. परंतु त्यातही आनंद सामावलेला होता. पुण्याच्या पर्वतीवर पावसाळ्यात हलक्या सरींचा शिडकावा घेण्याची मजा अनेक वेळा मी अनुभवली होती. शालेय जीवन आठवले व मी लहान मुलांप्रमाणे या दगडावरून त्या दगडावर उड्या मारीत नदीच्या मध्यभागी जाऊन पोहोचलो. तेथे दगडांवर पाय घसरत होता, त्यामुळे तोल सांभाळून चालावे लागायचे. नदीच्या पाण्यात पाय ठेवला. अंगातून एकच वीज चमकून गेल्यासारखे झाले. पाणी बर्फासारखे थंड होते. तेथे बसून तासभर यथेच्छ गाणी गाइली. परत वर जावेसे वाटत नव्हते. परंतु मनावर संयम ठेवून उठलो. वर येईपर्यंत त्या थंडीतदेखील घामाने सर्व कपडे भिजले.

मंदिरातून बाहेर पडावेसे वाटेना

जवळच असलेली शरावती पाहिल्यावर फार बरे वाटले. पर्वताच्या टोकावरून पाहिले असता खालील विद्युतनिर्मितिकेन्द्र खेळण्यासारखे दिसायचे.

पुढच्या प्रवासात आनंदपुरम येथे रात्री नऊ वाजता श्री. गणेशन या शेतकऱ्याकडे मुक्काम केला. श्री. गणेशनना कानडीशिवाय कोणतीच भाषा येत नव्हती. मी सांकेतिक भाषेने त्यांच्याशी थोडे संभाषण केले. नकाशातून माझ्या प्रवासाचा मार्ग दाखविला. आम्हा दोघांनाही हा प्रसंग विलक्षणच होता. तो भावना अथवा शब्दांनी व्यक्त करू शकत नव्हता. पण त्याच्या डोळ्यांतून प्रेम

वाहात होते. ‘ देशबांधव ’ या नात्याने त्याने फारच आपुलकीने माझा पाहुणचार केला.

स्वच्छ सुंदर पाण्याने तुंगा नदी भरली होती. अनेक भाविक शृंगेरीच्या यात्रेला आले होते. मीही आंघोळ करून दर्शन घेतले. ठरलेल्या वेळातच दर्शन घडले म्हणून बरे झाले, नाही तर संध्याकाळपर्यन्त थांबावे लागले असते. येथील काळ्या दगडातील काही मूर्ती फारच सुंदर आहेत. जगद्‌गुरू तेथे नव्हते. त्यामुळे मनाला थोडी रुखरुख वाटली. येथील भाविक वातावरण पाहून मन प्रसन्न झाले.

आनंदपुरम ते शृंगेरी व पुढे चिकमंगलूरपर्यंतच्या रस्त्यावर प्रवासात फारच त्रास झाला. शृंगेरीपासून सहा मैलांवर मी डोंगरात पोहोचलो. पुढे दोन रस्ते होते. पाट्या नव्हत्या. रस्त्यावर धुळीचे साम्राज्य होते. कपडे, गाडी व सर्व सामान धुळीने माखलेले होते. जमिनीवर पाय ठेवले तर बूट दिसेनासे झाले. धुळीचा थर चार-पाच इंच खोल होता. कोठे बसायला पण जागा नव्हती. उन्हाचा तसाच तासभर उभा राहिलो. नंतर काही मुले दिसली. त्यांना विचारले, “ चिकमंगलूर गे होगुदु हादीयल्लद्दे ? ” त्यांनी हात दाखवून “ इडिइडि ” असे उत्तर दिले. मी हसलो. “ स्ट्रेट ? ” एक उत्तरला, “ इंगे स्ट्रेट ! ” तेव्हा कुठे जिवात जीव आला.

सबंध दिवसाच्या कष्टमय प्रवासानंतर बेलूरला पोहोचलो. गावाबाहेर पाटी वाचली “ Belur Town ”. खाली हिंदीत लिहिले होते– ‘ बेलूर टउन ’. चेहेऱ्यावर स्मित उगवले.

बेलूरच्या ‘ चन्ना केशव ’ म्हणजे ‘ सौम्य कृष्ण ’च्या मंदिरातून बाहेर पडावेसे वाटत नव्हते. सकाळपासून तब्बल सहा तास मी मंदिरावरील शिल्प पाहात होतो. पण मनाचे समाधानच होत नव्हते. सुंदर पॉलिश केलेल्या काळ्या दगडावरील ते नक्षीकाम अति... अति सुंदर आहे. राजस्थानमधील देलवाडा जैन मंदिर राणकदेवी जैन मंदिराची आठवण करून देणारे हे शिल्प. तेथे संगमरवरावर नक्षीकाम आहे; येथे काळ्या दगडावर. पण येथील काही वैशिष्ट्ये राजस्थानमध्येदेखील पाहावयास मिळत नाहीत.

विद्युत-जनरेटरचे शाफ्ट उभे जसे फिरते, तसा त्या मंदिराच्या गाभाऱ्यातील खांब पूर्वी फिरत असे. एकाच दगडाचा खांब व त्यात अर्धा इंच जाडीची खालून वरपर्यंत कोरलेली पट्टी, आणि त्यात लहानलहान आकृत्या पाहून माणूस थक्क होतो. सर्व बाजूंनी खालून अनेक रांगा व त्यांत कोरलेले हत्ती, घोडे, सैनिक इत्यादी फार आकर्षक वाटते. एका स्वरूपसुंदरीच्या वेणीतील फुलावर एक भ्रमर बसला आहे,– हे सर्व स्पष्ट हुबेहुब आहे, व एकाच दगडातून कोरून काढलेले आहे. मंदिरासमोर साठ फूट उंचीचा खांब आहे. त्याचा चौकोनी पाया एकाच कोपऱ्यावर आधारित आहे व बाकीच्या तीन कोपऱ्यांतून कापड सहज आरपार जाऊ शकते. त्यावरून ९०० हून अधिक वर्षांपूर्वी येथील शिल्पकारांचा गुरुत्व-केन्द्राचा किती चांगला अभ्यास होता हे स्पष्ट होते. हा खांब पाहून पिसाच्या मिनोऱ्याची आठवण झाली.

त्याच प्रकारची मंदिरे हळेबीड येथे आहेत. तेथे गणपती, सरस्वती व महादेव यांची देवळे आहेत. समोर खुल्या हवेत दगडी शिल्पाकृतीचे संग्रहालय आहे. येथे नंदी व महादेवाचे लिंग प्रेक्षणीय आहे.

तसेच दगडी शिल्पाचा एक प्रचंड नमुना म्हणजे गौतमेश्वराची मूर्ती. श्रवण-बेळगाळ येथील ही ६० फूट उंच मूर्ती एकाच डोंगरातून कोरलेली आहे.

वेलूर व हळेबीडसारखे सूक्ष्म शिल्प मला इतर कोठेच पाहावयास मिळाले नाही. पुनःपुनः जाऊन व पाहूनही पुरे होणार नाही, अशी ही अभिमानास्पद प्रेक्षणीय स्थळे आहेत.

● ● ●


३ : बंडीपूरच्या अरण्यात

निजलिंगप्पांबरोबर मुलाखत

बंगलोर शहरात रात्री दहाच्या सुमारास प्रवेश केला. वाटेत गाडीच्या दुरुस्ती-साठी बरेचसे श्रम घ्यावे लागले होते. योग्य हॉटेलची विचारपूस करण्यात व प्रत्यक्ष मुक्काम करण्यास रात्रीचे अकरा वाजले. आंघोळ करून मध्यरात्रीचा मी बाहेर पडलो व आहार घेतला. प्रवासात १२ वाजण्यापूर्वी न झोपण्याचा नियमच जणू झाला होता.

उत्तरेला गेल्यावर सरहद्दीवर जवानांची भेट घेण्याचा मानस होता व त्यासाठी कोणा मुख्यमंत्र्याचे पत्र आवश्यक होते. तेव्हा ते त्या वेळचे म्हैसूरचे मुख्यमंत्री श्री. निजलिंगप्पांच्याकडून मिळवावे, असा विचार करून मी प्रयत्न सुरू केला. सात डिसेंबर रोजी सेशनला प्रारंभ होणार होता. मी त्या आधी श्री. बी. एम. पाटील यांना भेटलो. परंतु त्यांना मला साहाय्य करणे कठीण होते. श्री. निजलिंगप्पा कॉंग्रेसचे अध्यक्ष होणार होते, त्यामुळे बऱ्या लोकांची त्यांना भेटण्याची गर्दी उडाली होती. शिवाय त्याच दिवशी डॉ. झाकिर हुसेन येणार होते. अशा रीतीने त्यांचा सबंध दिवस कार्यक्रम आखला गेला होता. मुलाखत मिळणे कठीण होते.

सकाळी निवासस्थानी भेट झाली नाही, म्हणून दुपारच्या असेंब्ली सेशनला गेलो. तेथे त्यांच्या सेक्रेटरींना भेटलो. पण उपयोग झाला नाही. थोडा विचार करून मी तेथे सर्वांत सीनियर माणूस कोण याची चौकशी केली. श्री. राजप्पांचे



मेहतार-महल (विजापूर)


वरील चित्रात मेहतार-महलाचा दर्शनी भाग आहे. आतून विशाल बांधकाम आहे. चित्रातील महालावर अति बारिक नक्षीकाम असून पाहताच नजर स्थिरावते.

फोटो : अशोककुमार स्वामीनारायण



हंपीतील विठ्ठल


प्राचीन विजयनगरच्या राजांनी बांधलेले हे विठ्ठल मंदिर. उज
विविध समूह येथे असून त्यावर काठीने हलक्या हाताने वाज
हे अतिभव्य केल्यामुळे पंढरपूरचे ' विठोबा ' नाराज झाले व



रातील भव्य शिल्प


ाप-यात स्टोन–कार, त्याच्या शेजारी संगीत मंडप आहे. खांबांचे
वर घंटानाद, तबलातरंग, सरगम इत्यादी ध्वनी निर्माण होतात.
ा गरीबांच्या पंढरपूरी गेले अशी दंतकथा आहे.

फोटो : अशोककुमार स्वामीनारायण



चोवीस कमान : विजापूर


सुलतानांच्या रिवाजानूसार आदीलशहाने एका अतिभव्य इमारतीचे बांधकाम सुरू केले. पूर्ण झाली असती तर ताजमहालाहून मोठी झाली असती. अशा कमानी इतरत्र नाहीत.



हंपी येथील विठ्ठल मंदिरांतील दगडी रथ


चित्रांतील रथाची चाके दगडी असून फिरू शकतात. बारीक शिल्प असून काम इतके सुरेख आहे की कोठेही जोडकाम दिसून येत नाहीं.

फोटो : अशोककुमार स्वामीनारायण



बेलूर (म्हैसूर राज्य) येथील


काळ्या दगडामध्ये बांधलेले बारीक शिल्पात भारतातील सर्वोत्
फार उठावदार व आकर्षक आहे. तासन् तास पाहिल्यानंतरही मना



ाकेशव (सौम्य कृष्ण) मंदिर

-हणता येईल असे हे प्रेक्षणीय आहे. चांगले पॉलिश केले असल्यामुळे ि समाधान होत नाही.

फोटो : अशोककुमार स्वामीनारायण



हंपी येथील पंपापती मंदिरातील गोपूर

हा गोपूर १६०' उंच असून अकरा मजले आहेत. वर टोकापर्यंत जिन्याने जाता येते. चित्रांत दोन दीपस्तंभ आहेत.

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण

नाव कळताच मी त्यांच्याकडे गेलो. त्यांची थोडी प्रशंसा करून माझे काम तेच करू शकतील, असा विश्वास व्यक्त केला. त्यांना माझ्याबद्दल सहानुभूती वाटून त्यांनी मला निजलिंगप्पांच्या साध्या वेषातील संरक्षकाबरोबर आत पाठविले.

आम्ही स्पीकर यांच्या ऑफिसकडे आलो असता समोरून निजलिंगप्पा येताना दिसले. तत्क्षणी मी कानडी पेपर घेऊन पुढे गेलो व फोटो दाखवून इंग्लिशमध्ये परिचय देऊ लागलो. त्यांनी पत्र तयार करून सहीसाठी आणण्यास सांगितले. श्री. राजप्पांनी पत्र तयार करून मला दिले. ऑफिसच्या बाहेर थांबलो असता त्यांच्या वैयक्तिक मदतनिसांनी कळविले की ते सही देण्यास नकार देतात; त्यांच्याशी थोडा वाद झाल्यावर मी त्यांना पुनः भेटण्याची इच्छा व्यक्त केली. सर्व लोक बाहेर पडल्यावर मी आत प्रविष्ट झालो.

माझी ओळख नसताना पत्र कसे द्यावे असा प्रश्न होता. " आपण महाराष्ट्राच्या कोणा मंत्र्याकडून पत्र आणलं असतं तर मी दिलं असतं. " असे ते म्हणाले. मी त्यांना उत्तर दिले, " मी उत्तरेकडे प्रवास सुरू केला असता, व मुंबईला गेलो असतो तर तिथून घेतलं असतं. पण दक्षिणेला आधी निघालो म्हणून इथं आलो. मी महाराष्ट्र व म्हैसूर असा विचार करीत नाही. सर्व मंत्री राष्ट्राचे नेते आहेत. मी एक सामान्य नागरिक आहे. महाराष्ट्रातही कोणीही मंत्री मला ओळखत नाही. तेव्हा मी कोणाहीकडे पत्राची अपेक्षा करू नये का ? " असे सांगून मी पोस्टाचे आयडेन्टिटी कार्ड दाखविले व म्हणालो, "माझा तुमचा नुकताच परिचय झाला आहे. असं म्हणून पाहिजे असल्यास तुम्ही प्रशस्तिपत्र द्या." अशा प्रकारे पाच ते सात मिनिटे संभाषण झाल्यावर त्यांनी त्यांच्या चिटणिसास पत्र तयार करण्यास सांगितले.

अशा रीतीने पत्र मिळविल्याबद्दल त्यांच्या दोघांही चिटणिसांनी, हेडक्लार्क श्री. राजप्पा व इतर अनेकांनी कौतुक केले. माझा तेथील पत्ता त्यांनी घेतला, व त्यामुळे रात्री माझ्याकडे चार प्रसिद्ध वर्तमानपत्रांचे बातमीदार भेटावयास आले.

गुंडांच्या वस्तीतून भटकंती

बंगलोरची विधानसभा (विधान सौध) ही एक प्रेक्षणीय इमारत आहे. इतर कोणत्याच राज्यात इतकी सुंदर विधानसभा नाही. इतर अनेक आकर्षक

स्थळे आहेत. तेथील हवामानाबद्दल फार ऐकले होते. मलाही येथील हवामान फारच आवडले. पुण्याच्या तोडीचे आहे. परंतु पुण्यात हवा व पाणी यांचे सुंदर मीलन आहे. बंगलोरचे पाणी थोडे दूषित आहे. पोटाचे विकार त्यामुळे होतात, असे अनेकांच्या तोंडून ऐकले. तेव्हा त्या दृष्टीने पुणेच श्रेष्ठ अशी खात्री पटली.

एके रात्री बंगलोरला रस्ता चुकून मी गुंडांच्या वस्तीत गेलो. मागे फिरावे तर फार लांबचा रस्ता होता. हिंमत करून पुढे निघालो. खिशातील रुमाल काढून अस्सल पुणेरी भामट्याप्रमाणे गळ्याला बांधून घेतला व " ए मेरे दिल कही और चल... " हे दारुड्याचे गाणे शिट्टीवर वाजवीत रस्त्याच्या मध्यातून निघालो. आजूबाजूला अनेक गुंड दारू पिऊन बसले होते. कोणी आरडा ओरड करीत होता. कोणी धिंगाणा घालीत होता. सर्वांनी मजकडे पाहिले. पण कोणी चकार शब्द काढला नाही. पुढे मुख्य रस्ता आल्यावर मी सभ्य गृहस्थाप्रमाणे चालू लागलो.

कोलार येथील सोन्याच्या खाणी पाहण्यास प्रवेश मिळण्यास फारच त्रास झाला. सर्वोच्च अधिकाऱ्याला भेटून त्याची परवानगी घेऊन पाहण्यास मिळाले. तेथे ठराविक दिवशीच भेट घेता येते हे माहीत नव्हते. लिफ्टने फार खोल गेल्यावर प्रत्यक्ष काम पहावयास मिळाले. रसायनशाळा वगैरे सर्व पाहिले. सुरक्षिततेच्या दृष्टीने फारशी सोय नाही असे वाटले.

मी बंगलोरला असताना कोयनेकडे धरणीकंप झाला व मद्रास येथे चक्रीवादळामुळे बरेचसे नुकसान झाल्याचे वाचले. चक्रीवादळामुळे सबंध दक्षिण भागात पाऊस जोराचा सुरू झाला व मला बंगलोरला थोडा मुक्काम वाढवावा लागला. नव्याने परिचित झालेले श्री. अरविंदकुमार मला फारच आग्रहाने स्वतः होऊन आपल्या घरी घेऊन गेले. त्यांच्या सौ. व मुलांना फार आनंद वाटला. अल्पावधीत मला माझ्या अत्यंत निकट स्नेह्याकडे आल्यासारखे वाटले. गप्पा इतक्या रंगायच्या की रात्रीचे दीड ते दोन वाजल्याचे भानच राहात नसे. असा अनुभव पुष्कळ ठिकाणी आला.

म्हैसूरला जाताना शिवसमुद्रम येथील धबधबा पाहिला. धबधब्यापासून फार लांब अंतरावर कावेरीचे दोन प्रवाह होतात. पुनः धबधब्याच्या रूपाने पडून दरीत

त्यांचे मीलन होते. दुपारच्या वेळेस इंद्रधनुष्य पाहण्याची संधी लाभली. आसपासचे डोंगर व झाडी-झुडपांमुळे या स्थळाला वेगळेच सौन्दर्य लाभले आहे. एक सुंदर विद्युतनिर्मिती केन्द्र पण आहे.

शिवसमुद्रमहून दोनदा चुकीच्या मार्गावर प्रवास झाला. लोकांना विशेष माहिती नसताना हमी देत असत. शेवटी एकंदर दहा जणांना लागोपाठ वाटेत हटकून खरी माहिती शोधून काढावी लागली. नकाशामध्ये रस्ता दिलेला नसल्याने अडचण आली. मार्गावरील दुतर्फा पडिक जमीन पाहून मनाला फार वाईट वाटले. आधुनिक पद्धतीने लागवड करून किंवा बागायत करून उत्पादन केल्यास किती बरे होईल ?—असे एकसारखे वाटे.

शेकडो वर्षांच्या ताज्या कलाकृती

श्रीरंगपट्टम येथील टिपू सुलतानची कबर वगैरे इतिहासप्रसिद्ध स्थळे पाहिली. त्याच्या महालातील भिंतीवरचे चित्रकाम फारच अस्पष्ट झाले आहे. पण ही अप्रतिम कलाकृती असल्याची खात्री होते. शेकडो वर्षांपूर्वीचे रंग अजून टिकून आहेत. काही आकृत्या स्पष्ट दिसतात व अगदी जिवंत वाटतात. जवळ असलेल्या बागेमुळे या स्थळाला पर्यटन केन्द्राचे स्वरूप आले आहे.

त्या दिवशी वृन्दावन बागेत रोषणाई होणार होती म्हणून मी म्हैसूरकडे न जाता सर्व सामानासह सायंकाळी आठ वाजता सरळ वृन्दावनला गेलो. एका पोलिसाला गाडीवर नजर ठेवण्यास सांगून मी बागेत तास– दीड तास फिरलो. अनेक लोक सुंदर सुंदर वस्त्रभूषणे धारण करून फिरत होते. जणू काही सौन्दर्याची स्पर्धा चालू होती. बागेसमोरील एका अलीशान हॉटेलकडे दृष्टी वळली. बाहेरूनच त्याची शोभा उत्कृष्ट होती, तर आतून काय वातावरण असणार, अशी कल्पना केली. नुकताच प्रवास करीत असता अनेक झोपड्या वाटेत पाहिल्या होत्या. नग्नावस्थेत इतस्ततः मातीत खेळत असलेली काळी सावळी कोवळी मुले पाहिली होती. त्या शहराबाहेरील झोपड्या व त्यांतून येणारा दिव्याचा अल्प प्रकाश राहून राहून डोळ्यांसमोर उभा राहात होता.

बागेच्या दुसऱ्या टोकाकडील तलावाकाठी मी जाऊन उभा राहिलो. संथ पाण्याकडे पाहात पुष्कळ वेळ निघून गेला. कोणास ठाऊक, पण त्या लखलख-

णाऱ्या दिव्यांकडे पाहण्याची इच्छाच लुप्त झाली होती. वृंदावनचे आकर्षण अनेक वर्षांपासूनचे होते, परंतु प्रत्यक्षात मी तेथे गेल्यावर अचानक असे का झाले? मन अस्वस्थ होऊ लागले. असा अनुभव पूर्वी कधीच आला नव्हता. जेमतेम मी थोडेसे हिंडलो. बागेतील सौन्दर्याचा आस्वाद घेण्याचा प्रयत्न केला. वरून वाहात येणाऱ्या पाण्याकडे पाहिले.

कृष्णाच्या मूर्तीकडे पाहिले. हिरव्या, पिवळ्या, लाल रंगाच्या किरणांत ते सर्व शोभून दिसत होते. भारतातील हे सर्वोत्कृष्ट उद्यान. पण मी तेथे माझे मन रमवू शकलो नाही.

म्हैसूरचे शान्त शहरी वातावरण

म्हैसूर शहरातील शांत वातावरण मला आवडले. निवृत्त लोकांनी तेथे येऊन राहावे व खऱ्या शान्त पण शहरी वातावरणाचा आनंद लुटावा. अनेक उद्याने, महाल व देवालयांनी सुशोभित असे हे शहर खरोखरच आवडण्यासारखे आहे. प्रत्येक महालात काही वैशिष्ट्य आहे. मोठमोठी तैलचित्रे, सुंदर नक्षी असलेल्या चौकटीत बसविलेले भव्य आरसे, प्रशस्त खोल्यांमधील छतांवर असलेली नक्षी व रंगकाम, विविध वेळेला व प्रसंगांसाठी उपयुक्त अशा वेगवेगळ्या खोल्या हे सर्व पाहून आनंद होतो.

राजमहाल पाहण्याची फार इच्छा होती. परंतु हल्ली पाहावयास मिळत नाही असे समजले. मुख्य द्वाराजवळील दरवानास त्याच्या पगाराबद्दल व इतर परिस्थितीबद्दल चौकशी केली. सर्व ऐकून आर्थिक विषमतेबद्दल आश्चर्य व्यक्त केले. ते त्याला आवडले. त्याने त्यांच्या अधिकाऱ्याजवळ जाऊन माझी इच्छा व्यक्त केली. महाराज गावात नव्हते व तीन दिवस परतणार नव्हते त्यामुळे मी मुलाखतीचा विचार टाळला व फक्त राजमहाल पाहिला.

दसऱ्याच्या मिरवणुकीची साधने, रचना, सर्व सोहळा यांची माहिती मिळाली. अनेक सुंदर वस्तू पाहिल्या. डोळ्यांचे पारणे फिटावे इतके सुंदर शिल्प व चित्रकला पाहावयास मिळाली. सत्तर ऐंशी फूट लांबीचे छत पण डिझाइनमध्ये कोठे यत्किंचितही फरक दिसून आला नाही. महालासमोरील भव्य पटांगण पाहून व

त्या गृहस्थाने केलेले वर्णन ऐकून आयुष्यात एकदा तरी दसऱ्याला येथे निश्चित यावयाचे असा निश्चय केला.

चामुंडा हिलवर मोटरसायकलीने जात असता पुण्याच्या रामटेकडीचे व मुंबईच्या वाळकेश्वर व पाली हिलची आठवण झाली. अगदी टोकापर्यंत सुंदर रस्ता व विद्युत दीपांचे खांब यांनी शोभा वाढली आहे. वर देवीचे दर्शन घेतले. प्रवेशद्वारांतील चांदीवरील नक्षीकाम पाहण्यात पुष्कळ वेळ गेला. समोरील महाल पाहिला. खालून वरून गालिचे पसरलेले होते; त्यावरून चालत असताना आपण लोकशाही राष्ट्राचे नागरिक आहो अशी सातत्याने जाणीव झाली. एका सुंदर आरामखुर्चीवर बसून तेथेच विश्रान्ती घेतली व तेथील लोकांकडून माहिती विचारून घेतली. हिलच्या दुसऱ्या बाजूस नंदीची मोठी मूर्ती आहे. एकाच दगडातून केलेली ही भव्य मूर्ती पाहून इलोरा येथील दगडी हत्ती आठवला.

म्हैसूर राज्याची सीमा बंडीपूरला संपते. अलीकडे बंडीपूर व पलीकडे मद्रास राज्यात मुदूमुलाई अशी दोन अरण्ये आहेत. त्यांत गाडीतून व हत्तीवरून हिंडतात व हिंस्र पशू दाखवतात. परंतु हे नित्याचे झाले असल्यामुळे पशु सावध झालेले आहेत व त्यामुळे हरीण, हत्तीचे कळप किंवा इतर साधारण जनावरांशिवाय सहसा काहीही पाहावयास मिळत नाही. राहण्याजेवणाची सोय आहे. त्यामुळे करमणूक म्हणून ही स्थळे बरी आहेत.

म्हैसूर राज्यातील बंडीपूर व मद्रास राज्यातील मुदूमुलाई अरण्ये एकमेकांना लागून आहेत. येथे प्रवाशांना जंगली जनावरे पाहावयास मिळावीत अशी सोय केलेली आहे. त्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी अनेक मनोरे बांधण्यात आले आहेत. शिवाय मोटरीतून व हत्तीवरूनदेखील जंगलात प्रवाशांना फिरवून आणतात. येथे राहण्यासाठी अरण्यात बंगले असून, जेवणाची सोय उत्तम आहे.

मी तेथे गेलो असता इतर कोणी प्रवासी नव्हते. मोटरीचे भाडे रु. १०० एकट्याला देणे परवडण्यासारखे नव्हते म्हणून मी हत्तीवरून अरण्यात फिरलो. नेहमीच्या वाटेने न जाता जंगलात आडवाटेने जाण्यास मी माहुतांना सांगितले. नजर एकसारखी चोहोकडे फिरत होती. घनदाट अरण्यात ठिकठिकाणी हाडे व गाई म्हशींची डोकी पडलेली दिसत होती. हवेत एक विशिष्ट वास दरवळत

होता. गर्दझाडीतून सर्प इत्यादी दिसावेत म्हणून मी बारकाईने पाहात होतो. तेवढ्यात हत्ती जागच्या जागी थांबला. माहुताने मला इशारा केला. मीही सावध झालो व बैठकीला घट्ट धरून बसलो.

जवळजवळ तीस एक फुटांवरून हत्तीचे कळप एकामागून एक " उंचाईसे एक कतार......." करून जात होते. मी सर्कशीतले हत्ती व नेहमी पाहण्यात येणारी पेशवे पार्कमधील " सुमित्रा " पाहात आलो होतो. तेव्हा ही रांग पाहून फार आश्चर्य वाटले. उंच, धिप्पाड अंग, लांबलांब दोन पुढचे दात 'डौलाने स्वारी'च्या कल्पनेस धक्का देईल अशी ती भरभर चाल व आजूबाजूच्या झाडीतील निवडक फांद्या सोंडेवाटे तोडून गिळत जाणे, –हे सर्व अजब होते.

माझ्या प्रश्नाला उत्तर देत माहुत म्हणाला, " याच्यासारखा शान्तिप्रिय प्राणी दुसरा नाही. पण छेडछाड झाल्यावर भल्या भल्या प्राण्याला चिरडून टाकायला हे कमी करणार नाहीत. "

पुढे अनेक हरिण, कोल्हे, लांडगे, ससे दिसले. हरिणांचे कळप मुद्दाम समोरून पळत जावयाचे व लांब जाऊन वाकडी मान करून पाहायचे. विविध पक्ष्यांचे आवाज तर एकसारखे कानी पडत होते. मधूनच माकडांची टोळी पाहावयास मिळायची व त्यांचे चापल्य पाहून आश्चर्य वाटायचे.

या जंगलात शिकारीची सक्त मनाई आहे. त्यामुळे जनावरे पुष्कळ आहेत. परंतु रोजच्या प्रवासामुळे हिंस्र पशू सावध होऊन कोठे तरी लांब लांब निघून गेले असावेत असे वाटले. कारण जवळ जवळ तीन तास फिरून मला एकही, वाघ चित्ता कोठे दिसले नाहीत. त्यांच्यासाठी शोकीन लोक रात्रंदिवस एके ठिकाणी मुक्काम ठोकून बसतात असें ऐकले. पण मला ते शक्य नव्हते. अरण्यात भटकण्याचा आनंद हा विरळाच.

उटकमंडचा चाळीस मैलांचा घाट चढत असता संध्याकाळ झाली होती. भयाण जंगल व त्यातून सर्पाकार वळणे असलेला रस्ता काळजीस कारणीभूत होत होता. येथे हत्तींचा फारच सुळसुळाट आहे. तेव्हा अंधार झाल्यावर गाड्यांना घाटात जाऊ देत नाहीत. मी लवकर निघाल्यामुळे प्रवास पुढे करू शकलो. वाटेत तीन रानडुकर, जंगली धिप्पाड म्हैस वगैरे प्राणी पाहिले.

रस्त्याच्या एका कडेला लांब पिसांचे शेपूट असलेला एक कोंबडा बसला होता, तो गाडीचा आवाज ऐकून एकदम उडाला, व माझ्या समोरून जाऊन तीस फुटांवरील झाडावर जाऊन बसला. काही ससे व कोल्हेदेखील रस्ते पार करून जाताना दिसले. आपण खरोखरच भयाण जंगलातून जात आहोत असे आता वाटायला लागले. दुतर्फा असलेल्या झुडपांतून जंगलाचा विशिष्ट असह्य दर्प येत होता.

रात्रीचे आठ वाजले. सगळीकडे काळोख पसरला. अशात पावसाला सुरुवात झाली. काळोख, सर्पाकार वळणे, पाऊस व बॅटरी उतरल्यामुळे पडणारा अल्प प्रकाश या कारणास्तव पुढील प्रवास जोखमीचा होता. एक छोटी वस्ती पाहून थांबलो. थंडीमुळे कोणी बाहेर दिसत नव्हते. माझे कपडे भिजले होते व गार वाऱ्यामुळे सर्वांग कापत होते. मला तामिळ येत नसल्यामुळे फार पंचाईत झाली. " इंग्लिश इंग्लिश " असे बोलल्यावर एक जण मला एका घराजवळ घेऊन गेला. एका मुसलमानाशी मी बोललो. पण, राहण्याची सोय होण्यासारखी नव्हती. तसाच मी पुढे प्रवास सुरू केला. पावसात हळूहळू पाऊण तास प्रवास केल्यानंतर एक हॉटेल दिसले. तेथे एका सभ्य गृहस्थाने माहिती दिल्यावरून मी डोंगराच्या आत जाणाऱ्या वाटेकडे गाडी वळवली. मनात शंकाकुशंका होत्या. पण इलाज नव्हता. देवाचे नाव घेत पुढे झालो. अर्ध्या मैलावर एक मोठा तलाव व छोटे ऑफिस दिसले. तेथील कर्मचाऱ्याने फारच आपुलकीने तलावाच्या समोरील डाक बंगल्यात जागा दिली. हे पयकरा धरण होते. मी पुनः अर्धा मैल चालत पावसात गेलो व त्या हॉटेलमधून गरम इडली सांबार खाऊन परतलो.

● ● ●

४ : निलगिरीच्या कुशीत

पाइन वृक्षांनी डोळे दिपले

पथकरा डॅमवरील मद्रास इलेक्ट्रिसिटी बोर्डाचा बंगला फारच सोयीस्कर आहे. रात्री अकरा वाजता मी इलेक्ट्रिक हीटरमधून येणाऱ्या गरम गरम पाण्यात आंघोळ केली व रूम- हीटरसमोर जाऊन बसलो. अनेक ठिकाणी पत्रे लिहावयाची होती ती संपवून दीड वाजता मी झोपलो.

लख्ख ऊन पडले असतादेखील सकाळी आठ वाजता वातावरण धुकेमय होते. कोवळ्या उन्हात व गुलाबी थंडीत मी प्रवासास सुरुवात केली. उटी अकरा मैलांवर होते. हा प्रवास इतका सुखद झाला की ते व्यक्त करण्यास माझ्याजवळ शब्द नाहीत. गालिच्यासारखी हिरवीगार शेते व उंच उंच पाइनचे वृक्ष पाहता डोळे दिपून गेले. डोंगरावरील हिरव्या गवतात जाऊन खूप लोळावे, धरतीमातेला प्रेमालिंगन द्यावे असे वाटले; आणि लागलीच मी गाडी थांबवली. रस्त्याच्या कडेला एका छोट्या टेकडीच्या उतारावर चढलो व मुद्दाम आडवा पडून लोडासारखा गडगडत २५ ते ३० फूट खाली आलो. तसाच गवतात पडून राहिलो व समोरील डोंगरावरच्या ढगांचे निरीक्षण करण्यात गर्क झालो.

उटकमंड आता एक मैलावर होते. तेवढ्यात गाडीच्या क्लचची तार तुटली. आता गाडी ढकलावी लागणार होती. त्या चढावर ऐन थंडीत घाम फुटणार होता, पण सुदैवाने तेवढा चढ चढल्यावर सर्व उतार होता म्हणून थोड्यावर भागले.

उटीच्या गव्हर्नरांच्या बंगल्यातून बाहेर पडावेसे वाटत नव्हते. अशी अप्रतिम तैलचित्रे पूर्वी माझ्या पाहण्यात आली नव्हती. आज पण त्याच्या आठवणीने मन प्रफुल्लित होते. बोटॅनिकल गार्डन डोंगराच्या उतारावर असल्यामुळे वरून खाल-पर्यंत एका दृष्टिक्षेपात पाहता येते, हे विशेष. तलावातील नौकाविहाराचा आनंद अविस्मरणीय. पुण्याच्या कॉलेजच्या बोट-क्लबमध्ये सवय झाली असल्यामुळे मी एकटाच बोट घेऊन लांब लांब विहार करून आलो. तसेच म्हैसूर महाराजांचा पॅलेस पाहताना फार वेळ लागला. त्यांनी केलेली जंगली म्हशींची शिकार पाहिली व दिवाणखान्यातील वाघ प्रथमदर्शनी जिवंत वाटला. मुलांनी व बायकांनी पाहताक्षणीच किंचाळावे, असा त्या वाघाचा देखावा होता !

उटीचे प्रमुख आकर्षण म्हणजे ८६०० फूट उंचीवरील ' दोदाबटा '. थेट वरपर्यंत जायला सडक असल्यामुळे मी मोटर सायकलीवरून गेलो. येथून उटी म्हणजे अति छोटा खेळण्याचा किल्ला असावा, असे दिसले. चोहोकडे डोंगर होते. प्रत्येक दरीत दोन-चार झोपड्या दिसायच्या. या दाट जंगलात डोंगराळ भागात लोक कसे राहात असतील, पावसापाण्यात त्यांच्या जीवनावश्यक वस्तूंसाठी त्यांना किती कष्ट पडत असतील, असा विचार मनात डोकावून गेला.

प्रत्यक्ष वस्तीपेक्षा ही लांबची स्थळे फारच रमणीय वाटली. उटी हे आता व्यापाराचे केन्द्र झाले आहे. या दिवसांतदेखील रहदारी पाहून आश्चर्य वाटले. हे खरे विश्रान्तीचे स्थान नाही, असे वाटू लागले. शान्त वातावरण पाहिजे असल्यास शहरापासून ४–५ मैलांवर राहणे बरे.

दिलीपकुमारांशी मुलाखत

संध्याकाळी बाजारात माझ्या गाडीजवळ एक गृहस्थ उभा होता. त्याने कौतुक करून विचारपूस केली व स्वतः प्रसिद्ध अभिनेता श्री. दिलीपकुमार यांचे ड्रायव्हर असल्याचे सांगितले. माझा एक प्रकारे बहुमान करावा, या आविर्भावाने तो म्हणाला, " साहेब, सुबह दस बजे सेवॉय होटेलमें आइयेगा. मैं हमारे साहबसे मुलाकात करवा दूँगा." हे ऐकून माझ्यातील कलाप्रिय ' अशोककुमार ' जागा झाला. मला न सुचलेले त्याने सुचविले होते.

दिलीपकुमार यांच्याशी वार्तालाप करण्यात मला फार आनंद वाटला. त्यांच्या सौ. ची प्रकृती बरी नसल्यामुळे भेट झाली नाही. परंतु ते माझ्याशी मनमोकळे-पणाने बोलले व सुंदर शब्दांत कौतुक केले. आपुलकीने सल्ला देत म्हणाले, " अशोककुमारजी, आप बॉर्डर (सरहद्द) पर मत जाइयेगा. That is very sensitive area. They will arrest you. और फिर मुश्किल होगी."

भारताचे ' छोटे स्वित्झर्लंड ' म्हणून प्रसिद्ध असलेल्या उटीच्या परिसरात इतकी प्रेक्षणीय स्थळे आहेत की, महिनाभर राहिलो तरी सर्व पाहून व्हायचे नाही व समाधान व्हायचे नाही. तेव्हा अति उत्कृष्ट स्थळे पाहून व अनेक मैल डोंगरात फिरून मी पुढे निघालो.

सबंध भाग एक विशाल बाग

दक्षिण भारतातील माझ्या प्रवासात निलगिरीच्या पर्वतावर मला जो आनंद लाभला तो इतर कोठेच मिळाला नाही. बंडीपूरपासून मेट्टुपलायमपर्यंतचा प्रवास अति सुखद झाला. सृष्टीचे अमाप सौन्दर्य या भागात आहे. हा सबंध भाग म्हणजेच एक विशाल बाग आहे, व त्यात अनेक धब धबे आहेत. कोटागिरी व कुनूर ही उल्लेखनीय स्थळे या जिल्ह्यात आहेत. ' केईटी ' या दरीच्या खोऱ्यातून अनेक मैल चालत जावे व विविध वनस्पतींचे निरीक्षण करावे. जंगलाच्या मध्यभागी आलेल्या ' लेडी कनांग्स सीट 'वरून केलेले सृष्टिदर्शन शब्दांनी कधीच रेखाटता येणार नाही. कुनूर येथील ' सीम्स पार्क 'मध्ये विविध फुलांचा जो संग्रह आहे, तसा सबंध भारतात इतरत्र पाहावयास मिळत नाही. ' टायगर्स हिल ' व ' वॉकर्स हिल 'वर फिरत असता थकल्यावरदेखील चालत राहावे व डोळे भरून सृष्टीचे दर्शन करावे असे वाटते. तसेच कोटागिरी येथील ' रंगास्वामी शिखर ', ' पीलार रॉक ' व ' सेंट केथरिन फॉल्स ' आल्हाददायी आहेत. चित्रपट निर्मात्यांचे आवडते हे स्थळ खरोखरच अवर्णनीय आहे.

कोटागिरी येथे प्रवास करीत असता अचानक मुसळधार पावसाला सुरवात झाली. ३०, ४०, ५० फुटांवर लागणारे वळण व चढ,– त्यामुळे प्रवास कष्टाचा झाला. इंजिनवर फार लोड येऊ लागला, व आता अशात काही तरी बिघाड निर्माण होणार ही भीती वाटू लागली. चार–पाच मैल पुढे गेल्यावर

काही तरुण सुशिक्षित मुलींना पाहिले. त्यांच्या हातांत पुस्तके पाहून शिकलेल्या असाव्यात असें समजून मी परतलो. तेथेच ‘ स्त्रियांचे विद्यापीठ ’ म्हणून पाटी होती. मी सरळ आत शिरलो व पोर्चमध्ये गाडी लावली. आत वर्ग चालू होते. मी बाहेर उभा राहून पोस्टकार्ड लिहू लागलो. थोड्या वेळाने तेथील महिला प्रिन्सिपॉलने ऑफिसमध्ये बोलाविले. मी इंग्लिश वर्तमानपत्र त्यांच्यासमोर ठेवले. त्यांनी वाचून माझे स्वागत केले व गरम कॉफी व बिस्किटस् घेतल्यावर अंगात तरतरी आली. काही वेळ त्यांच्याशी बोलल्यावर पाऊस थांबला म्हणून मी निघालो. सर्वांनी कौतुकाने माझ्याकडे पाहात गोड निरोप दिला.

हातवाऱ्यांच्या भाषेत संभाषण

निलगिरी ओलांडून मी समोरच्या प्रदेशात आलो होतो, तेव्हा इंजिनची काळजी कमी झाली होती. मेट्टुपलायम येथे मी पोहोचलो, तेव्हा पाऊस जोरात पडू लागला. कपडे आणि सामान सर्व भिजले होते. एका दुकानात चौकशीसाठी गेलो, पण मी काही आर्थिक साहाय्य मागणार असे समजून त्याने प्रश्नांची उत्तरे न देता शेजारील दुकानात चौकशी करण्यास सांगितले. मला ही वागणूक फार अपमानास्पद वाटली. मी त्या गावात न थांबता रागाच्या भरात पुढे निघालो.

रात्रीचे साडेआठ वाजले तरी पाऊस चालूच होता. आतापर्यंत सूटकेस आणि बेडिंगमधले सर्व सामान भिजले होते. अंधारातून पावसात प्रवास त्रासदायक होता. कडेला एक छोटे घर पाहिले. आवारात शिरलो व घरासमोर गाडी उभी केली. घरातील सर्व लोक बाहेर आले. तामीळ मला येत नव्हते व त्यांना इंग्लिश, हिंदी वगैरे समजत नव्हते. हातवारे करून मी माझा विचार दर्शविला. त्यांनी स्वतः सर्व सामान आत घेऊन सर्व सोय केली. रात्री उशिरा तेथील डॉ. आर. शिवास्वामी आल्यावर त्यांच्याशी स्पष्ट बोलू शकलो. तोपर्यंत अभिनयावरच भागवावे लागले.

मी शेतातील विहिरीवर आंघोळ केली. उप्पीट, इडली, चटणी, कॉफीची न्याहारी करून निघालो. त्या सर्वांना माझ्या भेटीने आनंद झाला होता. निघताना जवळचा माणूस लांब जात असल्यासारखे भाव त्यांच्या डोळ्यांत उमटले होते.

कोइमतूर हे उद्योगप्रसिद्ध शहर. इतर दृष्टींनी फार विकास पावलेले नाही. येथून तीन मैलांवर आलेल्या पेरूर येथील पट्टीश्वर महादेवाच्या दर्शनाला गेलो. मुख्य देवळाचा विस्तार भव्य होता. शेजारील गौरी मंदिराच्या भिंतीवर अनेक पुराण-चित्रे चित्रित केली होती. येथे प्रथमच मला अष्टलक्ष्मीचे दर्शन घडले. हे दुसरीकडे कोठे पाहावयास मिळाले नाही. छतावर अनेक वेगवेगळ्या आकृत्यां-मध्ये आकडे लिहून मंत्रचक्रे तयार केली होती. त्याबद्दल काहींना विचारपूस केली, पण समाधानकारक उत्तर मिळाले नाही.

सबंध मद्रास राज्यात कोइमतूर जिल्हा सर्वाधिक फलद्रूप वाटला. कोठेही पडीक जमीन दिसत नव्हती. रस्त्याच्या दुतर्फा नारळ व केळीच्या बागा आणि अगदी रस्त्याला लागून दुतर्फा चिंचेची झाडे, झाडावर चिंचेच्या आकड्यांचे घडच लोंबत होते. शाळेत असता पर्वती कॅनाल, विठ्ठलवाडी वगैरे ठिकाणी चिंचा, कैऱ्या पाडण्याचा कार्यक्रम नियमितपणे होई. त्याची आठवण होत पुटपुटलो, “ इतक्या चिंचा तेथे असत्या तर आपले किती श्रम वाचले असते! ”

बटालागुंडू येथे अंधार झाल्यावर मी पोहोचलो. सहा मैलांवर घाट सुरू होत होता व अगदी अरुंद रस्ता असल्यामुळे सकाळी प्रवास करण्याचे ठरले. वेगळा अनुभव मिळावा या दृष्टीने मी पोलिस चौकीवर आग्रहाने राहिलो. जो येई तो माझ्याबद्दल चौकशी करीत असे व सत्य समजल्यावर हसत असे. रात्रीचे दोन वाजले तरी सबइन्स्पेक्टरचे काम संपले नव्हते. ओरडून विचारल्याशिवाय नीट उत्तरच मिळत नव्हते त्याला.

कोडाईकनल घाटाच्या दोन्ही बाजूंना फळांचे मळे पाहून फार आनंद झाल व कौतुक करावेसे वाटले. मी फिरलो त्या सर्व प्रान्तांपेक्षा मद्रासमध्ये लोक अधिक उद्यमी वाटले. महाबळेश्वरसारखाच हा डोंगराळ भाग आहे. परंतु अरण्यात त्यांनी प्रयत्नपूर्वक तयार केलेल्या फळबागा व फुलांच्या बागा पाहिल्यावर येथील लोकांबद्दल आदर निर्माण झाला. सहसा जो कोणी भेटायचा तो शिस्तीला सोडून वागत नसे.

चौतीस मैलांचा घाट चढून मी मुक्कामी पोहोचलो. फारच जपून प्रवास करावा लागला होता. येथे उटीसारखी वस्ती नव्हती. पर्यटकांमध्ये मी एकटाच

आलो होतो. असह्य थंडीत मी आलेलो पाहून लोक आश्चर्याने पाहू लागले. भर उन्हात चालतानादेखील हातपाय कापायचे. हे स्थळ इतर हिल-स्टेशन्सपेक्षा विषुववृत्ताच्या जास्त जवळ असल्यामुळे तपमान खाली गेल्यावरही पाण्याचा बर्फ होत नाही.

येथे मी सबंध दिवस पायीच फिरलो. चढउतारावर चालण्याची विशेष मजा आली. येथे सोलार फिजिकल लॅबोरेटरी, बीअरशोला फॉल्स, सिल्व्हर कॅस्केड, कोकर्स वॉक, ब्रायन्ट पार्क व सर्वोत्तम म्हणजे कोडाईकनल लेक पाहिले. उटी, माउंट अबू, नैनीताल, काश्मीरचे दल वगैरे सर्वांपेक्षा मला येथील तलाव जास्त आवडले. त्यांचा नैसर्गिक आकार, सर्व दिशांनी वेढणारा व झाडीझुडपापासून जाणारा रस्ता, संथ पाणी, व आजूबाजूला बांधलेले सुंदर बंगले हे अत्यंत आकर्षक व शान्तिदायक वाटले. तलावाच्या काठी हळूहळू चालत, हातात काठी घेऊन मी उर्दू गझल गात होतो. त्या निर्जन जागेत एकट्याने मनसोक्त चैन केली.

खरोखर ! जग विसरायला लावील असे हे सुंदर स्थान आठवत मी हे लिहीत आहे हेदेखील विसरलो.

पळणी पर्वतमालेत आलेले हे स्थान उटीहूनदेखील सुंदर वाटले. पहाटे ' पीलार रॉक्स ' पाहून परत येत असता गोल्फ क्लबवर क्लबचे प्रेसिडेंट श्री. नागराजन यांची भेट झाली. थोडा वेळ त्यांच्याशी त्यांच्या आग्रहावरून गोल्फ खेळलो.

केरळमध्ये टेकेडी येथे माझा पहिला मुक्काम झाला. ऐवढ्या प्रवासात मला येथे मुस्लिम लीगचा झेंडा व ऑफिस दिसले. लोकांच्या राहणीवरून गरिबी स्पष्ट दिसत होती.

येथील ' पेरियल लेक ' हे प्रमुख आकर्षण. अरण्यात चारी दिशांना लांब लांब पसरलेले असे तलाव दुसरीकडे पाहावयास मिळत नाहीत. पहाटे बोटीतून येथे प्रवास करताना तलावाच्या काठी जलप्राशनासाठी आलेली जनावरे मनसोक्तपणे पाहावयास मिळतात. एकामागून एक By the hight जात असलेले हत्तींचे कळप, सुंदर हरीण, सांबर, व क्वचित बिबळ्या वाघ, रानडुक्कर, जंगली म्हैस,

असे अनेक प्रकारचे हिंस्र पशू पाहावयास मिळतात. येथे परदेशी प्रवासी नेहमी येत असतात. म्हणून केरळ सरकारने एक वातानुकूल विश्रामगृह बांधले आहे.

येथे मी 'सर्वे ऑफ इंडिया'च्या फॉरेस्ट अधिकाऱ्यांबरोबर जंगलात १० ते १५ मैल गेलो. पण हत्तींचे कळप जवळून पाहावयास मिळाले नाहीत. त्यांच्या अनुभवाच्या गप्पा ऐकून काही दिवस अशा लोकांबरोबर राहावे असे वाटले. त्यांचे काम फार साहसाचे असते.

केरळ म्हणजे हिरव्या आणि लाल रंगाची भूमी असे म्हणावयास हरकत नाही. जेथे वनस्पती नाही तेथे लाल माती पाहावयास मिळते. याचा सर्वोत्तम संगम व मनोहर दृश्य म्हणजे त्रिवेंद्रमजवळील कोवालम बीच. कोवालम बीचवर गेलो असता सहा तास केव्हा लोटले हे मला समजले नाही.

● ● ●

९ : केरळमधील नारळी-पोफळीच्या बागा

क्षितिजापर्यंत पोपटी सागर

टेकेडीहून निघालो तेव्हा लख्ख ऊन पडले होते. तरीदेखील गारठा कमी झाला नव्हता. केरळसारख्या उष्ण हवामानाच्या राज्यातदेखील अशी शीतस्थळे आहेत ही ईश्वरकृपा म्हणावयाची. सुरुवातीला ८ ते १० मैल व २००० फूट चढ चढावा लागला. त्यानंतर ६० मैल एकसारखा उतार होता, व शेवटचे १० मैल सपाट प्रदेशातून प्रवास करून मी कोट्टायमला पोहोचणार होतो.

टेकेडीपासून ६ मैलांवरील पम्मी व कक्की ही धरणे पाहिली. अमेरिकन अर्थ व तंत्र यांच्या साहाय्याने बांधलेली ही विशाल धरणे आहेत. चोहोकडे हिरवीगार बागच पसरलेली आहे जणू ! नारळाचे मळे, चहा व केळीची बाग, रस्त्याच्या दुतर्फा हिरव्या मिरचीचा वेल, वेलदोडे व क्वचित दृष्टीस पडणारी लवंगांची झाडे, यांनी जमीन जणू काही हिरव्या शालूने नटलेली आहे.

दक्षिण भारताच्या प्रवासातील डोंगराळ भागाचा हा शेवटचा ६० मैलांचा टप्पाच बाकी होता. यापुढे अशी वळणे, चढउतार अनुभवावयास मिळणार नव्हते. असा विचार येताच मन मागे धावू लागले. उटकमंड, कोडाईकनल इत्यादी सर्व आठवले. कोडाईकनलहून पेरुमलाई, थेनी, उधमपल्यम, हनुमंतपट्टी व कुमुली हा सर्व मार्ग आठवला. पेरुमलाई सोडल्यावर दुतर्फा असलेली भाताची शेती पाहून " मेरे देश की धरती सोना उगले.... " असे म्हटल्याशिवाय राहवले नाही. क्षितिजापर्यंत विस्तारलेले ते शेत म्हणजे एकजात पोपटी रंगाचा संथ सागरच

पाहून घ्या. कोठे काडीमात्र रंगछटेमध्ये फरक नाही. ज्याने रात्रंदिवस शेतात राबून नावालादेखील कोठे रंगभेद होऊ दिला नाही त्याला अति कुशल रंगारी का म्हणू नये असे वाटले. काही अमेरिकन चित्रपटांमध्ये पाहिलेली शेते आठवली. आधुनिक उपकरणांनी केलेल्या त्या शेतीला तोडीस तोड अशी ही शेती होती अशी खात्री पटली होती. सौम्य मधुर सुगंधाने सारे वातावरण मनोहर झाले होते. फुलांच्या सुगंधाला आव्हान दिले गेले होते. ज्याने अनुभवले नाही त्याला अतिशयोक्ती वाटेलही कदाचित, पण हे सत्य आहे, अगदी सत्य आहे.

तेवढ्यात एका 'ज्यू' पादचाऱ्यावर माझी नजर गेली. त्याच्या दोन्ही हातांची बोटे धरून दोन काळेसावळे नाजुक बालगोपाल त्याच्याबरोबर चालत होते. तो पादचारीच त्यांच्याबरोबर चालत होता असे म्हणणे जास्त रास्त होईल. कारण त्याची गती या मुलांच्या पावलांना अनुसरून होती. किंग सॉलोमनचे जहाज जेव्हा प्रथम पूवार नावाच्या केरळ राज्यातील समुद्रकाठी असलेल्या खेड्याजवळ आले तेव्हा त्याचा भारतात प्रवेश झाला. त्या वेळेस पूवार हे (Port of Opir) म्हणून प्रसिद्ध होते. सोनेचांदी देऊन ते तेथून आवश्यक वनस्पतिजन्य पदार्थ घेऊन जायचे. हा सर्व इतिहास आठवला. हा पादरी चालता चालता खाली वाकून हसत मुद्रेने त्या शेंबड्या (आपल्याकडील प्रसिद्ध शब्द) पोरांकडे पाहात होता व त्या चिमुकल्या तोंडांवाटे विचारलेल्या बाळबोध प्रश्नांची उत्तरे देत होता. मनात विचार आला, आपल्याकडील साधुसंत व धर्म प्रचारक बालकांकडे किती लक्ष देतात ? ज्यांच्यावर राष्ट्राच्या उभारणीची जबाबदारी आहे अशा शिशूकडे दुर्लक्ष करून जो तो तरुण पिढीला व जे उदोउदो करू शकतील अशांनाच हाती धरत नाहीत का ?

परंतु अशा वादग्रस्त प्रश्नावर फार विचार करीत बसण्याची ती वेळ नव्हती. रस्त्याच्या एका बाजूला खोल दरी होती. त्याच्या आड रस्त्यात भिंत (वॉल) देखील बांधली नव्हती. तोल गेला असता तर 'सुपरमेन 'प्रमाणे दरीचा तळ गाठायला मुळीच अवधी लागला नसता. माझ्यातील दीर्घदृष्टी व बुद्धिमत्ता... (क्षमस्व)...सर्व काही बाजूला ठेवून मी मुकाट्याने गाडीचा तोल सांभाळण्याची




बेलूर विष्णु-मंदिरातील कोरीव मूर्ती

डाव्या कोपऱ्यात सरस्वतीची मूर्ती असून उजव्या बाजूला नर्तक-गणेशाची मूर्ती आहे. उत्तम पॉलीशमुळे उन्हांत मूर्ती चकाकतात.

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण.



कावेरी धबधबा—शिवसमुद्रम्.



शिवसमुद्रम् येथील धबधबा सुंदर व वैशिष्टयपूर्ण आहे. येथून काही मैलांवर कावेरीचे दोन प्रवाह होतात. दुभंगलेल्या नदीचे दोन धबधबे होऊन पुन्हा संगम होतो. लांबून दोन प्रवाह स्पष्ट दिसतात. धबधब्याजवळ शीम्सा पावरहाऊस असून स्थळ प्रेक्षणीय आहे

फोटो : अशोककुमार स्वामीनारायण



केरळमधील जमिनीचे मोजमाप

जबलपूरहून आलेले "सर्वे ऑफ इंडिया" चे लोक पर्वतांत व जंगलात मोजमाप करीत असताना लेखकाच्या अतिआग्रहाने फॉरेस्ट रेन्जर त्यांना स्वतःबरोबर जंगलात घेऊन गेले.

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण.

काळजी घेऊ लागलो. उतारामुळे न कळतच वेग वाढायचा; वळणावर फार दक्षतेने गाडी चालवावी लागत असे.

समोरून रुसलेल्या चेहऱ्याने एक बाल-विद्यार्थी पाटी घेऊन जात होता. गाडीचा 'हॉर्न' वाजत नसल्यामुळे मी एक रुणरुणीत 'पुणेरी' शिट्टी वाजवली. त्याने वर पाहिले. त्याच्या टपोऱ्या डोळ्यांतून आश्चर्य व्यक्त झाले. टवटवीत चेहऱ्यावर निर्दोष स्मित झळकले व गुबगुबीत गालावर एक नाजुक खळी उमटली. चिमुकला हात हवेत भराभर फडकायला लागला. त्यात उत्साह इतका दांडगा होता की, डोके दुसऱ्या हातातील पाटीपर्यंत त्याचे आंदोलन पोहोचले. कानी शब्द पडले, "टाटा...बाय.... बा ऽ ऽ य–" व माझ्यातील गांभीर्य लोप पावले. मीही त्याच बालिश मुद्रेने त्याच्या उत्साहाला प्रत्युत्तर दिले.

या सुंदर उद्घाटनानंतर जणू मैफिलीची खैरात झाली. अनेक प्राथमिक विद्यार्थी–विद्यार्थिनींनी हा उपक्रम चालू ठेवला. त्या कडक उन्हात उघड्या पायांनी डोंगर उतरत असता मुले मला पाहून थांबायची व गटागटाने 'टाटा' करून आपला आनंद व्यक्त करायची. वीसेक मैलपर्यंत असा शिष्टाचार पाहण्यास मिळाला. मधूनच कोणी 'ज्यादा' बनून माकडचेष्टा करायचा, व सर्व मुले हसत-खिदळत जायची. आजपर्यंतचा माझा अनुभव असा नव्हता. मुले सहसा कपाळावर आठ्या आणून काहीच उमगत नसल्यासारखी बघायची. काही शेतातून पळत रस्त्याकडे यायची. तर काही रस्त्यावरून भिऊन लांब पळायची. परंतु येथे सर्वांच्या बाबतीत एकच अनुभव ! सर्वच मुले आनंदी, उत्साही, खेळकर दिसली. इतकी चलाख मुले अद्याप पाहण्यात आली नव्हती. त्या मुलांनी मला प्रभावित केले, त्यामुळे कोट्टायमहून मित्राला लिहिलेल्या पत्रात असे लिहावयास मी प्रवृत्त झालो की, "जर आपल्याकडील पालकांनी आपल्या मुलांना सर्वांगीण उत्कृष्ट शिक्षण न दिले तर येथील मुले भविष्यकाळी त्यांच्यावर राज्य करतील !" त्या मुलांच्या आठवणीने वाटते की, "मेरे देशकी धरती उगले हीरे मोती.... "

पर्वतमालेतून मी आता बाहेर पडलो होतो. चढउतार संपले होते. पण वळणे एकसारखी लागत होती. 'सूर्य' मी म्हणत होता. गारठा संपला होता व मुंबई-

सारखा उकाडा सुरू झाला. एकसारखा अनेक मैलांचा भर उन्हात प्रवास झाल्यामुळे थोडी विश्रान्ती घ्यावी म्हणून मी एका छोट्या वस्तीजवळ थांबलो. गाडी चालू असता वाऱ्यामुळे जाणवले नव्हते, पण येथे थांबताच दोन- तीन मिनिटांत सर्वांग घामाने भिजले. काही लुंगीमधील लोक जवळपास गोळा झाले व माझ्या अंगावर इतके कपडे पाहून आश्चर्य व्यक्त करू लागले. थोडा वेळ गप्पा मारल्यावर नारळाचे पाणी पिऊन मी प्रवासाला सुरुवात केली.

वस्ती कोठे संपतच नाही

केरळ राज्यातील राष्ट्रीय राजमार्ग फारच विलक्षण आहे. वस्तीच्या बाहेर आल्यासारखे कुठेच वाटत नाही. एक मिनिट असे जात नाही की झोपडी व माणसांची ये–जा दिसत नाही. रस्त्याच्या दोन्ही कडेला बागांची कुंपणे व अंतरा अंतरावर झोपडे. विशेष म्हणजे बहुतेक झोपड्यांच्या बाहेर स्त्रिया असायच्या, आणि त्या वाळत घातलेल्या काळ्या मिरीवर व इतर वस्तूंवर लक्ष देत बसायच्या. अहो, सांगितले तर खरे वाटणार नाही, पण कल्पना यावी म्हणून सांगतो की, लघुशंकेसाठी एकान्त गाठता गाठता पंचवीस मैल लांब निघून गेलो, पण शेवटी हार खावी लागली. इतकी दाट वस्ती इतर कोणत्याही राज्यात पाहावयास मिळत नाही.

कोट्टायमहून मी काही मैलांवर असताना इंजिनमध्ये बिघाड झाला. खटपट करून तात्पुरते काम केले व पुढे निघालो. कोट्टायमला पोहोचेपर्यंत काळजीतच होतो. तेथे दुरुस्ती करून घेतली. आधी पंक्चरचा अनुभव आला होता. त्यामुळे हे काही विशेष वाटले नाही. परंतु चाक पंक्चर झाल्यासारखे वाटायचे.

शिवाचा व इंग्रजीचाही त्रिफळा !

कोट्टायममध्ये एका लहान देवळातील ब्राह्मणाशी बोलत असता येथील शिक्षणाच्या कक्षेची कल्पना आली. मोलमजुरीची कामे करणाऱ्या अनेक लोकांनादेखील इंग्रजीचे कामचलाऊ ज्ञान आहे असे दिसते. त्या ब्राह्मणाने माझ्याबरोबर इंग्रजीत जरा बरे संभाषण केले. तेव्हा कोइमतूरजवळच्या पेरूर येथील पट्टीश्वर महादेवाच्या देवळातील एका ब्राह्मणाचे संभाषण आठवले. तो मला

महादेवाबद्दल सांगत होता, " काऊ मिल्क ड्रॉप ". थोडे थांबून " शिवा आउट " असे मोठ्याने ओरडला, व क्रिकेटमध्ये विकेटकीपर दोन हात फैलावतो तसे त्याने केले. ' शिवा 'बरोबर इंग्रजीचाही त्याने चांगलाच त्रिफळा उडवला होता ! मला काही समजले नाही. हे पाहून त्याने भिंतीवरील चित्राकडे हात केला. कामधेनूच्या स्तनांतून दुधाची धार जमिनीवर पडल्याबरोबर शिवलिंग प्रकट झाले,— हा पुराणातील प्रसंग तेथे चित्रित केला होता ! हे पाहिल्यावर मात्र माझी हसून हसून पुरेवाट झाली. तो चिडला व विशिष्ट उच्चारात ओरडला, "नो लाफिंग." हसण्यात भर पडली. अखेर ' गिऱ्हाइका 'स खूष करावे हे लक्षात आल्यावर तोही हसू लागला. मंदिराचा इतिहास सांगत असता तो म्हणाला, " वन थाउजंड अँड वन हंड्रेड ट्वेन्टीवन इयर मारवाडी स्टार्ट. " एक हजार एकशे एकवीस वर्षांपूर्वी मारवाडी गृहस्थांनी बांधकामास सुरुवात केली, असे त्यास म्हणावयाचे होते. हे सर्व ऐकताच मी स्मित केले. पण त्यामुळे कोट्टायमचा तो ब्राह्मण मात्र आश्चर्याने पाहायला लागला.

कोट्टायमला प्रथम मी दोन सुंदर तरुणी विखुरलेल्या केसांनी रस्त्यावरून जाताना पाहिल्या. मला थोडे वेगळे काही पाहिल्यासारखे वाटले. थोड्या वेळाने लक्षात आले की, सर्वच्या सर्व स्त्रिया अशा रीतीने वावरत होत्या. अशी प्रथाच आहे मुळी येथे. आपल्याकडेही असे क्वचित पाहावयास मिळते. परंतु ते प्रासंगिक असते.

केरळ कथकली नृत्यासाठी प्रसिद्ध आहे. देव–दानवांचे भव्य व अक्राळ-विक्राळ मेकअप करून नृत्यद्वारा कथानक उभे करण्याचा हा प्रकार. तसेच केरळातील लोक मलिन विद्यातंत्र इत्यादींमध्ये फार प्रवीण आहेत असे ऐकले होते. या मान्त्रिकाचा प्रकार मला अर्नाकुलमकडे जात असताना पाहावयास मिळाला. दिवेलागणी झाल्यानंतरचा प्रवास जपूनच करीत होतो. सबंध दिवसाच्या प्रवासाने कंटाळलो होतो. त्यातूनच ' हॉर्न ' वाजत नव्हता व दिवाही नीट लागत नव्हता. मी थोडा काळजीत होतो. तेवढ्यात लांबून ढोल-नगारे, लेझीम, झांजा यांचा आवाज ऐकू येऊ लागला. स्त्री व पुरुषांचे किंचाळणे— यामुळे हा काय प्रकार आहे हे समजेना.

जसजसा मी पुढे झालो तसा आवाज मोठा व तीव्र होत गेला. काही तरी रानटी प्रकार चालला असावा असे वाटू लागले. चोहोकडे अंधार पसरलेला होता व रात्रीचा गार वारा वाहात होता. मी एकटाच त्या भल्या मोठ्या रस्त्याने प्रवास करीत होतो. हळूहळू तो आवाज माझ्या दिशेने वाढत होता. माझी नजर समोर स्थिर झाली होती, व काही दिसत असल्यास त्याचा वेध घेण्याच्या प्रयत्नात मी होतो. काही मिनिटांनी लांबून अनेक मशाली नजरेस पडल्या. मला मोठा जनसमुदाय एका प्रचंड रथाच्या भोवती नाचत, किंचाळत पुढे सरसावत होता. गाडीचा वेग कमी झाला.

माझी गाडी पाहून काही पुरुष माझ्या दिशेने पळत आले. मी थांबलो. छातीत धडधडायला लागले होते. त्यांनी जवळ येऊन मल्याळममध्ये काही तरी सांगितले. मला काहीच समजले नाही. परंतु त्यांचे हातवारे ओळखून मी गाडी रस्त्याच्या कडेला उभी केली. ते परत निघून गेले. मला थोडे हायसे वाटले. आपल्याला वाटते तेवढे हे भीतिदायक नाही, हे ओळखून तो प्रकार पाहावयास लागलो. मिरवणूक जवळ आल्यावर मी पाहिले, अनेक पुरुष आबालवृद्ध दोन फुटांपासून दहा दहा फुटांपर्यंत लांब सळया गालाच्या आरपार खुपसून देवीच्या रथापुढे चालत होते. असला प्रकार मुसलमानांमध्ये पूर्वी पाहिला होता. परंतु ते दोनतीन फुटी छोट्या सळया वापरीत. पण इकडे इतक्या लांब व जड सळया होत्या की दोन टोकांना दोन माणसे त्यांना धरून चालत असत. असला विचित्र प्रकार पूर्वी कधीच पाहिला नव्हता. स्त्रिया आपल्या येथील कडकलक्ष्मीप्रमाणे देव्हारा डोक्यावर घेऊन नाचत किंचाळत होत्या. असल्या स्त्रीया–पुरुषांची संख्या मी मोजू लागलो व बोलता बोलता मी 'शतक' सहज पुरे केले. नंतर हा विचार सोडून दिला. एकंदर हा प्रकार अजबच होता. आपल्याकडील स्त्रिया किंवा मुलांनी असे काही पाहिले तर क्षणार्धात थंडीताप भरायचा अंगात.

हुबळीप्रमाणे अर्नाकुलम येथे पण मला एक सोईस्कर हॉटेल लाभले. रात्री गरम पाण्याने आंघोळ करून जेवण घेतले व 'डनलॉप'च्या गादीवर जाऊन पडलो, तेव्हा 'जीवन जगण्यासाठी आहे!' हे प्रत्ययास आले. अतिशय भूक लागलेली असली की आहाराची खरी किंमत कळते व त्याचा उत्तमोत्तम स्वाद अनुभवास मिळतो. श्रीरामकृष्ण परमहंसांना एकाने फुटाणे खावयास दिले. ते

खात नाहीत असे पाहून त्या गृहस्थाने आग्रह केला, तेव्हा ते उत्तरले, " हम इसकी जिलेबी बनाके खायेंगे. " त्याच्या काही लक्षात आले नाही. तेव्हा त्यांनी स्पष्ट केले की, " जब जोरकी भूक लगेगी तब इसीमें जलेबी का स्वाद आयेगा. " मलाही आज तोच आनंद प्राप्त झाला होता. भुकेनंतर जेवण व अति श्रमानंतर आराम मिळाला होता. वाचता वाचता केव्हा डोळा लागला समजलेदेखील नाही.

अर्नाकुलमच्या ' मातृभूमी ' या मल्याळम वर्तमानपत्रात माझे वृत्त प्रसिद्ध झाले. हॉटेलमध्ये अनेक लोक विचारपूस करू लागले. एकजण माझ्याशी गप्पांमध्ये इतका रंगला की रात्रीच्या दहाचे साडेबारा वाजले.

भर उन्हात लोकांना प्रतीक्षा करताना पाहिल्यावर चौकशी केली व समजले की, श्री. सत्यसाईबाबा आले होते. अर्नाकुलममध्ये अनेक ठिकाणी त्यांचा कार्यक्रम होता. गावोगावहून लोक आले होते. या गर्दीत धडपड करण्यात काही अर्थ नाही, असा विचार करून मी त्यांच्या मुक्कामाचा पत्ता काढला व दुसऱ्या दिवशी आंघोळ करून तेथे पोहोचलो. पण ' बाबा ' भल्या पहाटेच शेजारील गावात गेले होते. माझ्या कार्यक्रमाप्रमाणे मला राहणे कठीण होते, म्हणून मी भेटीचा विचार रद्द केला.

अर्नाकुलम व कोचीनमध्ये सहा मैलांचे अंतर आहे. जलमार्गानेही येथून तेथे जाता येते. आपल्याकडील बसेसप्रमाणे तेथे बोटींची वाहतूक आहे. कोचीनमध्ये समुद्रकाठी जपानी पद्धतीने मासे पकडण्याचे काम चालू होते ते पाहिले. समुद्रकाठी छोटेसे सुंदर उद्यान पाहिले. पण शहरातून फिरणे कंटाळवाणे वाटले. मुंबईची मांडवीच म्हणा ना. सुपारी व रबर यांचा व्यापार प्रामुख्याने या शहरांकडे आहे. अल्पावधीत शहराची कल्पना यावी म्हणून येथील सिटी इंजिनीअरच्या ऑफिसमध्ये गेलो. दोन तास घालवले. याला त्याला भेटलो. पण नकाशा काही कोणाला सापडला नाही. अखेर वैतागून बाहेर पडलो !

जलमार्ग, हवाई मार्ग, रेल्वेमार्ग व बस-मार्गांचा जेथे संगम होतो अशा कोचीन शहरात ठिकठिकाणी इतके छोटे-मोठे पूल आहेत व अशा जर्जरी अवस्थेत आहेत की, वाहतूक त्रासदायक होऊन जाते. पुलावरून वाहनांना सावकाश जावे लागते.

कोचीनला चिरस्मरणीय दृश्य पाहावयास मिळाले असेल तर तो सूर्यास्त. तांबड्या–निळ्या सूर्यकिरणांनी आभाळ भरले होते. शुभ्र कापसासारख्या ढगांना सोनेरी किनार शोभून दिसत होती. तसेच प्रतिबिंब समुद्राच्या पाण्यावर उमटलेले होते. सर्व वातावरण सोनेरी रंगांनी सुशोभित झाले होते. जणू काही सोन्याचा सूर्य अस्त पावत होता. कोचीनच्या सूर्यास्ताची आजपर्यंत कोणीही शिफारस केली नसली तरी मी करू इच्छितो !

● ● ●

६ : कोवालम् बीच

चॉकलेट रंगातील मेकअप

अर्नाकुलम्–कोचीन सोडताना मी सैनिकी हिरव्या रंगाची हाफपँट व पांढरा स्पोर्ट शर्ट अंगावर धारण केला. दक्षिणेत उन्हात प्रवास करावा लागणार याची कल्पना असल्यामुळे मी मुद्दाम बरोबर ते कपडे घेतले होते. ऊन इतके कडक होते की जास्त वारा लागावा म्हणून गाडीचा वेग आपोआपच वाढत असे. थांबल्याबरोबर सर्वांग घामाने ओलेचिंब व्हायचे. दुपारच्या प्रवासामुळे अंगाचा काळा रंग पक्का व्हायला फार वेळ लागला नाही. रात्री मुक्कामी प्रशस्त स्नान-गृहात प्रवेश केल्यावर आरशात पाहताक्षणीच अंगोपांगांच्या रंगातील भेद हमखास जाणवला. चॉकलेट रंगाने ' मेकअप 'च केला होता.

अलेप्पी, पल्लम, क्विलॉन इत्यादी निसर्गरम्य स्थळे पाहिली. तसे पाहिले तर सर्वच केरळ नयनमनोहर आहे. नारळाची बाग पाहिली किंवा ' पाम ग्रुव्ह ' पाहिल्यावर एकसारखी लपंडावाची आठवण व्हायची. येथे जर समवयस्क सवंगड्यांशी ' शिवाशिवी 'चा खेळ खेळायला मिळाला तर खरोखर काय मजा येईल ! कोणताही विचार मनात आला की ताबडतोब त्याची अंमलबजावणी करायची असा हा एक छोटा छंद आहे मला. त्यानुसार मी एकटाच एका सुंदर समुद्रकाठी असलेल्या वाळूत ' पामवृक्षा 'भोवती उगाचच पळत सुटलो. मनात त्या वेळेस नाना विचार घुटमळत होते, व हलके स्मित चेहऱ्यावर उमटायचे. परंतु समुद्रातील लहरीप्रमाणे तेही विलीन होत असे.

अलेप्पी ते कोट्टायम जलमार्ग आहे. नदीचा ‘ पट ’ असावा तसा येथे समुद्र खूप आतपर्यंत १० ते २० मैल घुसला आहे. त्यातून नियमित वाहतूक चाललेली असते. या मार्गाला ‘ बॅक वॉटर्स ’ म्हणतात. असा मार्ग इतरही अनेक ठिकाणी पाहावयास मिळतो. हे एक केरळचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. येथे सणाच्या दिवशी नौका-स्पर्धा होत असतात. एका नावेत ३० ते ४० पर्यंत नावाडी बसतात व स्पर्धेत भाग घेतात.

वाटेत रस्ता दोन ते तीन मैल समुद्र किनाऱ्याशी अगदी समान्तर आहे. मासे वाळवण्याचे काम चालत होते. थोड्या अंतरावर दोन तीन बोटी असावयाच्या व स्त्री-पुरुष गटागटाने काम करायचे. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला नारळाच्या बागा होत्या व काही स्त्रिया नारळाच्या रेषांतून ‘ दोरखंड ’ तयार करीत होत्या. माझ्या गाडीचा आवाज ऐकून सर्वांच्या हातचे काम तसेच राहायचे. दोन–चार ठिकाणी असे घडले की, लोक उत्साहाने दुसऱ्यांचे लक्ष माझ्याकडे वेधायचे व मजकडे पाहून हसायचे. का,–हे काही मला उमगले नाही.

नारळाच्या आगरात नारळ महाग

एक छोटे दुकान पाहून मी थांबलो. खाण्याजोगे तेथे काहीच नव्हते. नारळाचे (शहाळ्याचे) पाणी पीत असता लहान लहान मुले माझ्याकडे बघायला लागली. मी एका नारळाची मलई (कोवळे खोबरे) त्या मुलांना दिल्यावर ती फारच खूष झाली. खुद्द बागेत राहणाऱ्या या मुलांकडे पाहून मला आश्चर्य वाटले. त्याहून अधिक आश्चर्य म्हणजे एका नारळाचे ८० पैसे असा त्याने हिशेब लावला. म्हैसूर मद्रासमध्ये त्यांच्या तोडीचे उत्पादन नसतानादेखील तेथे ३० ते ४० पैशांत नारळ मिळायचे.

केरळमध्ये धान्य किंवा कडधान्याचे उत्पादन फारच कमी असल्याकारणाने त्या सर्व वस्तू त्यांना इतर प्रान्तांतून मागवाव्या लागतात. त्यामुळे येथे सर्व राज्यांपेक्षा महागाई अधिक आहे. इतर उद्योगही नाहीत. तेव्हा जीवनावश्यक इतर वस्तूसाठी त्यांना दुसऱ्या राज्यांवर विसंबून राहावे लागते. प्रमुख आहार तांदुळाचा भात. तांदूळ त्यांना बहुतांशी आंध्रप्रदेश पुरवितो. ही परिस्थिती म्हैसूर

किंवा मद्रास राज्यात नाही. केरळात महाराष्ट्रापेक्षाही जास्त महागाई आहे. म्हैसूरमध्ये अन्नधान्य स्वस्त व मद्रासला त्याहूनही अधिक स्वस्त आहे, असे मला वाटते. मद्रास स्वयंपूर्ण आहे.

केरळमध्ये अर्नाकुलम् व त्रिवेन्द्रम या स्थळांशिवाय मला इतरत्र जेवण सोयीस्कर न वाटल्यामुळे मी जेवलो नाही. येथे उकडलेला तांदूळ वापरतात. एका ठिकाणी हॉटेलमध्ये बोटावर मोजता येतील एवढ्या 'पॅस्ट्रीज' व 'केक्स' पाहायला मिळाले. पुण्यात ज्याची २० पैसे किंमत आहे. त्याचे मला ५० पैसे चुकवावे लागले. इतर काही मिळाले नाही. एक गृहस्थ तेथे भेटला. तो मुंबईला राहून आला होता. तेव्हा त्याला माझ्या गैरसोयीची कल्पना आली व त्याने नोकराला पाठवून माझ्यासाठी दूध मागविले. पैसे थोडे जास्त पडले. पण समाधान झाले. या भागात केळ्याशिवाय अन्य फळ क्वचितच पाहायला मिळते. केळी मात्र उल्लेखनीय. नेद्रबळ नावाच्या केळ्याचा गर केशरी रंगाचा असतो. त्याचे मी वाण्याच्या दुकानी मुद्दाम वजन केले; तर ते २८० ग्रॅम भरले. किंमत होती ३५ पैसे. केळ्याचे काही पदार्थ तळून मिष्टान्नाप्रमाणे येथे लोक खातात.

त्रिवेन्द्रमकडे जात असताना वाटेत एका छोट्या गावी थांबलो. तेथून आत ६ मैलांवर शिवगिरी नावाचे स्थळ आहे. मी गेलो त्याच दिवशी दुपारी डॉ. झकीर हुसेन तेथे येऊन गेले होते. तेथील स्वर्गीय संत श्री. नारायणगुरूंच्या मंदिराच्या उद्घाटन प्रसंगी ते आले होते. मीही तेथे गेलो. नारायणगुरूंनी बांधलेल्या सरस्वतीच्या मंदिराव्यतिरिक्त मी इतर कोठेही सरस्वतीचे मंदिर पाहिले नव्हते. तेथे बांधलेल्या भव्य शामियान्यात सुंदर चित्रे लावली होती. चित्रकाराबद्दल चौकशी करता समजले की, एका १५ वर्षांच्या मुलाने ती सर्व चित्रे तयार केली होती ! ही अप्रतिम चित्रे पाहून त्या बालकलाकाराचे मनोमन कौतुक केले. हंपीचा इरैया, जोग फॉलसचा अब्दुल गफार, व कोट्टायमच्या अनेक मुलांची आठवण झाली.

हिंदीविरोध फक्त राजकारण्यांचा

त्रिवेन्द्रममध्ये प्रवेश केल्यावर विद्यार्थ्यांचे अनेक गट दृष्टीस पडले. चौकशीसाठी उभा राहिलो तो विद्यार्थ्यांनी मला घेरले व विविध प्रश्न विचारले.

तेवढ्यात समोरच्या स्टुडिओमधला फोटोग्राफर आला व त्याने स्वयंस्फूर्तीने माझे फोटो घेतले. आम्ही उभे राहिलो होतो त्याच्या समोर एक कॉलेज होते. त्याचे नाव विचारता एकाने उत्तर दिले, " We never utter the proper name of the College.... We call it Red College. " (आम्ही कॉलेजच्या खऱ्या नावाने कधीच त्यास संबोधीत नाही. आम्ही त्यास ' लाल कॉलेज ' म्हणून ओळखतो.) प्रत्यक्षात इमारतीचा रंग लाल होता.परंतु त्या विद्यार्थ्यांचे बोलणे द्वयर्थी होते. साम्यवाद येथील विद्यार्थ्यांमध्येही किती भिनला आहे याचे हे एक प्रात्यक्षिकच मला घडले. त्या दिवशी ' हिंदी विरोधी आंदोलना 'निमित्त विद्यार्थ्यांनी हरताळ पाळला होता.

सायंकाळी येथील इंडियन कॉफी हाउसमध्ये बसलो होतो. शेजारच्या टेबलावरील विद्यार्थी हरताळाबद्दल चर्चा करीत होते. काही मिनिटे त्यांचे संभाषण ऐकल्यावर मला गप्प राहवले नाही. फजिती (आधुनिक) झाली तरी परवा नाही, परंतु त्यांच्या विचारांना योग्य दिशा दाखविणे हे वयोमानाच्या दृष्टीने आपले कर्तव्य आहे असे वाटून मी हळूच त्यांच्यातील एका विद्यार्थ्याशी बोलू लागलो. प्रेक्षणीय स्थळांची चौकशी करण्याच्या निमित्ताने मी माझा परिचय करून दिला. थोडा ' भाव ' मिळालाच. (हे अपेक्षितच होते म्हणा). सर्वांनी अनेक प्रश्न विचारून आपल्या जिज्ञासू वृत्तीचे प्रदर्शन केले.

हळूहळू मी मूळ मुद्द्याकडे गेलो व हिंदीचा विरोध का, किंवा पर्यायी मार्ग कोणता ?, कोणत्याही एका दक्षिण भारतीय भाषेला राष्ट्रभाषा म्हणून मानायची असल्यास सर्व दाक्षिणात्यांना ते मान्य होईल का ?– वगैरे प्रश्न विचारले. अल्पावधीतच त्यांच्या ' हिंदी विरोधी ' फळीचा त्रिफळा उडेल असे वाटले नव्हते. पण ते झाले खरे. चर्चेअंती लक्षात आले की हे राजकारण आहे. सामान्य माणसाचा तसा विरोध नाही. म्हैसूर व मद्रास राज्यांतदेखील मला हेच पाहावयास मिळाले.

त्रिवेन्द्रमच्या मेडिकल होस्टेलवर फोन केला. अनोळखी विद्यार्थ्यांना परिचय दिला, व प्रेक्षणीय स्थळांच्या भेटीसाठी आमंत्रण दिले. सोबत असलेली बरी, व वेळ वाचविणे असा हेतू होता. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात जा, पण

विद्यार्थ्यांइतके सहकार्य इतर कोणामध्ये दिसून येणार नाही, असे माझे मत आहे. आफ्रिकेहून आलेल्या विनोद पटेलने मला चांगली साथ दिली.

त्रिवेन्द्रमच्या कोवालम बीचवर

पहाटे आम्ही कोवालम बीचवर गेलो. शक्य तेवढा समुद्रात मी पोहलो. समुद्रकाठी वनराईत व खडकांमध्ये यथेच्छ विहार केला. समुद्रकिनाऱ्यावरील वाळूत किल्ला तयार करून पायाने उडविणाऱ्या मुलांच्या खेळाशी... प्रेयसीने केलेल्या प्रेमाची तुलना करणारे " प्रीतम है जीवन जोखू " हे सयगलने म्हटलेले स्वर्गीय गायन फार रंगले. विनोद पटेल माझ्यावर बेहद्द खुष झाला. अचानक एका ठिकाणी भेट झालेल्या या आम्हा दोघा व्यक्तींची आवड एकच होती, याचे दोघांना फार आश्चर्य वाटले व आनंदही झाला. ' मी आता एकटा प्रवास करीत नसून विविध गायकांना बरोबर घेऊन प्रवास करीत आहे. त्यामुळे प्रवास कंटाळवाणा होत नाही. ' असे मी सांगितल्यावर त्याला नवल वाटले. मनात क्वचित तो म्हणालाही असेल, ' काय विचित्र माणूस आहे हा ! '

• • •

७ : रामेश्वरम्‌ची मंदिरे

नय्यर डॅमचे सृष्टिसौन्दर्य

त्रिवेन्द्रमहून १६ मैलांवर आलेल्या नय्यर डॅमकडे जात असता रस्ता फार अरुंद व खाचखळग्यांचा होता. प्रवास जपून करावा लागला. खरोखर हे अति प्रशंसनीय निसर्गरम्य पर्यटन-स्थळ आहे. आसपास अरण्यवजा बागायत आहे. तलावातून धो धो येणाऱ्या कॅनॉलमधील पाण्याकडे पाहातच राहावे असे वाटते. हवेत उडणाऱ्या तुषारांमुळे भर उन्हात गारवा अनुभवावयास मिळाला. बागेत एक माळी पाण्याचा पाइप घेऊन उभा होता. परंतु त्या रबरी पाइपमधून पाणी येत नव्हते, म्हणून मी टक लावून पाहिले. तेव्हा लक्षात आले की, तो एक पुतळा होता,– हुबेहूब, जिवंत माळ्यासारखा ! त्याचप्रमाणे गारुडी, नाग, पाणी भरून घागर घेऊन जात असलेली नवयौवना, बैलगाडी व दोन युगुले, एक शेतकरीण व तिचे तान्हे मूल– अशा विविध मूर्ती पाहून फारच आनंद झाला. पाहता-क्षणी जिवंतच वाटायच्या. त्यावर भरलेले रंग कल्पनेपलीकडे नैसर्गिक वाटायचे. त्रिवेन्द्रमला जाऊन जर कोणी कोवालम बीच व नय्यर तलाव पाहिला नाही तर त्या भेटीला काही अर्थच उरणार नाही.

नय्यर तलावावरून परतताना घाईमुळे मी वेग वाढविला. दुपारच्या खाण्याच्या वेळेला डॉ. झाकिर हुसेन यांची भेट होण्याची शक्यता होती, म्हणून भर वेगात गाडी चालवीत होतो. मागे बसलेला विनोद पटेल घट्ट धरून बसला होता.

समोर एक ट्रक पाहून मी हॉर्न वाजविला. परंतु त्याने पुढे जाण्याचा इशारा दिला नाही. मी एकसारखा हॉर्न वाजवीतच राहिलो. तरी त्याने इशारा दिला नाही. तो आडवा येणार नाही असे समजून उजव्या बाजूने पुढे निघून जाण्याच्या विचाराने मी गाडीचा वेग वाढविला व ट्रकच्या जवळ पोहोचतो– तेवढ्यातच तो ट्रक उजव्या हाताला वळला,–पूर्व इशारा न देता ! आता गाडी त्या ट्रकला जाऊन आदळणारच होती. क्षणार्धात प्रकार लक्षात येताच मी दोन्ही ब्रेक्स मारले,– पण गाडी इतक्या वेगात होती की ब्रेकच्या तारादेखील तुटल्या व गाडीचा वेग कमी झाला नाही ! मी गाडीचे हँडल उजव्या बाजूला वळविले व तेथील चढावर झाडाझुडपातून वाचवीत गाडी वर नेली. आता चढही संपत होता, व पुढे काय हे ठाऊक नव्हते. मी हँडल एकदम वळविला व गाडी त्या चढावर घसरली. काय झाले ते नेमके समजले नाही,– पण मी उठून पाहिले तेव्हा गाडी एका बाजूला,– मी दुसऱ्या बाजूला– व तो नाजुक विनोद पटेल तिसऱ्या बाजूला एका झाडाखाली उताणा पडला होता !

मी चटकन उभा राहिलो. वस्तीतील सर्व लोक पळतच गोळा झाले होते. काहींनी मित्राला उचलले व बाजूला झोपवून त्याच्या तोंडावर पाणी शिंपले. गाडी कोणाला उभी करता येईना म्हणून मीच ती उचलली व स्टँडवर लावली. माझ्या हाताचे कातडे खरचटून निघाले होते. तसेच पायाच्या गुडघ्याला बराच मार लागला होता व पँट रक्तबंबाळ होऊन मोजे व बूट रक्ताने ओले झाले होते.

एवढे लागल्यावर मी देवाचे आभार मानले ! कारण गाडी थोडी पुढे गेली असती तर आम्ही दरीत खोल गेलो असतो. या प्रकाराने गावकरी चिडले होते. त्यांनी ट्रकच्या ड्रायव्हरला मार द्यायला सुरवात केली. पण तसे न करण्याबद्दल मी सांगितले. भाषेची अडचण होती. पण अभिनयाने काम भागत होते. त्या ड्रायव्हरजवळ लायसन्स मागितले; तेव्हा समजले की, तो विनापरवाना गाडी चालवत होता. स्थळकाळ लक्षात घेता जास्त वादात शिरलो नाही. गावकऱ्यांनी स्वच्छ कापड व पाण्याने माझे हातपाय धुतले व जखमेवर पट्ट्या बांधल्या. गाडीची तात्पुरती दुरुस्ती करून आम्ही दोघे सरळ सरकारी रुग्णालयात गेलो. विनोद तेथील विद्यार्थी होता, तेव्हा शुश्रूषेला जास्त अवधी लागला नाही.

प्रवासातील दुसरा व प्रत्यक्ष यमदूताचे दर्शन घडविणारा अपघात झाल्यावर प्रवास काळजीपूर्वक करायचा असा मनाशी निश्चय केला ! हातापायाला बँडेज बांधून प्रवास करताना फार त्रास झाला. पुढे कलकत्त्यात चार दिवस आराम घेतल्यानंतरच जखम भरून निघाली. तोपर्यंत जवळजवळ तीन आठवडे कष्टातच प्रवास केला. अर्थात इतर करमणुकीची अनेक साधने व स्थळे पाहायला मिळाल्यामुळे त्या कष्टातून पण आनंद लाभत होता. जेव्हा जेव्हा जखम दुखावली जाई तेव्हा मी हसायचो व मनाशीच बोलायचो, " काय मजेदार पर्यटन आहे आपले...."

कन्याकुमारीला मी सूर्यास्त होण्याअगोदर पोहोचलो. येथील सूर्यास्त व सूर्योदय फार प्रसिद्ध आहेत. तिन्ही दिशांना समुद्र असलेला हा एकच भाग आहे. भारताचे दक्षिणेकडील टोक, तेथे पोहोचल्यावर मनामध्ये वेगळ्याच भावना निर्माण होतात... त्या शब्दात व्यक्त करता येणार नाहीत. सूर्यास्ताच्या वेळी क्षितिजापासून निघालेला एक लांब सोनेरी पट्टा समुद्रतळावर दिसतो. तो भव्य देखावा इतर कोठेही पाहायला मिळत नाही. सूर्यास्त झाल्यावर जमिनीवर जरी अंधार पसरलेला असला तरी आकाशात त्याच्या किरणांचे अस्तित्व पुष्कळ उशिरापर्यंत असतेच. ढगातील तो प्रकाश पाहण्याचा आनंदही उत्कृष्ट असतो.

पहाटे थंडीत सूर्योदय पाहावयास जाऊन उभा राहिलो. परंतु दुर्दैवाने क्षितिज ढगांनी झाकले होते व सर्व काही प्रकाशमान झाल्यानंतर पुष्कळ वेळाने सूर्यदर्शन घडले. त्यामुळे विरस झाला. तेथून आंघोळ करून रिवाजाप्रमाणे एका वस्त्रानिशी कन्याकुमारी देवीचे दर्शन घेतले. आत लावलेल्या दीपमालेमुळें गाभारा शोभून दिसत होता. मी फार प्रसन्न झालो.

विवेकानंद खडकावर चालत असलेले मंदिराचे काम पाहिले. गांधी मंदिर पाहिले. अनेक शिल्पकार काम करीत असताना बारीक नक्षीकाम पाहिले. समुद्रकांठी हिंडलो व वेळेच्या अभावी मन मारून मी पुढच्या प्रवासाला सुरवात केली.

कन्याकुमारीहून निघालो व तिरुनलवेलीकडे उत्साहाने प्रवास सुरू केला. तिरुनलवेलीला न थांबता मी सरळ कोर्टालमकडे गेलो. तेथील रसायनयुक्त नैसर्गिक पाण्याचे धबधबे प्रसिद्ध आहेत. त्या पाण्यात आंघोळ केल्यावर कातडीचे विकार


नाहीसे होतात, म्हणून शेकडो मैलांवरून लोक तेथे येतात. काही दिवस राहतात व बरे होतात. अशा प्रकारची कुंडे मुंबईजवळ वज्रेश्वरी व बिहार राज्यात राजगीरला आहेत. परंतु ते पाणी गंधकामुळे गरम असते. या धबधब्याचे पाणी गार आहे. मी येथे दोन तास फिरलो. चारही बाजूंना डोंगर व मध्ये धबधबे सुंदर दिसत होते. हातापायावर जखमा असल्यामुळे आंघोळ करू शकलो नाही. कोर्टालम ते तिरुनलवेली संध्यासमयी परतताना प्रवास फार सुखाचा झाला. रस्ता अरुंद पण छान होता. सबंध दिवसाच्या श्रमानंतर शेतात बैल बसून गवत खात होते. बैलगाड्या शहराहून परतत होत्या. गाई–म्हशींचे कळप व त्यांच्या धीम्या चालीमुळे गळ्यातील घंटांच्या नादाने वातावरण प्रसन्न झाले होते. आभाळात ढग विखुरलेले होते व राहून राहून त्यांचा आकार बदलत होता. वारा मंद गतीने वाहात होता. या सर्वांचा माझ्यावर इतका परिणाम झाला की मी नेहमी जलद गतीने गाडी चालवणारा नकळतच गाडीचा वेग एकदम कमी करून प्रवास करू लागलो. अनोळखी प्रदेशात प्रवास करण्याची मौज फार वेगळीच असते.

कोर्टालम ते तिरुनलवेली अंतर फक्त पस्तीस मैलांचे होते. पण मी रात्री आठ वाजता पोहोचलो. मेकॅनिकला गाडी सर्व्हिसिंगसाठी दिली व पहाटे परत करण्यास सांगितले. त्याने सहानुभूतीने काम करून वेळेवर पहाटे गाडी आणून दिली. नाही तर माझा मुक्काम अर्धा दिवस वाढला असता व विनाकारण खर्च झाला असता. याहीपलीकडे त्या दुकानाच्या मॅनेजरने मला सहकार्य केले. माझ्या अंगात ताप आहे. हे पाहून श्री. नटराजन मला डॉ. मोहिद्दीनकडे घेऊन गेले. तेथे मलमपट्टी करवून घेतली व टॅक्सीतून माझ्या मुक्कामी हॉटेलला मला पोहोचवून दिले. डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणे त्याने मला तेथे आठवडाभर आराम करण्याची आग्रहाची विनंती केली व त्याच्या घरी चलण्याचे आमंत्रण दिले. त्यांच्या डोळ्यांत मी जी माणुसकी पाहिली ती कधीही विसरू शकणार नाही. आरामासाठी नव्हे तर त्या सद्गृहस्थाच्या सत्संगासाठी राहावे असे क्षणभर वाटले. पण मी माझा मुक्काम लांबवू शकत नव्हतो. आधीच पावसामुळे आंध्रच्या माझ्या कार्यक्रमात विलंब झाला होता.

तुतिकोरिन हे इतिहासप्रसिद्ध बंदर. परंतु फारसे सुधारलेले नाही. लायन्स क्लब, रोटरी क्लब इत्यादी पाट्या प्रवेश करताच नजरेस पडतात. प्रवाशांसाठी माहिती पुरविणारी कचेरी पण आहे. जुन्या गोद्यांशिवाय विशेष काही नाही. येथून रामेश्वरला जावयाचे असल्यास बहुतेक लोक मदुरेला जातात व परत दक्षिणेकडे प्रवास करून रामेश्वरला जातात. मी मधला रस्ता असल्यास अंतर व वेळ वाचेल म्हणून प्रयत्न करू लागलो.

रस्त्यांची चौकशी हा एक अति महत्त्वाचा भाग होता. अशिक्षित व सुशिक्षित सर्वांची मार्गदर्शनात थोडीफार चूक व्हायची. कोणी दिशा चुकायचा, कोणी अंतर चुकायचा, कोणी रस्त्याला चांगल्याचा वाईट करायचा तर कोणी वाइटाचा चांगला करायचा. त्यामुळे फार पंचाईत व्हायची, व नेमके काय हे कळत नसे. नकाशात सर्व माहिती मिळणे कठीण. ऑटोमोबाइल असोसिएशनची आमच्यावर कृपा झाली नव्हती, म्हणून मी पाच–सहा वेळा चौकशी करून कार्यक्रम आखायच्या (१) पोलिस चौकी, (२) ट्रॅन्सपोर्ट कंपन्या, (३) एस. टी. बस सर्व्हिस, (४) पेट्रोल पंप, (५) व्यापारी, (६) शेतकरी, कामकरी, –अशा चौकशीच्या विविध फळ्या उभारल्या होत्या.


तेथून मी कुरुकुच्छालम्, एस्यापुरम्, अरुकोटाई, कौमुदी, पार्थनुर, परमकुंटी, रामनाथपुरम्, मंडपम् व रामेश्वरम्– असा मार्ग आखला. या मार्गाने जवळ जवळ ६६ मैल प्रवास वाचणार होता. कुरुकुच्छालम्‌ला गेल्यावर चौकशी करता समजले की, त्याहूनही जवळचा नवीन मार्ग सुरू झाला आहे हे लोकांना माहीत नाही. पटण्यासारखे वाटल्यामुळे मी कुळचुर, पीळातीकुळम्, व्यंचर, उत्रगोशमंगई, रामनाथपुरम्, मंडपम् व रामेश्वरम्– असा मार्ग आखला, व प्रवासाला सुरवात केली. कुळतुरला आणखी जवळचा मार्ग सापडला, म्हणून मी सुरन्गुडीच्या दिशेने पुढे झालो. सुरुवातीला रस्ता बरा होता म्हणून खात्री पटली. परंतु काही मैल गेल्यावर एकदम मातीचा रस्ता आला. हा थोड्या अंतरापुरता असेल असे समजून पुढे झालो, आणि बघतो तर– चिखल...! दोन मैल गेलो तरी रस्ता चांगला लागेना...!! त्याच्या पुढे फटफटीवर बसून जाणे अशक्यच होते, म्हणून खाली उतरलो. काय करावे या



कोवालमचा रम्य समुद्रकिनारा

त्रिवेंद्रम पासून ७ मैलांवर आहे. येथे रहाण्यासाठी मोठे हॉटेल असून पोहण्याची उत्तम सोय आहे. अनेक परदेशीय प्रवासी येथे रहातात व जलतरणाचा आनंद लुटतात. पामवृक्षांनी सुशोभित किनारा सहलीसाठी उत्तम आहे.

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण.



↑ प्रकाशक श्री. सुरेशचंद्र बाबुभाई सुरतवाला व लेखक श्री. अशोककुमार स्वामीनारायण, महसूल मंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांना भेटले असतांना घेतलेले छायाचित्र. प्रवासातील १२०० छायाचित्रांचा संग्रह पाहून बाळासाहेबांनी प्रशंसोद्गार काढले



← पुणे महानगरपालिकेने केलेल्या सत्कारास उत्तर देताना श्री. अशोककुमार स्वामीनारायण शेजारी मेयर श्री. कड आहेत.



कन्याकुमारी ते रामेश्वरम्

अनेक मैल अशी वृक्षांची वाढ आहे. दक्षिणेतील वैशिष्टयपूर्ण जंगलच म्हणा ना ? मद्रास राज्यातील हाच भाग निर्जन व उजाड वाटतो. रस्ता धुळीचा व खाचखळग्यांचा आहे.

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण.




← लेखक व मजूर

फोटो : श्री. अशोककुमार स्वामी नारायण रामेश्वरला जात असताना जवळचा रस्ता म्हणून लेखकाने नव्या पूर्वकिनाऱ्यावरील राजमार्गाने प्रवास केला. चक्रीवादळाच्या तडाख्यात उद्ध्वस्त झाल्यामुळे चिखलातूनअनेक मैल प्रवास करावा लागला व गाडी ढकलावी लागली.

मंदिरावर आद्य शंकराचार्य व चार शिष्य यांच्या मूर्ती आहेत. उजव्या बाजूच्या भिंतीवरील श्लोकांवर डांबर फासलेले दिसते.

रामेश्वर येथील
↓ शंकराचार्यांचे मंदिर



विवंचनेत थोडा वेळ निघून गेला. " काही जरी झाले तरी पुढे टाकलेले पाऊल मागे घ्यायचे नाहीं " असा मनाशी निश्चय केला व गाडी ढकलू लागलो.

सुरुवातीला उत्साह दांडगा होता, म्हणून काही वाटले नाही. तोल सांभाळीत त्या चिखलात चालत...गाडी ढकलीत अर्ध्या- पाऊण मैलावर पोहोचलो. घामाने न्हाऊन निघालो होतो. पुण्याहून बरोबर घेतलेली उन्हात घालण्याची टोपी बँगलोरला विसरलो होतो....ही सवय बरी नाही असा विचार करून स्वतःलाच शिक्षा देण्याच्या विचाराने दुसरी घेतली नव्हती. आता वाटायला लागले... ते परवडले असते. पण या उन्हात डोके शिजायला वॉटरबॅग जपून आणली होती, ती नेमकी कन्याकुमारीजवळच कुठे तरी मागच्या मागे पडली. ती बांधताना केलेल्या हलगर्जीपणाचे आता प्रायश्चित्त भोगत होतो.

चौफेर नजर फिरवली. सारे कसे शान्त शान्त होते ! ऐकायला चिमणीचा आवाजदेखील नव्हता व बघायला साधी मुंगीदेखील नव्हती. विश्रान्ती घ्यायची तर नावालादेखील सावली नव्हती. एवढेच काय, चोहोकडे चिखल पसरला होता. थोडे टेकावे म्हणून गाडीच्या ' सीट 'वर हात ठेवला. तर चटकाच बसला. कातडीतून पाणी पाझरत होते, पण प्यायला एक थेंब नव्हते.

वरती निरभ्र आकाश व खाली चिखल ! ' The sky above and the mud below ' ची आठवण झाली. विचार करायला पुष्कळ वेळ होता म्हणून हातापायांची दुखापत आठवली. पाहतो तो तेथून रक्त निघाले होते. जगज्जेत्या सिकंदरचे सैन्य आठवले. नेपोलियनचे ' वॉटर्लू ' आठवले. ' मोझेस 'नी तांबडा समुद्र ओलांडून आपल्या अनुयायांना नेले, त्या वेळच्या त्या लोकांची आठवण झाली. वेड्या महंमदचा ' दिल्ली ते दौलताबाद ' व ' दौलताबाद ते दिल्ली ' हा फेरफटका आठवला. अनेक इंग्लिश युद्धचित्रे आठवली व हिंदी ' हकिकत 'ची आठवण झाली. शेवटी आठवला पुराणातील राम. (तो तरी भाग्यशाली होता, एकटा नव्हता !) परंतु संत रामदासांची आठवण होताच धारिष्ट्य आले. रामदासस्वामींची सतत १२ वर्षे पायी चाललेली भ्रमंती आठवली. सर्व काही आठवण्याचाच कार्यक्रम होता. म्हणून इतर काही संत आठवले, एका एका संताला त्याच्या एका एका गुणामुळे मनाचे वैभव मिळाल्याचे आठवले.

ज्ञानेश्वरांना वेदान्ताच्या ज्ञानाने, नामदेवाला भक्तीच्या लडिवाळपणाने, एकनाथाला मनाच्या मोठेपणाने, संत तुकारामांना अंतर्मुखतेमुळे, व संत रामदासांना भ्रमन्तीमुळे !

उठा 'स्वामी'...! (माझ्या लांबलचक आडनावाचे सोयीसाठी कॉलेज विद्यार्थ्यांनी केलेले संक्षिप्त संबोधन !) मन घट्ट करून मी तयार झालो. 'अंजनीने स्तनाच्या धारेने शिला फोडल्यावर हनुमानाला जसे प्रोत्साहन लाभले होते, तसे मला लाभल्यासारखे वाटले ! मलाही माझी 'आई' आठवली. खरोखर तिचे फार फार उपकार आहेत माझ्यावर. लहानपणी माझ्यावर विश्वास ठेवून तिने मला उन्हा-तान्हात व पावसापाण्यात मोकाट फिरायला सोडले नसते तर मी अशा रीतीने येथपर्यंत कधीच पोहोचू शकलो नसतो. शेजाऱ्यांनी किंवा बाहेरगावाहून आलेल्या पाहुण्यांनी चिंतित मुद्रेने माझ्याबद्दल विचारपूस केल्यावर ती, माझा मुलावर पूर्ण भरवसा आहे. जगाच्या कोठल्याही कोपऱ्यात गेलेला असला तरी सुखरूप घरी परत येईल. त्याचबरोबर पहिल्या महायुद्धाच्या काळात वडिलांनी केलेले इंग्लंडमधील वास्तव्य आठवले.

म्हणून म्हटले, 'उठा स्वामी ! संतांच्या थोर आठवणींना आठवून एवढे करा...., निदान आळीत तरी लौकिक मिळेल ! हाती घेतले ते तडीस न्या !! असा मी स्वतःला आदेश दिला. मनगट बळकट केले व गाडी ढकलू लागलो.

उजाड प्रदेशात जेवण ?

तीन तासांनंतर तीनएक मैल पोहोचलो जेमतेम ! थोडे थांबून 'दैवगति दुर्निवार असते' असे पुटपुटलो व पुढचे पाऊल टाकतो-- तेवढ्यात समोर अर्ध्या फर्लांगावर काही कामगार दिसले. मी झटपट गाडी स्टँडवर लावली व पळत त्यांच्याकडे गेलो. वाटेतच डॉ. आर. शिवास्वामी व कोडाईकनलला भेटलेले कोइम्बतूरचे प्रोफेसर एस. सुंदरम यांची आठवण झाली. त्यांच्याकडे मी तामीळची थोडी वाक्ये शिकून घेतली होती. घाईघाईत मी त्या मजुरांना म्हटले, 'नल्ल सापडु यंगे किडक्कीम ?" ऐकताच दोनतीन स्त्रियांनी ओठांवर बोटे ठेवली व हळुवार काही बोलू लागल्या. मजूर पुरुषांपैकी एकाने नाटकात लहान मुले जसा हात फिरवतात तसा हात फिरवून सर्व जमीन दाखवली व काही तरी बोलला ! त्याचे बोलणे संपते न संपते तोच सर्वजण एकदम हसायला लागले. मी बावचळलो.

बोललेले वाक्य पुन्हा आटवले व झालेला प्रकार लक्षात आला. ' मी सबंध भारताचा प्रवास करावयास निघालो आहे, " असे म्हणण्याऐवजी मी म्हणालो होतो की, ' येथे चांगले जेवण कोठे मिळेल ? ' त्यांनी हात फिरवून उजाड प्रदेश दाखवला होता. क्वचित त्या स्त्रिया म्हणाल्या असतील, " इथं बाबा कुठलं रं जेवण ? "

मी आठवून आठवून माझ्या यादीतलं सातवं वाक्य बोललो, ' नोन तामीळ पत्र वायं तान्‌ तरीयम '— ' मला तामीळची दहाच वाक्ये येत आहेत. ' ते म्हणाले, " तामीळ तरी ना ? " " तामीळ येत नाही ? " " तरी यादा... तरी याददा " नंतर मात्र मी पटापटा बोललो. तरी खेडवळात खपलो होतो म्हणून माघारी फिरवून डायरी काढली. त्यांच्या जवळ जाऊन व्यवस्थित बोललो. सुदैवाने त्यांचे इंजिनीयरसाहेब तेवढ्यात जीपमधून तेथे आले.

मद्रास व पूर्व किनाऱ्याच्या दक्षिण भागात झालेल्या चक्री-वादळामुळे व अतिवृष्टीमुळे हा सर्व रस्ता उद्‌ध्वस्त झाला होता. त्या इंजिनीयरने स्वतःजवळ असलेले फोटो दाखविले. तेव्हा समजले की, मी येण्याच्या पूर्वी रस्ता बराच सुधारला होता. आठवणीसाठी मी त्यातून एक फोटो घेतला. सर्व मजुरांनी माझी गाडी पुढे एक मैल ढकलली व बऱ्या रस्त्यावर पोहोचविले. त्यांच्याबरोबर फोटो घेतल्यावर ते खूष झाले. त्या इंजिनीयरच्या मार्गदर्शनाप्रमाणे मी सुरगुंडी, थांगम्मलपुरम, सयलगडी, रामनड रस्त्याने जायचे ठरवले. सुरुवातीला छोटी वस्ती होती. एका गृहस्थाला साधारण इंग्रजी येत होते. त्याच्या साहाय्याने मी थोडी खाण्याची सोय करून घेतली. एका चहाच्या हाटेलवाल्याकडून खास मार्गदर्शन करून ' गोल ' भजी करून घेतली. सुरगुन्डीच्या एकुलत्या एक इंग्रजी जाणत्या जेथुरामलिंगमने एकाला बोलावून ' धारोष्ण ' दूध मिळवून दिले. मनात म्हटले, ' बूँद बूँद पर लिखा है पीनेवाले का नाम. '

जेथुरामलिंगमचे म्हणणे होते की, पावसामुळे थांगम्लपुरमच्या रस्त्यातील नाल्यांना पूर आला होता; म्हणून मी उर्मबार, काननीराजपुरम, नरीपोईयार, सयलगुडी असा मार्ग पत्करावा. ते खरे वाटले. कारण सुरगुन्डीला येता येताच मी दोन ओढे ओलांडून कसा बसा आलो होतो. मनात शंका कुशंका असतानासुद्धा काही उपयोग नव्हता. मी प्रवास पुढे सुरू केला. अक्षरशः कित्येक मैल

निर्जन अरण्यातूनच मी मातीच्या रस्त्यावरून प्रवास केला. परंतु रस्त्यात कोठेही धोका झाला नाही. वेदकनरीपुयुर या छोट्या वस्तीतली मुले मी थांबलो असत बिथरली. जेमतेम त्यांना एकत्र आणून फोटो घेतला व या निमित्ताने तिथे विश्रान्ती घेतली. तेथून पुढे काही मैल चांगला ' टार ' रोड लागला. सायलगुडीहून पुढे रस्त्याची धूळ खात खात एकदाचा रामनाथपुरमला पोहोचलो. एखाद्या मद्राशाला माहीत नसतील ही नावे. वरील व मुथुकुलाथुर, विलाठीकुलम, मेहरूर, इत्यादी मला माहीत झाली होती. सायलगुडीला काही लोकांनी आग्रहाने ' चहा ' देऊन हक्काने ' समूह फोटो ' काढून घेतला होता.

रामनाथपुरम ते मंडपम रस्त्यावर नाले भरल्यामुळे परत फिरावे लागले. रामनाथपुरमला पोलिस स्टेशनवर फटफटी ठेवून मी रेल्वेने रामेश्वरला पोहोचलो. या प्रवासात एका शाळेच्या हेडमास्तरकडून तामीळमध्ये एक ते शंभरपर्यंत अंक शिकलो. म्हैसूर राज्यातील ' केरूर 'प्रमाणे येथेही लोक कौतुकाने माझे उच्चार ऐकत होते.

रात्रीच्या आरतीला हजेरी लावली. अनेक दिवसांची हौस आज पूर्ण झाली होती. मागे हरिद्वारला जाऊन गंगाजळ आणल्यासून रामेश्वरला जाण्याची फार इच्छा होती. सबंध दिवसाच्या कष्टमय व जोखमी प्रवासातून सुखरूप पोहोचविल्याबद्दल देवाचे आभार मानले. नकळतच डोळे पाणावले होते.

संबंध रात्र ढेकूण व डांस यांनी जागरण घडविले होते. अनायासे ३॥ वाजताच्या काकड- आरतीला मी जाऊ शकलो. एरवी क्वचितच देवालयात जाणारा मी त्या घंटानादात भक्तिभावनेने गहिवरलो. अनेक भाविक देशाच्या कोनाकोपऱ्यांतून आलेले. मोठ्या श्रद्धेने आरती म्हणत होते.

सकाळी हलके समुद्रस्नान केले. ' सरस्वती 'चे दर्शन घेतले, शंकराचार्यांचे दर्शन घेतले. स्फटिकलिंग ज्यास लोक ' मणी ' म्हणून ओळखतात त्याचे दर्शन झाले व सबंध मंदिर निरखून पाहिले. भल्या मोठ्या राजवाड्यासारखे हे विशाल शिवालय पाहून आश्चर्य वाटले. एक हजार खांब पाहून डोळ्यांचे पारणे फिटले. मंदिरात असलेले चोवीस- कुंड पाहिले. आंघोळ करणे हितावह नव्हते. समुद्रस्नानानंतर चोवीस- कुंडाच्या पाण्याने आंघोळ करण्याची प्रथा आहे.

हिंदीविरोधी आंदोलनात काही अशिक्षितांनी शंकराचार्य मठाच्या भिंतीवरील व देवासमोर संस्कृत श्लोकांवर पण डांबर फासले होते. हे पाहून मन खिन्न झाले.

रामेश्वर व मंडपम येथे पाहिलेले गलिच्छ रस्ते व वस्त्या आठवल्या की आजही उद्वेग येते. जास्तीत जास्त दिवस राहावेसे वाटावे अशी व्यवस्था तीर्थक्षेत्रात असावी असे वाटले. मी दुसऱ्याच दिवशी रामनाथपुरमला परतलो.

• • •

८ : मीनाक्षी-मंदिराची मोहिनी

भारत यात्रेमुळे 'देवमाणूस' झालो

रामनाथरपुमला पोहोचलो तेव्हा दुपारचे तीन वाजले होते. मदुरा ७० मैल होते. फटफटी पोलिस स्टेशनवर होती व ते स्टेशनपासून दोन मैलांवर होते. एका शाळकरी मुलाने मला मदत केली. तो व मी स्टेशनवरून सायकलीवर पोलिस स्टेशनला गेलो. ती सायकल त्या दुकानाच्या दुसऱ्या शाखेत तेथे परत केली व मी मोटरसायकल घेऊन स्टेशनवर परतलो.

गाडीत पेट्रोल नव्हते म्हणून पंपावर पेट्रोल भरून घेतले. मदुराईपर्यंत पोहोचण्याइतके– तीन लीटर त्यास भरण्यास सांगितले. कारण रोख पैसे संपत आले होते. परंतु त्याने टाकी रिकामी आहे असे पाहून जास्त भरले. मी जवळ घेतलेल्या 'ट्रॅव्हलर्स चेक'चा उपयोग नव्हता; कारण रविवारमुळे बँका बंद होत्या व कोणी व्यापारी त्याची किंमत जाणत नव्हता. फार पंचाईत पडली. दोन तास निघून गेले, पण प्रश्न सुटत नव्हता. अखेर अर्नाकुलमच्या एका व्यापाऱ्याने माझे पेट्रोलचे पैसे भरले. माझी त्याची नुकतीच रामेश्वरला ओळख झाली होती व नाव-पत्त्यांची देवाणघेवाण झाली होती. मी त्याला मनिऑर्डरने पैसे पाठविण्याचे आश्वासन दिले.

सकाळी फक्त चहा घेऊन निघालो होतो. भूक अतिशय लागली असतानाही येथे झालेल्या प्रकारामुळे मी चहा घ्यायलादेखील थांबलो नाही, व तसाच प्रवास सुरू केला. रात्रीच्या जागरणामुळे डोळे जड झाले होते. परंतु थंड वाऱ्यामुळे उत्साह टिकून राहिला होता.

अंधार होण्यापूर्वी मदुरेला पोहोचावे म्हणून गाडी भर वेगाने जात होती. अशात एका छोट्या वस्तीजवळ अचानक एक वृद्ध बाई रस्ता ओलांडताना नजरेस पडली. तत्क्षणी ब्रेक्स मारणे धोक्याचे होते म्हणून पुष्कळ हॉर्न वाजविला, पण त्या वृद्धेने काही पाहिले नाही व रस्त्याच्या मध्यभागापर्यंत येऊन पोहोचली. रस्ता अरुंद होता. वळण घेऊन बाजूने निघण्याचा प्रयत्न करावा व ती परत त्याच दिशेला घाईने पळू लागली तर ! अशा पेचात होतो. मी ताबडतोबीने ब्रेक्स मारले व जेमतेम गाडी थांबवली. रस्त्यावर लांब काळा पट्टा उठला होता. ब्रेक्सच्या आवाजाने सर्वांचे लक्ष वेधले होते. सेकंदात माझ्या-भोवती लोकांचा घोळका जमला.

या चार पाच ओळी वाचायला जेवढा वेळ लागला असेल तेवढाही वेळ ही घटना घडायला लागला नव्हता. ती बाई रस्त्याच्या कडेला पोहोचली होती व तिथे एका स्त्रीने तिला सांगितल्यावर तिच्या लक्षात आले होते. जमलेले लोक काही तरी बोलत होते. त्यांच्या अभिनयावरून व हावभावावरून मला समजले की, ते माझी प्रशंसा करीत होते. एक गृहस्थ काही विचारत आहे, असे पाहून मी म्हणालो, "नोन इंडिया पुरावू सूद्री वरी हिरेन, नोन मुख्यमान अडंगळे पाळी पो हिरेन, कोविल कोविल." "मी सबंध भारताचा प्रवास करीत असून प्रमुख स्थळे, तीर्थक्षेत्रे व देवालये पाहावयास निघालो आहे."

'अय्ययोऽऽ' पुढचे काही मला कळले नाही. त्या म्हातारीच्या मुलाने तिला माझ्या जवळ आणून माझ्याविषयी काही सांगितले. अन् काय आश्चर्य घडले म्हणून सांगू,—ती पासष्ट सत्तर वयाची वृद्धा कमरेत वाकून चक्क माझे पाय धरू लागली ! 'नहीं नहीं' म्हणत मी तिला सावरले. तिच्या डोळयांत पाणी उभे राहिले होते, व गहिवरून ती काही तरी म्हणत होती. दोन तीन पुरुषांनी हात जोडून काही तरी सांगितले. मला काहीच कळत नव्हते. उत्कंठेने मी कुणी तरी सुशिक्षित येण्याची वाट पाहू लागलो.

काही मिनिटांतच एक मोटर येत असताना दिसली. मी हात दाखवून थांबवली व त्या गृहस्थांशी इंग्रजीत संभाषण करून विनंती केली. त्याने गाडीतून उतरून विचारपूस करून मला सर्व काही सांगितल्यावर मला फार आनंद झाला. आश्चर्यही वाटले. त्या वृद्धेला लहानपणापासून उत्तरेला काशी, हरिद्वार वगैरे

यात्रा करण्याची इच्छा होती. परंतु उभे आयुष्य गेले तरी ती करू शकली नव्हती. मी या वयात सर्व यात्रा करीत आहे हे ऐकून मला ' देवमाणूस ' म्हणून ती पाया पडू लागली होती. तिची ही श्रद्धा पाहून मला आश्चर्य वाटले. आपल्या संस्कृतीचे प्रत्यक्ष दर्शनच घडले होते. तिच्यासाठी मी देवाला प्रार्थना केली व पुढे निघालो.

विसर पडणार नाही असा सुड्ड

परमगुळी येथे चांगले अल्पोपाहारगृह पाहून मी प्रवेश केला. तेथे सर्व पदार्थ गरम होत होते. समोर आलेले उडीद्वडा सांबर खातो न खातो तेवढ्यात आतून तो ऑर्डरवाला पळतच आला व हात लांबवून ओरडला " सुड्ड...सुड्ड ....सुड्ड....सुड्ड. " तो इतक्या घाईघाईने भराभर बोलला की, मी चटकन चमचा फेकून दिला. क्षणार्धात झुरळ, पाली, उंदीर इत्यादी सर्व महाभाग डोळ्यांसमोर काजव्यांप्रमाणे चमकून गेले. एक अति भयंकर भूतकाळ आठवला ...माझ्या मामेबहिणीची सोयरीक होती. सबंध दिवाणखाना बऱ्या लोकांनी भरला होता. शोकिनांच्या कपड्यांवरील अत्तरांच्या व उदबत्तींच्या सुगंधाने त्या प्रशस्त दिवाणखान्यात नुसता घमघमाट झाला होता. सर्वांच्यासमोर बदाम, चारोळी, केशरयुक्त दुधाचे पेले ठेवले गेले होते. थोड्या अवधीनंतर सर्व याचे प्राशन करणार होते— तेवढ्यातच माझी ताई ओरडतच आली, कुणी दूध पिऊ नका ! कुणी दूध पिऊ नका ! " सर्वच्या सर्व अवाक होऊन डोळे विस्फारून बघत होते. सर्वांना वाढून झाल्यावर भांड्याच्या तळाशी एक ' पाल ' दिसली होती. हे जर उघडकीस आले नसते तर ... ! कोण बाका प्रसंग ओढवला असता याची कल्पना करवत नव्हती.

अगदी असेच माझ्या मनात त्या वेळेस विचार आले व सर्वांगातून शहारे आले. परंतु अल्पावधीतच भ्रमनिरास झाला. मी फेकलेला चमचा व सांबार समोर एकाच्या अंगावर पडले होते व तो ओरडायला लागला होता हे पाहून गल्ल्यावरील मालक पळत आला होता व त्याने सर्व समजावून सांगितले की, अगदी उकळत असलेला सांबार माझ्या बशीत देण्यात आला होता, व तो फारच गरम होता. ' सुड्ड ' म्हणजे गरम ! हा मायेचा व्याप सोडून ' वर ' जाईपर्यंत मी या ' सुड्ड 'ला विसरणार नाही.

नंतर मात्र तेथे बऱ्याच करमणुकीत मी अल्पोपाहार घेतला. गरम इडली सांबार, जिलेबी इत्यादी आवडते पदार्थ होते. त्या मालकाच्या ' खमंग हिंदी 'ने मला ताजेतवाने केले. तो बोलत होता, " बहुतु लोगअं रामेश्वरम् गो (को) जाता, वापिसु लाऊटता....इदर काना गाता (खाना खाता). हम गो (को) हिंदी बोल्या ...सो....ओ डिंगल करता. पीछे सो हम मूको बंद करता. " " पुष्कळ लोक येथून रामेश्वरला जातात. परतताना येथे आहार घेतात. आम्ही हिंदी बोललो की ते टिंगल करतात व नंतर आम्हांला तोंड बंद करावे लागते. " असे त्यास म्हणावयाचे होते.

मीनाक्षी-मंदिरातील शिल्प

मदुरेच्या वाटेत अनेक ठिकाणी मी थांबलो. ठिकठिकाणी मोर- युगुल पाहावयास मिळाले. काही ठिकाणी मोराचा फुलविलेला पिसारा पाहून आनंद झाला. फोटो घेण्यास जवळ जावे तेवढ्यात ते पळून जायचे. तेव्हा लांबून पाहूनच मी पुष्कळ करमणूक करून घेतली. त्यांचा आपापसात चाललेला खेळ.. गुजगोष्टी पाहून फार समाधान झाले.

मदुरेच्या ' टूरिस्ट- बंगलो 'मध्ये आंघोळ करून तासभर आराम केला व संध्याकाळी बाहेर निघालो. बाजारात हिंडत असता मुंबईच्या एका तरुण मारवाडी व्यापाऱ्याची भेट झाली. त्याने अति आग्रहाने त्याच्या नेहमीच्या खाजगी भोजनालयामध्ये नेले. रात्री उशीरापर्यंत हिंडवले व शहराची कल्पना दिली. मी कोणत्या वेळेला कोठे काय पाहावे वगैरे सांगून अखेर स्वतः माझ्यासाठी वेळ खर्ची करण्याचे आश्वासन दिले.

मदुरा ' मीनाक्षी 'चे अति भव्य मंदिर पाहून आश्चर्य वाटले. चारी दिशांना उंच, भव्य, रंगीबेरंगी अनेक मूर्तींनी सजविलेले गोपुर– प्रवेशद्वार, त्याच्या आतही छोटी गोपुरे, मध्ये भव्य मीनाक्षीचे मंदिर, पूर्वेला आलेले सोन्याच्या पत्र्याने मढविलेले व बंदिस्तावस्थेत असलेले मंदिर, मध्ये स्नानासाठी असलेला भव्य कुंड,– सर्व काही आकर्षक होते. हजारो स्त्री-पुरुषांची एकसारखी ये-जा असायची. वृद्ध स्त्रिया अस्सल मद्रासी जुन्या पद्धतीचे वस्त्र नेसून कपाळाला भस्म लावून हातात पूजेचे ताट घेऊन मोठ्या भक्तिभावाने देवळात प्रविष्ट होत

होत्या. तरुणी विखुरलेल्या केसांनी...मूळ प्रथा टिकवून पण थोड्या आधुनिक पद्धतीने कपडे घालून भावी आकांक्षांना घेऊन प्रवेशद्वारातूनच देवळाच्या मूर्तीकडे नजर भिडवून गाभाऱ्यात प्रविष्ट होत होत्या. असंख्य पुरुष फक्त लुंगी घालून दंडांना व कपाळाला भस्माच्या त्रिरेषा उमटवून गळ्यातील जानवे फिरवीत स्तोत्रमंत्राचा घोष करीत इतस्ततः फिरत होते. स्त्री-पुरुषांचे अनेक गट क्रमाक्रमाने प्रत्येक छोट्या छोट्या देवालयात जावयाचे, समोर उभे राहून प्रार्थना करायचे, व समूहाने प्रदक्षिणा घालून...ब्राह्मणांच्या मार्गदर्शनाखाली विधी उरकून घेत होते.

त्या भव्य मंदिरात इकडून तिकडून मी पाहात पाहात जवळ जवळ दोन तास फिरलो. परंतु मनाचे समाधान झाले नव्हते. मंदिरात कोठे काय आहे, लोक कोणत्या क्रमाने दर्शन घेतात, कोठे काय काय विधी करतात हे जाणून घेण्याची उत्सुकता होती. थोडा विचार केल्यावर मी मुख्य द्वाराजवळ जाऊन उभा राहिलो. काही मिनिटांनी तरुणांचा एक गट एका प्रौढ ब्राह्मणासह आत शिरला.

पाळीपाळीने ते लोक सर्व छोट्या मोठ्या देवालयांसमोर गेले. उभे राहिले. स्तोत्र इत्यादी तामीळमध्ये गाऊ लागले. आपल्याकडे जसे भजनमंडळींनी एक भजन सुरू केले की सर्व लोक शक्य तेवढ्या मोठ्या आवाजाने, उंच स्वराने गाण्याचा प्रयत्न करतात व घामाघुम होतात, तोच प्रकार येथे पाहण्यास मिळाला. प्रत्येक देवळासमोर कमीत कमी पाच पाच मिनिटे उभे राहून ते शक्य तेवढ्या मोठ्या स्वराने श्लोक म्हणत होते. हेल काढून गात होते. राम, कृष्ण, विष्णु, महादेव, गणपति, गौरी, लक्ष्मी, सरस्वती, दुर्गा, अंबा इत्यादी अनेक तथा प्रामुख्याने नवग्रहांचे देऊळ अशा सर्व ठिकाणी त्यांनी स्तुतिसुमने वाहिली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावरून व गळ्या-खांद्यावरून घाम वाहात होता. गात असता गळ्यावर नसा फुगून स्पष्ट दिसायच्या. त्यांचे हे श्रम, पाठान्तर व भक्ती पाहून मला आदर निर्माण झाला. खरोखरच या भागातील लोक अनेकदृष्ट्या सुसंस्कृत आहेत. त्यांचा उपक्रम संपल्यानंतर मी त्यांच्याशी काही वेळ संभाषण केले.

कॅमेरा पाहून त्यांनी फोटो घ्यावयास सांगितले व मला पाहिजे असलेले काम उरकले. कारण एरवी आत फोटो घेण्याची सक्त मनाई आहे. बाहेरून गोपुराचे फोटो घेतले. शहराच्या मध्यभागी एका व्यापारी पेठेत हे मंदिर असल्याकारणाने चोहोकडील रस्ते गजबजलेले होते. तेथून त्या उंच गोपुरांचे फोटो घेताना थोडा त्रास झाला. एकंदर नऊ उंच गोपुरांतील सर्वोच्च गोपुर ४९० फूट उंच आहे. मंदिरात प्रशस्त मंडप आहे. त्याला १००० खांब आहेत.

● ● ●

९ : पक्षी-तीर्थ आणि पक्षी-संग्रहालय

मदुरा येथे दुसरे प्रमुख आकर्षण म्हणजे 'गांधी-भवन.' महात्माजींच्या जीवनावर आधारलेली छायाचित्रे.... स्वातंत्र्य चळवळी.... त्यांची दिनचर्या.... आश्रमी जीवन... देशाच्या कोपऱ्या कोपऱ्यातील दीन-दुःखितांशी त्यांचा सहवास, इत्यादी प्रसंगांवर आधारित हे संग्रहालय. त्यांचे पत्रव्यवहार व अनेक श्रेष्ठींचे त्याबद्दलचे आदरयुक्त वक्तव्य हे सर्व येथे हुबेहूब रेखाटलेले आहे. तासन् तास मी त्या छायाचित्रांकडे पाहात राहिलो, व ज्या सर्वांनी स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला त्यांना निरखून आदरांजली वाहिली.

राजाचा महाल पूर्वी फार सुंदर असावा असे वाटते. सध्या तेथे पुण्याच्या धान्यवाटपाच्या वेगवेगळ्या कचेऱ्यांसारख्या अनेक कचेऱ्या आहेत. या महालाविषयी राजाराणींच्या कथा फारच रम्य आहेत. शहरात एक तलाव आहे. पुण्याच्या सारसबागेच्या जागेसारखे व अहमदाबादच्या 'काकरीया'ची आठवण करून देणारे. मला येथील चर्चची इमारत फार आवडली. सुंदर आकार व आकर्षक रंग डोळयांत भरतात.

मदुरा ते त्रिचनापल्ली ८२ मैलांचे अंतर मी दोन तास १० मिनिटांत कापले. रस्ता एकदम निर्विघ्न होता. सकाळच्या मंद वाऱ्यात प्रवासाची फार मजा आली. त्रिची या स्वच्छ, सुंदर, व भव्य रेल्वे स्टेशनमध्ये प्रवेश केला. अनेक दिवसांपासून रेल्वे स्टेशन पाहिले नव्हते म्हणून उगाचच प्लॅटफॉर्मवर चकरा मारल्या. तेवढाच 'चेंज' म्हणून! येथे 'हाय प्रेशर बॉइलर प्लँट' असून विशाल रेल्वे वर्कशॉप आहे. गावाच्या एका टोकाला छोटा डोंगर

व त्यावर किल्ला आहे. वर जात असता दौलताबादच्या किल्ल्याची आठवण झाली. अनोळखी माणूस अंधारात दोनचारदा सहज भिंतीला आदळेल अशी मार्गरचना आहे. आधी ' गौरी 'चे भव्य मंदिर असून वरती महादेवाचे मंदिर आहे. शिवलिंग ४॥ इंच आहे. येथे रोज पंचामृताच्या घागरीने अभिषेक होतो. भाविक लोक खास कावेरीचे पाणी भरून आणतात, व घाम पुशीत त्या घागरीने शिवलिंगास स्नान घालतात. पुण्याच्या पर्वतीला आहेत तशा खिडक्या येथे असून येथून शहराचे चांगले दर्शन घडले. असाच किल्ला जोधपूरलादेखील आहे. हरंतु तो याहून विशाल, सुंदर व भव्य आहे. त्रिचीच्या किल्ल्यात राजाची १५ फूट उंच आणि डोंगर कातून कोरलेली मूर्ती आहे. पेशव्यांप्रमाणे मांडी घालून बसला आहे असा देखावा आहे.

येथून पाच मैलांवर आलेले श्रीरंगम् उल्लेखनीय आहे. वाटेत जांबुळेश्वरचे देऊळ आहे. श्रीरंगमचें अनंतशयनमचे मंदिर म्हणजे ' कोर्ट 'च आहे. त्यातच सर्व आवश्यक वस्तू मिळतील असा बाजार आहे. देवाच्या दर्शनाच्या वेळा ठरलेल्या आहेत. दीड वाजता दर्शन होणार होते म्हणून तासभर रांगेत उभे राहावे लागले. तिकिटाची बारी सुरू झाली व पिंजऱ्यातल्या कॅशियरने २५ पैशांचे तिकिट दिले. ज्याला हार इत्यादी वस्तूंसह पूजा करावयाची असेल त्यास सव्वा रुपयाचे तिकिट होते. द्वारपालाने तिकिट फाडले व मी प्रविष्ट झालो. मंदिराच्या गाभाऱ्यात मात्र पढंरपूरसारखी ओढाताण व आरडाओरड नव्हती. इथे व्यवहार शान्त, सौम्य व चोख होता. दर्शन घेतल्यावर फारच प्रसन्न झालो. पुजारी सर्व समजून सांगावयाचा. मूर्तीच्या मुकुटातील खरे हिरे तुपाच्या छोट्या दिव्यांच्या प्रकाशात लखलख, लखलख व्हायचे, व आपल्यातील लाल, हिरव्या, निळ्या, पिवळ्या रंगांच्या छटांनी भक्तांना प्रसन्न करायचे.

येथे एक तास ताटकळत उभा असता करमणूक म्हणून तेथील ब्राह्मणाचे व पुजाऱ्यांचे निरीक्षण केले. कोणास ठाऊक का पण येथील सर्वच्या सर्व लोक एकजात लंगडत लंगडत चालायचे. प्रत्येकाची कमर जणू काही वातविकाराने लचकली होती. एकंदर त्यांच्या देहयष्टीवरून ' वाता 'ने त्यांच्यावर ' मात ' केलेली स्पष्ट होत होती. मला हसत असताना पाहून एकास काय प्रेरणा झाली कुणास ठाऊक, तोही ' नॉर्मन विस्डम ' छाप हसू लागला.

श्रीरंगहून तंजावर ३८ मैलांवर आहे. हमखास पाहण्याजोगे असे हे स्थळ आहे. येथील बृहदीश्वर महादेवाचे देऊळ ११ व्या शतकातील असून २७० फूट उंच आहे. १३॥ फूट उंच शिवलिंग, नटराज मूर्ती, व नृत्यस्पर्धांचा मंडप, ध्यानस्थ सरस्वती, नर्तक गणेश, गौरी, महादेव इत्यादी आकर्षक मूर्ती, सावली-वरून वेळ व दिनांक ओळखता येईल. अशी गोपुराची रचना, १२ फूट उंचीचा नंदी, अति वेगाने पळत असलेल्या अश्वावरून पडत असलेला स्वार, मदमस्त हत्तींची दौड व सोंडेने माणसाला उचलणे इत्यादी शिल्प— हे सर्व येथील प्रमुख आकर्षण आहे.

येथील सेंट्रल लायब्ररीमध्ये १२००० ग्रंथ आहेत, व सरस्वती महालमध्ये प्राचीन वृक्षपर्णांवरील हस्तलिखिते, छत्रपती संभाजीनंतरचे सरफोजी इत्यादींची भिंतीवरील भव्य चित्रे, सरस्वतीची मूर्ती व वस्तुसंग्रहालये ही वैशिष्ट्ये आहेत. नव्वद फूट लांबीचे ‘ व्हेल ’ माशाचे अस्थिपंजर, १० फुटांहून अधिक लांब २४ फासळ्या, १ फुटाहून अधिक व्यास असलेले गोल अस्थिमणी अद्भुत आहेत.

देवदेवतांच्या ब्राँझमधील नाजुक मूर्ती म्हणजे सौन्दर्यसंपन्न आश्चर्यच आहे. कोणत्याही सुंदर स्त्रीचे गर्वहरण करावयाचे असल्यास तिला येथील ब्राँझच्या मूर्ती दाखवा. चर्चेला अवकाशच राहणार नाही, इतकी शालीनता व सौन्दर्य या निर्जीव मूर्तीमध्ये कलाकाराने भरले आहे. ‘ असल ’ शिवाय ‘ नकल ’ येऊ शकत नाही, याचा विचार केल्यास लक्षात येईल की, त्या काळी देहाच्या सौन्दर्याची किती जोपासना होत असावी. एकाहून एक सुंदर अशा अनेक मूर्ती येथे आहेत. तासन् तास तिष्ठत उभे राहा, व डोळे भरून पाहा. एक सेकंदही थकल्यासारखे वाटणार नाही. इतके आकर्षण त्या लहान नाजुक मूर्तीमध्ये ओथंबलेले आहे.

कुंभकोणम् येथील कृष्णमंदिराच्या गोपुरावर कोरलेले गोपीकृष्णाचे क्रीडेचे प्रसंग म्हणजे “ हा काय प्रकार ” असे वदवायला लावणारे आहेत. सबंध दक्षिण भारतात अशा शिल्पकृतींचे गोपुर इतरत्र कोठेही पाहावयास मिळत नाही.

चिदंबरमचे नटराज-मंदिर

चिदंबरम येथील नटराज (महादेव) मंदिराचे आवार पुण्यातील शनिवारवाड्याच्या निदान सहा पटीने तरी विशाल असेल. त्याच आवारात येथील टिळक तलावाची आटवण करून देईल, एवढा मोठा तलाव आहे व चोहोकडून खाली उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. मध्यभागी मुख्य देऊळ आहे. त्यात अनेक खांब विविध नक्षीकामाचे दर्शन घडवितात. मंदिराचे शिखर सोन्याच्या पत्र्यांनी मढविलेले आहे, तसेच छतही. त्यामुळे या मंदिराला काही वेगळीच शोभा आली आहे. उन्हात सोनेरी शिखर व कळस जेव्हा चमकतात तेव्हा त्यावरील सुन्दर घाट प्रामुख्याने डोळ्यात भरतो. या मंदिराच्या आवारात मोठमोठ्या दगडी शिळा इतस्ततः पडल्या आहेत. त्याच जागेत जर सुंदर बाग करावयाची म्हटली तर पंपिंग स्टेशन बांधून शेजारील तलावाचा उपयोग करून कारंजांनी सुशोभित अशी मनोहर बाग सहज करता येईल. शनिवारवाड्याप्रमाणे उंच भिंत असल्यामुळे येथून बागेचे विहंगमावलोकन केल्याचाही आनंद मिळेल. मी थोडा वेळ येथून तेथून फिरून कोठे काय करता येईल, ही बाग जास्तीत जास्त आकर्षक कशी होईल, याची स्वप्ने रंगवू लागलो. अशा प्रकारची सूचना तेथील ट्रस्टींना पत्राने करावी असा विचार केला.

चिदंबरम येथील प्रसिद्ध व प्रशस्त अन्नमलाई विद्यापीठ पाहून मी पाँडिचेरीकडे निघालो. वाटेत रहदारी इतर भागापेक्षा जास्त दिसली. दोन्ही बाजूंना वनराईमुळे छोट्या अरण्यातून पार होत असल्यासारखे मला वाटले. रस्ता चांगला असल्यामुळे प्रवासाला त्रास झाला नाही. प्रामुख्याने सांगायचे म्हणजे येथील ग्रामीण भागातील लोकांनादेखील रहदारीचे ज्ञान इतर प्रान्तांपेक्षा जास्त आहे, असे लक्षात आल्याशिवाय राहात नाही. पादचारी असो, सायकलस्वार असो, वा बैलगाडीवाला असो, गाडीचा हॉर्न ऐकल्याबरोबर रहदारीच्या नियमानुसार चटदिशी डाव्या बाजूला होऊन गाडीला पुढे जाण्याची त्यास सोय करून देतो. त्यामुळे निश्चिंतपणे गाडी चालविता येते, व उगाच काळजीने मानसिक त्रास होत नाही. ज्याने लांबचा प्रवास केला असेल त्याला अनुभव असेल. अनेक भागांत असे प्रत्ययास येते की, पुढून जाणारी बैलगाडी हॉर्न ऐकून कोणत्या बाजूला केव्हा जाईल याचा अंदाजच लागू शकत


नाही. त्यामुळे जोपर्यंत तिला चुकवून पुढे होत नाही तोपर्यंत ड्रायव्हर काळजीने ग्रस्त असतो.

मद्रास राज्यात प्रमुख वळणाला व घाट विभागात (निलिगिरी) तर अर्ध्याएक फर्लांगावर माइल स्टोन्स (मैलांचे दगड) आहेत. तथापि छोट्या छोट्या वस्तीत त्वरित लक्ष जाईल, अशा रीतीने पाट्या लावल्या आहेत व आवश्यक तेथे सर्व रहदारीची चिन्हे दर्शविणाऱ्या पाट्या आहेत. सुंदर बिनधोक रस्ते दक्षिण भारतात पाहण्यास मिळतात, व त्यातही मद्रास राज्यात काही विशेष आहे. मदुरेच्या 'दिनमणी' या तामीळ वर्तमानपत्राच्या बातमीदाराला मुलाखत देत असता मी म्हणालो होतो की, मद्रासमध्ये रहदारीची सोय चांगली आहे. त्याचप्रमाणे इतर राज्यांतील म्हणजे महाराष्ट्र, म्हैसूर, केरळ इत्यादींची वैशिष्ट्ये, प्रशंसनीय बाजूंचा उल्लेख केला होता. परंतु या बातमीदाराने इतर राज्यांबद्दल चांगले बोललो ते लिहिले नाही. तथापि तुलना मी केलेली नसताना असे प्रसिद्ध केले, 'अखिल भारतीय प्रवासासाठी पुण्याहून निघालेले श्री. अशोककुमार नुकतेच म्हैसूर व केरळ राज्यातून प्रवास करून आले. त्यांनी प्रतिपादन केले की, मद्रास राज्याचे रस्ते त्याच्या दोन्ही शेजारील राज्यांपेक्षा उत्कृष्ट आहेत.'

त्या बातमीदाराचा हा शिष्टपणा मला मुळीच आवडला नाही. म्हैसूरच्या प्रेमळ व नम्र लोकांबद्दल त्याने एखादे वाक्य टाकले असते तर काय बिघडले असते? महाराष्ट्रात माझ्यासारखे असंख्य होतकरू तरुण आहेत असे प्रसिद्ध केले असते तर काय बिघडले असते?

ले. गव्हर्नर सीलम यांचा पाहुणचार


पुण्याहून निघण्याच्या दोन दिवसांपूर्वी मी पाँडिचेरीचे लेफ्ट. गव्हर्नर श्री. सीलम यांना सर्किट हाउसवर भेटलो होतो. त्या वेळेस त्यांनी परिचय नसतानादेखील माझ्या प्रवासाबद्दल फारच आपुलकीने विचारपूस करून चर्चा केली होती. मी पाँडिचेरीला येऊन त्यांच्याकडे वास्तव्य करावे, तसा त्यांनी आग्रहसुद्धा केला होता. ते म्हणाले होते, "पाँडिचेरीला आलात की सरळ राजभवनमध्ये या." प्रसंगाची आठवण झाली व मी मनाने तेव्हाच पाँडिचेरीला पोहोचलो. परंतु प्रत्यक्षात त्या शहरात प्रविष्ट झाल्यावर मी 'टूरिस्ट बंगला'मध्ये उतरलो व नंतर त्यांना भेटावयास गेलो.



मदुरा येथील मीनाक्षी मंदिराचे गोपूर

बहुरंगांनी रंगविलेले असे हे शिल्प मंदिराचे प्रवेशद्वारावरील गोपूरावर आहे. चारही दिशांना चार प्रवेशद्वार असून असे गोपूर आहेत. पुराणांतील विविध प्रसंग येथे गुंफले आहेत.


-- फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण.



महाबलीपूरम येथील प्राचीन लेणी

पांडव अज्ञातवासात असताना येथे त्यांनी लेणी तयार केली होती. खाली लेणी असून वर देऊळ आहे. येथून समुद्र २०० फुटांवर असून किनारा अति उत्कृष्ट आहे. मद्रासहून अनेक लोक येथे सहलीला नित्य-नियमित येत असतात.


फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण.



महाबलीपूरम् येथील पांडव-रथ

येथे पांडव राहिले असताना त्यांनी पाच देऊळे तयार केली. त्यांना रथाचा आकार दिला असून आत महादेव, विष्णु इत्यादींच्या मूर्ति आहेत.

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण.



वराह-नरसिंह मंदिर (सिंहाचलम्)

पूर्वघाटातील सिंहाचलम् या डोंगर-माथ्यावर हे देऊळ असून येथे अति उत्कृष्ट शिल्पाने विविध पुराणकथांना समाविष्ट केले आहे. लहान परंतु सुरेख व सुडौल मूर्ति पहाण्यात माणूस मग्न होतो. आतील शिवलिंगावर बारा महिने चंदनाचा लेप असतो. फक्त महाशिवरात्रीला खऱ्या लिंगाचे दर्शन घडते.

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण.

पाँडिचेरीला मी दोन दिवस होतो. प्रत्यक्ष गव्हर्नरांनी माझ्याशी दोन दोन तास चर्चा केल्यावर इतर सेवकवर्ग मी आलो-गेलो की मागेपुढे होऊ लागले. माझ्या प्रवासात मी अनेक थोरामोठ्यांना भेटलो. परंतु श्री. सीलम यांच्या अंगी असलेली आपुलकी मला इतरत्र क्वचितच पाहावयास मिळाली. घरातील एका वडील माणसाने करावी तशी त्यांनी विचारपूस केली, माझ्याशी चर्चा केली. पुढे कोठे कोठे जाणार, याचा अंदाज घेतला. आपण पाहिलेल्या प्रदेशांची माहिती दिली. तथापि दार्जिलिंग वगैरे भागात काही विशिष्ट स्थळे पाहण्याचा सल्ला दिला. गौरव करून ते म्हणाले, " मोटरसायकलीवर तुम्ही एकटे प्रवास करता हे मोठे जोखमीचे व साहसाचे आहे. संरक्षणासाठी काही घेतले आहे का? " नकारात्मक उत्तर देऊन मी म्हणालो, " वेळच वाईट येणार असली तर कशीही येईल. " त्यावर त्यांनी स्मित केले.

पाँडिचेरीमध्ये मी अरविंद आश्रमास भेट दिली. माताजींचे दर्शन घेतले. आश्रमामधील वाचनालय पाहून नवल वाटले व आपणास असे काहीच पाहावयास वा उपभोगावयास मिळाले नाही, याबद्दल खेद वाटला. अशा सर्व सोयींनी उपयुक्त संस्थेत शिक्षणाचा योग लाभायला नशीब पाहिजे. तेथील विद्यार्थ्यांना पाहिल्यावर वाटेल,– अशी संस्था आपल्या पुण्यात असली व अशा सुखसोयी तेथील विद्यार्थ्यांना लाभल्या तर ती संस्था निश्चित विश्वविख्यात होईल. पुण्यात जन्म झाला व तेथे माझे शिक्षण झाले, याबद्दल मी नेहमीच अभिमान बाळगत आलो आहे. माझ्या शाळेतील व पुण्याच्या इतर प्रसिद्ध शाळांमधील शिक्षक-वर्गाशी मी येथील शिक्षकांची तुलना केली. अल्प वेतनात आपल्याकडील शिक्षक किती श्रम घेऊन संस्थेच्या विद्यार्थ्यांना तयार करतात व संस्थेचा गौरव वाढवितात !

स्वयंपूर्ण अरविंद आश्रम

अरविंद आश्रमाची स्थावर जंगम मिळकत आहे. स्वतःची शेती आहे. त्याचे उत्पन्न विद्यार्थी, शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त होते. भाजीपाला, फळफळावळ– सर्व काही त्यांच्याच बागांतून निर्माण होते. संस्थेचा वेगळा कारखाना आहे. त्यात आवश्यक ते सर्व फर्निचर तयार होते. ते विक्रीसाठीही

तयार करतात. संस्थेची एक पेपर-मिल– कागद तयार करण्याचा कारखाना आहे. एक विशाल धोबी घाट असून सर्व कपडे धुण्याची व्यवस्था आहे व इस्त्रीचाही विभाग आहे. विद्यार्थी व शिक्षकांना कपडे, चादरी, उशीचे अभ्रे इत्यादी सर्व काही धुऊन इस्त्री करून मिळते. एक विशाल क्रीडांगण, पोहण्याचा तलाव, पाहुण्यांना राहण्यासाठी उत्तम निवासस्थान वगैरे अनेक सुखसोयी आहेत. विद्यार्थी व शिक्षकांनी अवश्य पाहावी अशी ही शैक्षणिक संस्था आहे. प्रवेशासाठी मुलांचे फोटो माताजींच्यासमोर ठेवण्यात येतात व त्या एक एक पाहून त्याचा विचार करतात. त्यांनी नकार दिल्यावर इतर कोणत्याही योग्यतेचा विचार करण्यात येत नाही, हे विशेष.

राजभवनमध्ये मी गव्हर्नरांशी बोलत असता तेथे मुख्यमंत्री आले व माझ्यामुळे त्यांना थोडा वेळ बाहेर बसून राहावे लागले. तथापि मी सुटाबुटात होतो. त्यामुळे मुख्यमंत्र्यांवर प्रभाव पडला. म्हणून माझ्याशी त्यांनीही नंतरच्या भेटीत चर्चा केली. गव्हर्नर व मुख्यमंत्री दोघांनी मला प्रशस्तिपत्रे दिली. निघण्यापूर्वी गव्हर्नरांनी सांगितल्याप्रमाणे मी भेटावयास गेलो, तेव्हा त्यांनी त्यांच्या सेक्रेटरीला सांगितले, " हे आता उन्हाचा प्रवास करणार आहेत. तेव्हां त्यांना काही उत्तम शीतपेय द्या. " मला उद्देशून म्हणाले, " तुम्हांला इतर कोणत्याही मदतीची अपेक्षा असेल, तर विनासंकोच सांगा. " मी उत्तरलो, " आपले अंत:करणापासूनचे आशीर्वाद लाभले म्हणजे माझ्या प्रवासात मला सुयश लाभेल, अशी खात्री आहे. " त्यांनी हसतमुखाने आशीर्वाद दिले व शुभेच्छा व्यक्त केली.

पॉंडिचेरी ते महाबलीपुरमच्या प्रवासात अनेक वेळा पंडित ओंकारनाथ ठाकूर यांची आठवण झाली. पॉंडीला मी त्यांच्या दुःखद निधनाची वार्ता वाचली होती. अनेक वेळा त्या थोर संगीततज्ज्ञास भरलेल्या अंत:करणाने मी श्रद्धांजली वाहिली. सुरतेला मी अनेक वेळा त्यांच्या घरासमोर ओट्यावर बसलेले पाहिले होते. मी एका कोपऱ्यात उभा राहून पुष्कळ वेळपर्यंत त्यांच्या प्रभावी चेहऱ्याकडे टक लावून पाहात असे. त्या थोर कलावंताला मनोमन शतशः प्रणाम केले होते. परंतु मला गायनाचे बाळकडू कधीच लाभले नसल्यामुळे त्यांच्यासमोर जाऊन उभे राहण्याचे नैतिक धैर्य माझ्यात नव्हते.

वेदांथंगलचे पक्षी-संग्रहालय

वेदांथंगल मद्रासहून ५३ मैलांवर आहे. भारतातील दोन विख्यात 'पक्षी-संग्रहालयां'पैकी हे एक स्थळ. दुसरे भरतपूर येथील घाना येथे आहे. वेदांथंगलला पावसाळा संपल्यावर हजारोंच्या संख्येने शहामृग, बगळे इत्यादी जलवासी पक्षी एकत्रित होतात, व तलावाच्या काठी असलेल्या वृक्षांवर संततिपालन करतात. येथे कधी न पाहिलेले असे पक्षी व त्यांची अंडीदेखील पाहावयास मिळतात. क्वचित पक्ष्यांची संख्या इतकी वाढते की, वृक्षावरील पाने दिसणेही अक्षरशः दुरापास्त होते. दुपारी ३ ते ६ दिनचर व निशाचर पक्ष्यांची ये-जा चालू असताना माणूस थक्क होतो. पक्ष्यांचे लांबून निरीक्षण करण्यासाठी दुर्बीण आवश्यक वाटली. असंख्य पक्षी पाहून मी आश्चर्यचकित झालो. नंतर समजले की, त्या वेळेस तर पक्ष्यांची संख्या फार कमी झाली होती. मग संख्या पूर्ण असल्यावर काय दृश्य असेल?

तिरुकलीकुन्द्रम स्टेशनजवळील पक्षितीर्थ पर्वतीसारखे आहे. वरती चढायला मोठ्या पायऱ्या आहेत व डोंगरावर महादेवाचे मंदिर आहे. प्रवेशद्वारावर गणपतीच्या मांडीवर विराजमान सरस्वतीची आकर्षक मूर्ती आहे. हा संगम मला येथे प्रथमच पाहण्यास मिळाला. येथे दुपारी १२ वाजता दोन पांढरे पक्षी भिन्न दिशांकडून येतात व ब्राह्मणाने दिलेला आहार घेऊन जातात. हे शंकर व पार्वती आहेत, अशी लोकांची श्रद्धा आहे. अनेक भाविक लोक येथे त्यांचे दर्शन घेण्यास येतात. डोंगरांवरून गावातील विशाल मंदिरे व त्यातील तलाव यामुळे गाव पाहण्याजोगा वाटतो. प्रचंड वेगाने वाहणारा वारा विसरणे शक्य नाही.

पक्षितीर्थपासून दहा मैलांवर व मद्रासपासून ५३ मैलांवर महाबलीपुरम समुद्रकाठी आहे. सप्तदेवालय या नावानेदेखील हे प्रसिद्ध आहे. प्राचीन शिल्प व लेणी या ठिकाणी उपलब्ध आहेत. "अर्जुनाचे तप, महिषासुर मंडप, महादेवाचे मंदिर व शिवलिंग, रथाच्या आकारातील पाच देवळे ही या स्थळांची वैशिष्ट्ये आहेत. सुंदर समुद्राकडे पाहिल्यावर मन प्रसन्न होते, व आकर्षक निळसर पाण्याकडे पाहिले की उडी मारून पोहावे असे वाटते. येथे उतारूंसाठी खास राहण्याची व जेवणाची सोय सरकारच्या पर्यटन खात्यातर्फे करण्यात

आली आहे, तथापि इतर खाजगी उपाहारगृहेदेखील आहेत. लोणावळा व खंडाळयाप्रमाणे येथेही मद्रासहून नित्य अनेक पर्यटक येतात, व या निसर्गरम्य वातावरणात आनंदोत्सव करतात.

मद्रासच्या परिसरातील विशेष उल्लेखनीय अशा या महाबलीपुरमला मी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास पोहोचलो. गाडीचा दिवा मुळीच लागत नव्हता. म्हणून येथपर्यंत येताना शेवटच्या प्रवासात फार त्रास झाला. वाटेत कोठे थांबण्याची व्यवस्था नव्हती. जेमतेम अल्प प्रकाशात मी येथील डाक बंगल्यापर्यंत आलो. डाक बंगल्यातील एक खण एका जर्मन शेतीतंत्रज्ञाने ताब्यात घेतला होता व दुसरा पर्यटनमंत्री श्री. करणसिंग यांनी रिझर्व्ह केला होता. म्हणून चौकीदाराने मला नकार दिला. " मंत्र्याला भेटण्याची ही चांगली संधी चालून आली होती, म्हणून मी मुद्दाम तेथे थांबण्याचा निश्चय केला.

चौकीदार काही केल्या तेथे थांबू देईना. सुदैवाने तेथे एक तरुण ' एजंट ' भेटला. येणाऱ्या प्रवाशांची थोडी कामे करून बक्षीस मिळविण्याचा त्याचा व्यवसाय होता. ' आमिष ' दाखविल्यावर त्याने वकिली सुरू केली, व अखेर चौकीदाराने रात्री बारानंतर मंत्री न आले तर ताबा देण्याची तयारी दर्शविली. करणसिंग आलेच तर त्यांना माझ्याबद्दल सहानुभूती वाटेल याची खात्री होती.

मी व्हरांड्यात बसलो होतो तो तेथे एक ' पक्क्या ' रंगातला लुंगीधारी आला व म्हणाला, " आय हिअर कुक फॉर ऑल सर. एम आय कुक यू ? हं.... हां सर, एम आय कुक यू ! " मी त्याच्याकडे पाहिले. त्याच्या देहाकडे पाहून तो ' खरा आचारी ' असावा याबद्दल शंका राहिली नाही. " एम आय कुक यू ? यू टेस्ट राइस, एम आय कुक राइस ? यू टेस्ट भजी. एम आय कुक भजी ? यू टेस्ट चपाती. एम आय कुक चपाती ? " त्याच्या या एम आय... एम आय एम आय....चा भडिमार एकसारखा चालू होता. " मे आय "चे तो " एम आय " करीत होता. ' मूकं करोति वाचालं....' इतके सामर्थ्य त्याच्या त्या चिकट वाणीत होते. ' एम आय कुक यू वुइथ दाल फॉर राइस ! " हे ऐकल्यावर मात्र मला उत्तर देणे अपरिहार्य होते.

प्रत्यक्ष जेवायला बसल्यावर फार पश्चात्ताप झाला. त्याने खुशाल शिळ्या पोळ्या व भाजी वाढली की ताटात ! पण इलाज नव्हता. त्याला दोन शब्द सुनवून गरम भात करण्यास सांगितले व पोटाची खळगी भरली.

शेजारील जर्मन तज्ज्ञाशी मांसाहार, मद्यपान इत्यादी काही हिंदूंमध्ये वर्ज्य का, यावर फार चर्चा झाली. अडीच तासांनंतर तो म्हणाला, " मी आजपर्यंत पुष्कळांशी या गोष्टीवर चर्चा केली, पण तुमचा दृष्टिकोण मला कुठेच दिसला नाही. आज मला खात्री पटली,– प्रत्येकाच्या धर्मातील नियम हे श्रेष्ठ असतात." रात्री श्री. करणसिंग आले नाहीत. मी त्या भव्य जागेचा तात्पुरता मालिक झालो. भाडे भरले फक्त ००.८५ रुपये.

कांचीपुरम येथील देवालये फार प्रशंसनीय आहेत. शिव व विष्णूचे कैलासनाथ व वैकुंठनाथ पेरुमल मंदिर ही पल्लव वंशाच्या राजांनी बांधलेली आहेत. येथून दोन मैलांवरील वरदराजस्वामींचे मंदिर व त्यातील कल्याण मंडप अति सुंदर आहे. कल्याण मंडपमधील खांबांवरील बारीक कोरीवकाम प्रेक्षणीय आहे. सातव्या शतकात ' ह्यूएन त्संग ' नावाचा प्रसिद्ध चिनी प्रवासी आला होता व त्याने याबद्दल पुष्कळ लिहिले आहे. या स्थळाला ' दक्षिण काशी ' म्हणून मानतात व अनेक भाविक यात्रेला येतात.

शेवटचा ४७ मैल प्रवास करून मी मद्रासला पोहोचणार होतो. रस्ता अतिशय उत्कृष्ट होता. त्यामुळे गाडी भर वेगाने चालविण्याचा आनंद मिळवू शकलो. दोन दोन ट्रक्स एका वेळेला दोन्ही दिशेने आल्या व एका रेषेत मिळाल्या तरी मला मधून मोटार सायकलीवरने जाता यावे इतका रुंद हा रस्ता आहे. भर उन्हाचा एक वाजता मी मद्रास शहरात प्रविष्ट झालो.

● ● ●

१० : तिरुपतीच्या बालाजी मंदिरात

मद्रासचा प्रसिद्ध मरीना बीच

ऊन मी म्हणत असताना मी मद्रास शहरात प्रवेश केला. सुदैवाने त्या दिवशी शहराचे वातावरण शान्त होते ! तामिळ भाषिकांची विश्व-परिषद चालू असल्यामुळे असे घडले असावे. मद्रास-भेट सार्थ होईल असे वाटले. एका पेट्रोल पंपावर थांबलो असताना काही कॉलेज विद्यार्थी तेथे आले व चर्चा करू लागले. मी सुरुवातीला हिंदी बोलू लागलो. ओघाने व त्यांतील दोघांतिघांनी हिंदीमध्ये उत्तरे दिली. परंतु नंतर लक्षात आल्यावर ती इंग्लिशमध्ये बोलू लागली.

मी हसतमुख होतो, तेव्हा त्यांनीदेखील खिलाडू वृत्तीने संभाषणे केली. "उत्तरेस सर्व लोक हिंदी शुद्ध बोलत नाहीत तरीही ते हिंदीचा पुरस्कार करतात. तुम्ही त्यांच्याकडे गेलात तर ते तुम्हांला शुद्ध हिंदी कसे शिकवू शकतील ?" असे मी म्हटल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. नंतर मी एकाला त्याचे नाव विचारले. तो म्हणाला, "यल्ल यम्म यन्न राव...... (L. M. N. Rao)." मी त्यांना म्हणालो, "मी स्वतःला भाग्यशाली समजतो. कारण मला महाराष्ट्रात हिंदी व इंग्लिश दोन्ही भाषांचे चांगले शिक्षण मिळाले. त्यामुळे या बाबतीत महाराष्ट्र कोणत्याही परिस्थितीला तोंड देऊ शकेल."– त्यांनीही प्रामाणिकपणे कौतुक केले व हिंदीचे शिक्षण नसल्यामुळे खेद व्यक्त केला.

मद्रास शहरात अनेक हॉटेल्समध्ये गेलो. पण कोठेच खोली मिळाली नाही. परिषदेस लांबून लोक एकत्रित आले होते. म्हणून मी नाइलाजाने एका मित्राकडे गेलो. कोणत्याही मोठ्या शहरात गेलो की माझी प्रथम जिज्ञासा जनरल पोस्टाला भेट देण्याची असायची. मी माझी पत्रे जनरल पोस्टमास्तर यांच्या पत्त्यावर मागवायचो; व माझ्याजवळील 'पोस्टाचे आयडेंटिटी' कार्ड दाखवून ती मिळवायचो.

कोणत्याही प्रकारचे लांबच्या पल्ल्याचे कार्य हाती घेतले की त्याच्या यशाचा मानकरी एकटा कोणीच नसतो. इतरांचाही त्यात वाटा असतो. हा अनुभव मलादेखील माझ्या प्रवासात आला. मी निघण्यापूर्वी माझ्या व्यवसायाचे सर्व अधिकार माझे परम मित्र श्री. सुरेशचंद्र सुरतवाला यांच्याकडे सोपवून गेलो होतो. त्यांनी माझा सर्व व्यवहार अत्यंत काळजीपूर्वक व निष्ठेने पाहिला. सुरेशनी थोडे दुर्लक्ष केले असते तर मला कोणत्याही क्षणी माझा प्रवास सोडून पुण्याकडे धाव घ्यावी लागली असती. सोलापूर, बेंगलोर, कोचीन, त्रिवेन्द्रम, मदुरा व मद्रास या सर्व शहरांत मला त्यांच्याकडून पत्रद्वारा सर्व गोष्टींचा खुलासा झाला, व त्यामुळे मी निश्चितपणे प्रवास करू शकलो.

मद्रास शहरात रस्ते भव्य आहेत. वाहनतंत्र जरा वेगळे आहे. त्यामुळे सुरुवातीला काही पोलिसांचा परिचय झाला. काही वेळा मीदेखील शिष्टपणाने वागलो व लोकांचे माझ्याकडे व गाडीकडे लक्ष जावे याचा प्रयत्न केला. खोडी करण्याच्या माझ्या सवयीचा मी क्वचित करमणुकीसाठी उपयोग करून घेत असे. परंतु 'ऑल इंडिया टूर'ची पाटी वाचून लोक सहानुभूतीने वागत.

मुंबईचे मरिन ड्राइव्हप्रमाणे मद्रासचे 'मरीना' प्रसिद्ध आहे. परंतु मरिन ड्राइव्हसारखा भव्य देखावा इथे पाहावयास मिळत नाही. मरीना बीचवर एक भले मोठे जहाज सदैव उभे असते. चक्री वादळाच्या तडाख्याने हे अगदी काठापर्यंत आले व वाळूत रुतून बसले. अनेक प्रयत्न फसल्यामुळे त्याचा तेथेच लिलाव करण्यात आला. एका श्रीमंत गृहस्थाने ते विकत घेतले व तिकीट ठेवून सामान्य नागरिकास पाहावयास मोकळे ठेवले. सध्या हा एक येथे आकर्षणाचा विषय बनला आहे.

मद्रास हे भारतातले तिसऱ्या क्रमांकाचे शहर. त्यास आठ मैलांचा समृद्ध किनारा असून, उत्तर विभाग व्यापार–उद्योग, व दक्षिण विभाग निवास म्हणून वापरला जातो. दक्षिण मद्रासमधील 'अड्यार' प्रसिद्ध आहे. येथे थिऑसॉफिकल सोसायटी आहे. मी गेलो त्याच दिवशी त्यांची विश्व-परिषद संपली होती म्हणून फार वाईट वाटले. येथे दरवर्षी परिषद भरते, आणि भारतीय व परदेशी पाहुणे येतात. शहरात हिंदूंची अनेक देवळे आहेत. तसेच आशियातील सर्वांत जुने असे सेन्ट मेरीचे चर्च आहे.

मद्रासला असलेली दिवादांडी १६० फूट उंच आहे, व त्यावरून शहराचे दर्शन फार आकर्षक वाटते. तेथील वस्तुसंग्रहालय फार मोठे आहे. ते पाहावयास मला पाच तास लागले. शेजारी आर्ट गॅलरी आहे. त्यातील चित्रकला पाहून डोळ्यांचे पारणे फिटले. अति उत्कृष्ट चित्रांचा– प्रामुख्याने तैलचित्रांचा येथे संग्रह आहे. बाहेर पाऊस पडत नाही. बाहेर पडता पडता मी पुन्हा पुन्हा मागे वळून पाहू लागलो, इतके आकर्षण येथे आहे. येथील लॉ-कॉलेज, उच्च न्यायालय, व हस्तकौशल्यासाठी प्रसिद्ध व्हिक्टोरिया विद्यालय पाहण्याजोगे आहे. या सर्वांवर भूषण म्हणून शोभत असेल तर येथील 'कलाक्षेत्र.' येथे अनेक तरुण-तरुणींना नृत्य–संगीताचे ज्ञान दिले जाते, व येथून अनेक होतकरू कलावंत नाव-लौकिकास पात्र ठरून जातात.

प्रसिद्ध 'हिंदू' वर्तमानपत्राच्या संपादकांनी शुभेच्छांसह माझे वृत्त प्रसिद्ध केले. मदुरेच्या 'दिनमणी'वरचा राग थोडा कमी झाला. अनेक अनुभवांवरून मला व्यक्त करावेसे वाटते की, येथील लोकांचे वागणे इतके विलक्षण आहे की कधी कौतुक व आदर निर्माण होतो तर कधी संतापही येतो.

मद्रास राज्याची सरहद्द ओलांडून मी आंध्र प्रदेशामध्ये प्रविष्ट झालो. नादुरुस्त रस्ता व अनेक नाले यांमुळे मद्रास, म्हैसूरच्या रस्त्यांची आठवण येऊ लागली. वाटेत 'अरुणा' नावाचे भव्य जलाशय व त्यामध्ये पडणारे शेजारील डोंगरांचे प्रतिबिंब पाहून फार आनंद झाला. शेताकडे जरा गेलो, माती ओली व मऊ वाटत होती. पाहताच 'सुपीक' वाटावी अशी जमीन आहे. अनेक तलावांवरून येणाऱ्या गार वाऱ्यांमुळे उन्हाचा परिणाम जाणवला नव्हता. तलावांतील संथ पाणी, शेळ्या-मेंढ्यांचे कळप, गुराखी, नीलवर्णी डोंगर, त्यांचे संथ पाण्यात

पडलेले प्रतिबिंब, अचल ढग– या साऱ्यांमुळे येथील संध्या रमणीय असावी असे वाटले. वाटेतील एका छोट्या गावी नारायण मंदिर पाहिले. जुने शिल्प अल्प प्रमाणात पाहावयास मिळाले. मी पाहिलेले खास 'नारायणा'चे हे पहिलेच मंदिर.

तिरुपतीचे बालाजी मंदिर

रेणीगुंठा जंक्शनहून पुढे तिरुपतीला पोहोचलो. शहरात आधुनिक पद्धतीची उपाहारगृहे पाहिली. गावातील मंदिरे पाहिली, व त्यांवरचे शिल्प प्रशंसनीय वाटले. असली अनेक देवळे पाहिली होती, तरीदेखील हे पाहताच आकर्षण वाटले. इतर ठिकाणी गोपुरामध्ये मूर्ती मोठ्या होत्या. येथे लहान होत्या; व पुराणांतील प्रसंग ठळकपणे लक्षात येतील अशा रीतीने कोरलेले होते.

तिरुपतीचे प्रमुख आकर्षण म्हणजे तिरुमल पर्वतावरील प्रसिद्ध व यात्रिकांचे आवडते 'बालाजी मंदिर'. या तीर्थक्षेत्रावर लोकांची फारच श्रद्धा आहे. त्यामुळे अनेक भाविक येथे येऊन संकल्प करतात व देवापुढे इच्छित वस्तूची मागणी करतात.

अनेक यात्रेकरू पायी हा पर्वत चढतात. आडवाटेने सात मैल चढावे लागते, व रस्त्याने १४ मैल प्रवास करावा लागतो. मी चार पाच मैल गेल्यावर जोराचा पाऊस सुरू झाला व थोड्या अवधीत मी सर्व सामानासह ओलाचिंब झालो. पावसाच्या सरी, एकसारखी हेअर-पिनच्या आकाराची वळणे, व चढ, यांमुळे गाडी चालविणे फार कठीण झाले. रस्ता उत्तम होता म्हणून बरे झाले.

भिजलेल्या अंगाने मी रांगेत जाऊन उभा राहिलो. माझ्यापुढे २०० ते २५० लोक उभे होते. माझ्याजवळील एकाने चष्मा काढून खिशात ठेवण्यास सांगितले. आजपर्यंत अनेक ठिकाणी कॅमेरा, चामडी पट्टा, मोजे इत्यादींना विरोध झाल्याचा अनुभव होता. परंतु चष्म्याची सूचना कोठेच मिळाली नव्हती. म्हणून मी 'चक्' करून उजव्या हाताचा पंजा नर्तकासारखा अर्धगोल फिरविला व तोंड वाकडे करून आश्चर्य व्यक्त केले. तेव्हा त्याने त्याचे कारण सांगून स्पष्टीकरण केले. मी भिंतीवर पाहिले, व अनेक माकडे पाहून आश्चर्यचकित झालो. मथुरेच्या माकडां-बद्दल ऐकले होते. तेथे आमच्या एका स्नेह्याच्या थोबाडीत मारून लाडवांचा डबा

या ' मारुति-सेने 'च्या सभासदांनी पळविल्याचे आठवले. तेवढ्यात एक चमत्कार पाहावयास मिळाला. एक गृहस्थ केळीचा फणा घेऊन उभा होता. थोडे दुर्लक्ष होताच एका माकडाने सर्वच्या सर्व केळी लांबविली व वर जाऊन बसला. त्याने हातवारे केल्यावर समोरून केळीचे साल त्याच्यावर येऊन पडले ! भिंतीवर चढायचा त्या गृहस्थाने प्रयत्न करताच इतर माकडे धावून आली ! !

वाटेत अंधार झाला व रस्ता नादुरुस्त असल्याने प्रवास फार हळू करावा लागला. रात्री नऊ वाजता मी गुडूर येथे पोहोचलो.

डाक बंगल्यात जागा नव्हती. परंतु तेथे उतरलेल्या इजिनीयरांनी मला एक खोली रिकामी करून दिली व आवश्यक वस्तू पुरविल्या. त्यांच्या सह-कार्यामुळे मी रात्री आराम मिळवू शकलो.

निघण्यापूर्वी एका अल्पोपाहार गृहात विद्यार्थ्यांजवळ थोडे तेलगू शिकून घेतले. त्याचा उपयोग गावाच्या हद्दीवरच झाला. गाडी नादुरुस्त झाल्यामुळे काहींचे सहकार्य घ्यावे लागले व थोडे तेलगू आल्याने बरे झाले. गुडूरहून वेलूर, ओंगोडा, गुंटूरहून मी विजयवाड्याला आलो. सकाळी नऊ ते तीन वाजेपर्यंत २५, ७५, ६४, २१ असे एकंदर १८५ मैलांचा प्रवास झाला. वाटेत तीन मोठे पूल पाहावयास मिळाले. काही एकदम पडीक जमीन पाहावयास मिळाली. काही स्थळेही निर्जन होती, तर काही ठिकाणी विविध भाज्या व प्रामुख्याने मिरच्यांची लागवड पाहावयास मिळाली.

ओंगोल येथे एका हॉटेलमध्ये केळीच्या पानावर जेवलो. हॉटेलच्या मालकाने घरातून भांडी आणून देण्याबद्दल विचारले. पण मीच नकार दिला, व सर्वांप्रमाणे जेवण्याचा प्रयत्न केला. अनेकांचे लक्ष माझ्याकडे लागले होते. खाण्याच्या बाबतीत " ससा व कासव " यांच्या शर्यतीसारखे झाले. परंतु माझी व इतरांची करमणूक झाली. आंध्र प्रदेशामध्ये तांदूळ स्वस्त असल्यामुळे आहाराची येथील लोकांना विशेष चिंता नाही. त्यामुळे लोक प्रयत्नशून्य झाले आहेत, असेही काहींनी सांगितले.

गुंटूर शहर चांगले आहे. आकाशवाणीकेन्द्र, पॉलिटेक्निक इत्यादी सोयी असल्यावरून शहराचा अंदाज आला. वेलोरे, गुंटूर व विजयवाडा आंध्रचे प्रमुख

साम्य म्हणजे तिन्ही शहरांत ' लीला-महल ' नावाची चित्रपटगृहे आहेत व ती प्रशंसनीय आहेत. विजयवाड्याजवळील डोंगरातून वळण घेताच मला आश्चर्य वाटले. निर्जन प्रदेशातून, नादुरुस्त रस्त्यावरून व नाल्यातून उन्हाचा प्रवास केल्यानंतर हे वळण संपताच एक अत्यंत आकर्षक दृश्य पाहावयास मिळाले ते म्हणजे विजयवाडा शहरात प्रवेश करण्यापूर्वीचा पूल, सुंदर तलाव, दोन समान्तर पूल, समोर डोंगरामागे निळ्या आभाळात शुभ्र कापसासारखे ढग, उडता उडता पाण्यात चोच बुडविणारे ते खेळकर पक्षी- वगैरे सर्व अत्यंत मनोहर व आल्हाद-दायी वाटले.

तेथे पोहोचताच मी काळजीपूर्वक एक फोटो घेतला. पुलावरून व तलावाच्या काठी एक तास फिरलो, व सृष्टिसौन्दर्याचे दर्शन घेतले. सृष्टी व मनुष्य-जीवनाचा सुंदर संगम येथे झाला आहे. पुलावरून एकसारखी वाहतूक चालू होती. परंतु तलावाचे पाणी, ढग इत्यादी सर्व निश्चल होते. पुण्याच्या बंडगार्डनवरील देखाव्याची आठवण करून देणारे ते दृश्य होते.

विजयवाडा येथील जिल्हा परिषदेच्या आरामगृहात मी प्रवेश मिळविला. तेथे परिषदेच्या अध्यक्षांचे चिरंजीव मला भेटले. त्यांच्याशी चर्चा झाली व पुढे संयुक्त कार्यक्रम घडवून आणण्याची त्यांनी इच्छा व्यक्त केली. आमचे संभाषण चालले असता ' आंध्र- प्रभा ' या दैनिकाचा बातमीदार तेथे आला. त्याने सायकलीवर माझा पाठलाग करून मला गाठले होते. दुसऱ्या दिवशी ' आंध्र-प्रभा ', ' इंडियन एक्स्प्रेस 'मध्ये बातमी प्रसिद्ध झाली.

येथील गौरीशंकर नावाच्या वातानुकूल हॉटेलमध्ये मी रात्रीचे जेवण घ्यावयास गेलो. त्यांच्या पद्धतीने जेवण पसंत नव्हते म्हणून मी मुद्दाम मॅनेजरला सांगून फोडणीचा भात करवून घेतला. मॅनेजरने सहानुभूती दाखवून आचाऱ्यास बोलावून योग्य सूचना दिल्या. ' विशेष व्यक्ती ' म्हणून वागण्याचा व इच्छे-प्रमाणे सोयी उपलब्ध करून घेण्याचा मला छंदच लागला या प्रवासात.

विजयवाडा येथे फिरण्यासाठी पूल व पाहण्यासाठी एक मंदिर आहे. खाण्यासाठी चांगली हॉटेल्स आहेत, व बोलण्यासाठी नम्र व भावनाप्रधान लोक आहेत. येथील लोकांच्या मनोवृत्तीने, सहकार्याने व आपुलकीने मी प्रभावित झालो. त्यांच्याबद्दल माझ्या मनात वेगळेच प्रेम निर्माण झाले.

● ● ●

११ : सिंहाचलमचे सुंदर शिल्प

मच्छराच्या स्कॉड्रनचा हल्ला

विजयवाडा येथे भेटलेल्या काही नम्र व प्रेमळ लोकांमुळे मला येथल्या लोकांबद्दल विशेष प्रेम वाटू लागले. मित्राला पत्र लिहून रात्री साडेबाराला अंथरुणात पडलो, व म्हैसूर, मद्रास, केरळ, आंध्र प्रदेश, व महाराष्ट्राच्या लोकांची तुलना करू लागलो. सर्वांमध्ये थोडाफार फरक आहे. जेवणखाण, राहणीमान, वाणी–वागणूक व नित्याच्या सवयी इत्यादींमध्ये विविधता आहे. परंतु एका गोष्टीचे सर्वांकडे साम्य आहे, ती म्हणजे राष्ट्रीय भावना. आम्ही भारतीय आहोत, देशबांधव आहोत, ही भावना सर्वांकडे पाहावयास मिळते.

माझ्या मुक्कामाची जागा सुन्दर व स्वच्छ होती. मोठ्या खोलीत पलंग, टेबल खुर्ची, पंखा, टयूब लाइट, इत्यादी सर्व होते. खोलीला लागून गच्ची होती. सुंदर बाथरूम वा इतर सोई वेगवेगळ्या होत्या. त्यामुळे आल्याबरोबर चांगल्या झोपेची शाश्वती मिळाली होती. कारण वाटेत अनेक ठिकाणी मला नीट झोप मिळाली नव्हती. ढेकूण, डास, मच्छर इत्यादींनी जागरणाचे चांगलेच धडे शिकविले होते. येथील स्वच्छता व प्रसन्न वातावरण पाहून मी खूष झालो. दिवा मालवला व शान्त पडलो. काही मिनिटे गेली नसतील, एवढ्यात एक नव्याने परिचित झालेला आवाज माझ्या कानी पडला. युद्धजन्य प्रदेशात आभाळातून अदृश्य विमानांचा आवाज येऊ लागताच सैनिक जसे चपापतात व आवाज येण्याच्या दिशेचा वेध घेण्यास तत्पर होतात तसे माझे झाले. काही

क्षणांत ' फाइटस् '–फायटर्स माझ्या कानाभोवती गोंगाट करू लागले. मच्छराचे स्क्वॉड्रन माझ्यावर चाल करून आले होते.

सकाळी सहाला तयार होऊन निघण्याचा बेत साडेसातवर गेला व मी विजयवाडा सोडले. काही मैलांवर लक्षात आले की स्पीडोमीटर बंद पडला होता. प्रवासाची नोंद चुकू नये म्हणून ते मी दुरुस्त करण्यास थांबलो. फोकस उघडले, तार बसविली. तरीही चालेना, म्हणून गिअर बॉक्स उघडला व लक्षात आले की तेथे तार तुटली होती. तसाच पुढे प्रवास चालू ठेवला. राजमहेन्द्रीला १२–१ वाजता पोहोचावयाचे असें माझे ठरले होते. परंतु मी १२ वाजता एलुरुपर्यंतच पोहोचलो होतो. तेथून राजमहेन्द्री ७० मैलांवर होते. असा विलंब झाला की मन बेचैन व्हायचे.

एलुरुला पंपावरील माणसांनी मला ' आंध्रप्रभा 'ची बातमी दिली व कौतुकाने विचारपूस करून आग्रहाने चहा दिला. अशा प्रसंगी आपण स्नेह्यांमध्येच आहोत असे वाटायचे. पुढच्या प्रवासात रस्ता बरा नव्हता. खाचखळग्यांचा. त्या अरुंद रस्त्यावर अनेक पाय-रिक्षा ये-जा करीत होत्या. लोक रस्त्याच्या मधूनच चालायचे. त्यातून गाई, म्हशी, मेंढ्या, कोंबड्या इत्यादींची गर्दी होती. अशात एखादी ट्रक आली तर सर्वांना रस्ता सोडून जवळील शेतामध्ये जाऊन उभे राहण्याची पाळी यायची. या रस्त्यावर प्रवास करीत असता मला फारच जपावे लागले.

समोर जात असलेल्या ट्रकच्या पुढे जायचे झाल्यास ५ ते ७ मैल त्याच्या मागेमागे धूळ खात जावे लागायचे, तेव्हा कोठे तो पुढे जाण्यास वाट द्यायचा. एका ट्रक ड्रायव्हरने पुष्कळ लांबपर्यंत मला वाट दिली नाही. हॉर्न वाजवून वाजवून मी हैराण झालो. मी शेवटी संतापून जवळील पायवाटेवरून भरधाव गाडी नेली, व उधळत का होईना एकदाचा पुढे झालो. याला पुण्याचे पाणी दाखवावे असे वाटले म्हणून मी वाहतुक पोलिस अधिकाऱ्याप्रमाणे त्याच्या पुढून थांबण्याचा इशारा देत माझ्या गाडीचा वेग कमी केला व रस्त्याच्या मध्यभागी थांबलो. रस्ता अरुंद असल्यामुळे त्याला थांबणे भाग पडले. ड्रायव्हरजवळ जाऊन मी त्याला फारच दम दिला. त्यांना हिंदी समजत होते म्हणून मला बरा ' वाव ' मिळाला. तेथील पादचारी पण धावून आले, व त्यांनाही यांचा रोजचा उपद्रव असल्यामुळ

सर्वांनी त्याचा समाचार घेण्यास सुरवात केली. मी म्हणालो, " सामने से ट्रक आती हो तो बाजू को होते हो ना ? फिर हमारी इतनी छोटीसी गाडी को जगह नहीं दे सकते क्या ? तुम लोगों की ऐसी लापरवाही से कितने ॲक्सिडेंट होते हैं मालूम है ? " असे म्हणूनही विशेष परिणाम होत नाही असे वाटल्यावर मी गाडीचा नंबर लिहून घेतला व माझ्या गाडीच्या रोखाने निघालो. त्याच्या मनश्चक्षूंसमोर आर. टी. ओ. अधिकारी उभा राहिला असावा. कारण नंबर घेतल्यावर ताबडतोब तो मागून धावत आला व हात जोडून विनंती करू लागला. माझ्या आत्मविश्वासात भर पडली.

'धुल्ला' रेल्वे स्टेशनपासून रेल्वे व जलमार्ग– कॅनॉल यांच्यामधून सडक जाते. अनेक मैल अशा प्रकारे तिन्ही वाहनमार्ग समान्तर आहेत. कॅनॉलमधून छोट्या नावेतून मालाची वाहतूक होते. मधून रस्ता व दुसऱ्या बाजूला रेल्वे, असा त्रिवेणीसंगम येथे पाहावयास मिळाला. एकदा असे घडले की, मी प्रवास करीत असताना एका बाजूने आगगाडी जात होती, व माझ्या दुसऱ्या बाजूने नाव होती. तशात मनात विचार आला की, वरून या क्षणी विमान जात असताना दिसले तर काय मजा येईल ! हा 'बालिश' विचार येताच मी खरोखर इतका खूष झालो की, विमान आले असतेच तर हँडलवरचे हात सोडून मी टाळ्या वाजविल्या असत्या ! मी एकटा असल्याकारणाने प्रवास कंटाळवाणा न व्हावा म्हणून अनेक नानाविध तरंग व खुळ्या कल्पनांनी मनोरंजन करून घेण्याचा प्रयत्न करायचो व मन प्रफुल्लित ठेवायचो. या दीर्घ एकाकी प्रवासात मी विशेष 'लीला' माझ्या मनात निर्माण केली होती.

राजमहेन्द्रीच्या अलीकडे गोदावरीच्या पैलतीरी जाण्यासाठी नावेत बसावे लागावयाचे, म्हणून नुकताच नवीन रस्ता तयार केला आहे. या रस्त्यावर काही मैल फारच अरुंद रस्ता आहे. एका बाजूला कॅनॉल आहे व दुसऱ्या बाजूला उतार आहे. बैलगाडी समोरून येत असल्यामुळे एक रिक्षावाला बाजूला होत असता गडबडून कॅनॉलमध्ये पडला. काही लोकांनी धावून रिक्षा धरली नसती तर तिलाही जलसमाधी मिळाली असती. तसेच एक सायकलस्वार तोल जाऊन उतारावर गेला व भर वेगाने एका झोपड्यावर जाऊन आदळला. मी सावध होऊनच गाडी चालवीत होतो. इथल्यासारखी काळजी मला याआधी कोठेच घ्यावी लागली नव्हती.

पुढील रस्ता रुंद होता. पण सबंध रस्ता धुळीच्या थराने भरला होता. धूळ उडवीत मी प्रवास केला. राजमहेन्द्रीहून चार मैल पुढे हा रस्ता पक्क्या सडकेला जाऊन मिळाला तेव्हा हायसे वाटले. वाटेत कोठेही पेट्रोल भरले नव्हते म्हणून पाहिले तेव्हा लक्षात आले की, ते संपत आले होते. पुढे तीस मैलांवर पेट्रोल मिळेल म्हणून एका कारच्या मालकाकडून एक गॅलन पेट्रोल विकत घेतले. परंतु त्याच्या जवळ तेल नव्हते, व माझ्या गाडीला पेट्रोल व तेल एकत्र करूनच लागत होते. मी गिअरबॉक्सचा बोल्ट काढून तेल काढले, व फार मळकट नव्हते म्हणून तेच पेट्रोलमध्ये टाकले व प्रवास सुरू केला.

विशाखापटनमशिवाय मध्ये कुठेही पाहण्याजोगे काही नव्हते. म्हणून शक्य तेवढा जास्त प्रवास करून रात्री १० वाजता मी प्रतिपाडू या छोट्या गावी थांबलो. राहण्याची इतर कोठेच सोय नव्हती. म्हणून सरळ पोलिस स्टेशनवर मुक्काम ठोकला. इन्स्पेक्टर श्री. नागभूषणम् यांनी कौतुक केल्यामुळे इतर पोलिसांनी मनःपूर्वक सहकार्य केले. नागभूषणमूनी माझ्यासाठी पोलिसांस हॉटेल-मधून जेवण आणण्यास सांगितले. परंतु आपल्या आवडीचा आहार घ्यावा म्हणून मी स्वतः त्यांच्याबरोबर गेलो. अर्ध्या मैलावरील त्या हॉटेलमध्ये मी स्वतःच्या हाताने भाताला फोडणी दिली व मालकालाही माझ्याबरोबर जेवावयास बसविले. त्याला महाराष्ट्रियन फोडणी पसंत पडली. हॉटेलमालकाला जेवू घालणाऱ्या प्रवाशाला पाहण्यासाठी त्याच्या घरातील व शेजारील लोक धावून आले. आम्ही येथेच्छ भोजन घेतले. घरातील स्त्रियांच्या आग्रहामुळे त्या गृहस्थाने माझ्याकडून ' फोडणीचा भात ' शिकून घेतला. गावात जरा फिरावेसे वाटले. माझ्यामागे पंचवीस एक माणसांचा गट होता त्यामुळे गावात चर्चेची लाट उसळली. मला याचा आनंद झाला.

गरम दूध पिऊन व पहाटे गरम पाण्याने आंघोळ करून मी प्रतिपाडू सोडले. अपेक्षेपेक्षा जास्त वेळ लागल्यामुळे मी वाटेत न थांबता ८७ मैलांचा अखंड प्रवास करून विशाखापट्टनम् येथील शिपयार्डला पोहोचलो. रविवार असल्यामुळे ७ जानेवारी १९६८ ला शिपयार्ड बंद होते. जहाजनिर्मिती केन्द्र न पाहता जाणे अयोग्य होते, व त्यासाठी एक दिवस थांबून राहणेही शक्य नव्हते. म्हणून मी तेथील सुरक्षा विभागाच्या सर्वोच्च अधिकाऱ्याला फोन केला व सर्व

काही सांगून खास परवानगी मिळविली. माझ्याबरोबर एक मार्गदर्शक व एक संरक्षक असे दोघेजण आले व मला जहाज निर्मितीचे वेगवेगळे टप्पे दाखविले. एका जहाजावर थोडे कामगार होते, इतर सर्व काही बंद होते. परंतु यंत्रशास्त्र हा माझा विषय असल्यामुळे मला बऱ्हंशी माहिती मिळाली.


तेथील श्री. राव यांचे मी आभार मानले. त्यांनी त्यांच्या उत्तरकाशी येथील बंधूंचा पत्ता दिला, व गेल्यावर अवश्य भेटण्यास सांगितले. मला आनंद झाला. तेथून दोन मैल पुढे गेल्यावर लागलीच परतलो व तेथे राहिलेला कॅमेरा घेतला.

वराह-नरसिंहाचे मंदिर

विशाखापट्टनमपासून ६ मैलांवरील सिंहाचलमकडे मी निघालो. पूर्व घाटातील पर्वतावर बांधलेले वराह नरसिंहाचे हे मंदिर म्हणजे शिल्पकलेची एक अप्रतिम निर्मिती आहे. काही दानशूर हिंदूंनी येथे खालून वरपर्यंत पायऱ्या बांधल्या आहेत. ११२० पायऱ्या चढल्यावर मंदिर लागते. ते सर्वोच्च शिखरावर बांधले आहे. घनदाट जंगलामध्ये आलेले हे रमणीय स्थळ पर्यटन स्थळ म्हणून संबोधण्यास काहीच हरकत नाही.

दर्शनास बाहेर थांबलो. दार उघडल्यावर वराह-नरसिंहाचे दर्शन घेतले. येथे मंदिरात महाशिवरात्रीच्या जत्रेला खऱ्या शिवलिंगाचे दर्शन घडते. एका भल्या मोठ्या समईची ज्योत बारा महिने सतत तशीच तेवत असते.


देवळाच्या आवारात एक लग्नमंडप आहे. तेथील खांबांवर फार सुंदर नक्षी-काम केलेले आहे. प्रस्तुत मंदिरावरील नक्षीकाम तासन्तास बघत राहावे इतके सुंदर व आकर्षक आहे. अनेक चौकटींतून लहान लहान मूर्ती कोरल्या आहेत, व पुराणांतील अनेक प्रसंग उभे केले आहेत. भक्त प्रल्हाद, ध्रुव, श्रावण, अहिल्योद्धार, समुद्रमंथन, गौरी, नटेश्वर, यांचे आनंदतांडव व शिवलीलानृत्य, नृसिंहावतार, मत्स्यावतार, इत्यादी अत्यंत आकर्षक आहेत. हे सर्व खालून स्पष्ट दिसत नव्हते, म्हणून मी समोरील दुसऱ्या मंदिरावर चढून पाहण्याचा विचार केला; परंतु पुजाऱ्याने संमती दिली नाही. फोटो काढण्याचीही सक्त मनाई होती.



जगन्नाथपुरीचे जगन्नाथ मंदिर

हे जगन्नाथमंदिराचे प्रवेशद्वार आहे. आतून हे मंदिर अति भव्य असून लाल दगडावरील शिल्प पाहण्याजोगे आहे. डाव्या कोपऱ्यात लेखकांची मोटारसायकल दिसत आहे.

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण.






पूर्वघाटातील हळा पर्वतावर सिंहाचलम् येथील हे मंदिर आहे. एका बाजूचे शिल्प चित्रात दिसत आहे. मध्यभागी शेषनाग, विष्णु व लक्ष्मी यांच्या सुरेख मूर्ति आहेत.

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण.

हला पर्वतावरील
नृसिंहाचे मंदिर



कलकत्ता येथील दिगंबर जैन मंदिर

तलावासमोरील मंदिर जोधपूरच्या लाल दगडापासून तयार केले असून अति आकर्षक आहे. या मंदिराच्या आवारातून बाहेर पडावेसे वाटत नाही.

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण.

मी दोन तास एकसारखा त्याला विनवीत राहिलो, फोटो घेतल्याशिवाय जाणे मुळीच पटत नव्हते. अखेर त्याला माझी कीव आली; हळूच इशाऱ्याने परवानगी दिली. मी सस्मित होऊन तत्काळ त्या मंदिरावर चढलो व पटापट काही फोटो काढले. दुर्दैवाने रोल संपल्यामुळे जास्त फोटो घेता आले नाहीत. परंतु तेथेच बसून, पुष्कळ वेळ एकेका मूर्तीला निरखून पाहिले; पाहताक्षणीच ‘चक्’ व्हायचे, व ओघानेच “ काय सुंदर आहे, अहाहा ! ! ” शब्द तोंडून बाहेर पडायचे. येथे पुराणातील इतके प्रसंग कोरले आहेत की, एकेकावर कथा लिहावयास बसलो तर सुंदर पुराणकथांचे छोटे पुस्तकच तयार होईल. नाजुक मूर्तींच्या साहाय्याने कथानक निर्माण केल्याचे येथेच प्रथम पाहावयास मिळाले. पूर्वघाटातील हे सिंहाचलमचे मंदिर सर्व मंदिरांतील शिल्पांना एक आव्हानच आहे.

सिंहाचलमहून अरण्यामधून जात असलेल्या रस्त्याने प्रवास करून मी चित्तीवलासा येथे राष्ट्रीय मार्गावर पोहोचलो. जगन्नडराजपुरम येथे चहा घेतला व संधिप्रकाशात पुढे निघालो. अंधार झाल्यावर दिवा लावला. पण प्रकाश एकदम कमी पडत होता. दोन दिवसांच्या प्रवासात एकसारखा इतका हॉर्न वाजवावा लागला होता की, बॅटरी एकदम उतरली होती. रस्ता निर्जन होता. चोहोकडे अंधार पसरला होता. वाहतूकही शून्यवत होती. थोड्या मैलांचा प्रवास केल्यावर एक नवीन इमारत दिसली. दिवा लागलेला पाहून तेथे गेलो. तेथील गुराख्यास विचारपूस केली व समजले, पुढच्या वर्षीपासून सुरू होणाऱ्या येथील गव्हर्नमेंट पॉलिटेक्निकची ती इमारत होती. वरती एक भले मोठे टेबल होते. त्यावरच मी अंथरुण तयार केले. गावात जाऊन उतरण्याची सोय करण्यास वेळ घालवण्यापेक्षा येथेच मुक्काम केलेला बरा असे वाटले. सामानावर लक्ष ठेवण्यास गुरखा होता म्हणून काळजी नव्हती. तेथून एका माणसाला पैसे देऊन गावात पाठविले. तो थोडे उत्तम पदार्थ घेऊन आला. असा मुक्काम व अशी आहाराची व्यवस्था हा माझा प्रथम अनुभव होता.

श्रीकाकुलमच्या भावी पॉलिटेक्निकमधून बाहेर पडलो. रस्त्यावर समजले की, एक्झॉस्ट पाइप लीक होताच स्विच बिघडले होते. शक्य तेवढी दुरुस्ती

करून घेतली व ९८ मैलांवरील बेरहामपूरला पोहोचलो. इच्छापुरमपासून ओरिसाची हद्द लागली होती. बेरहामपूर येथे 'उडिया' भाषेचे शब्द कानी पडू लागले. या भाषेत एक विशेष नाजुकपणा आहे. सुरुवातीला काही पुरुष बायकी वाटले. नंतर विचार केला. क्वचित हा भाषेचाच गुण असावा.

बेरहामपूरच्या पेट्रोल पंपावर एका गुजराती गृहस्थाची ओळख झाली. आधुनिक सोयींनी सज्ज अशा त्या सर्व्हिस स्टेशनवर मी मनसोक्त आंघोळ केली. कान्तिभाईंनी मला आपुलकीचा आग्रह केल्यावर मी त्यांच्याबरोबर गावातील 'मारवाडी भोजनालय'मध्ये जेवावयाला गेलो. बऱ्याच दिवसांनंतर इच्छित भोजन लाभले.

गोपालपूर येथील समुद्रतट सुंदर आहे. येथे अनेक जलतरणपटू राहतात व समुद्रात पोहोण्याचा आनंद लुटतात. गावात वेणुगोपालचे छोटे पण स्वच्छ सुंदर मंदिर आहे. लांब समुद्रतटावर एकान्तामध्ये महादेवाचे मंदिर आहे. प्रवाशांना राहण्यासाठी एक सोयीचे हॉटेल आहे. येथील लोकांची प्रवाशांना फसविण्याची वृत्ती असते. मी अनुभवाने तयार झालो असल्यामुळे फसलो नाही.

रस्ता सरळ सपाट असल्यामुळे प्रवास सहज झाला. पुढे एक छोटा घाट लागला. तो चढून उतार लागताच समोर समुद्र दृष्टीस पडला. हिरवळ, वृक्षांच्या रांगा, नीलवर्ण समुद्रजलातील एक छोटे बेट, निळ्या आकाशात विखुरलेले काळे ढग, व मंद वारा या सर्वांमुळे मी प्रसन्न झालो. थोडा वेळ थांबलो, इतस्ततः फिरलो. सृष्टीचे दर्शन घेतले. विश्रान्ती घेतली. सृष्टीला स्तुतिसुमने वाहणारी दोन गीते गायली व प्रसन्न मुद्रेने पुनश्च प्रवास सुरू केला.

बालुगा गावापासून एका फर्लांगावर समुद्रापासूनच निर्माण झालेले 'चिल्का' हा तलाव पाहिला. मध्ये एक छोटे बेट होते. त्यावर छोटी टेकडी व झाडे-झुडपे होती. नावेत बसून पैलतीर पाहण्याची सोय होती. नावेत बसून काही खलाशी मासे पकडत होते. मासे पकडण्यासाठी येथे अनेक शौकिन येतात. समुद्र काठावरील मऊ वाळूत बसलो. काही गावकरी माझ्याजवळ आले. आमचे संभाषण झाले. त्यांचा एक फोटो घेतल्यावर ते खूष झाले. त्यांच्यापैकी एकाने एकदम भडक निळ्या रंगाची लुंगी घातली होती व त्यावर तितकाच भडक हिरव्या रंगाचा शर्ट घातला होता. इतर कोणी बोलायला लागला की ताबडतोब

तो मध्येच बोलायचा. मी त्याला विचारले, 'तुम मुसलमान हो क्या?' "हाँ साब, मेरा नाम हारुन रशीद. आप कैसा पहेचाना साब?" "हम तुम्हारे लिबासपरसे पहचाना." त्यावर दुसरा बोलला, "ऐसाच दो जोड हैं इसके पास साब. येच कपडा बारा महिना पहनता." सर्व लोक मनमोकळेपणाने हसले. हारुन रशीददेखील खिलाडू वृत्तीचा होता. त्यानेही सर्वांना साद दिली.

खुर्दा येथे पोहोचलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. उन्हात प्रवास करताना समुद्रकाठच्या हवेमुळे घामाने अंग चिकट झाले होते. इन्स्पेक्शन बंगल्यात गरम पाणी करवून आंघोळ केली व बाजारात भोजनास गेलो. जेवण बरे नव्हते. येथे काही दुधाचे मिष्टान्न होते म्हणून सामोसा, चन्नाकेक, (माव्याचा केक) सीताभोग, संतोष, खिरमन इत्यादी मिष्टान्ने घेतली. भेळेची गाडी पाहिली व भेळ घेतली. तिला मोहरीच्या तेलाचा वास आल्यामुळे खात्री केली. येथे चटणी म्हणून मोहरीचे तेल वरून टाकतात हे विशेष.

खुर्दावरून १२ मैलांवरील उदयगिरी व खंडगिरी येथील लेणी पाहिली. पाहण्याजोगे येथे विशेष नाही. परंतु एकान्तात भ्रमण करावयाचे असेल तर या टेकड्या फार चांगल्या आहेत. झाडा-झुडपांतून रस्ता असून, अनेक स्वच्छ खडकही आहेत. शान्त एकान्त स्थळ म्हणून त्याला संबोधता येईल. येथून सहा मैलांवर ओरिसाची राजधानी भुवनेश्वर आहे. पण मी परतताना थांबण्याच्या विचाराने सरळ जगन्नाथपुरीकडे निघालो. एका तीर्थक्षेत्राकडे जात असल्याचा मला आनंद होत होता.

पुरीच्या रस्त्यावर भरधाव जात असता झुडपातून अचानक रस्त्यावर आलेला एक साप माझ्या गाडीच्या खाली चिरडला गेला. माझा जीव फार हळहळला. पण मी काहीही करू शकत नव्हतो. शृंगेरीच्या वाटेवर असताना लांबून मी एक भला मोठा नाग पाहिला होता. रस्त्याच्या मध्यावर गोल वेटोळे करून उरलेल्या अंगाने ताठ उभा होता, व फणा काढून डुलत होता. मी अचानक ब्रेक्स मारले व गाडी थांबविली. हात जोडून प्रणाम करावे व नंतर जवळील कॅमेऱ्याने फोटो काढावा असा विचार होता; परंतु गाडीचा आवाज ऐकून त्याने झाडीत ·झेप घेतली व एकच सरळ १० फुटी काठी

उडावी तसे दृश्य मी पाहिले. त्या महादेवाच्या प्रिय नागदेवताचे दर्शन घडल्यामुळे त्या वेळेस मला धन्यता वाटली होती. परंतु आज शृंगेरीच्या जागी पुरीच्या शंकराचार्यांकडे मी जात असताना हा प्रकार घडला त्यामुळे फार वाईट वाटले.

जगन्नाथपुरीला मी देवाचे दर्शन घेतले व शंकराचार्यांना भेटावयास मठावर गेलो. श्रीजगद्‌गुरुंना साष्टांग दंडवत करून मी त्यांचे आशीर्वाद मिळविले. त्यांनी प्रवासाबद्दल विचारपूस केली व शुभेच्छा व्यक्त केली. त्यांनी गेल्या अडीच महिन्यांत केलेल्या प्रदीर्घ प्रवासाबद्दल मला सांगितले. त्यांची पथ्ये, दिनचर्या, यांची कल्पना दिली. दोन तास माझे व त्यांचे संभाषण चालले होते. त्यानंतर मला त्यांच्याकडे पाहण्याची वेगळी दृष्टी मिळाली. देवधर्मांचे नित्यनियम पाळताना त्यांना किती कष्ट पडत असतील, याचा विचार केल्यावर त्यांच्या त्यागाची व श्रेष्ठत्वाची प्राचीती आली.

स्वखुषीने त्यांनी मला काही मदत पाहिजे का विचारले. मी त्यांच्याकडून पुन्हा एकदा आशीर्वाद मागून घेतला. त्यांनी त्यांच्या चिटणिसाला मला प्रशस्ति-पत्र देण्याबद्दल आज्ञा दिली. प्रशस्तिपत्र व जगद्‌गुरूंचे बहुमोल आशीर्वाद घेऊन पुढच्या प्रवासाच्या यशाची खात्री घेऊन मी आत्मविश्वासाने निघालो.

● ● ●

१२ : भुवनेश्वरची प्राचीन मंदिरे

दक्षिण भारत सोडल्याची खूण

पुरी जगद्गुरूंचे आशीर्वाद घेऊन मी उत्साहपूर्वक पुरी सोडली. येथील वातावरणामुळे जेवणाची इच्छा नष्ट झाली होती. फक्त नारळाचे पाणी पिऊन निघालो होतो. म्हणून २५ मैलांवरील पीपीली येथे थोडा आहार घेतला व कोणार्क येथील प्रसिद्ध सूर्यमंदिर पहावयास निघालो. रस्ता अरुंद, नागमोडी वळणाचा होता, जंगलातून जात होता, म्हणून धीम्या गतीने प्रवास केला.

सूर्यमंदिराचा एक सुंदर फोटो मी आधी पाहिला होता, परंतु विशेष लक्ष दिले नव्हते; म्हणून त्यातील शिल्प व विषय याबद्दल मला जास्त माहिती नव्हती. तालमीत आखाडा असतो तसा या मंदिराभोवती भिंत उभारून मोठा आखाडाच निर्माण केला आहे. मुख्य मंदिराव्यतिरिक्त एक छोटे मंदिर आहे. मुख्य मंदिराची भव्यता पाहिल्यावर डोळे दिपतात. त्यावरील शिल्प उत्कृष्ट आहे. गायन, वादन, नर्तन वगैरेविषयी वेगवेगळे देखावे एका भिंतीवर कोरले आहेत, ते फार आकर्षक आहेत. या मंदिराच्या जवळपास निसर्गही सुंदर आहे. वाळू व त्यामधील छोटे छोटे वृक्ष, अधूनमधून दिसणारी फळांची बाग, नारळीची झाडे यांमुळे येथील सौंदर्य वाढीस लागले आहे. परतताना मंदिरांच्या आवाराबाहेर एका सरकारी जाहिरातीचे बोर्ड दिसले. अधिकाऱ्यांनी जाहिरातीसाठी चांगले स्थळ निवडले होते. त्याचा विषय होता ‘ कुटुंबनियोजन ’.

भुवनेश्वर येथे प्रवाशांच्या सोयीसाठी एक बंगला बांधत असून अल्प भाड्यात राहण्याची चांगली सोय आहे. परंतु याचा फायदा व्यापारानिमित्त येणारे सदैव घेत असल्यामुळे माझ्यासारख्या पर्यटकाची सोय होणे कठीण वाटले. मी एका हॉटेलात उतरलो. प्रवासात अनेक दिवसांनंतर प्रथम मला पंजाबी हॉटेल पाहावयास मिळाले. तेथे चांगले शाकाहारी जेवण उपलब्ध होते. मी दक्षिण भारत सोडले असे वाटू लागले.

भुवनेश्वर येथील गौरी-केदार, लिंगराज, राजारानी, मुक्तेश्वर, व सिद्धेश्वर महादेव, परशुरामेश्वर, वेताळ वगैरे देवळे उल्लेखनीय आहेत. त्यांवरील शिल्प फारच आकर्षक आहे. अजंठा येथे जशी काही आश्चर्यकारक बहुअर्थी चित्रे आहेत, ते शिल्प येथे पाहावयास मिळते. गौरी-मंदिराचा पुढचा भाग साधा आहे, व मागच्या बाजूला लाल दगडांमध्ये बारीक कोरलेले आर्ट– त्याकडे सारखे पाहातच राहावे असे वाटते. मंदिरासमोर गौरी-कुंड आहे. त्याचे पाणी इतके स्वच्छ स्फटिकासारखे आहे की, हे कुंड वीस फूट खोल असूनदेखील तळ व त्यावरील पैसे स्पष्ट दिसतात. तसेच स्वच्छ पाणी पुण्याजवळील बनेश्वर येथील कुंडामध्ये पाहावयास मिळते. या कुंडामध्ये आंघोळी करण्याची परवानगी आहे. अनेक तरुणी येथे आंघोळ करून भिजलेल्या कपड्यांनी समोरील गौरीपुढे नवस करतात.

लिंगराज हे येथील सर्वांत भव्य मंदिर. त्याचा कळस दूर अंतरावरूनही दृष्टीस पडतो. आत महादेवाचे भव्य लिंग आहे; परंतु मूर्ती विशेष आकर्षक नाही. तेव्हा लोकांचा वेळ आत जास्त न जाता बाहेरील सौन्दर्य पाहण्यातच अधिक जातो. राजारानी व वेताळेश्वर या मंदिरांवरील शिल्प वैशिष्ट्यपूर्ण आहे. इतर सर्व मंदिरे पाहण्याजोगी आहेत. ही सर्व देवालये वेगवेगळ्या ठिकाणी आहेत.

भुवनेश्वर – मोकळे मोकळे शहर

भुवनेश्वर स्वच्छ, सुंदर व आधुनिक आहे. येथे पायरिक्षा अनेक असून, आपल्या इकडच्यासारख्या ऑटोरिक्षा पाहावयास मिळत नाहीत. रस्ते रुंद असून बहुतेक रस्त्यांवर दुतर्फा झाडे आहेत. वसती शहराच्या मानाने कमी आहे, व घरे जवळ जवळ नसल्यामुळे गजबजलेला असा भाग कोठेही पाहावयास मिळत नाही. पुणे-मुंबईच्या धावपळीच्या जीवनाशी माझा निकडीचा संबंध असल्यामुळे येथे

मला वातावरण एकदम निरुत्साही वाटले. ज्यांना एका ठराविक चाकोरीतून आपले जीवन जगावयाचे आहे, ज्याची दिनचर्या यंत्रवत ठरलेली आहे, त्यांच्यासाठी ही आधुनिक राहणी पोषक असली तरी ज्यांना सर्वसामान्य लोकांपेक्षा काही वेगळे करण्याची इच्छा असेल, जीवनात विविधता निर्माण करावयाची असेल, त्यांच्यासाठी ही पोषक ठरणार नाही असे मला वाटते. कारण पुण्या-मुंबई-सारख्या ठिकाणी चालता बोलता माणसांना विविध गोष्टी पाहावयास, ऐकावयास व अनुभवावयास मिळतात, तसे अशा शहरांमध्ये होणे कठीण.

संध्याकाळी जर प्रवास करीत नसलो व एखाद्या ठिकाणी मुक्कामास असलो, आणि संध्यासमयी जर काही विशेष पाहण्यासारखे स्थळ नसले तर मी बागेत, सिनेमागृह वा नाट्यगृहावर, रेल्वे स्टेशनवर किंवा एस. टी. स्टँडवर, भाजीपाला मार्केट, किंवा कापड बाजार, व जेथे काही विशेष वस्तूची विक्री होत असेल अशा ठिकाणी फिरावयास निघायचो. कधी पानाच्या दुकानी दुकानदाराशी व गिऱ्हाइकांशी, तर कधी भेळ, पाणी-पुरी, फळे व खेळणीवाल्या गाडीवाल्याबरोबर, कधी स्टेशनवर वा स्टँडवर उभ्या असलेल्या प्रवाशाबरोबर, तर कधी हॉटेले व टूरिस्ट बंगल्यामधील उतारूंबरोबर, कधी रिक्षावाले, टांगेवाले, नाविक तर कधी एखाद्या ५० हजार, ६० हजार किंमतीच्या कारच्या ड्रायव्हरबरोबर, कधी किराणा भुसाराच्या दुकानी, तर कधी भाजीवाला किंवा फळवाल्याबरोबर, कधी एखाद्या ऑफिसच्या पट्टेवाल्याबरोबर तर कधी ऑफिसरबरोबर, बागेतल्या माळ्याबरोबर, व नवीन होणाऱ्या बागेच्या निर्मात्याबरोबर, थिएटरबाहेर काळाबाजार करणाऱ्या-बरोबर, वा एखाद्या नाटकाच्या किंवा संगीत-नृत्य कार्यक्रमाच्या संचालकांबरोबर, कधी मंडईमधील टॉमेटोवाली तर कधी टूरिस्ट इन्फर्मेशन ब्यूरोची टायपिस्ट, व रिसेप्शनिस्ट, कधी मुख्य मंत्र्यांच्या बंगल्यावरील चौकीदाराबरोबर तर कधी स्वतः मुख्यमंत्र्यांबरोबर मी वार्तालाप केला. अशा रीतीने चांभार, न्हावी, धोबी, शिंपी, प्यून, पट्टेवाला, पानवाला, चित्रकार, शिल्पकार, गायक–गायिका, वादक, नर्तक–नर्तकी, (लेखक किंवा कवी यांच्याकडे गेलो की श्रवण करता करता समाधी लागायची, या भीतीने वेळेच्या अभावी गेलो नाही.) साधू–संन्याशी, तसेच धर्मधुरंधर निवडणुकीत कोणी विचारीत नसताना आगंतुक ग्राम गाळीत फिरणाऱ्या कार्यकर्त्या-

पासून, यशाची माळ घालून फिरणाऱ्या मंत्र्यांपर्यंत सर्वांच्या सान्निध्यात मी माझ्या या प्रवासात आलो.

भुवनेश्वरचा भाबडा रिक्षावाला मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत होता. इतर सर्व ठिकाणी असा अनुभव आला की, एक प्रश्न विचारला की त्याची रेकॉर्ड सुरू व्हायची. आवश्यक–अनावश्यक काहीही न पाहता तो त्याची चक्की चालूच ठेवावयाचा. हे झाले ' सुधारलेले ' रिक्षावाले. परंतु भुवनेश्वरचा तो रिक्षावाला ' स्थितप्रज्ञ 'सारखा निश्चल मनोभावाने वागत होता. हॉटेल-मालका-कडून खूण निशाणीसह पत्ता विचारून घेतला होता म्हणून त्यास मार्गदर्शन करण्यास ते कामी लागले. तोही पुणेरी टांगेवाला किंवा रिक्षावाला व्हावा म्हणून जाता जाता त्याला मी सर्व थिएटर, मंत्र्यांचे बंगले, मोठीमोठी हॉटेल्स, कोर्ट, कलेक्टर कचेरी, मामलतदार कचेरी, चांगले कलाकार वा साहित्यकार, व वशि-ल्याचे बोळ, इत्यादींचे पत्ते व मार्ग तोंडपाठ ठेवण्याचा सल्ला दिला. त्याला नवीन संशोधन हाती लागल्याचा आनंद झाला.

ओरिसाच्या मुख्यमंत्र्यांची भेट

' उडिया ' नावावरून ही भाषा उडाऊ लोकांची असावी असा कांहींना भास होईल. परंतु प्रत्यक्षात ही अत्यंत भोळ्या, प्रामाणिक व सौजन्यशील प्रजेची मातृ-भाषा आहे. ऐकताक्षणीच या भाषेचा नाजुक, गोड लडिवाळपणा लक्षात आल्या-वाचून राहात नाही. या भाषेच्या साहाय्याने भांडण करता येईल का ?–असा मला प्रश्न पडला. स्वतःचे गाव कधी सोडून बाहेर न गेलेल्या एखाद्या उडियाला उडवून डोळे बांधून हेलिकॉप्टरने सरळ पुण्याच्या मंडईत सकाळी उतरविले तर त्यास एखाद्या अरण्यात सापडल्याचा भास झाल्याशिवाय राहणार नाही असे मला वाटते; इतकी येथील प्रजा शान्त आहे. म्हणून तर एक व्यापारी म्हणाला होता, " अहो अशोककुमार, आपण मुंबई मुंबई करतो पण खरा पैसा मिळवण्याचा ' चान्स ' इकडेच आहे. "

ओरिसाचे मुख्यमंत्री श्री. आर. एन. सिंगदेव यांच्या बंगल्यासमोर जाताच समोरून शिपाई धावत आला. मी टेरिलिनचा सूट परिधान केला होता. प्रथम

प्रथम संपर्कात वस्त्राभूषण यांचा काय परिणाम होत असतो व फायदा काय होतो याचा मला पूर्वी अनुभव होता. त्यामुळे मी अशा उपयुक्त वस्तू प्रवासात नेल्या होत्या उन्हात सुटाचे ' लस्टर फायबर ' चमकत होते. त्यावर बहुधा श्री. राधा-मोहन मिश्रांचे लक्ष गेले असावे. एक शिपाई आतून धावत आला व म्हणाला, " सेक्रेटरीसाहेबांनी आपणास आत बोलाविले आहे. " चिटणिसांबरोबर हस्तान्दोलन झाले. " माझे नाव अशोककुमार आहे. मी पुण्याहून आलो आहे, व मला सिंगदेवना भेटावयाचे आहे. " असे म्हटल्यावर त्यांनी अतिथीसाठींची बैठकीची खोली उघडली, व मला तेथे बसविले. सूट, बूट, टाय, व अस्खलित इंग्लिश संभाषण याचा प्रभाव भारतीय जनतेवर अजूनही पुष्कळ आहे. त्याने विशेष विचारपूस केली नाही.

मुख्यमंत्री जेवण आटोपून खाली आले. त्यांची अत्यंत साधी राहणी पाहून मी मनातल्या मनात फार लाजलो. हसतमुखाने त्यांनी माझ्याबरोबर संभाषणास सुरवात केली. मी म्हणालो, " आजच्या तरुण पिढीने प्रवास करून आपल्या मातृभूमीचा व देशबांधवांचा खऱ्या अर्थाने दर्शन घेऊन अभ्यास करावा, वेग-वेगळ्या प्रान्तांतील लोकांशी आपले संबंध प्रस्थापित करावे, परप्रान्तीयांना आमंत्रण देऊन आपला प्रान्त दाखवावा, व विचारांची देवाण-घेवाण करून एकमेकांच्या अडचणींना समजून घेण्याचा प्रयत्न करून, आपापसांतील मतभेद दूर करावे, अशा रीतीने राष्ट्रीय ऐक्य वाढीस लावावे, अशा शुभ आकांक्षा घेऊन मी एक अखिल भारतीय युवक संघटना प्रस्थापित करू इच्छितो. सामान्य जनतेचे ऐक्य व प्रेम वाढीस लागले तर विघ्नसंतोषी लोकांना चालना मिळणार नाही असे मला वाटते. त्यासाठी मी मोटरसायकलीवर भ्रमण करून स्वतः आधी मातृ-भूमीचे दर्शन घ्यावयास निघालो आहे. आपले आशीर्वाद व शुभेच्छा मला हव्या आहेत. "

मला माझी कल्पना कशी अंमलात आणता येईल याबद्दल त्यांनी विचारपूस केली, व योग्य उत्तर मिळाल्यावर त्यांनी समाधान व्यक्त केले. अशी संघटना स्थापित झाल्यावर ' घटना ' पाठवून देण्याची त्यांनी सूचना केली. चिटणीस श्री. राधामोहन मिश्रांना त्यांनी पत्र तयार करावयास सांगितले. पत्र घेऊन मी

निघालो. पाउले पुढे पडत होती, व मन मागे धावत होते. झालेल्या संभाषणाचे मनन करीत मी ' हॉटेल नटराज'ला परतलो . ' तुम्ही जाता पण अशी अचानक भेट होणे कठीण आहे ' असे म्हणालेला हॉटेलचा मालकही माझ्यावर खूष झाला, व त्याने स्वखुषीने शीतपेयाची एक बाटली स्वतः माझ्यापुढे आणून ठेवली.

चांदीवरील उत्कृष्ट कारागिरी

भुवनेश्वरहून कटक पंधरा मैल अंतरावर आहे. कटक हे इतिहासप्रसिद्ध शहर आहे. एका बाबतीत याला भारताचे सर्वोत्कृष्ट शहर मानता येईल,— ते म्हणजे येथील चांदीवरील कारागिरी व शाडूच्या मातीच्या मूर्ती. चांदीपासून येथे इतकी बारीक जाळी व नक्षी तयार करण्यात येते की, पाहताक्षणीच भुवया उंचावतात. एक कारागीर काम करीत असता मी निरीक्षण करू लागलो. त्याने हातातील काम बाजूला ठेवल्यावरच मी शुद्धीवर आलो, व लक्षात आले की— तब्बल तीन तास निघून गेले होते. दिवेलागणीला आलेलो मी रात्री नऊला परतलो. किरकोळ खरेदीची कामे अर्धवट राहिली होती. कटकच्या या कलेची कल्पना पाटणा व अलहाबाद येथील संग्रहालयात येऊ शकते. डॉ. राजेन्द्रप्रसाद व श्री. जवाहरलाल नेहरू यांना कटक नगरपालिकेकडून भेट करण्यात आलेल्या सुंदर वस्तू येथे ठेवलेल्या आहेत.

चांदीवरील नक्षीकामाप्रमाणे ' सरस्वती-पूजन ' महोत्सवात येथे उत्तमोत्तम शिल्प पाहावयास मिळते. आपल्या येथे जसा गणेशोत्सव असतो, त्याप्रमाणे बंगाली लोक सरस्वतीपूजनाचा उत्सव मोठ्या थाटाने साजरा करतात. महिना— दीड महिना अगोदर वर्गणी गोळा करण्यास सुरुवात होते. विविध देखावे तयार करण्यात येतात, व गणेश विसर्जनाप्रमाणे येथे पण प्रचंड मिरवणूक निघते. बंगालव्यतिरिक्त ओरिसा, बिहार, उत्तर प्रदेश, दिल्ली वगैरे ज्या ज्या ठिकाणी बंगाली लोकांची वस्ती आहे तेथे हा उत्सव साजरा होतो. मी गेलो तो या उत्सवाअगोदर. परंतु तेथील स्टुडिओमध्ये मला वेगवेगळी दृश्ये पाहावयास मिळाली. या मूर्तींकडे पाहून मला फार आनंद झाला. इतक्या नाजुक, सुंदर व अगदी जिवंत वाटाव्यात अशा या मूर्ती मी पूर्वी कोठेही पाहिल्या नव्हत्या. प्रत्येक दृश्यातील कल्पकतेने मी प्रभावित झालो. म्हैसूरला दसऱ्यानिमित्त एकदा जावे, असा

निश्चय केला होता. याप्रमाणे येथेही सरस्वती-पूजन पाहायला यावे, असा मनाशी निश्चय केला.

मी बरोबर घेतलेली मोटरसायकल दोन वर्षांची जुनी असल्यामुळे वाटेत दुरुस्ती-मध्ये फार वेळ गेला, व त्रासही पुष्कळ झाला. कटकला आवश्यक ती दुरुस्ती करून घेतली होती. यामुळे कटक–कलकत्ता रस्त्यावर गाडी भरधाव चालू लागली. हादरे बसल्यावर स्विचमधील चावी सैल बसत असल्यामुळे फिरायची व विजेचा प्रवाह तुटायचा. त्यामुळे इंजिन गाडी पळत असतानाच बंद पडायचे. त्यावर फार लक्ष द्यावे लागले, व चावी निसटताच पुन्हा बरोबर बसविण्याचे काम गाडी वेगात असताना करावे लागले. काही मैल गेल्यानंतर नवीन रस्ता लागला, तो फार रुंद व अति उत्कृष्ट होता. यामुळे कटक ते खरगपूर हे २२० मैलांचे अंतर मी चार तासांत सहज कापू शकलो.

कलकत्त्याहून ऐंशी मैलांवर असताना वाटेत काही लोक रस्त्यामध्ये उभे होते. यांनी दुरून नमस्कार करून थांबण्यास विनंती केली. एक म्हणाला, " साहब, हम आज ही नया हौट्टल खोला है । आप पहलापहल हमारे यहाँ खाना खाने-वाले हैं । साहब, तुमरे तुमरे या लागू. हमारे यहाँ खाना खाकर जाओ साहब. " हा नवीन प्रकार पाहून मला हसू आले. हे उत्तर प्रदेशचे लोक दिसत होते. सतत चार तास प्रवास करून मलादेखील भूक लागलीच होती. मी यांच्याकडे पाहात असताच एकजण म्हणाला, " हमारे यहाँ साहब सुद्ध वैष्णु भोजन है साहब. " असे म्हणून त्याने डोक्यावर बांधलेली केसांची शेंडी दोन बोटांनी धरून उभी करून दाखविली. मला न राहवल्यामुळे मी पोट धरून हसलो. निसटून रस्त्यावर पडलेली गाडी उभी केली व या ' सुद्ध साकाहारी हौट्टल ' म्हणजे गवताच्या मंडपात शिरलो. माझ्या हस्ते या हॉटेलचे उद्‌घाटन झाले, सर्वांनी फार दक्षतेने मला जेवू घातले. मी पैसे दिले, बक्षीस दिले, व शुभेच्छा व्यक्त करून निघालो.

हजार फूट घेराचा वटवृक्ष

सकाळी आठ वाजता कटकहून निघून अडीच वाजता म्हणजे साडेसहा तासांत तीनशे मैल प्रवास करून कलकत्त्याला पोहोचलो. प्रयोग करून पाहावा

म्हणून मी येथील डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट (जिल्हाधिकारी) यांच्याकडे गेलो. मी सांगितले, " सध्या कलकत्त्यात दंगे होत आहेत. तेव्हा माझ्या व या वाहनाच्या सुरक्षिततेसाठी येथील पोलिस क्लब किंवा तत्सम जागेत माझी राहण्याची सोय होईल का ? " तेव्हा ते उद्गारले, " अशा प्रकारे कोणी मला भेटल्याचे व संरक्षण मागितल्याचे यापूर्वी घडलेले मला आठवत नाही. येथे अनेक हॉटेल्स आहेत. आपण कोठेही उतरू शकता. " अपेक्षितच उत्तर मिळाले होते ! तेव्हा हसत हसत मी बाहेर पडलो. एक अनुभव घेतल्याचा मला आनंद झाला होता.

शहराच्या भरवस्तीच्या ठिकाणी मी एका हॉटेलमध्ये उतरलो. आंघोळ वगैरे उरकून सायंकाळी बाहेर पडलो. रस्त्यावर गर्दीच्या लाटा उसळत होत्या व लोक गटागटाने चर्चा करीत होते. त्याच दिवशी शहराच्या एका वस्तीतून गव्हर्नर श्री. धर्मवीर यांची गाडी जात असता लोकांनी दगडफेक करायला सुरवात केली होती. पोलिसांनी अश्रुधूर सोडून हवेत गोळीबार केला होता.

संध्याकाळी सुरत येथे ओळख झालेल्या सुरती मोढ जातीच्या एका तरुण मित्राला भेटलो. त्याने व त्याच्या मित्रांनी अत्यंत आग्रहाने मला आपल्या घरी नेले. हॉटेलमधून सामान आणले व कौतुकाने पाहुणचार केला. त्रिवेन्द्रम येथे झालेल्या जखमा समुद्रात पोहणे, पावसात भिजणे, एकसारखी धावपळ व अत्यंत थंडी यांमुळे महिना झाला तरी भरून निघाल्या नव्हत्या. म्हणून डॉक्टरांकडे गेलो. जखम साफ होत असताना एक गृहस्थ ती पाहून घेरी येऊन पडले. कलकत्ता येथील चार दिवसांच्या वास्तव्यात मला बराच शारीरिक व मानसिक आराम लाभला.

कलकत्ता येथील ' टूरिस्ट ब्यूरो 'मधून काही नकाशे घेतले व रस्त्यांची माहिती विचारून घेतली. तेथील आरामगाडीची कार्यक्रमपत्रिका मिळवून मी सर्व प्रेक्षणीय स्थळे पाहिली. पूर्वी १९६४ सालीदेखील मी येथे राहून गेलो होतो. येथे पुढील स्थळे प्रेक्षणीय आहेत. स्वामी विवेकानंद स्थापित बेलूर मठ, त्यांचे गुरू श्री रामकृष्ण परमहंस पूर्वी राहात असलेले दक्षिणेश्वर मंदिर, कालीघाटावरील कालीमाता मंदिर, काचेचे जैन मंदिर, लाल दगडाचे दिगंबर जैन मंदिर, संग्रहालय, उद्यान व प्राणिसंग्रहालय, पार्क मैदान, विल्यम फोर्ट, व्हिक्टोरिया मेमोरियल,

कलकत्ता येथील मुख्य बाजार, चौरंगी– जेथे दोन मैलांच्या रस्त्यावर प्रमुख क्लब, दुकाने व प्रसिद्ध हॉटेल्स आहेत, व आधुनिक पद्धतीचे 'न्यू मार्केट' आहे, नॅशनल लायब्ररी, जुने सेंट जॉन चर्च, नाखोदा मस्जिद, संगमरवरी महल, बोटॅनिकल गार्डन, व हल्लीचे नवे आकर्षण व अत्यंत प्रेक्षणीय असे बिर्ला प्लॅनेटोरियम.

येथील बिर्लाचे प्लॅनेटोरियम न पाहता जो परतला त्याने कलकत्ता पाहिले नाही असे म्हणावे लागेल. पं. जवाहरलाल नेहरू जेव्हा जेव्हा कलकत्त्याला यायचे, तेव्हा मुद्दाम वेळ काढून येथे कार्यक्रम पाहून यायचे. येथे गोल प्रेक्षागृह आहे. आत संपूर्ण अंधार करण्यात येतो, व वरील अर्धगोलाकार सीलिंग व भिंतीवर खास प्रोजेक्टरने चित्रपट दाखविण्यात येतो. हा चित्रपट आकाश व तारे यासंबंधी असतो. आपण एकटेच भल्यामोठ्या मैदानात बसलेलो असून क्षितिजापासून आभाळाकडे पाहात आहोत, असा येथे भास होतो. पुणे येथील प्लॅनेटोरियमपेक्षा हे अनेक पटींनी मोठे आहे. असे प्लॅनेटोरियम दुसरीकडे पाहावयास मिळत नाही.

बोटॅनिकल गार्डनची स्थापना १७८६ साली झाली होती. तेथे १७० वर्षांचे जुने वडाचे झाड आहे. त्याचा एक हजार फुटांचा परिघ आहे, व खांब उभारावेत अशा अनेक शाखा जमिनीत रुतलेल्या आहेत. शहराच्या वस्तीप्रमाणे येथील वस्तु-संग्रहाल्यात वस्तूंची गर्दी झाली आहे. जेवण करून सकाळी अकरा वाजता मी आत गेलो होतो व पाच वाजता बंद होताना बाहेर निघालो. इतके भव्य हे संग्रहाल्य आहे. येथील कालीघाटावर एका पंड्याने बळजबरीने बरोबर येऊन मार्ग दाखविला व सव्वा रुपयाची मागणी केली. त्याच्या हातावर दहा पैसे टिकविल्यावर तो बघतच राहिला. मीही टक लावून एक मिनिट पाहिले, व मी पुण्याचा आहे, असे सांगून पाठ फिरविली. न्यू मार्केट पाहून आनंदमिश्रित आश्चर्य वाटले. तेथे घरगुती उपयोगाची कोणती वस्तू मिळत नाही असे नाही. त्या भल्यामोठ्या मार्केटमध्ये मी तासन्‌तास फिरलो. भूक लागल्यावर तेथेच अल्पोपाहार घेतला व बसावेसे वाटल्यावर फर्निचरच्या दुकानातील सोफा इत्यादींवर आराम केला. प्रसिद्ध बंगाली मिठाईच्या सर्व प्रकारांचा आस्वाद घेतला, व नित्य-नियमाप्रमाणेच जेवण टाळले.

मी कलकत्ता सोडण्याच्या आदल्या दिवशी येथील हिंदी वर्तमानपत्र ' विश्वामित्र 'चा बातमीदार भेटला. संपादकांच्या आमंत्रणावरून मी प्रेसला गेलो. त्यांनी अभिनंदन केले, व आल्यावर ताबडतोब मी स्वतः भेटलो नाही, याबद्दल खेद व्यक्त केला. त्यांच्या एका मंडळातर्फे सत्कार करण्याची त्यांची इच्छा होती, परंतु मी विमलाबेन इत्यादींच्या आग्रहामुळे दोनचे चार दिवस करून राहिलो होतो. जास्त राहणे योग्य नव्हते.

तारीख सतरा जानेवारीला मी सकाळी कलकत्त्याहून निघालो व शान्तिनिकेतनकडे प्रवास सुरू केला.

● ● ●

१३ : हिमालयाचे पहिले दर्शन

शान्तिनिकेतनच्या वातावरणात

अनेकांच्या आग्रहास न जुमानता मी कलकत्ता सोडले व पुढे झालो. राहून राहून एकेकाचे शब्द आठवत होते. कलकत्ता येथील वर्तमानपत्रात दार्जिलिंगमध्ये होत असलेल्या हिमवर्षावाच्या बातम्या प्रसिद्ध होत होत्या म्हणून मी दार्जिलिंगला जायचे टाळावे, असा सर्वांचा आग्रह होता. सतरा जानेवारीच्या त्या सकाळी गुलाबी थंडीत माझी गाडी शान्तिनिकेतनकडे भर वेगाने धावू लागली. १३५ मैल प्रवास करून शान्तिनिकेतन पाहून दार्जिलिंगच्या वाटेवर पुढे प्रवास करावयाचा असा विचार होता.


ग्रॅन्ड ट्रंक रोडने मी जात असता वाटेत एका खेड्यात मेळा पाहिला. प्रौढ स्त्री-पुरुष तोंडात पानाचा विडा ठेवून खिदळत इतस्ततः भ्रमण करीत होते. अनेक तरुण कागदी पिंगाणी घेऊन गोंधळ माजवीत होते. प्राचीन मानण्यात येत असलेल्या एका शंकूच्या आकाराच्या बांधकामावर जिन्याने अनेक लोक चढून जवळपासच्या सौन्दर्याचे दर्शन घेत होते. खेळणी व मिठाईची दुकाने त्यांच्या कल्पनेप्रमाणे सुशोभित केली होती. येथे सुशिक्षितांना अपरिचित पण ग्रामीण भागातील लोकांना सुपरिचित अशा ' गुडीशेप 'सारख्या पदार्थावर लोक मेजवानी करीत होते. एकंदर सर्व प्रकार येथील मेळ्यासारखाच वाटला.

बरद्वान मुख्य मार्ग सोडून भोलपूरकडे निघालो व तेथून तीन मैलांवरील शान्तिनिकेतनला पोहोचलो. सुट्टी असल्यामुळे सर्व काही बंद होते. मैदानात


काही विद्यार्थी क्रिकेट खेळत होते. त्यांच्याजवळ चौकशी करून मी एका अधि-काऱ्याकडे गेलो व त्यास विनंती केली. त्याने मला तेथील चित्रकलाप्रदर्शन, मुख्य इमारत, विद्यार्थ्यांचे वर्ग, बाग इत्यादी शक्य ते सर्व दाखविले व माहिती दिली. मैदानावर मुलींची एन. सी. सी. परेड चालली होती. तेथून मेजरशी ओळख करून दिली. त्यांनीही थोडी माहिती दिली. विद्यार्थी–विद्यार्थिनी मोकळ्या हवेत, मोकळ्या वातावरणात कशा रीतीने साहित्य व कलेचा अभ्यास करीत असतील याची मी कल्पना करू शकलो. पाँडिचेरीला अरविंदाश्रम दोन दिवस वेळ खर्चून पाहिला होता, म्हणून येथे मुद्दाम राहावेसे वाटले नाही. कारण अजून प्रवास पुष्कळ करावयाचा होता. रवीन्द्रनाथ टागोरांना मनोमन आदरांजली वाहून शान्तिनिकेतन येथील वास्तव्य टाकावे लागत असल्याचे दुःख घेऊन मी शान्ति-निकेतन सोडले. शान्तिनिकेतन ते दार्जिलिंग हा रस्ता मागासलेल्या भागातून जात असल्यासारखे वाटते. बेहरामपूर, किशनगंगा व सिलीगुडीशिवाय मध्ये कोठेही चांगली वस्ती, वा शेती, किंवा वनश्री विशेष पाहावयास मिळत नाही. सेऊडी सैंथिया व सुल्तानपूर या मार्गांनी बेहरामपूरकडे जात असता अर्ध्या पाऊण तासाने एखादा ट्रक दिसायचा. बैलगाड्या, सायकलस्वार किंवा पादचारी पण थोडेच. एखाद्या निर्जन मैदानातून जात असल्यासारखे येथे वाटत होते. वाटेत विश्रान्तीची जागा पण दिसली नाही. एकसारखा प्रवासच करीत होतो.

दिवेलागणी झाल्यावर प्रवासात काळजी वाढली. उटी व कोडाइकनलसारखी थंडी येथे होती. वाऱ्याचा वेग वाढताच अंग थरथर कापू लागले. भयानक अंधकार चोहोकडे पसरलेला होता. क्वचित कोणा पक्ष्याची चिवचिव ऐकू यायची. अशा शान्त स्थळी गाडीच्या आवाजाचा प्रतिध्वनी कानी पडून मागून कोणी पाठलाग करीत असल्याचा सारखा भास होत होता. रस्ता अरुंद, खाचखळग्यांचा, नागमोडी होता. गळ्याला वारा लागू नये म्हणून डावा हात सोडून शर्टाचे वरचे बटन लावले व पुन्हा हँडलवर हात ठेवायला जातो तो हॉर्नच्या बटनावर ठेवला गेला. अचानक हॉर्न वाजल्यावर अंगावरून एकच वीज चमकून गेली. स्वानुभवा-खेरीज त्या वेळेची मनःस्थिती समजणे कठीण आहे.


दहा जणांना विचारल्यानंतर बेहरामपूरचा डाक बंगला सापडला, परंतु तेथील रखवालदार सापडायला अंदाजे एक तास लागला. त्याने मला चांगली मदत केली



कलकत्ता येथील पारसनाथ मंदिर : श्वेतांबर जैनांचे हे मंदिर असून विविध रंगीत कांचा वापरल्या आहेत. समोर फवारा, तलाव असून आजूबाजूला सुंदर बाग आहे.



विजयवाडा



डोंगराआडून रस्ता वळताच असं दृश्य दिसतं. नदी, पूल, समोर डोंगर यामुळे या स्थळाला विशिष्ट शोभा आली आहे. सायंकाळी अनेक नागरिक येथे फिरावयास येतात.

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण.



गंगटोक येथे स्वागत

गंगटोक : सिक्किम राजघराण्यातील या कुमारीने लेखकाच्या साहसाचे कौतुक करून मेजवानी दिली.

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण

व आवश्यक ती सोय केली. गरम गरम पाण्याने आंघोळ करून कपडे बदलले व एक मैलावरील गावात जेवणासाठी गेलों. थंडीने अंग कापत होते. म्हणून तिचा परिणाम नाहीसा करायला मी ' डबल अप् ' करीत गावात शिरलो. एक, दोन, तीन, चार, पाच हॉटेले– पण कोठेही चांगले शाकाहारी जेवण नव्हते. सबंध दिवस चहा, दूध व फलाहार घेऊन काढला होता. पोटभर जेवण घेतले नाही, तर चांगली झोंप लागणार नाही असे वाटले. कॉलेजचे मेस आठवले. तेथे प्रयत्न करावा असा विचार केला, परंतु ते फार लांब होते. आधीच मी दोन ते अडीच मैल पायी हिंडलो होतो, व तेवढे परत जावयाचे होते. अखेर एका हॉटेलमध्ये दहीभात घेतला व बरोबर रसगुल्ला, कालजाम (गुलाबजामसारखे मिष्टान्न), फलाकंद वगैरे खाऊन परतलो.

पहाटे सहा वाजता उठलो. थंडीचा लवकर प्रवास करणे कठीण होते, म्हणून सुरतवालाला पत्र लिहावयास बसलो. गेल्या काही दिवसांत पत्र लिहिणे जमले नव्हते, म्हणून आठवणीने मन बेचैन झाले होते. काळजीपूर्वक पत्र लिहिले, परंतु शहर सोडून पाच मैल गेल्यावर पत्र टाकण्याची आठवण झाली. एका बैलगाडीवाल्याजवळ ते दिले व न विसरता पोस्टात टाकण्यासाठी पुन्हा पुन्हा बजावले.

फरक्का बेरेक हे पहिलेच स्थळ असे होते की जेथे मला मोटरसायकल बोटी-तून दुसऱ्या काठावर न्यावी लागली. अनेक गाड्यांची रांग लागली होती, व बोट एकच होती. सामान चढविण्या-उतरविण्यात पुष्कळ वेळ जायचा, म्हणून मला समोरचा काठ गाठायला तीन तास उन्हात ताटकळत उभे राहावे लागले. बोटीत मला अहमदनगरचे एक वृद्ध गृहस्थ भेटले. अनेक दिवसांनी प्रिय मराठी भाषा ऐकायला व बोलायला मिळाली याचा मला विशेष आनंद झाला. नानाविध आनंदातून हा आगळा आनंद अनुभवावयास मिळाला.

पैलतीरी बिहारच्या लोकांच्या खाणावळी होत्या. फ्लॉवर, टोमॅटो, व बटा-ट्याची मिश्र भाजी मनासारखी तयार करवून घेतली. तुपातील पराठा, भाजी, गरम भात, आमटी, व वर लोणी– असा आवडता आहार मिळाल्यावर अंग थोडे

जड झाले. झोपावेसे वाटले, परंतु ते परवडणारे नव्हते. धुतलेला हात वाळतो तोच दार्जिलिंगच्या दिशेने गाडी वळवली. अंगातील आळस झटकून 'जवाना'-प्रमाणे वागण्याचे अंगवळण मी या प्रवासात स्वतःला लावले खरे !

अमेरिकन सैनिकाची पुनः भेट

किशनगंजच्या अलीकडे १९ मैलांवर चांगला रस्ता लागला व मला 'हायसे' झाले. तोपर्यंत येथील सायकलस्वारांनी माझ्या मनात चांगलीच धास्ती निर्माण केली होती. पाण्यात काही मासे ज्याप्रमाणे एकसारखी शेपटी हालवीत 'डग्' खात असल्यासारखे पोहतात व अचानक वळून दुसऱ्या दिशेला जातात, हवेत उडणारा पतंग वाऱ्याचा वेग कमी झाल्यावर जसा 'लप्' खातो, अगदी त्या-प्रमाणे येथील सायकलस्वार झटदिशी वाटेल त्या दिशेला वळतात. इलेक्ट्रॉनिक कंट्रोलवर उडणारी रॉकेटदेखील दिशा बदलताना याच्याहून अधिक सौम्य आचरण करीत असतील.

अंधारात दार्जिलिंगचा घाट चढणे इष्ट नव्हते, व सृष्टिसौन्दर्य पाहण्याचा आनंद लाभणार नव्हता. म्हणून मी सिलीगुडीला मुक्काम केला. पाच-सहा हॉटेल-मध्ये खोल्या पाहिल्या, परंतु दर जास्त होते, सोयी कमी होत्या, व मला फक्त रात्रीपुरतीच सोय हवी होती, म्हणून अखेर मी झेड. पी. च्या बंगल्यावर गेलो. तेथे एका परदेशी पाहुण्याला पाहून मी चक्क ओरडलोच... "Hollo Mr. Ridqlay ! I am extremely glad to see you again." त्यानेही मला ओळखले. मी बंगलोरजवळील श्रवणबेलगोळला गेलो असता आमची भेट झाली होती. नाव व पत्ते यांची देव-घेव झाली होती. आम्हा दोघांसही पुष्कळ आनंद झाला. आम्ही हाताने तेथे स्वयंपाक केला, जेवलो, व रात्री उशिरापर्यंत गप्पा मारीत बसलो. अमेरिकेतील तो तरुण सैनिक मायदेशी परतत होता. परतताना काही राष्ट्रे पाहावीत असा त्याचा मानस होता. माझ्या सल्ल्यावरून दार्जिलिंग व सिक्कीमला पण त्याने मला साथ दिली.

सिलीगुडीपासून तीनएक मैलांपासून दार्जिलिंगचा घाट सुरू होतो. ७७ किलो-मीटरचा घाट म्हणजे एक परीक्षाच आहे. सुरुवातीलाच तीन ट्रकमधून १६–१७ वर्षांची मुले जाताना दिसली. लालबुंद टवटवीत चेहरे, व गुबगुबीत गाल पाहून

आनंद झाला. आश्चर्याने साथ दिली. त्याचे कारण असे की, त्या सर्वांनी सैनिकी गणवेष धारण केला होता, व प्रत्येकाच्या हातात रायफली होत्या. या कोवळ्या मुलांना पाहून मला तत्क्षणी श्री. यशवंतरावजी चव्हाणांची आठवण झाली. ते संरक्षणमंत्री असताना पाकिस्तानशी युद्ध संपल्यानंतर पुण्याला आले होते. भाषणात ते म्हणाले होते... "युद्ध ही फार गंभीर गोष्ट आहे. सुंदर झाडांवरील ताजी व सुंदर सुंदर फुले आम्हांला या रणचंडीला वाहावी लागतात— तेव्हा विजयश्री मिळते." या शब्दांची आठवण झाली. या सुंदर सुकुमारांना पाहून मला सुंदर फुलांची आठवण झाली.

घाटाचा रस्ता सापाच्या वळणाचा आहे. एकसारखी वळणे लागत असल्यामुळे टक लावून दक्षतेने गाडी चालवावी लागायची. थोड्या थोड्या अंतरावर रेल्वेचे फाटे ओलांडून जावे लागायचे, तेव्हा वेग कमी केल्याशिवाय गत्यंतर नसायचे. कारण त्यावरून चाक घसरायची भीती होती. परंतु चढ चढण्यासाठी वेग जास्त देणे आवश्यक व्हायचे. या विषमतेमुळे क्लच, ॲक्सिलरेटर, गिअर, लिव्हरब्रेक्स यांच्यामध्ये एकसारखा बदल करावा लागत असे. हातापायाची हालचाल भराभर करावी लागायची. वर गेलो तसतशी दरी जास्तच खोल दिसू लागली. खालीवर पाहात सृष्टीचे निरीक्षण करीत मी कुर्सींगला आलो, आणि 'गौरीशंकर' नावाच्या चहाच्या मळ्याजवळ थांबलो. 'स्वर्गाची शिडी' असा शब्दप्रयोग अनेक पुराणदंतकथांमध्ये वाचलेले आठवले. 'The land of the white Orchid' म्हणून इंग्रजांनी गौरविलेले हे कुर्सींग सिलीगुडीहून ५२ कि. मि. असून, ४८६४ फूट उंचीवर आहे. येथे बौद्धांचे सुंदर मंदिर आहे. अनेक देवालये आहेत. येथे मी दोन तास थांबलो व सारखा फिरत राहिलो. दार्जिलिंगचे आकर्षण अधिक मोठे असल्याकारणाने मी मन घट्ट करून पुढे निघालो.

धुक्यातून ढगामध्ये प्रवेश

चुनाभट्टीपासून थंडीला सुरुवात झाली. नेहमीच्या कपड्यांमध्ये येथील थंडी किती तीव्र असते, याचा अनुभव यावा म्हणून मी स्वेटर, मफलर किंवा हाताचे मोजे घातले नव्हते. पुढे निघालो तसे हात पाय गारठू लागले, व थरथर कापू लागले. दार्जिलिंगहून दहा मैलांवर मी धुक्यातून ढगामध्ये प्रवेश केला. जेमतेम

१२–१५ फूट अंतरापर्यंतचे पाहू शकत होतो. गाडीचा वेग फारच धीमा करावा लागला. हाताची बोटे लाकडासारखी गारठली. अधूनमधून एक एक हात सोडून मी चालू गाडीवर मांडीवर बोटे मोडून सांधे मोकळे करून घ्यायचो. डाव्या हाताचा क्लच व उजव्या हाताच्या ब्रेकचे लिव्हर अत्यंत थंड झाल्यामुळे बोटांना जणू काही थंडीचे चटकेच बसत होते. त्यावर थोडीशी बोटांची हालचाल झाली की जखमेवर काही तरी घासल्यासारखे व्हायचे. बोटातील आंगठीवर दाब देताच बोट बर्फाशी घट्ट बांधल्याचा भास व्हायचा. थंडीने पाय लटपटू लागले होते, म्हणून ते हवेत झटकून ऊब निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होतो. दोन्ही कानांवर बर्फाच्या शिला बांधल्याचा भास होत होता. जखमेवर मीठ टाकावे त्याप्रमाणे झालेली उघड्या कातडीची आग आग मी कधीच विसरू शकणार नाही. नाकातून एकसारखे पाणी गळू लागले ते लहान मुलाप्रमाणे मी हाताने पट्दिशी पुसून टाकायचा. हात सोडल्यावर गाडीचा तोल जाऊन दरीत पडण्याचीही भीती होती.

राहून राहून नेफा सरहद्द व नथूला खिंड आठवू लागली. तेथे बारा महिने व चोवीस तास बर्फात राहणारे जवान आठवले. या भयंकर थंडीत क्लच, ॲक्सिलरेटर व पुढचा ब्रेक पकडणे मला कठीण झाले होते, तर तेथे चीनचा हल्ला झाला असताना जवानांनी रायफली कशा चालविल्या असतील, अवजड लोखंडी हत्यारे सांभाळून युद्ध करणे वा सर्व साहित्यानिशी बर्फातून पळणे, पळता पळता पाय घसरून पडल्यावर, वस्तू अंगावर आदळल्यावर त्या वेदना सहन करून, दुष्मनावर हल्ला करणे हे किती अवघड आहे, याची मी कल्पना करू लागलो. "वे शहीद हुए हैं, जिनकी जरा याद करो कुर्बानी" हे गीत आठवले व लहानपणापासून मला अत्यंत प्रिय असा लता मंगेशकर यांचा सुरेल आवाज आठवला.

दार्जिलिंगपासून चार मैलांवर असलेल्या 'घूम'ला पोहोचताच सर्व लोक आश्चर्याने धावून आले. पावसाच्या बारीक सरी पडल्यामुळे कपडे थोडे ओले झाले होते. आबालवृद्ध माझ्याकडे पाहून डोळ्यांनी आश्चर्य व्यक्त करीत होते व आपापसांत काही बोलत होते. मी एका हलवायाच्या दुकानी जाऊन भट्टीसमोर उभा राहिलो. काही मिनिटांनी अंगाचा थरकाप थांबला. घूम दार्जिलिंगपेक्षा ६० फूट उंचीवर आहे.

गरम चहा व थोडा नाश्ता घेऊन मी भट्टीसमोर बसलो. हलक्या सरी व वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे बाहेर पाय टाकावा असे वाटत नव्हते. दीड तासानंतर पाऊस थांबला व सुदैवाने लख्ख ऊन पडले. धूम ते दार्जिलिंग चार मैलांचा प्रवास थांबत, पाहात, व धीम्या गतीने फार सुखासमाधानाने पूर्ण करून मी शहरात प्रविष्ट झालो.

टूरिस्ट ब्यूरोच्या रिसेप्शनिस्टच्या सल्ल्याप्रमाणे मी श्रीमती शॉ यांच्या स्टुअर्ट लॉजमध्ये उतरलो. श्रीमती शॉंचे वय ५०–५५ वर्षांचे आहे. त्यांच्या घरात त्या एकट्याच असल्याकारणाने राहण्याची सोय करून देतात व आपुलकीने पाहुणचार करतात अशी त्यांची येथे ख्याती आहे. त्यांच्याशी गप्पागोष्टी केल्यानंतर मला फार बरे वाटले.

स्वेटर, मफलर, हातमोजे इत्यादी चढवून मी निघालो तो संध्यासमयीच परतलो. येथे मोटरसायकल ठेवण्याची सोय नव्हती, म्हणून पोलिस स्टेशनवर ठेवून आलो. धुके पुष्कळ असल्याकारणाने रात्री हिमवर्षाव होईल असे लोक बोलत होते. माझ्या खोलीत ‘रूम हीटर’ किंवा ‘फायर प्लेस’ नव्हते. माझ्या खोलीत एक छोटी शेगडी ठेवण्यात आली. पलंगावर दोन गाद्या, त्यावर दोन ब्लँकेट्स अंथरून मी झोपलो व वरती दोन ब्लँकेट्स पांघरूण घेतले. परंतु थंडीचा कडाका फार होता. शेगडी फुंकून, शेक घेऊन दमल्यावर रात्री १ वाजता झोप लागली.

" घाबरून, गोंधळून मी उठलो तेव्हा साडेतीन वाजले होते. सबंध खोली कोल-गॅसने भरून गेली होती. श्वसन अत्यंत कठीण झाल्यामुळे माझी झोप उडाली होती. मी खाड्कन पाठीमागचे दार उघडले व अंगातून एकच थंडीची वीज चमकून गेली. भर्रर्रकन वारा आत आला. बाहेर पाहिले व माझे आइस्क्रीमच झाले. चोहोकडून बर्फच बर्फ पसरला होता. हिमवर्षावाने सबंध रस्ते व घरांची छपरे झाकून टाकली होती. थंडी असह्य होती. मी दार लावून घेतले व शेगडी-जवळ शेक घेऊ लागलो. थंडी व कोलगॅसने मला हैराण केले होते.

सकाळचे ११ वाजत आले होते. परंतु डोकेदुखी थांबली नव्हती. रात्रीची आठवण झाली की अंगावर काटे यायचे. दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या लोकांचे स्मरण

झाले. सरहद्दीवरच्या जवानांचे स्मरण झाले. किती कष्टमय जीवन आहे येथील लोकांचे ! असा विचार मनात येताच नकळत डोळ्यांतून दोन थेंब बाहेर आले.

बाहेरची शुद्ध हवा मिळाल्यावर बरे वाटेल म्हणून बाहेर पडलो. दोन-चार मैल हिंडलो फिरलो, व 'होटेल ग्लीनरीस'मध्ये बसून काचेच्या खिडक्यांतून शुभ्र 'कांचनगंगा'चे दर्शन करीत येथेच्छ भोजन घेतले. तेथेच बसून हिमालय, निळे आकाश, पांढरे ढग, हिरवे निळे मळे, व फळांची बाग, डोंगराच्या उतारावरील खेळण्यासारखी दिसणारी घरे, व मातीच्या चित्रांप्रमाणे दिसणारी माणसे, बॉंबर विमानाप्रमाणे दरीत झेप घेणारे पक्षी व घिरट्या घालीत उंचउंच जाणारे पक्षी— या सर्वांचे निरीक्षण केले. मन प्रसन्न झाले. गरम कॉफी घेतल्यावर उत्साह वाढला व मी दार्जिलिंगची रम्य प्रेक्षणीय स्थळे पाहावयास निघालो.

डेअरी कोरेच्या कामासाठी प्रसिद्ध असे कॅवेन्टर्स फार्म पाहिले. पाणीपुरवठा करणारा सहा मैलांवरील सीचल तलाव, धूम येथील बौद्ध मंदिर, बटासा रेल्वे कूप, परंधाम मंदिर, हस्तकौशल्य व कलाकृतींचा संग्रह असलेली 'आवा' आर्ट गॅलरी, चौरास्ताजवळील स्टेप असइड— जेथे देशबंधू चित्तरंजन दास यांचा मृत्यू झाला ते स्थळ, कांचनगंगाचे सौन्दर्य पाहण्याचे सुंदर स्थळ, ऑब्झर्व्हेटरी हिल, वनस्पती संग्रहालय, हिमालयाच्या परिसरात वावरणाऱ्या जनावरांचे संग्रहालय, हिमालय आरोहणाची शिक्षण संस्था, श्रीमंदिर, लॉइड बोटॅनिकल गार्डन, चहाचे मळे असलेली 'हॅपी व्हॅली' व जगातील सर्वांहून अधिक उंचीवर असलेले व छोटे म्हणून ख्यातनाम असे लेब्रोंग येथील रेसकोर्स इत्यादी सर्व प्रेक्षणीय स्थळे पाहिली. दार्जिलिंगचे 'नाक' असा उल्लेख करता येईल अशा टायगर हिलवर जाण्यासाठी चांगल्या हवामानाची वाट पाहू लागलो.

आनंदाने मन थयथय नाचले

पहाटे पावणेपाचला बाहेर पडलो. गाडीच्या सीटवर पडलेल्या दवबिंदूंचा बर्फ झाला होता. गाडी चालू केली व थंडी मी म्हणत असताच मी टायगर हिलच्या रोखाने निघालो. साधारण प्रकाशात आजूबाजूचा भाग दृष्टीस पडत होता व दिव्याच्या साहाय्याने मी टायगर हिल चढू लागलो. गाडी वरपर्यंत पोहोचू

शकली नाही. चढ फार होता म्हणून पायीच वर गेलो. समोर दृष्टिक्षेप करताच डोळ्यांचे पारणे फिटले, भुवया उंचावल्या, विस्मय व आनंदाने तोंडातून प्रशंसेचे उद्‌गार आपोआप बाहेर पडले! माझ्यासमोर काही मैलांवर कांचनगंगा व एव्हरेस्ट स्पष्ट दिसत होते. आभाळातील ढग खाली दऱ्याखोऱ्यांत झोपी गेले होते व ते विश्रान्ती घेत असता या पर्वताचा पृष्ठभाग उघडा पडून स्पष्ट शुभ्र दुधासारखा दिसत होता. माझ्या आयुष्यात मी प्रथमच हिमालयाचे प्रत्यक्ष दर्शन घेत होतो. आनंदाने मन थयथय नाचत होते. हळूहळू सूर्याची कोवळी सुवर्ण-किरणे त्या पर्वतावर पडू लागली व ते पर्वतदेखील सोनेरी किरणांनी न्हाऊन निघाल्यामुळे सुवर्णरंजित झाले. अलभ्य लाभ मिळाल्याचा कोण आनंद झाला होता म्हणून सांगू! जसजशी सूर्याची किरणे गिरिशिखरावरून तळाकडे धावू लागली, वातावरणातील थंडी कमी होत गेली, दरीत झोपलेले ढग आळस झटकून गगनाच्या दिशेने धावू लागली, त्यांच्या आडोशाला पर्वतमालेचा शिरोमणी एव्हरेस्ट होत असताना मी पाहिला,– व नंतरही मी तासन्‌ तास त्या दिशेला पाहात राहिलो.

दार्जिलिंगहून सिक्कीमच्या मार्गाने जात असता वाटेत पाऊस पडला म्हणून परतलो व धूमच्या त्या हलवायाकडेच मुक्काम केला. तेथील शैलाश्रा या सरकारी होटेलमध्येदेखील फायर प्लेस नव्हती. म्हणून त्या दुकानातच रात्र काढली. ती रात्रदेखील मी आजन्म विसरणार नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी लख्ख ऊन पडले. गुलाबी थंडी व ऊन यामुळे प्रवास फारच आल्हाददायी झाला. तिस्ता नदीच्या काठचे तिस्ता गाव १४०० फूट उंचीवर आहे. त्यामुळे ५५०० फूट उतरून मला जावयाचे होते. मी केलेल्या सबंध प्रवासात सर्वांत अधिक उतार या घाटात आहे. उतार इतका होता की गाडीच्या सीटवरून अंग हळूहळू पुढे सरकायचे व कष्टाने समतोल ठेवावे लागायचे.

तिस्ता नदी पार केल्यावर २० मैलांनंतर सिक्कीमची सरहद्द लागली. रेंगपो येथे थोडा वेळ थांबलो व सिक्कीमच्या हद्दीतून गंगटोककडे प्रवास सुरू केला. रस्ता नादुरुस्त असल्यामुळे अनेक ठिकाणी त्रास झाला. गंगटोक ५५०० फूट उंचीवर असल्यामुळे चढ एकसारखा होता. गंगटोकपासून १० मैलांवर पाऊस

जोराने सुरू झाला. सर्वांग व सर्व सामान भिजले. सुदैवाने येथे दार्जिलिंगसारखा गार वारा नव्हता. गंगटोकला पोहोचल्यावर तासानंतर उतरण्याचे स्थळ निश्चित झाले व मी ग्रीन हॉटेलमध्ये मुक्काम केला.

गंगटोक अत्यंत सुंदर, मनोहर व आल्हाददायी छोटे शहर आहे. दार्जिलिंगच्या मानाने वस्ती फारच कमी आहे. लोक भोळे, मागासलेले, पण प्रामाणिक व देखणे आहेत. सिक्कीमच्या राजाने अमेरिकन स्त्रीशी लग्न केल्यापासून येथे राहणी बदलत चालली असावी. थिएटरास अनेक वर्षांपासून नाकारलेली परवानगी दोन वर्षांपूर्वीच मिळाली व एक नवे थिएटर निर्माण झाले. डोंगरखोऱ्यांचा हा प्रदेश संरक्षणाच्या दृष्टीने कठीण आहे. गंगटोकहून समोर तीन मैलांवर हिमाच्छादित पर्वतमाला दिसते. येथून पुढे कोणालाही भारतीय सेनाधिकाऱ्याच्या परवान्याशिवाय जाता येत नाही. नथूला खिंड १४,००० फूट उंच असून चीनच्या सरहद्दीवर आहे.

सव्वीस जानेवारीस येथील जवानांबरोबर तेथे वास्तव्य करावे असा विचार होता म्हणून मी मुद्दाम राहिलो. पोलिटीकल ऑफिसर मेनन, जी. ओ. सी. मेजर जनरल गुप्ता, इत्यादींशी परिचय करून घेतला. सकाळी सर्वांसमवेत ध्वज-वंदन झाले व चहापानाचा कार्यक्रम झाला. श्री. गुप्तांनी मला त्यांच्याकडे येण्याचे खास आमंत्रण दिले, व सरहद्दीवरच्या परिस्थितीची माहिती दिली. येथील राज-घराण्याच्या एका युवतीचे माझ्या मोटरसायकलीवर लक्ष गेले. तिने नोकरांमार्फत विचारपूस करून ग्रीन होटेलला मला आमंत्रण पाठविले. भोजन नुकतेच झाले होते, म्हणून जेवलो नाही. पण तेथे गप्पांमध्ये पुष्कळ वेळ निघून गेला. दुपारचा चहा व अल्पोपाहार आम्ही घेतला. सायंकाळच्या कार्यक्रमाला गेलो. तेथे कटकच्या नृत्यांगना कुमारी कुमकुमदास यांची ओळख झाली. अनेक विषयांवर बोलणे झाले, व फारच प्रेमळ अशा व्यक्तींचा येथे परिचय झाल्याचे मला समाधान लाभले.

गंगटोक येथील २६ जानेवारी १९६८ चा तो सैनिक, सेनाधिकारी, राजघराणे व कलाकार मंडळींच्या सान्निध्यात उत्सवरूपाने साजरा केलेला आनंद-दायी दिवस मी आजन्म विसरणार नाही.

● ● ●

१४ : निसर्गरम्य सिक्कीममध्ये

नथुला खिंडीतील कडक थंडी

गंगटोकच्या समोरील पर्वतावर रोमटेक आहे. हे भारतातील सर्वात मोठे बौद्ध मंदिर. भारतातील असे म्हणावयाला हरकत नाही, असे मला वाटते. कारण सिक्कीम तसे जरी स्वतंत्र असले तरी चीनपासून संरक्षण मिळविण्यासाठी भारतीय सैन्याची मदत त्यांनी घेतली आहे व बहुअंशी प्रदेश आपल्या सेनेच्या ताब्यात आहे. या भागात सिक्कीम नागरिकांनादेखील भारतीय सेनाधिकाऱ्यांच्या परवान्या-शिवाय जाता येत नाही. सैन्याने व्यापलेल्या प्रदेशात सिक्कीम दरबार व भारतीय सेनाधिकारी असे दोन परवाने लागतात.

सिक्कीम व चीन यांच्या सरहद्दीवरील नथूला खिंड ही बारा महिने बर्फमय असते. या थंडीत मद्यपान केल्यास रक्तवाहिन्यांतून रक्तस्राव होतो व माणूस अल्पावधीत मृत्युमुखी पडतो. त्यामुळे सैन्याला अशा हवामानात राहण्याचा सराव करावा लागतो, असे मेजर जनरल गुप्ता म्हणाले. मला माहिती सांगताना ते म्हणाले, " आम्ही पाच पाच मैलांच्या अंतरावर पडाव टाकतो. क्रमाक्रमाने पंधरा पंधरा दिवस सैनिक राहात गेला म्हणजे त्याला या हवामानाचा सराव होतो, व अखेर नथूला येथे राहण्याची त्याची तयारी होते." या केन्सवरने जात असता मला वाटेत अनेक सैनिक डोक्याला घट्ट फेटा बांधून हिंडत असताना दिसले. थंडीमुळे डोके इतके दुखते की आवळून बांधून ठेवावे असे वाटते. त्यामुळे डोके-दुखीचा ताण जाणवत नाही. या भागातील व्यवस्थेबद्दल फार गुप्तता ठेवली जाते.

गंगटोकमध्ये बहुतेक व्यापारी दिल्लीकडचे अग्रवाल, जैन यांपैकी आहेत. येथे कोणताही व्यापार सुरू केल्यास इतर कोणत्याही भागापेक्षा अधिक सुखाने करता येईल असे मला वाटले. मोटरसायकलीच्या फोकसच्या काचेची किंमत येथे १५ रु. होती. पुण्याला ती अडीच ते तीन रुपयांपर्यंत मिळते. भारतीय सेना आल्यापासून वस्तू महागल्या असे येथील नागरिकांचे मत आहे.

गंगटोकहून बारा मैल दरीत गेल्यावर समोरील पर्वताचा रस्ता सापडला. येथून रोमटेकचा रस्ता फार बिकट होता. जेमतेम एक ट्रक जाऊ शकेल असा. त्यामुळे फार जपून प्रवास करावा लागला. चढ पण कठीण होता. भर उन्हाचा मी रोमटेकला पोहोचलो.

येथील बौद्ध मंदिराचे प्रमुख साधू करमापा दलाई लामाचे वारस मानले जातात. मी गेलो तेव्हा ते त्यांच्या दर्शनाच्या आसनावर बसले होते, व समोरील धर्मनृत्य पाहात होते. उत्सवाच्या दिवशी येथील सर्व साधू समूहनृत्य करतात. हे विशिष्ट प्रकारचे नृत्य आहे. विलंबित लयीमध्ये वाद्ये वाजवितात, व त्याबरोबर सर्व साधू एका खांबाभोवती मोठे वेटोळे करून धीम्या गतीने हात व पायांची हालचाल करतात. एका वेळेला एकच पाय जमिनीवर टेकलेला असतो. दुसऱ्या पायाचे व हाताचे वळण ठराविक वक्रतेने होत असते. आपण जसे योगासन प्राणायाम इत्यादींचे महत्त्व मानतो त्याचप्रमाणे यांची या नृत्यावर फार श्रद्धा आहे. त्यामुळे आध्यात्मिक शक्ती वाढते, अशी त्यांची श्रद्धा आहे

मीठ-लोणी मिश्रित तिबेटी चहा

रोमटेकच्या या मंदिरात माझा आग्रहाने पाहुणचार करण्यात आला. गंगटोकचे पोलिटिकल ऑफिसर श्री. मेनन व त्यांच्या सौ. देखील योगायोगाने तेथे आल्या होत्या. येथे मी तिबेटियन चहा घेतला. तिबेटी लोक चहामध्ये लोणी व मीठ टाकतात. त्यामुळे चहाची चव फार वेगळी लागते. गरम चहामुळे तरतरी मिळते व लोण्यामुळे शरीराला पोषण मिळते, थंडीपासून संरक्षण होते. चहा, बिस्किटे यांचा नाश्ता करून मी उठेपर्यंत नृत्य संपले होते, व करमापा त्यांच्या बैठकीच्या खोलीत येऊन बसले होते. मी त्यांना भेटावयाला गेलो. एका दुभाषाने माझा

परिचय करून दिल्यावर त्यांनी माझी प्रशंसा केली, व त्यांच्या कल्पनेप्रमाणे माझ्या प्रवासातील अनेक अडचणींचा उल्लेख करून विचारपूस केली. मला त्यांनी तेथे दोन तीन दिवस राहण्याचा आग्रह केला. परंतु मी सखेद नकार देऊन माझी अडचण सांगितली. मी त्यांना एक विनंती करीत म्हणालो, "माझे पुण्यातदेखील अनेक बौद्ध धर्मीय स्नेही आहेत. तुमचा व त्यांचा पंथ वेगळा असला तरी तुमच्याकडून मी शुभसंदेश नेऊन पोहोचविला तर त्यांना फारच आनंद होईल..." असे म्हटल्यावर त्यांनी मला तिबेटियन भाषेत एक पत्र लिहून दिले. या तिबेटियन निर्वासितांबद्दल नानाविध विचार घेऊन मी रोमटेक सोडले. परतताना तहान लागल्यावर त्या तिबेटियन चहाची आठवण झाली. दार्जिलिंग येथे रोज सकाळी श्रीमती शॉ चहा करून देत त्या चहाची आठवण झाली. श्रीमती शॉ वापरीत असलेली चहाची पावडर ९० रु. किलो भावाची होती. हे ऐकल्यावर मला आश्चर्य वाटले होते. परंतु तेथे त्यांच्याशी चर्चा करून सत्याचा शोध लागणार नाही, असे वाटल्यामुळे मी गप्प बसलो होतो. मनाशी विचार केला होता की, ही गोष्ट पुण्याला गेल्यावर माझ्या लेखमालेत प्रसिद्ध झाल्यानंतर "वाचकांचा पत्र-व्यवहार" या सदराखाली चर्चेचा विषय होईलच;– तेव्हा याचा खुलासा कुणी चिकित्सक वाचक करतीलच ! म्हणून मी गप्प बसलो होतो.

रेंगपो येथे आल्यावर एका बंगाली स्त्रीने आग्रहाने बोलावले, व चहा पुढे केला. "माझा एक धाकटा भाऊ दिसायला अगदी तुमच्यासारखा आहे" असे म्हणत तिने आपले प्रेम व्यक्त केले. तेथे अंगणात लहान मुलांमध्ये थोडा वेळ खेळून मी निघालो.

तिस्तापासून सिलिगुडीच्या रस्त्यावर सिपोकपर्यंत प्रवास केला व तेथून जल-पैगुरी व कुचबिहारकडे वळलो. आसाम प्रान्तात प्रवेश केल्यावर तेथील कजिरंगा, गौहत्ती, शिलाँग इत्यादी सर्व डोळ्यांसमोर उभी राहिली.

• • •

१२ : कजिरंगा प्राणी–निवास

आसामच्या निसर्गातील विविधता

आसामचे खरे नाव 'असम' आहे. असमचे अर्थ विषम व अद्वितीय असे दोन आहेत. आसाममध्ये 'बोडो' नावाची एक जात आहे, ते लोक 'हाशाम' म्हणतात, व त्यावरूनदेखील आसाम असे नाव प्रचलित झाले आहे. पश्चिम आसामचा भाग सपाट आहे, परंतु बाकीचा सर्व भाग पहाडी आहे.

रस्त्याच्या दुतर्फा गर्द झाडी व उंच उंच बांबूमुळे हा प्रदेश इतर सर्व भागांपेक्षा वेगळा वाटतो. अधूनमधून थोडा भाग धारवाडच्या जंगलासारखा वाटतो. लुशाई व मिक्कीर या पर्वतमालेतील जंगल फारच दाट आहे. चोहोकडे डोंगरावर हिरवी वनश्री दृष्टीस पडते, व सपाट प्रदेशामध्ये हिरवेगार गवत डोळ्यांना आकर्षून घेते.

राजा गौरीनाथने मदत मागितल्यावर इंग्रजांनी येथे पाय रोवला. त्या वेळचा आसाम कसा असेल याची कल्पना करवत नाही. या आधुनिक युगातदेखील हा भाग इतका मागासलेला आहे की, शहरी माणसाला येथे नव्या जगात आल्याचा भास होतो. भारतातील विविधतेचा विचार करता आसाम प्रथम दृष्टीसमोर उभा राहावा, इतके वैशिष्ट्य येथे सामावलेले आहे. चीन व पाकिस्तानच्या धोक्यामुळे रस्ते चांगले तयार करण्यात आले आहेत. तेव्हा प्रवासात मात्र कल्पनेपेक्षा कमी त्रास झाला.

ब्रह्मपुत्रा नदीच्या काठी विकास पावलेले गौहत्ती हे आसामचे प्रमुख व्यापार केन्द्र. चोहोकडे हिरव्या—निळ्या टेकड्यांनी घेरलेले हे शहर ब्रह्मपुत्रेच्या प्रवाहामुळे फारच सुंदर व आकर्षक वाटते. गोहत्ती हे प्राचीन शहर असल्यामुळे येथे अनेक देवळे आहेत. कामाख्या देवी, अस्पकान्ता, वसिष्ठ आश्रम व उमानंद अशी देवळे मध्यावरील एका टापूवर आहेत.

कामाख्या देवीचे मंदिर म्हणजे मान्त्रिक व तान्त्रिकांचा मेळाच म्हणावयाचे. येथे भारताच्या कानाकोपऱ्यांतून मान्त्रिक येतात. मंत्रविद्येचा अभ्यास करतात. येथील पुजारी अशा मान्त्रिकाला त्यांच्या प्रणाम करायच्या पद्धतीवरून बरोबर ओळखतात, व त्यांचा पाहुणचार करून पूजेअर्चेची वेगळी सोय करतात. मंत्रविद्येसाठी हे मंदिर फार प्रसिद्ध आहे.

शिलाँग समुद्रतळापासून ४९०० फूट उंच आहे. येथील प्रदेश इतर भागापेक्षा वेगळा आहे. डोंगराच्या उतारावर पायवाटा फार सुंदर आहेत. पाइन वृक्षांमधून चालत असताना भर उन्हात इतका गारवा अनुभवावयास मिळतो की उन्हाची आच लागत नाही. साधारण चढउतार असलेल्या या भागात अनेक गोल्फ मैदाने आहेत. ही गोल्फ मैदाने उटकमंड व कोडाईकनलची आठवण करून देतात. गौहत्तीपासून ६५ मैलांवरील या शहराकडे जात असताना रस्ता फार सुंदर आहे. अरण्य व हिरवळ यांची शोभा वाढवण्यासाठी दुतर्फा पाइन वृक्ष उभे आहेत. हा रस्ता संपूच नये असे वाटते.

अशा सुंदर मनोहर वनराईत प्रवास केल्यानंतर रूक्ष भागात प्रवास करावा लागला तर कोणाला नकोसा वाटणार नाही ? मनुष्याच्या जीवनात सुखामागून दुःखे व दुःखांमागून सुखे येत असतात असे म्हणतात. त्याप्रमाणे माझेही या प्रवासात अनेक वेळा झाले. एखादा दिवस फारच आल्हाददायी गेला की एखादा रूक्ष जायचा.

आसाममधील कजिरंगा हे प्रसिद्ध अरण्य असून, ते शिवसागर जिल्ह्यात आले आहे. गौहत्तीहून १३० मैल पूर्वेला डोंगरदऱ्यांत अति प्रेक्षणीय अशा या स्थळी अनेक शौकीन प्रवासी येतात. येथे हिंस्र पशूंची शिकार करण्याची सक्त मनाई आहे.

कजिरंगा येथे हत्तींचे कळप मोठ्या प्रमाणात पाहावयास मिळतात. रानटी म्हशी, बैल हे इतके धिप्पाड असतात की पाहिल्या क्षणी ही कोणी वेगळ्या प्रकारची जनावरे असल्याचा भास होतो. गेंडा हा सबंध भारतात येथेच पाहावयास मिळतो. अन्यत्र पाहण्यास मिळत नाही.

कजिरंगा येथे प्रवाशांची राहण्या–उतरण्याची उत्तम सोय आहे. पाळलेल्या हत्तीवर बसवून अरण्यात फिरवितात व हिंस्र पशू दाखवितात. रानात अनेक छोटे मोठे तलाव असून, त्यांत हत्तींचे कळप स्नान– क्रीडांसाठी आलेले व पाण्यात फवारे उडवून आंघोळ करीत असलेले पाहावयास मिळतात. केरळमधील पेरियर सरोवराची आठवण करून देईल असे हे भयानक असून, ते रम्य, मनोहर व आनंददायी असे स्थळ आहे.

गारो, खाँसी, जैंतिया, मिकिर, उत्तर काचार, मिझो हे पहाडी इलाखे व विभिन्न टोळ्या आसाममध्ये आहेत. फक्त नागालँडमध्ये नागा आदिवासी बहुसंख्येने असून, त्यांच्या नागांचे अंगामी, आओ, चाखेसांग, चांग, कोन्याक, यिमचुंग, फोम, खेलियांग, सेमा, रेंग्मा, लोथा, खिएनमुंगन, संगतम् आदी लहानमोठ्या टोळ्या आहेत. अशाच प्रकारच्या इतर भागांतही अशा विविध जमाती असून, त्यांचे रीतिरिवाज, भाषा, राहणी इत्यादी एकमेकांपासून वेगळे आहे. त्या दृष्टीने वैविध्यपूर्ण भारतात हा भाग त्या वैविध्यात अनेकरीत्या भर घालतो.

डोंगराळ वनराई सोडून सपाट प्रदेशात प्रवेश केल्यावर माझ्यावर एक छोटे संकट कोसळले.

थकवा आणणारी विश्रान्ती

रस्ता फार अरुंद असल्यामुळे प्रवासात त्रास झाला. भाग उजाड व निर्मनुष्य वाटला. पंधरा ते वीस मिनिटांनी एखादा ट्रक वाटेत दिसायचा. तहान लागली असताना रस्त्यावर गाडी थांबवून एक फर्लांग आत शेतातील झोपड्यांमध्ये जावे लागले. अशा रस्त्यावर जणू काही देवाने परीक्षा घेण्याचे ठरविले होते. विश्रान्ती-साठी पाच मिनिटे झाडाखाली बसलो. नजर एकसारखी चौफेर फिरत होती.

लांबलांब दृष्टी करूनही कोणी दिसत नव्हते. जमीन वाळून तिला अनेक तडे पडले होते. विखुरलेली काटेरी झाडे व झुडुपे याव्यतिरिक्त कोठेही हिरवळ दिसत नव्हती. चेहऱ्यावर रुमाल फिरविला व झाडाला टेकलो, परंतु काही आराम मिळाल्यासारखे वाटले नाही. इतर ठिकाणी सृष्टिसौन्दर्य पाहतान्न सर्व श्रमांचा विसर पडायचा. पण येथे मात्र थांबणे हे थकवा आणण्यासारखे वाटले. म्हणून उठलो, गाडी चालू केली. छातीत 'धस्स'से झाले. क्षणार्धात कपाळावर घाम फुटला. गाडीचे मागचे चाक पंक्चर झाले होते!

शृंगेरीच्या पुढील जयपूरजवळ असे झाले होते. परंतु सुदैवाने तेथे अरुणाचलम भट्ट व त्यांचे मित्र यांचे साहाय्य मला लाभले होते. त्यांनी माझ्या मार्गदर्शना-प्रमाणे थोडे काम करून माझे श्रम वाचविले होते. एका ट्रकला थांबवून हवेची सोय केली होती. या ठिकाणी जेथे मला विश्रान्तीसाठी थांबणेही आवडले नाही तेथे असा प्रसंग ओढवल्यावर मनाची काय अवस्था झाली असेल बरे?

पुढचे चाक पंक्चर झाल्यास ते चाक काढण्याचा तरी त्रास कमी होतो. परंतु येथे नेमके मागचेच चाक पंक्चर झाले होते. रस्त्याच्या मध्यावरच मांडी घालून बसलो व कोणी येतो का म्हणून वाट पाहू लागलो. संत सखूच्या दळणाला देवाने हात लावला होता– ते आठवले. संत एकनाथासाठी पंढरीच्या रायाने पाणी भरले होते म्हणे. पण "मला मदत करायला परमेश्वराला पंक्चरची प्रॅक्टिस पाहिजे ना! परमेश्वरा, पंक्चरच्या प्रात्यक्षिकाच्या परीक्षेत पास केलेच पाहिजेस हं!" अशी मी मनाशी प्रार्थना केली. छोट्यामोठ्या संकटकाळी मार्ग मिळावा म्हणून मी परमेश्वराची अचूक आठवण करीत असतो. त्या दीनबंधू दुःखहर्त्या देवाचे स्मरण मी "शान्ताकारं भुजगशयनं..." या शुभ श्लोकाद्वारा करून प्रार्थना करतो. त्यापासून नेहमी संकटाला धैर्याने तोंड देण्याचे सामर्थ्य लाभते असा माझा अनुभव आहे.

पूर्वीच्या शिक्षणाचा उपयोग झाला

मी निर्धाराने कामाला लागलो. झाडाला गाडी टेकवून तिरपी उभी केली. बेडिंगमध्ये बांधलेले पंक्चर काढण्याचे सर्व सामान बाहेर काढले. पाना घेऊन

नट फिरवू लागलो. पटापट काम करायचे म्हणून घाई करता करता चार पाच वेळा नटावरचा पाना सुटला, व हात एकदा इथे तर एकदा तिथे जाऊन आपटला. आंगठ्याला व बोटांना मार बसला. थोडे खरचटले, व लक्षात यावे इतके रक्त निघाले. पुन्हा " पंगुम् लंघयते गिरीम् " असे सामर्थ्य असलेल्या परमेशाची आठवण केली व कामाला लागलो.

पूर्वी पुण्याच्या एका प्रसिद्ध रबर कारखान्यात मी अनुभवासाठी तीन महिने इंजिनीयरिंगच्या विभागात काम केले होते. तेथे एक दिवस असा गेला नाही की ज्या दिवशी मी लुब्रिकेटिंग ऑइल व कार्बनने हात पाय व चेहऱ्यावर ' मेकअप ' केले नाही. कामाची हौस फार. एखादा कामगार आळशासारखा वागतो आहे, असे वाटले की त्याला स्फूर्ती दानप्रदान करण्याच्या हेतूने मी त्याच्या हातचा पाना घेऊन चटकन कामाला लागायचो व शक्य तितकी जास्त घाण हाताला लावून घ्यायचो. माझ्या सोयीसाठी ती तेथे असावयाचीही बरीच ! पण त्या प्रामाणिक प्रयत्नाचा भरपूर फायदा मला मिळाला. मुख्य इंजिनीयरांनी माझ्याकडे एका महिन्यात दुसऱ्या पाळीची जबाबदारी सोपविली. तीही यशस्वी रीत्या पार पाडल्यावर त्यांनी मालकांपुढे शिफारस करून त्याच कंपनीच्या नवीन होणाऱ्या दुसऱ्या कारखान्याची नवीन मशिनरी उभारण्याच्या स्वच्छ कामासाठी या घाणीतून उचलून तेथे पाठविले. तेथेही आणखी तीन महिने कामाचा चांगलाच अनुभव घेऊन सहा वर्षांपूर्वी जानेवारी १९६३ अखेरीस नोकरी सोडली ती कायमचीच.

माझ्या उभ्या आयुष्यातील तो सहा महिन्यांचा नोकरीचा काळ म्हणजे विविध अनुभवांचा पर्वतच म्हणावा लागेल. त्यापैकी दुरुस्तीचा अनुभव मला येथे घडला. निघण्यापूर्वी दोन दिवस पुण्याचे श्री. माने यांच्या हाताखाली मोटर-सायकल दुरुस्तीचे धडे घेतले होते. शिवाय माझा मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनीयरिंगचा अभ्यास झालेला, व त्यात ही भर म्हणजे तर्कशुद्ध, शास्त्रशुद्ध इत्यादी शुद्ध बुद्धीने विचार करायची सवय. या सर्वांचा समन्वय झाल्यामुळे मला चाक काढणे फारसे कठीण गेले नाही. परंतु टायर काढता काढता आधीच वाकलेला रॉड आणखी वाकला व मलाही त्याने वाकवून खाली बसविले !

सुदैवाने थोड्या वेळाने एक ट्रक आला. त्याला थांबविण्यात आले. बिहारच्या त्या ड्रायव्हरने मला मदत केली. दणादण घण हाणून (मेकॅनिकच्या भाषेत) त्याने टायर व ट्यूब काढले. त्याला जास्त वेळ थांबणे शक्य नव्हते. म्हणून तो निघाला. मी पुहा विघ्नहर्त्याची आठवण करून हॉटपेच जाळण्यासाठी काडेपेटी-देखील आठवणीने घेतली होती. ती वेळेवर उपयोगी पडल्यामुळे माझ्या दक्षतेबद्दल मला आनंद झाला. दुसरीकडे कोठे पंक्चर नसावे अशी खात्री झाल्यावर मी ट्यूब व टायर पुन्हा बसविले, व हवेसाठी डिझेल ट्रकची वाट पाहू लागलो. हवेचा पंप जड असल्याकारणाने मी बरोबर घेतला नव्हता. शिवाय त्याला श्रम पण पुष्कळ पडतात. हल्लीच्या डिझेलवर चालणाऱ्या ट्रकचे एंजिन कॉंप्रेशन इग्निशनचे असल्यामुळे प्रत्येक एंजिनबरोबर एक एअर कॉंप्रेसर असतोच. त्यातील हवेचा दाब पुष्कळ असल्यामुळे पाइप लावून त्यातून हवा दुसरीकडे भरता येते. त्यामुळे मी पंप घेतला नव्हता.

प्रियकराने उत्कंठेने प्रियतमेची वाट पाहावी (माझी ही केवळ साहित्यिक पोपटपंची आहे) त्याप्रमाणे मी आपल्या ' स्वामी 'च्या सेवेसाठी भर वेगाने धावणाऱ्या एका डिझेल ट्रकची वाट पाहू लागलो. दोन तासानी ' अखेर जमले ! ' आंधळा मागतो एक डोळा व देव देतो दोन, याप्रमाणे एकापाठोपाठ दुसरा पण आला. हवा मिळताच माझी बसलेली छाती फुगली. त्यांना बक्षीस दिले, व " योगक्षेमं वहाम्यहम् "चा पाठ करीत पुढचे पाऊल टाकले.

गाडीचे एंजिन बिघडल्यामुळे व मागच्या चाकाचे बेअरिंग फारच सैल झाल्यामुळे वळणावर गाडी वळविणे फार कठीण जाऊ लागले. यामुळे पुष्कळ इच्छा असूनही मला अति पूर्वेकडील आसामचा प्रवास टाळावा लागला, व मी सिलिगुडीला येऊन मुक्काम केला.

....८

• • •

१६ : बिहारची प्रवासी आकर्षणे

उत्कृष्ट राजमार्गांपैकी एक

सीवोकच्या डोंगर भागातून शेवटचा प्रवास धोक्याचा होता. त्यात भर म्हणून माझ्या मोटरसायकलीच्या मागच्या चाकाचे फौंडेशनचे बुशिंग फारच सैल झाले होते. हजारो मैलांच्या नागमोडी वळणांतून प्रवास केल्याने घर्षणाने ते निकामी झाले होते. वळणावर मागचे चाक सहजतेने वळत नव्हते व क्वचित हादरे बसल्यामुळे तोल सांभाळणेही कठीण जायचे. चाळीस पन्नास फुटांवर सारखी (हेअरपिन) आकाराची वळणे लागायची. अंधार झाला होता, व गाडीचा प्रकाशही कमी होता. रहदारी तर मुळीच नव्हती. अशा परिस्थितीत जेमतेम रात्री पावणे-नऊला सिलिगुडीला परतलो.

आवश्यक बुशिंग तेथे मिळत नव्हते. म्हणून कॅलिपरने माप घेऊन मी स्वतः एका छोट्या वर्क-शॉपमध्ये गेलो व समोर उभा राहून ते करून घेतले. ही व इतर दुरुस्तीची कामे उरकता उरकता सबंध दिवस गेला, म्हणून रात्री तेथेच मुक्काम केला. रात्री बसून प्रवासातील सर्व खर्चाचा हिशोब, पुढच्या प्रवासाची आखणी, अंदाजे मैल प्रवास इत्यादी गोष्टींचा अभ्यास करून टिपण करून रात्री दोन वाजता झोपलो.

सिलिगुडी ते बरौनी हा ३१ क्रमांकाचा राजमार्ग फारच उत्कृष्ट आहे. सबंध भारतातील बोटावर मोजता येतील एवढ्या चांगल्या रस्त्यांपैकी हा एक आहे.

असे मी म्हणू शकेन. वाटेत ॲक्सिलरेटर केबल फिटिंग, स्पार्क-प्लग, सफाई इत्यादी छोटी दुरुस्ती करून मी पूर्णियाला पोहोचलो. बिहार राज्यातील हे एक प्रसिद्ध शहर आहे. पूर्णियाहून काही मैलांवरील फूलबारिया या खेड्यापासून बरौनीचा वेगळा फाटा फुटतो. या रस्त्यावर प्रवास करणे हे एक नवीन आकर्षणच आहे. दुतर्फा विस्तीर्ण शेते व मधून हा भव्य सुंदर राजमार्ग म्हणजे कथ्थई रंगाच्या गालिच्यावर संथ पडलेला एक सर्पच पाहून घ्यावा. शेते नुकतीच नांगरून झाली होती, त्यामुळे हिरवळ नाममात्रही नव्हती. परंतु एकसारख्या रंगाची ती जमीन व समान्तर रेषेतील नांगरट यांमुळे एक वेगळेच आकर्षण या दृश्यात सामावलेले होते.

लोहगावला होत असलेल्या मोटरसायकल शर्यतीची आठवण देणारी भव्य अर्ध–वर्तुळाकार वक्रता रस्त्याला अधूनमधून पाहावयास मिळायची, तेव्हा गाडीचे हॅन्डल एकसारखे ठराविक कोनात तिरपे ठेवून गाडी चालवावी लागत होती. मला मोटरसायकलींच्या शर्यतीची आठवण झाली. हीच मोटरसायकल मी १९६६ ला विकत घेतली असता रेसमध्ये भाग घेण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली होती. परंतु अतिनिकट संबंध असलेल्या व्यक्तींनी विरोध केल्यामुळे ती इच्छा अपूर्ण राहिली होती. म्हणून मी ती हौस येथे पूर्ण करायचा मनात विचार केला व गाडी भर वेगात धावू लागली. ९०, १००, ११०, १२० कि. मिटर काटा असा वाढत असता माझे लक्ष पुढे जात असलेल्या एका आगगाडीवर गेले.

क्षणार्धात होमी वाडियाचे 'फ्रंटियर मेल, ग्यारह बजे, हंटरवाली, तुफान मेल इत्यादी इत्यादी...' चित्रपट आठवले. आगगाडी व डब्याच्या टपावरील हाणामारी पाहायला मिळणार नाही असा त्या नादिया, जॉन कावस इत्यादी प्रभृतींचा एकही चित्रपट बहुधा पाहावयास मिळणार नाही. काहीं मध्ये आगगाडीशी घोडा किंवा मोटरसायकल अशी शर्यतही पाहावयास मिळायची. त्या सर्व स्टंट विनोदी चित्रपटांचे स्मरण करून त्या दुकानात भर उन्हात मी माझे थोडे मनोरंजन करून घेतले. उत्साह शतपटीने वाढल्यामुळे पाव मिनिट एखाद्या रेसच्या जॉकीप्रमाणे मोटरसायकलीवर उभादेखील राहिलो. इतस्ततः नजर फिरवली व कोणी पाहणारे नाही हे लक्षात येताच पटदिशी खाली बसलो.

आता माझी गाडी आगगाडीच्या बरोबरीने धावू लागली होती. प्रवाशांचे लक्ष वेधण्यासाठी मी एक सणसणीत पुणेरी शिट्टी मारून हवेत भराभर हात भिरकावला. समोरून काही 'मॉडर्न' हातांनी रास्त प्रत्युत्तर दिले, व एंजिन ड्रायव्हरनीदेखील वाफेची शिट्टी पुन्हा पुन्हा वाजवून प्रतिसाद केला. शिट्ट्यांवरचे त्याचे हे अफाट प्रेम पाहून तो पुण्याचा असावा अशी दाट शंका माझ्या मनात आली. काही मैल या दोन्ही गाड्यांचा समान्तर प्रवास चालू राहिला. पुढे रेल्वे क्रॉसिंगला मला थांबावे लागले. आगगाडी पुढे जात असताना असा एक डबा पाहायला मिळाला नाही की ज्यामधील प्रवाशांनी हातवारे करून व आरडाओरडा करून माझे अभिनंदन केले नाही.

खगडिया गावी पोळी, भाजी, वरण-भाताचे जेवण घेत असता मला आपल्या महाराष्ट्राची आठवण झाली. माझ्या अनुभवाने महाराष्ट्र व बिहारच्या लोकांमध्ये राहणीच्या दृष्टीने फारच साम्य आहे. तेथील शेतकरी किंवा गावकऱ्यांना आपल्या येथील खेड्यामध्ये आणून सोडले तर कोणी म्हणणार नाही की हा परप्रान्तीय आहे. इतर सर्व प्रान्तांमध्ये विषमता कमीअधिक प्रमाणात पाहावयास मिळते.

गंगेकाठी पसरलेले पाटणा

बरौनीपासून एक रस्ता पाटण्याकडे व उजव्या बाजूचा मुझफ्फराबादकडे जातो. आधी नेपाळला जायचा विचार होता. परंतु गाडीमध्ये बिघाड होत होते व काश्मीरला पुढे त्रास होऊ नये म्हणून मुझाफराबादकडे गाडी न वळवता पाटण्याकडे निघालो. गंगेवरचा भव्य पूल ओलांडून हथीडाला पोहोचलो. येथून पुढे रस्ता खराब होता, व मध्ये एकही मैलाचा दगड नव्हता, म्हणून वाटेत अनेक ठिकाणी चौकशी करावी लागली. प्रवास कंटाळवाणा झाला. सरकारी अधिकाऱ्यांवर मनोमन राग व्यक्त करून पाटण्याच्या अलीकडे दहा मैलांवर थांबलो. पंचवीस पैसे देऊन उडपी किंवा इराणी हॉटेलमधील पाण्याच्या ग्लासाएवढा ग्लास भरून भरपूर प्रमाणात चहा घेतल्यावर अंगात फारच तरतरी आली. येथे सुदैवाने दूध-वाटपाच्या सहकारी सोसायट्या नाहीत, त्यामुळे खेड्यामध्ये निर्भेळ उत्तम दूध स्वस्तात मिळू शकते. बिहारचे लोक या बाबतीत तरी भाग्यशाली आहेत, असे

मनाशी पुटपुटलो. पुढे पाटणा शहराच्या एका टोकातून प्रवेश करून दुसऱ्या टोकाला असलेल्या रेल्वे स्टेशनजवळ एका हॉटेलमध्यें उतरलो.

पुण्याचे डॉ. रमेशचंद्र शहांच्या सांगण्यावरून भाई वैद्यांनी बिहारचे त्या वेळचे उपमुख्यमंत्री श्री. कर्पूरी ठाकूर यांच्यासाठी पत्र दिले होते. मी पोहोचलो त्याच दिवशी त्यांचे मंत्रिमंडळ गडगडले होते. रात्री रेडिओवरील बातमीने मी थोडा हवालदिल झालो. दुसऱ्या दिवशी सकाळी स्टेशनजवळ हरताळासाठी अफाट जनसमुदाय पाहून मी आत शिरकाव केला, व कर्मधर्मसंयोगाने तेथेच श्री. कर्पूरी ठाकूर यांची भेट झाली. नंतर मनाशी विचार केला की, मी कलकत्त्याला गेलो त्या दिवशी तेथील मंत्रिमंडळ गडगडले होते, पाटण्याला आलो येथेही तेच झाले.

पाटणा शहरात मी काही प्रेक्षणीय स्थळे पाहिली. प्रसिद्ध बंकीपूर व तेथील मैदान, आणि त्यामधील ९६ फूट उंचीचे अर्धगोल– घुमटाकार 'गोलघर', शहराच्या पश्चिमेस आलेले राजभवन, सचिवालय, व म्यूझियम, खुदाबक्ष पुस्तक संग्रहालय, शिखांचे हरमंदिर, ऐतिहासिक पाटलीपुत्र इत्यादी स्थळे पाहण्याजोगी आहेत. वॉरन हेस्टिन्जसने गुदाम म्हणून बांधलेल्या या गोलघरावरून संपूर्ण शहराचे दृश्य पाहावयास मिळते. गंगेच्या किनाऱ्यावर आठ मैल लांब पसरलेले हे शहर येथून फारच आकर्षक वाटते. गोलघरात धान्य ठेवतात हे पाहून विचार आला, येथे जर कलकत्ता येथे असलेल्या प्लॅनेटोरियमप्रमाणे एखादे प्लॅनेटोरियम केले तर फारच उपयुक्त ठरेल. प्रवाशांना एक मोठे आकर्षण होईल.

पाटणा म्यूझियममध्ये पहिले राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेन्द्र प्रसाद यांना भेट मिळालेल्या सर्व वस्तू व त्यांच्या स्मरणार्थ काही वस्तूंचा संग्रह हे एक आकर्षण आहे. खुदाबक्ष पुस्तकालयामध्ये जुनी अरबी व फारसी भाषेमधील हस्तलिखिते पाहावयास मिळतात. जुन्या पाटण्यामध्ये शीखांचे मोठे गुरुद्वार आहे. त्यास हरमंदिर म्हणतात. येथे शीखांना लढाऊ करणारे गुरु गोविंदसिंग यांचा जन्म झाला होता. हरमंदिर हें पूर्णपणे संगमरवरी शिलांनी बांधलेले आहे.

विनोबाजींचा मुक्काम राजगीरला होता म्हणून मी राजगीरला जाऊन थांबलो. येथे सरकारी शेजघरात (डोर्मीटर) मध्ये राहण्याची चांगली सोय आहे. येथून

विनोबाजींचा मुक्काम जवळ होता. सकाळी ते काही अनुयायांशी चर्चा करीत असताना मी तेथे गेलो. राजगीरहून तीन मैलांवरील एका पर्वताच्या पायथ्याशी श्री. जगजीवनजी महाराज नावाच्या एका स्थानकवासी जैन मुनींनी ' संथार ' म्हणजे आमरण उपोषण आरंभिले होते. त्याबद्दल चर्चा चालली होती. थोड्या-वेळाने ते स्वतः त्या मुनींना भेटावयास निघाले म्हणून मीही गेलो.

विनोबाजी व मुनींची चर्चा

मुनींच्या तंबूत मोजक्यांना प्रवेश मिळाला. त्यात मी स्वयंसेवकाचा ' आव आधी आणल्यामुळे माझा नंबर लागला. दोन भिन्न धर्मप्रणालींच्या साधुसंतांमध्ये होणारे संभाषण ऐकण्याची मला जिज्ञासा होती. मुनी बोलण्याच्या अवस्थेत नव्हते म्हणून त्यांच्या शिष्यांशी त्यांचे बोलणे झाले. श्री विनोबाजी म्हणाले, " उपवास जास्त दिवस चालले तरी हरकत नाही. परंतु पाणी व शक्य असल्यास फळांचा रस घेणे फार आवश्यक आहे. त्यामुळे साधनेत चित्त एकाग्र होऊ शकते. उपवास साधनेसाठी असतात, म्हणून पाणी घेणे आवश्यक आहे. पाणी न घेतल्याने आरोग्य बिघडते. शरीर निरोगी राहू शकत नाही. त्यामुळे साधना पण होऊ शकत नाही. म्हणून पाणी प्यायला पाहिजे. दोन शेर पाणी घेणे आवश्यक आहे." या संभाषणाचे पूर्ण उत्तर जैन मुनींनी दिले नाही; परंतु म्हणाले, " दोन शेर पाणी ते आहाराबरोबरदेखील घेत नव्हते. आता जास्तीत जास्त दोन औंस चमच्याने घेतात "

शिष्याचे हे बोलणे संपल्यानंतर मुनींनी क्षीण आवाजात सांगितले, " आता तेवढे पण पाणी घेण्याची वेळ राहिली नाही. तेवढी शक्ती अंगात नाही. " पुढे त्यांच्या शिष्याने सांगितले, " या उपोषणाचा संकल्प सर्व संघाच्या हजेरीत होत असतो व काहीही न खाण्याचा त्यांनी संकल्प केल्यामुळे ते आता फळाहार मुळीच घेऊ शकणार नाहीत !!" विनोबा म्हणाले, " संकल्पाचा त्याग हा पण एक मोठा त्याग आहे, व त्याला शास्त्राधार आहे. मी कोणत्याही धर्माचा नाही; हिंदू नाही वा जैनही नाही. मी विश्वशान्ती व अहिंसेच्या दृष्टीने सांगत आहे. पाणी व फळांचा रस घेतल्याने हिंसा होणार नाही. आपणास जी प्रेरणा झाली ती प्रमाण आहे. परंतु मी विश्वशान्तीसाठी विनंती करीत आहे. "

विनोबांनी प्रणाम केला व तंबूच्या बाहेर पडले. पुन्हा थांबून त्यांनी विचारले, " जेव्हा माझे बोलणे चालले होते तेव्हा आत कोण होते ? " " मी, मी होतो... " असे म्हणून पडत्या फळाची आज्ञा उचलण्याच्या हेतूने पुढे सरसावलो. परंतु त्यांना तेथील बॅज लावलेला स्वयंसेवक पाहिजे होता. त्यास ते म्हणाले, " मी मोहवश होऊन ही विनंती करीत नाही. मी विश्वशान्ती धर्मासाठी हे सांगत आहे. अशा प्रकारच्या त्यांच्या मृत्यूमुळे मला दुःख होणार नाही. मी मोहवशतेने हे सांगत नाही. पाणी घेतल्याने हिंसा होणार नाही, एवढेच माझे म्हणणे आहे. " असे सांगून ते निघाले. मीही त्यांच्या रक्षकांप्रमाणे त्यांच्या गाडीपुढे मोटरसायकल घेऊन निघालो.

मुक्कामाच्या स्थळी त्यांनी या विषयावर पुन्हा वक्तव्य केले. " त्याग ही अशी बाब आहे की जी आपल्या संप्रदायाला धरून केल्याने श्रेष्ठ ठरते व आपण ज्या रीत्या त्यांना त्याग करावयास सांगतो तोदेखील एक संप्रदायच मानला जाईल. म्हणून आपण सांप्रदायिक बनलो. असे असल्यामुळे अशा विषयात फार खोल विचार आवश्यक असतो. आम्हांस जे सांगावयाचे होते ते आम्ही सांगितले. करावे न करावे ही त्यांच्या मर्जीची गोष्ट आहे. "

त्यांची आहाराची वेळ होत आली होती म्हणून मी तेथून निघालो. पाटण्याहून राजगीर या वाटेतील नालंदा, पावापुरी इत्यादी पाहावयाचे राहिले होते म्हणून मी तेथे निघालो ! स्वस्त पादत्राणासाठी प्रसिद्ध असलेले बिहारशरीफ वाटेत येताना पाहिले होते.

प्राचीन विद्यापीठ म्हणून प्रसिद्ध असे नालंदा मी पाहिलेल्या सर्व स्थळांमध्ये अगदी वेगळेच वाटते. सातव्या शतकात चिनी प्रवासी ह्युएन-त्संगने येथे अभ्यास केला होता, व त्याने याबद्दल फार टिपणे लिहून ठेवली आहेत. नालंदा खंडेरमध्ये जुनी देवळे, छात्रालय, इत्यादी अनेक इमारती आहेत. ज्या अजूनही मजबूत वाटतात. आत सुंदर हिरवळ केलेली असून आकर्षक बागही तयार केली आहे. जवळच उत्कृष्ट शिल्प-संग्रहालय आहे.

पावापुरी येथे तलावाच्या मध्यभागी असलेले संगमरवरी जैन मंदिर व तेथे जाण्यासाठी केलेली जोधपुरी लाल दगडांची वाट यांमुळे हे वैशिष्ट्यपूर्ण व विलो-भनीय स्थळ झाले आहे. राजगीर हे येथील गरम पाण्याचे झरे व तलाव यामुळे प्रसिद्ध आहे. तेथे पाच उंच डोंगरही आहेत. ती जैनांची तीर्थस्थाने मानली जातात. राजगीरच्या त्या गरम पाण्याच्या कुंडात आंघोळ केल्यानंतर मी बाहेर आलो तेव्हा थकवा वाटू लागला. त्या पाण्याने अंग इतके शेकून निघाले होते की उभे राहावेसे वाटेना.

दुसऱ्या दिवशी सकाळी विनोबांच्या मुक्कामी गेलो. त्यांच्या शिष्याला मी मला भेटीची संधी देण्याची विनंती केली. ते म्हणाले, " आता नाही. नंतर चर्चा करा. " तेवढ्यात एक व्यक्ती आत येऊन बसली व विनोबांचे त्यांच्यावर लक्ष गेले. ताबडतोब त्यांनी त्या गृहस्थाची एक कविता काढून सूचना द्यावयास सुरुवात केली. ते गृहस्थ म्हणाले, " हे जुने आहे, मी नवीन लिहिले आहे." विनोबा उत्तरले, " असे का ? हे घ्या असे म्हणत त्यांनी कागद फाडला व कटाक्ष केला. " दिन दिन साधु बढत चला." संधी आली आहे असे पाहून या विनोदा-वर मी मोठ्याने हसलो. कल्पना फलदायी निवडली. माझे हास्य कानी पडताच त्यांचे लक्ष माझ्यावर पडताच ' काय वाटेल ते ग्रह होऊ दे पण संधी घालवावयाची नाही ' असा विचार करून वाघ शिकारीवर झेप घालतो त्या झपाट्याने मी उद्‌गारलो, " मी पुण्याहून आलो आहे. भारताच्या प्रवासाला निघालो आहे. " त्यांनी क्षणभर माझ्याकडे पाहिले व विचारले, " तुम्ही पायी प्रवास करता का सायकलीवर ? " मी म्हटले, " मोटरसायकलीवर." ते हसले. मी पण स्मित केले व त्यामुळे या क्षणापर्यंत अत्यंत गंभीर चेहरा करून बसलेले लोक " आता हसायला काही हरकत नाही " असे वाटल्यावर हसू लागले.

" कोणत्याही भाषेचा जेव्हा विचार मनात येतो तेव्हा आपली आठवण सातत्याने होते. " असे मी म्हणालो. मला सल्ला देताना ते म्हणाले, " तुम्ही महाराष्ट्रात राहता. तेथील लोक critic फार आहात. तेव्हा आपण Appre-ciative व्हा. " मी विचारले, " मी आधी तुमच्यासंबंधी व भाषेसंबंधी जे

वक्तव्य केले ते कोणत्या सदरात मोडेल ? " हे ऐकल्यावर ते हसले; खूष झाले व पुष्कळ वेळपर्यंत माझ्याशी संभाषण केले.

मी अखिल भारतीय युवक संघटनेची कल्पना दिली. तेव्हा ते म्हणाले, " मी संस्थांबद्दल मत व्यक्त करीत नाही. आपण चांगले करीत आहात, ते पार पडावे हा आशीर्वाद देतो. " नंतर त्यांनी परिचय करून दिलेल्या चार पदयात्रा करणाऱ्या भगिनींशी मी थोडी चर्चा केली. सर्वोदयाबद्दल व त्यांनी केलेल्या कामाबद्दल मी काही प्रश्न विचारले, त्यावरून मी एकंदर परिस्थितीचा आढावा घेऊ शकलो. श्री. जयप्रकाशजी नारायण यांचीही भेट झाली.

मी राजगीर सोडण्यापूर्वी विनोबाजींचे आशीर्वाद घ्यावयास गेलो. प्रेमळ आशीर्वाद देऊन त्यांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला, व एका कोपऱ्यात घेऊन जाऊन म्हणाले, " मी लोकांच्या पत्रांची उत्तरे देत नाही. परंतु तुम्ही पत्र पाठवीत जा. तुमचा पुढचा प्रवास सुखरूपपणे पार पडो ही शुभ कामना. " मी पुन्हा खाली वाकून त्यांचे आशीर्वाद घेतले, व आत्मविश्वासाने पुढचा प्रवास सुरू केला.

१७ : बुद्धगया वाराणशीची मंदिरे

विहारच्या गावकऱ्यांशी गप्पा

राजगीर सोडून एकदाचा प्रवास सुरू केला व खोसला या गावी येऊन थांबलो. सकाळी चहा–नाष्टा झाल्यावर अंगात आळस येऊ नये म्हणून मी सामानाची बांधाबांध व गाडीची तयारी इत्यादी कामे उरकूनच चहापाणी घ्यायची. क्वचित काही मैलांचा प्रवास झाल्यावर एखाद्या खेड्यात थांबून तेथील जीवनाचे निरीक्षण करीत तेथेच गावकऱ्यांशी गप्पा मारीत सकाळचा अल्पोपाहार घ्यायचो. त्या दिवशीही तसाच विचार करून मी खोसला येथे थांबलो. हॉटेल-मध्ये काही गावकरी गप्पा मारीत बसले होते. मी जाताच मुलांनी घोळका केला व प्रौढांनी प्रश्नांचा वर्षाव केला.

वस्ती, शेती, पीक-पाणी, कामधंदा, धनधान्य, शिक्षण, प्रगती इत्यादी नाना-विध प्रश्न मी त्यांना विचारले. उत्तरे देताना त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्य व्यक्त होत होते. माझ्या प्रश्नांतील काहींवर त्यांनी पूर्वी कधीच विचार केला नव्हता. कोणत्या तरी एखाद्या महत्त्वशून्य घटनेवर तासन् तास चर्चा व वादविवाद करीत बसणाऱ्या या भोळ्या गावकऱ्यांना अल्पावधीत इतक्या सर्व गोष्टींवर विचार करण्यास प्रवृत्त करणारा त्यांना चमत्कारिक वाटावा हे स्वाभाविकच होते. काही जिज्ञासूंनी गावाच्या प्रगतीसाठी कोणत्या छोट्या–मोठ्या योजना आखता येतील याबद्दल विचारपूस केली. मी त्यांना श्रमदानाने गावाचे रस्ते सुधारण्याचा, गटारे तयार करण्याचा व इतर लघुउद्योगांची थोडक्यात माहिती दिली.

बोलता बोलता विनोबाजी व सर्वोदय यांचा मी उल्लेख केला. तत्क्षणी एक ओरडला, " माफ करना साहब, पर उनका नाम मत लेना यहाँ पर ! " त्याच्या चेहऱ्यावर राग व तिरस्कार स्पष्ट दिसत होता. मला आश्चर्याचा धक्का बसला ! सर्वोदयाबद्दल मी काहीही बोलू इच्छित नव्हतो, हे मी स्पष्ट केले, व विनोबाजींची विद्वत्ता, अध्यात्माचा सखोल अभ्यास, अनेक भाषांवरचे प्रभुत्व, निःस्वार्थी जनसेवा व श्रमदान याबद्दल मला जो आदर आहे, तो व्यक्त करून त्यांनीही तो आदर बाळगायला पाहिजे अशी विनंती केली. सतत दोन तास चर्चा केल्यानंतर त्याच्या सहकाऱ्यांना माझे म्हणणे पटले, परंतु तो काही दाद देईना. जवळपासच्या काही गावांतील सर्वोदयाचे कार्य त्याने वदवून टीकेचा सूर तार सप्तकात नेला. मला त्या घटनांची पूर्वमाहिती नव्हती व सर्वोदयाशी माझा तसा काडीचाही संबंध नव्हता. म्हणून मी वाद टाळून दुसऱ्या विषयावर बोलू लागलो.

सार्वत्रिक निवडणुकांमध्ये पैसे घेऊन सर्वांनी मतदान केले, असे त्या सर्वांनी कबूल केले. माझ्यासारख्या अनोळखी माणसाजवळ कबुली देणाऱ्या त्या भोळ्या-भाबड्या लोकांची मला कीव आली. मी त्यांना लोकशाही व मतदान अधिकाराचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न केला व म्हणालो, " जो तुम्हांला पैसे देऊन निवडून येतो तो त्याचा पैसा वसूल करण्यासाठी हातपाय हालवणार नाही का ? अशा रीतीने जनतेच्या लाखो रुपयांचा अपव्यय होणार नाही का ? " त्याने उत्तर दिले, " तो तिथे जाऊन लाखो रुपये खाणार म्हणून आम्ही लाखो लोक एक एक दोन दोन रुपये खातो. ते खातात तर आम्ही का खाऊ नये ? " याच्या त्या वक्तव्यावर इतरांनी एकमेकांना टाळ्या दिल्या व त्याची प्रशंसा केली. प्रोत्साहन मिळाल्यावर तो पुन्हा बोलला, " प्रजेची संख्या मोठी आहे, त्या मानाने शासन करणारे अधिकारी अल्पसंख्य आहेत. मग त्यांनाच सुधारण्याचा प्रयत्न का होऊ नये ? ते सुधारले की जनता आपोआप शिस्तबद्ध होईल. "

या सर्व चर्चेमध्ये माझे साडेचार तास निघून गेले. प्रथम गुन्हेगार कोण ? मते विकत घेणारा का विकणारा ? प्रथम शिस्त कोणाला लावावी ? जनतेला की शासनाधिकाऱ्यांना ? हे दोन प्रश्न निर्माण कोठून झाले ? ' पहले मुर्गी या पहले अंडा ' या कूटप्रश्नाचे स्वरूप या विषयाला आल्यानंतर

वादविवाद संपविण्यात आला. त्या लोकांच्या म्होरक्याबद्दल विचारपूस करता असे समजले की, तो तेथील काही पुढाऱ्यांचा 'दलाल' होता. त्याच्यामार्फत गेलेल्या तक्रारींचेच निवारण होऊ शकत होते. त्यामुळे तो लोकांची मने वाटेल तशी वळविण्यात यशस्वी होत होता. मी त्या सर्वांची नावे टिपून घेतली. त्यांनी मुळीच कसूर केली नाही.

गयेच्या गलिच्छ रस्त्यांवरून मी प्रवास करीत असताना मला गांधीजींचे 'दरिद्रीनारायण व त्यांच्या वस्त्या' यांचे स्मरण झाले. दक्षिणेतल्या रामेश्वर-मंडपम् यांची आठवण झाली. गयेला मी जास्त न थांबता सात मैलांवरील बुद्धगयेला पोहोचलो.

बुद्धगयेतील मंदिरे

मद्रास राज्यातील तंजावर बृहदीश्वर मंदिराची आठवण करून देईल असे बोधगयेचे बुद्धमंदिर आहे. येथील शिल्प बेलूर, हळेबीड, किंवा देलवाडा येथील शिल्पासारखे बारीक नसले तरी दुरून पाहिल्यावर नजर खिळून राहावी असे आहे. मंदिराच्या अवतीभोवती छोटी स्वच्छ सुंदर बाग असून, उवड्यावर अनेक शिल्पाकृतींचे नमुने ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे याला छोट्या संग्रहालयाचेच स्वरूप प्राप्त झाले. मंदिराचा गाभारा स्वच्छ सुगंधी आहे. देवासमोर पाण्याचे कठोरे व इतर विशिष्ट वस्तूंची मांडणी यांमुळे अन्य कोणत्याही मंदिरापेक्षा येथे वेगळे वातावरण तत्क्षणी लक्षात येते. मुख्य मंदिराच्या समोर लक्ष्मीनारायणाचे व महादेवाचे मंदिर आहे. परंतु तेथील व्यवस्था पाहून मन खिन्न झाले. येथे तिबेटी लोकांचे वेगळे बुद्धमंदिर असून, तेथे एक गोल फिरती टाकी आहे. ती बॉलबेअरिंगवर उभी आहे, व तीस कड्या लावल्या आहेत. यात्रेकरू या कड्यांना धरून ही मंत्राची टाकी श्रद्धेने फिरतात. त्यामधील संग्रहित केलेल्या मंत्रांचा त्यास स्पर्श करणाऱ्यावर प्रभाव पडून माणसाच्या विविध शक्तींमध्ये वाढ होते, अशी श्रद्धा आहे. तिबेटी बुद्धमंदिराच्या पलीकडे एक चिनी बुद्धमंदिरही आहे. त्याचा आकार वेगळा आहे. राजगीरला मी एक जपानी बुद्धमंदिर पाहिले होते. त्याची मला येथे आठवण झाली.

गयेत पेट्रोल भरावयास विसरलो होतो. म्हणून वाटेत काळजी वाटू लागली. एक थेंबही वाया जाऊ देऊ नये या विचाराने भर वेगाने एकसारखी गाडी

पळवली. वाटेतच पेट्रोलच्या पुरवठ्यात अडथळे आल्यामुळे गाडीला धक्के बसायचे. पेट्रोल संपल्याची ही चिन्हे होती. अखेर पेट्रोल संपल्यावर मी गाडी न्यूट्रल केली व शक्य तितकी लांब 'मोमेंटम'ने जाऊ द्यावी असे ठरविले. पुढे भर उन्हात गाडी ढकलावी लागणार या विचाराने घाम फुटायला सुरुवात झाली होती. पण आश्चर्याची गोष्ट अशी की पुढचे वळण संपताच मी ग्रँड ट्रंक रोडवर पोहोचलो व गाडी बरोबर समोरील पेट्रोल पंपापर्यंत पोहोचली ! मी वाटेतच 'गीता माहात्म्य' वंदायला सुरुवात केलीच होती, व 'सहायोजायते शीघ्रम् यत्र गीता प्रवर्तते' असे म्हणताच मी या स्थळी पोहोचलो होतो. म्हणून माझ्या श्रद्धेत वाढ झाली.

औरंगाबादमध्ये प्रवेश करताच सरस्वतीपूजनाची आरास पाहावयास मिळाली. तेथे एका मंडपात भारताचा मोठा नकाशा काढला होता. प्रमुख व्यक्तींची छायाचित्रे त्यांच्या प्रान्तांवर लावली होती. महाराष्ट्रावर शिवाजीमहाराज, लोकमान्य टिळक, व गोखले यांची चित्रे लावून खाली नावे लिहिली होती. मला हे पाहून फार आनंद झाला. सर्व प्रान्तांतील थोर विभूतींबद्दल समसमान, आदर व्यक्त करून राष्ट्रीय भावना स्पष्ट केल्याबद्दल तेथील लोकांबद्दल माझ्या मनातील प्रेमादरात वाढ झाली.

खोसला येथे खाल्लेली मलई व घेतलेले दूध तेथे वादविवाद करतानाच पचविले होते.दुपारचे चार वाजत आले होते, त्यामुळे औरंगाबाद येथे जेवण मिळणे कठीण होते. परंतु एका हलवायाने मला ताबडतोब गरम पुऱ्या, स्वादिष्ट भाजी करून दिली. समाधानाने जेवून पुन्हा सरस्वतीचे दर्शन घेतल्यावर मी निघालो.

विचारात मग्न असल्याने समोर रेल्वे क्रॉसिंग असल्याचे अगदी जवळ पोहोचल्यानंतर ध्यानात आले. परंतु ब्रेकस् मारणे इष्ट नव्हते, म्हणून तशीच भर वेगात गाडी जाऊ दिली. पण रेल्वेच्या फाट्यावरून गाडी जी उधळली ती रस्त्यापासून जवळजवळ चार फूट उंच हवेत ! हेलिकॉप्टरप्रमाणे जात असलेल्या त्या मोटरसायकलवर बसून मी क्षणार्धात दोन्ही ब्रेक्स मारले, व ताबडतोब सोडले;– हवेतच चाकांची गती मंदावल्यामुळे बारा ते पंधरा फूट अंतरावर जमिनीवर गाडी जेव्हा उतरली–तेव्हा जोराचा हादरा बसला नाही व थोड्याच अंतरावर ब्रेक्स मारून मी गाडी थांबवू शकलो. गाडी स्टँडवर उभी करून मी

झाडाखाली जाऊन बसलो;... व डोके दोन्ही हातांनी धरून गुडघ्यावर टेकविले! क्रॉसिंगवरचा पहारेकरी धावून आला– व त्याने विचारपूस केली. मी उत्तर देण्याच्या मनःस्थितीत नव्हतो !

दोन मिनिटांत काय काय विचार अति वेगाने धावून गेले ते व्यक्त करणे माझ्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे! परंतु अहमदाबाद येथील आमच्या एका तरुण स्नेह्याचा मोटरसायकलीचा अपघात... डोळ्यांपुढे काजवे चमकवून गेला! त्या गरिबाची गाडी ट्रकला आदळून रस्त्याच्या पलीकडे आदळत आपटत ४० फुटांवर जाऊन पडली होती!--व त्या गाडीवरचे दोघेही इसम... जागच्या जागी.... ठार झाले होते !!

मी आलो त्या रस्त्यापेक्षा रेल्वे-क्रॉसिंग जरा उंचावर होते. व नंतर ताबडतोब उतार होता. म्हणून असे घडले होते. मैलाच्या दगडावर वाचलो. 'ससराम' सहज स्वाभाविकतेने 'हे राम' असे म्हटले गेले. मन घट्ट करून पुढे निघालो.

उत्तर प्रदेशात प्रवेश केल्यावर अंधार झाला. सय्यदराजा येथे पोहोचलो व मुक्काम करण्याचा विचार केला. इतर सोय नसल्यामुळे व आतापर्यंत काही डॉक्टरांच्या सहृदयतेचा अनुभव आल्यामुळे मी डॉ. चित्रांश यांच्याकडे सल्ला घेण्यास गेलो. त्यांनी माझा जो पाहुणचार केला तो मी कधी विसरू शकणार नाही. एक जुना मित्र भेटल्याचा मला आनंद झाला.

"मेरा नाम अशोक वर्मा है। मैं यू. पी. टूरिस्ट हूँ। आपसे इजाजत हो तो बातें करना चाहता हूँ।" असे म्हणून माझ्या खोलीत आलेल्या वाराणसीच्या त्या तरुणाचा विनापरवाना आत आल्याबद्दल प्रथम मला राग आला. त्याच्या एकंदर वागण्यात बेशिस्त होती खरी, परंतु मनाचा सरळ वाटला म्हणून मी त्याच्याशी आपुलकीने बोललो. बोलता बोलता अधून मधून तीनदा मी त्याचे नाव, पत्ता व व्यवसायाबद्दल विचारून घेतले. सर्व वेळी सहज स्वाभाविकतेने एकच उत्तर मिळाल्यामुळे त्याच्या प्रामाणिकपणाची खात्री पटली. सर्व सामान तसेच ठेवून त्यास मी बसावयास सांगितले व मी आंघोळ करायला गेलो.

अल्पावधीत मी त्याच्यावर विश्वास टेवल्याचे त्याला आश्चर्य वाटले. बोलताना त्याची मी पारख कशी केली हे सांगितल्यावर त्याने आदर व्यक्त केला, व आम्ही

जवळचे मित्र बनलो. त्याने आपल्या सर्व मित्रांची ओळख करून दिली. त्यामुळे मी वाराणशीत दोन दिवस जास्त राहिलो व सर्व प्रेक्षणीय स्थळे, होटेल्स इत्यादी पाहिली.

संगमरवरी भिंतीवर रामायण

वाराणशीमध्ये नवीन बांधलेले श्री तुलसी-मानस-मंदिर अति प्रसन्न, पवित्र व सुंदर स्थळ आहे. मंदिरात प्रवेश केल्यावर बाहेर पाऊल टाकावेसे वाटत नाही. संगमरवरी भिंतीवर संपूर्ण रामायण कोरले असून काही महत्त्वाचे प्रसंग सुंदर काचांवर आकर्षक रंगात चित्रित केलेले आहेत. राम-सीता, व लक्ष्मण यांच्या मूर्ती मनोहर आहेत. शुभ्रधवल संगमरवरी मूर्तींवरील गाल व ओठ गुलाबी रंगाने रंगविले आहेत.

गंगास्नान, प्रसिद्ध काशी-विश्वेश्वर दर्शन, व अभिषेक इत्यादी आवश्यक उपक्रम उरकला. बनारस हिंदू विद्यापीठ पाहिले, व अभिमान वाटला. तेथील बिर्लांनी बांधलेल्या काशी-विश्वनाथ मंदिरामधील शान्त, पवित्र वातावरण पाहून मनाला शान्ती लाभली व मी प्रसन्न झालो. संध्याकाळी संकटविमोचन येथील हनुमानाच्या दर्शनास गेलो होतो, व तेथे एकाचे नवे करकरीत जोडे चोरीला गेल्याचे ऐकून मनाला फार वाईट वाटले.

सारनाथ येथे जाताना वाटेतील 'सीता-माईकी सगडी' पाहिली. छोट्या टेकडीवरील ही इमारत एकान्तातील विश्रान्तीसाठी बरी आहे. येथून हिरव्या शेतांचे, निळ्या आभाळाचे, पांढऱ्या ढगांचे दृश्य पाहात बसावे असे वाटते. सारनाथ येथील स्तूप वैशिष्ट्यपूर्ण म्हणून ठीक आहे, पण येथे विशेष कोरीव शिल्प पाहावयास मिळत नाही. जवळील बौद्ध मंदिराच्या भिंतीवर जपानी चित्रकारांनी रंगविलेली चित्रे जिवंत वाटतात.

वर्मा, द्विवेदी, सयगल, तिवारी इत्यादी मित्र व त्यांच्या कुटुंबियांमध्ये अल्पकाळात घरोबा झाला. चार दिवस बाहेरचे खाणे नाममात्र झाले. सर्वांसमवेत मी एका नाटकाला गेलो. 'बर्फकी मिनार' या नाटकाचा प्रयोग तेथील एका बँकेच्या कर्मचारी व सेवक संघाने सादर केला होता. नाटक रंगत होते तेवढ्यात आरडाओरड व गुद्दागुद्दीला सुरुवात झाली.

या प्रयोगाच्या निमंत्रण-प्रत्रिका इंग्लिशमध्ये छापल्यामुळे काही हिंदीप्रेमी तरुणांनी खेळात व्यत्यय आणला होता. बँकेच्या कर्मचाऱ्यांनी माइकवरून पुन्हा पुन्हा क्षमा मागितली व पुढे अशी चूक न करण्याबद्दल ग्वाही दिली

शोकिनांसाठी वाराणसीबद्दल एक आश्चर्य सांगतो ते हे : मुंबईसह सर्व शहर व खेड्यांचा विचार करून मी या निर्णयाला आलो की, वाराणसीसारखा ‘ डोसा ’ म्हणजे ‘ घावन ’ इतरत्र कोठेही मिळत नाही. या बाबतीत दाक्षिणात्यांवर त्यांनी मात केली आहे.

अलाहाबाद येथे वाटेत श्री. मकरंदसिंग यांची भेट झाली. त्यांनी रेडिओ स्टेशनवर बोलाविले. तेथे विपिन शर्मा व विनोद रस्तोगी यांनी माझी मुलाखत टेपवर रेकॉर्ड करून घेतली. त्याचे ध्वनिक्षेपण नंतर अलाहाबाद व लखनौ रेडिओवर झाले.

आनंदभवन, खुशरू बाग, युनिव्हर्सिटी, अशोक स्तंभ, गंगा-यमुना-संगम, व म्यूझियममधील सर्व प्रेक्षणीय स्थळे पाहिली. म्यूझियममधील निकॉलस रोरीक यांची चित्रे पाहून मी फार प्रसन्न झालो. प्रत्येक चित्राचे सौन्दर्य जास्तीत जास्त कोठे उभे राहून पाहता येते हे शोधून तेथे तशा पाट्या लावण्याची लेखी सूचना तेथील व्यवस्थापक श्री. ऋषिराज त्रिपाठी यांना दिली.

येथे मी एक विलक्षण पाटी वाचली, “ सावधान ! पौष्टिक आहार चाहिये ! यहाँ मारवाडी ब्राह्मण के हाथ बनाया पवित्र भोजन मिलता है...ऊपर जाइए। ”

मी वरती गेलो. जेवणाला सुरवात करताच चौकशी आवश्यक वाटली. खालील प्रमाणे संवाद घडला—

“ महाराज मारवाडी है क्या ? ”


“ जी हाँ ! मारवाडी है। ”

“ मैं कहता हूँ यह महाराज मारवाडी हो ही नहीं सकता। ” काही क्षण वातावरण शान्त राहिले. मी पुढे म्हणालो, “ महाराज को कहो हम बुलाते हैं ! ”

थोड्या वेळाने महाराज प्रविष्ट झाले.

“ कहिए हुजूर ! आप मारवाडी हैं ? ”

“ हां साब ! ”



काशी येथील हिंदू विश्वविद्यालयाचे प्रवेशद्वार

प्रवेशद्वारासमोरील चौकात श्री मदनमोहन मालवियाजींचा पूर्णाकृती पुतळा उभा आहे. उजव्या कोपऱ्यात लेखक स्मारकाचे निरीक्षण करताना दिसतात.

फोटो : अशोककुमार स्वामीनारायण




रोमटेक येथील बौद्ध साधूंचे नृत्य.



गंगटोक समोरील पर्वतावर रोमटेक आहे. येथे दलाई लामांचे वारस समजले जाणारे "करमापा" प्रमुख म्हणून आहेत. लेखक तेथे गेले असताना त्यांनी शेजारी बसविले व हे वैशिष्टपूर्ण नृत्य दाखविले. त्यामुळे योगसाधना होते असे म्हणतात.

फोटो : अशोककुमार स्वामीनारायण



कुमाऊ हिल्समधील काटक स्त्रिया

नैनिताल ते अल्मोडा हा रस्ता कोसी नदीच्या काठाला लागूनच जातो. येथे स्त्रिया फारच कष्टाळू आहेत. पुरुषांनी काम करण्याची जणू प्रथाच नाही. चित्रातील स्त्रिया धान्याची पोती शहरातून गावी वाहून नेत असताना २० ते २५ मैलांची ही पदयात्रा होते.

" फिर यह भोजन ऐसा क्यों है ? "

" साब ! देस जैसा भेस ! " हा यू. पी. चा भैया वाद घालत होता. म्हणून मी रागाने म्हणलो, " हाँ, हाँ ! भेस कौनसा भी पहनिये, मगर इस भोजन में यह अंधेर करने की क्या जरूरत थी ? "

" साब ! यहाँ ऐसा ही खाना चलता है ! इस लिए मारवाडी भोजन नहीं बनाया ! "

" तो फिर ' मारवाडी भोजनालय ' क्यों लिखा ? ई भोजन सोखो हे कई ? मे का बोलू थाने को ठा पडे ? " शेवटचे अस्खलित मारवाडी शब्द ऐकून तो गप्प झाला. त्याला काही समजलेच नव्हते. थोड्या वेळाने त्या मौनमूक तथाकथित मारवाडी स्वयंपाक्याने हळूच काढता पाय घेतला.

उत्तर प्रदेशच्या त्या भैय्याने भोजनप्रसंगी नाराज केले. परंतु दुसऱ्या स्थळी एकाने अति स्वादिष्ट रबडी देऊन मनाचे समाधान केले. बिपिन शर्मा यांनी निघण्याच्या आदल्या रात्री आपल्या घरी जेवणाचे आमंत्रण दिले. एकंदरीत अलाहाबाद ऊर्फ प्रयागची वारी पदरात पडली.

● ● ●

१८ : कुमाव– उत्तर प्रदेशचा मुकुट

पाषाणातून वस्त्रालंकार निर्मिले

अलाहाबादहून मी कानपूरला आलो. हे एक औद्योगिक शहर आहे. पादत्राणांसाठी बिहारमध्ये जसे बिहार-शरीफ, तसेच उत्तर प्रदेशमध्ये कानपूर व आग्रा प्रसिद्ध आहेत. शहर अत्यंत मागासलेले वाटते. चिखलात कमळ निर्माण व्हावे तसे,– उद्योगपती श्री. कमलापतींनी बांधलेले राधाकिशन मंदिर अति सुंदर आहे. पाहताक्षणीच रंगविलेली वाटावीत इतकी हुबेहूब चित्रे विविध पाषाणांना कलात्मकरीत्या रचून तयार केलेली आहेत. कृष्णलीलेतील रासनृत्यामधील बेभान होऊन नाचणाऱ्या गोपींच्या अंगावरील गणवेष पाषाणातून निर्माण करणाऱ्यांचे करावे तितके कौतुक कमीच. कपड्यांवरील सुरकुत्यासुद्धा इतक्या कौशल्याने निर्माण केल्या आहेत की, सबंध चित्र जिवंत वाटावे,–अगदी जिवंत. त्याचप्रमाणे वीणाधारी सरस्वती, विघ्नहर्ता गणेश, तसेच गौरीशंकर– यांची रंगीत पाषाणातून हुबेहूब निर्माण केलेली चित्रे आश्चर्यजनक आहेत. शुभ्र संगमरवरी पाषाणांतून कोरलेले गौरी-तांडव, आनंद तांडव, नटराज महादेवाच्या व देवी गौरीच्या आकृत्या अत्यंत विलोभनीय आहेत. यापुढे हे मंदिर म्हणजे कानपूर असे म्हटले गेल्यास नवल नाही.

सबंध भारतात कमीत कमी अंतरावरील दोन मोठी शहरे कोणती ? याचे उत्तर कानपूर व लखनौ. अवघ्या अठ्ठेचाळीस मैलांच्या अंतरावर ही शहरे आहेत. रामायणातील लक्ष्मणाने वसविलेले– गोमतीकाठचे हे शहर आता ' नवाबशाही 'साठी प्रसिद्ध झाले आहे. येथील नवाबांचा रोमहर्षक इतिहास रसिकजनांना आकर्षून घेईल असा आहे. १६२ फूट लांब व ५४ फूट रुंद

हॉल असलेला बडा इमामवाडा, आकर्षक वस्तूंनी सुशोभित, हुसेनाबाद इमामवाडा, उंच भव्य दिमाखदार रुमी दरवाजा, प्रवाशांसाठी अति आगळा असा भुलभुलैया म्हणून ओळखले जाणारे छतर मंझिल,– जेथे एके काळी राजघराण्यातील स्त्रिया राहात असत, व विंगफिल्ड पार्क– सर्वांनी नटलेले हे शहर नवाबी थाटाचा पुरावा आहे.

संध्याकाळी गोमती घाटावरील शहीद स्मारकासमोर दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली वाहिली. गोमतीच्या शान्त पाण्यावरून येणाऱ्या मंद मंद वायुलहरींचा स्पर्श जन्मभर लक्षात राहील इतका मृदू होता. रात्रीचे साडेनऊ वाजले. त्या अंधाऱ्या रात्री मी एकटाच तेथे बसलो होतो. गंभीर व अति जिव्हाळ्याच्या स्मृतींना जवळ आणील असेच वातावरण होते. जागेवरून उठावेसे वाटत नव्हते.

बंगलोरचा ' कमर्शिअल स्ट्रीट ', कलकत्त्याचा ' चौरंगी ', त्याप्रमाणे लखनौचे ' हजरत गंज ' याचा उल्लेख करता येईल. रात्री विजेच्या प्रकाशात लखलखणारा हा बाजार हे येथील आधुनिक आकर्षण आहे. हजरत गंज म्हणजे पॅरिसच्या प्रमुख रस्त्यांच्या तोडीचे स्थळ आहे, असे तेथील एक कॉलेजकुमार म्हणाला. मला पॅरिसची कल्पना नाही त्यामुळे मी ऐकून गप्प बसलो.

त्या वेळचे मुख्यमंत्री चरणसिंग यांची भेट घेऊन पत्र घेतले व मी उत्साहाने ' फेन्टोमस 'प्रमाणे भरवेग गाडी पळवू लागलो.

जागरणामुळे उशिरा उठलो. ४०४ कि. मी. चे अंतर कापून लखनौ ते नैनीताल पोहोचावयाचे होते. लखनौ ते मीलहाबाद (जोश मीलहाबादी या शायरचे गाव), हरदोई, शहाजहानपूर, झुमका गीरा रे... प्रसिद्ध बरेलीवरून मी हलद्वानीला पोहोचलो. बरेलीच्या बाजारातून जाताना फारच त्रास झाला होता. रस्ता अरुंद आणि गर्दी अमाप. हलद्वानीला पोहोचलो तेव्हा सूर्यास्त झाला होता. अंधार पसरत होता. येथून नैनीताल घाट सुरू होतो. २६ मैलांचा घाट अंधारात चढणे कठीण होते. परंतु दुसऱ्या दिवशी माझ्या सुहृदाचा वाढदिवस होता. पंधरा फेब्रुवारी. तेव्हा वाढदिवसाच्या शुभ संदेशाची तार नैनीतालसारख्या रम्य स्थळी जाऊनच करावी या विचाराने मी तत्काळ निघालो.

मित्रांच्या ऊबदार आठवणीमुळे कडक थंडीचा परिणाम जाणवला नाही. अंधारात घाट चढल्यामुळे सृष्टिसौंदर्य पाहायला मिळाले नाही. पर्वताच्या

शिखरावर पोहोचल्यावर वळण संपले व मी फार खुष झालो. समोरच पीतवर्णी प्रकाशित फुग्यासारखा चंद्र अवर्णनीय सौन्दर्याने नटलेला दिसला.

उत्तर भारतातील सर्व 'हिल-स्टेशन्स'चे प्रवाशांच्या उन्हाळी भेटीचे उद्‌घाटन करावयास जणू मी निघालो होतो. त्या थंडीत एकही शौकीन या स्थळी येत नाही. मी गेलो तेथे सर्वांनी आश्चर्याने माझे स्वागत केले. त्या सर्व स्थळांमध्ये माझी पहिली भेट नैनीतालला होती. रस्त्याच्या दोन्ही कडांना बर्फाचे ढीग होते. दोन दिवसांपूर्वी झालेल्या हिमवृष्टीने भरलेले रस्ते आदल्या दिवशीच स्वच्छ करण्यात आले होते. झाडांवर व घरांच्या कौलांवर अजून बर्फ पडलेला होता. भर उन्हातदेखील थंडी मी म्हणायची.

सव्वासहा हजार फूट उंचावरील नैनीतालचे दोन प्रमुख भाग आहेत. एक 'तल्लीताल' म्हणजे खालचा भाग व दुसरा 'मल्लीताल' म्हणजे उंचावरील भाग. या दोन्हींच्या मध्ये 'नैनीताल'चा तलाव आहे. चोहोकडील उंच उंच हिमाच्छादित व हिरव्यागार पर्वतामुळे या स्थळांचे सौन्दर्य फारच वाढले आहे. येथे पोहोण्याची, नौकाविहाराची व मासे पकडण्याची उत्तम सोय आहे. पाणी संथ असल्यास एका टोकावर उभे राहून दुसऱ्या टोकावरील पर्वतांचे प्रतिबिंब पाण्यात स्पष्ट पाहता येते. आपल्या येथील बस-वाहतुकीप्रमाणे तेथे रिक्षा-वाहतूक आहे. रांगेत उभे राहून २५ पैशांचे तिकिट घेऊन तलावाच्या कडेने जाणाऱ्या रस्त्याच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत जाता येते. वाहनावर वीस रुपये कर आहे. परंतु मी एक मजूर करून गाडी ढकलून गावात मुक्कामाच्या स्थळी नेली म्हणून मला कर भरावा लागला नाही.

वस्तीपासून साडेतीन मैलांवरील "चायना पीक" चढणे म्हणजे एक कसोटीच आहे. त्यात भर म्हणून त्या वेळी तेथे सबंध रस्त्यावर बर्फच बर्फ पसरला होता. पाय ठेवताच सहा ते आठ इंच आत जायचा. त्यामुळे बूट व मोजे एकदम ओलेचिंब झाले व पाय थरथर कापू लागले. धावण्याची शर्यत संपल्यानंतर विजेत्याचा श्वास किती वेगात चालतो याची मला थोडी कल्पना येथे नुसता चढ चढताना आली. जेमतेम मी टोकावर पोहोचलो. श्वास नॉर्मलवर आल्यानंतर सौन्दर्य पाहण्यात गर्क झालो. दक्षिणेकडील 'स्नो-व्ह्यू', 'लडिया काटा', पश्चिमेला 'टिफिन टोप' इत्यादी गिरिशृंगांचे दर्शन येथून स्पष्ट दिसत

होते. उत्तरेकडे लांब अंतरावर राणिखेत व अलमोकेडा या रम्य स्थळांची पर्वतमाला दिसत होती. अति पूर्वेला हिमाच्छदित गंगोत्री, जम्नोत्री, त्रिशूळ आदी हिमालयाचे आकर्षक अंग दिसत होते, दार्जिलिंगच्या टायगर हिलवरून पाहिलेले एव्हरेस्ट व कांचनगंगा यांची आठवण झाली. मी फारफार प्रसन्न झालो.

हिमालयाचे दर्शन ' स्नो-व्ह्यू 'वरून चांगले झाले. त्याच रस्त्यावरील ' लडिया काटा ' येथे जात असताना ' चायना पीक ' सारखेच श्रम पडले. पाच मैलांवरील या स्थळी जात असता बर्फामुळे घोड्याला अर्ध्या वाटेतच सोडावे लागले. बर्फातून चालत असता पाय घसरून खोल दरीत पडण्याची भीती वाटायची. येथून नैनीतालसारखा ' भीमताल ' नावाचा तलाव दूरवर दिसत होता.

पश्चिमेला ' टिफिन टोप ' लँडस अँड खरपाताल गव्हर्नरांचा बंगला व कॉलेज पाहिले. येताना मी प्रथम थांबलो व पौर्णिमेचा चंद्र पाहिला. ते स्थळ हनुमानगढ होते. तेथेही पुन्हा सूर्यास्त पाहण्यासाठी गेलो.

नैनीतालजवळील स्थळे म्हणजे भीमताल व रामगड ही उत्कृष्ट आहेत. भीमताल दरीत असून रामगड पर्वताच्या शिखरावर आहे. रामगडला सफरचंदांच्या अनेक बागा आहेत. टोकापासून तळापर्यंत सबंध बागाच बागा पसरल्या आहेत. येथे सफरचंदाच्या फोडी व रस डब्यांमध्ये भरून सील करण्याचा कारखाना सरकारने उघडला आहे. हे डबे परदेशांतही जातात.

शाळेत हिंदी पाठ्य पुस्तकातील डॉ. झाकीर हुसेन लिखित ' अब्बूखाँ की बकरी ' हा धडा मला फार आवडला होता. अनेक वेळा वाचून झाल्यावर जवळ जवळ तोंडपाठ झाला होता तो. तेव्हा अलमोडा कसे असेल ?— असा राहून राहून मनात विचार यायचा. अगदी मनापासून एखाद्या वस्तूची अपेक्षा केली, तर त्याप्रमाणे देव सोय करून देतो माणसाला, याची जाणीव झाली. कल्पवृक्ष माणसाच्या कल्पनाशक्तीमध्येच सामावलेला आहे, याचे मला प्रात्यक्षिक घडल्यासारखे वाटले.

निसर्गरम्य अशा अलमोडा येथे फिरत असताना मला माझे शालेय जीवन व त्या वेळेच्या चिमुकल्या मनात उद्‌भवणाऱ्या विशाल कल्पना वगैरे आठवले.

कोसानीने स्वित्झर्लंडची आठवण

अलमोडाहून मी कोसानीला आलो. महात्माजींच्या चरित्रामध्ये वाचले होते की– ते म्हणत, "ज्यांना स्वित्झर्लंडचे आकर्षण आहे त्यांनी एकदा कोसानीला जरूर भेट द्यावी." कोसानीच्या डाक बंगल्यात सामान टाकून संध्याकाळी मी घाईघाईने निघालो....सूर्यास्त पाहण्यासाठी पर्वताच्या टोकावर गेलो. परंतु सूर्यास्त पाहू शकलो नाही. कारण पश्चिमेस आणखी उंच एक पर्वत उभा होता, मी होतो तेथे एक मैदान तयार करण्यात आले होते. तेथे हेलिकॉप्टर उतरण्याची सोय होती. परतताना अंधार झाला व मी वाट चुकलो....! चोहोकडे भयाण जंगल पसरलेले होते. उंच उंच वृक्षांच्या घटा व त्याखालील त्या गर्द झाडीतून मी एकटा...दिशांचा अंदाज घेऊन वाट शोधीत भटकत होतो. बॅटरी असती तर बरे झाले असते असे वाटले....! मी एका मिलिटरी कॅम्पमध्ये पोहोचलो.– "हायसे" झाले !

काही नवीन करावे या कल्पनेने मी तेथील एकाला मेजरबद्दल विचारपूस केली, व 'अशोककुमार' आल्याचा निरोप द्यायला सांगितले. परवानगी मिळताच मी तंबूत गेलो. आधी नाव सांगितल्यामुळे.... असेल कोणी ओळखीचाच ...या कल्पनेने त्यांनी एकदम उत्साहाने स्वागत केले. परंतु मला पाहिल्यानंतर मेजरसाहेब बुचकळ्यात पडले. मी माझ्या भ्रमणाचा इतिहास सांगितल्यावर त्यांनी प्रशंसा केली, व मला रात्री भोजनासाठी थांबण्याचा आग्रह केला. मी "पडत्या फळाची आज्ञा" उचलली. त्यांच्या काही मित्रांसोबत भोजन घेतल्यावर पत्त्यांचा डाव रंगला....रात्रीचे १२ केव्हा वाजले हे समजले नाही.

परतताना मेजर नायरनी मला एक रक्षक बरोबर दिला. तो मला डाक बंगल्याऐवजी रेस्ट हाउसवर घेऊन गेला. म्हणून आम्ही नव्या रस्त्याने शोधत पुढे चालू लागलो. काही वेळाने त्यालाही रस्ता माहीत नसल्याचे त्याने कबूल केले. त्याच्याजवळील बॅटरी व माझ्याजवळील कॅमेरा हे दोन्ही संरक्षणाच्या दृष्टीने निकामी होते. चोहोकडे काळोख इतका पसरला होता की, जंगल कसे आहे हेदेखील कळत नव्हते. तास– दीड तास होऊन गेला...परंतु बंगला काही सापडला नाही. रात्रीच्या थंडीने थरकाप उडवला होता. त्यात किर्रर्र आवाजाने भर घातली. अरण्य म्हणजे काय हे त्या रात्री मला समजले. बरोबरीचा माणूसदेखील

काळजीत पडला होता. त्याने थरथरत्या आवाजात मला धीर दिला.... "साब, आप फिकर मत करो। दो जन साथमें हो तो शेर कुछ नहीं करता। " परंतु मी त्याच्या बोलण्याकडे लक्ष देण्याच्या मनःस्थितीत नव्हतो. मी अंदाज करून एका पायवाटेवर चलायला सांगितले. मला खात्री नव्हती.... अंदाजच होता. सोबत "शान्ताकारं भुजगशयनम्....भवभय हरम्...." चा अक्षरशः अखंड पाठ चालला होता. "निर्बल के बल राम "चा साक्षात्कार झाला. परमेश्वरकृपेने मी अचूक मुक्कामाच्या जागी पोहोचलो होतो. आधी विचार केल्यानुसार सरळ गेलो असतो तर कोठे पोहोचलो असतो कोणास ठाऊक !

सोबत्याला जायला सांगून मी खोलीत प्रवेश करतो– तेवढ्यात चौकीदार ओरडत आला. मी एकटा अरण्यात गेलो होतो, म्हणून त्याला काळजी वाटली होती, व त्याने गावकऱ्यांना कंदील काठ्या घेऊन जमवले होते! "शोध करायचा तरी कुठे ? " असा प्रश्न पडल्यावर " दैवगती दुर्निवार असते " याचे त्यांनी अवलंबन केले होते आणि नुकतेच ते सर्वजण आपापल्या घरी गेले होते. मी त्याला सर्व काही सविस्तर सांगितले, व त्याला झालेल्या त्रासाबद्दल क्षमा मागितली. दुसऱ्या दिवशी सकाळी मात्र त्याने आपुलकीने त्याच्या घरी अल्पोपाहारास नेले व तेथील गांधी आश्रमाच्या श्री. पटेलना रात्रीचा प्रसंग सांगून हास्यांचे फवारे उडविले.

वैजनाथ अनेक दृष्ट्या प्रेक्षणीय

कोसानीच्या उत्तरेचा ११ मैलांचा एकसारखा उतार उतरून मी वैजनाथला पोहोचलो. भारतातील मी पाहिलेल्या अप्रसिद्ध स्थानांपैकी हे एक मुद्दाम उल्लेख करण्यासारखे आहे. शान्त एकान्त कोठे लाभेल ? शुद्ध स्फटिकासारखे जल– ज्यातून तळयातील खडानूखडा मोजून काढता येईल अशा पाण्याचा प्रवास कोठे सापडेल ? गौरी-गणेश, महादेव, व सत्यनारायण यांची प्राचीन देवालये कोठे पाहावयास मिळतील ? नील आकाश, शुभ्र ढग, हिरव्या रंगावर पिवळ्या फुलांची डिझाइन असलेली शालू नेसलेली दऱ्याखोऱ्यांची भूमी कोठे आहे ? भोळी भाबडी व गौरवर्णीय देखणी माणसे कोठे आहेत ? इच्छा असल्यास निर्जन वाटावे असे स्थळ कोठे आहे ?– अशा अनेक प्रश्नांचे उत्तर सामावलेले स्थळ

कोणते म्हणून जर कोणी विचारले तर मी " गोमती नदीच्या काठी वसलेले हे चिमुकले वैजनाथ " असेच म्हणेन.

वैजनाथपासून १४ मैलांवरील बागेश्वर येथे शरयू व गोमतीचा संगम होतो. बागेश्वर महादेवाचे मंदिर जुने आहे. वस्ती बरी असून राहण्या-जेवण्याची सोय आहे. आल्या रस्त्याने परतून मी कोसानीवरून बनौरा येथील गांधी आश्रमाला मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सबंध दिवस पर्जन्यवृष्टी व हिमवृष्टी झाल्यामुळे मला निघता आले नाही. सबंध दिवस खोलीत शेगडीशेजारी बसून लिहिण्यात वेळ घालवला.

राणीखेत येथील माझा मुक्काम फार आनंददायी झाला. एका गुजराती व्यापाऱ्याने माझे फार स्वागत केले, व त्याच्या जीपमधून जवळपासची प्रेक्षणीय स्थळे पाहिली. चोवीस्या गार्डन सबंध हिमाच्छादित होती. वृक्षांवर पिवळे पानही पाहावयास मिळाले नाही. या वृक्षांवर जेव्हा असंख्य सफरचंदे लगडतील तेव्हा किती सुंदर दृश्य पाहावयास मिळेल ?– त्या कड्यावरून दरीत दृष्टिक्षेप करता करता कल्पना करू लागलो.

राणीखेतसमोरील हिमालयाचे दर्शन घेऊन मी माध्यान्हसमयी निघालो. चाळीस मैलांचा घाट उतरून घनगडीवरून धीकाला येथील ' कॉरबेट पार्क ' येथे अरण्यात जावयाचे होते. पंधरा मैल हिमालयाचे दर्शन घेत प्रवास झाला व पुढे दिशा बदलली. एकसारखी वळणे, खाली खोल दरी, उत्तुंग गिरिशिखरे, रस्त्यांच्या कडेचे उंच उंच वृक्ष, पर्वताच्या उतारावरील शेते, व गाई-म्हशींचे कळप, खालून वर व वरून खाली असा स्वैर विहार करणारे पक्षी– या सर्वांचे निरीक्षण करीत मी प्रवास चालू ठेवला.

नैनीताल, रामगढ, अलमोडा, कोसी, कोसानी, चनौदा, सोमेश्वर, वैजनाथ, बागेश्वर व राणीखेत ही सर्व रम्य स्थळे आहेत. त्या डोंगरखोऱ्यांच्या प्रदेशाला ' कुमाऊ ' म्हणतात. कुमाऊ हिल्स म्हणजे उत्तर प्रदेशाच्या डोक्यावरील सुंदर, आकर्षक व बहुमोल मुकुटच म्हणावा.

● ● ●

१९ : कॉर्बेट नॅशनल पार्क

हिंस्र श्वापदांच्या जंगलात

धनगडी येथे पाच वाजता पोहोचलो. अंधार व्हायला थोडाच अवकाश होता. येथून रामनगर ३० किलोमीटर व कॉरबेट नॅशनल पार्कचा कँप ३१ किलोमीटर-वर होता. म्हणून रात्री सरळ पार्कमध्ये जाऊन मुक्काम करावा असा विचार करून निघालो. रस्ता चांगला असल्याची नाक्यावरील माणसाने खात्री दिली म्हणून मी एक रुपयाचे प्रवेश- तिकिट काढून जंगलात प्रवेश केला.

प्रथम रस्ता बरा होता. नंतर मात्र सबंध रस्ता अतिशय त्रासदायक होता. दोन दिवसांपूर्वी झालेल्या मोठ्या पावसामुळे सर्व नाले व नद्यांना पाणी होते. रस्त्यातून अर्धा पाऊण फूट खोल चिखल होता. त्यातून गाडी चालवताना फार जपावे लागत होते. वेग अत्यंत कमी झाल्यामुळे अंधार होण्यापूर्वी कँपवर पोहोचतो की नाही, अशी शंका निर्माण झाली. शिवाय जो भाग उंचावर होता, तेथे वाटेवर लहानमोठे अनेक दगड पडले होते, म्हणून चाक पंक्चर व्हायची भीती होती. धीकाला जंगलमधील तो कँप ३१ कि. मी. दूर होता. वर घनदाट जंगलात अनेक हिंस्र पशू आहेत. वाघ, चित्ता, हत्तींचे कळप, रानरेडे, डुक्कर, रानटी धिप्पाड म्हशी, लांडगे, कोल्हे, सांबर इत्यादी पशूंचा तर फारच सुळसुळाट आहे. अशात गाडी बिघडली किंवा पंक्चर झाली तर... ? त्यात भर म्हणजे छोट्या नदीनाल्यांना पावसाचे पाणी लागले होते, व मोठमोठे दगड त्यात पडले होते. म्हणून तेथून जाताना गाडीवरून उतरून गाडी ढकलूनच न्यावे लागायचे. अशा रीतीने अनेक ठिकाणी उतरावे लागले. त्या वेळेला कोणी जंगली जनावर पाणी प्यायला तर आले नसेल ना, असा एकसारखा विचार मनात येत होता.

रस्ता थोडा सपाट व पूर्वीपेक्षा बरा लागल्यावर मी गाडीचा वेग थोडा वाढविला. परंतु थोड्या अंतरावर गेलो व अचानक ब्रेक लागला. मला समजण्याआधीच आपसुकच गाडी थांबली होती. चोहोकडे फिरणाऱ्या डोळ्यांनी लांब रस्त्याच्या बरोबर मध्यभागी एक रानबैल उभा असलेला पाहिला होता. प्रकाश फारच कमी होता, व ते जनावर थोडे लांब होते. माझ्याजवळील कॅमेऱ्याने फोटो आला नसता म्हणून मी विचार सोडून दिला. गाडीच्या आवाजाने तो उधळून येऊ नये म्हणून मी एंजिन बंद केले व तो वाटेतून दूर होण्याची वाट पाहू लागलो.

पाच मिनिटे झाली. परंतु तो काही जागेवरचा हालेना. असा वेळ वाया जाणे इष्ट नव्हते म्हणून मी गाडी चालू केली. समोरील काच तुटली होती. खडा लागून बल्ब फुटू नये म्हणून त्यावर मी मफलर बांधला होता. तो काढला व गाडीचा दिवा लावला. प्रकाशाचा झोत बंद करून पुन्हा चालू केला, व हॉर्न वाजवायला सुरवात केली. मनात भीती होती म्हणून गाडीवर स्वार झालो, क्वचित समोर आला तर गाडी वळवता यावी म्हणून. परंतु काहीही उपयोग झाला नाही. देवाचे नाव घेऊन मी एंजिन जोराने चालू ठेवले,– मोठा आवाज केला,– जोराने गाडी समोरच्या दिशेने पळवली– थोड्या अंतरावर गेलो. तेवढ्यात त्याने मुसंडी मारून एकदम पळ काढला व सरळ त्या झाडीतून अदृश्य झाला. परंतु त्याच्या या अचानक चपळ हालचालीने मी हादरलो होतो, व आपोआपच गाडीचा ब्रेक लागला होता. एकंदर प्रकार लक्षात आल्यावर पुन्हा गाडी चालू केली.

पुढे वाटेत काही हरीण, सांबर, कोल्हे, लांडगे, ससे दिसले. माकडे झाडावर विनाकारण उड्या मारीत सुटलेली दिसली. रानटी म्हशी गाडीचा आवाज ऐकून झुडपातून बाहेर यायच्या व ताबडतोब आत पळत सुटायच्या. काही वेळा जनावर आतल्या बाजूला पळत सुटले तरी सुकलेल्या पानांचा आवाज झाल्यामुळे– आपल्याकडे धाव घेत आहे की काय असा भास व्हायचा. कसाबसा एकदाचा मी त्या कँपवर पोहोचलो. लांबून तंबू व बंगले पाहून जिवात जीव आला. माझ्या गाडीचा आवाज ऐकून मॅनेजर, व्यवस्थापक मंडळी व काही परदेशी पाहुणे प्रवेशद्वाराजवळ पळतच आले, व आश्चर्याने पाहू लागले. मी पण माझ्याकडे

नखशिखान्त दृष्टिक्षेप केला. बूट पँटचा बॉटम चिखलाने भरलेला होता. गाडीची दोन्ही चाके चिखलाने माखलेली होती.

मी त्या मॅनेजरकडे रस्त्याबद्दल तक्रार केली. संबंधित खात्याकडे फंड नसल्याचे त्याने सांगता मी म्हणालो, " परंतु तुमच्या माणसाने नीट माहिती तरी द्यायला पाहिजे ना ? " श्री. बऱ्हैतींनी त्यांच्या सहकाऱ्यांकडे पाहून सांगितले, " वह राजन होगा ! बडा केअरलेस है ! " झालेल्या चुकीबद्दल त्यांनी क्षमा मागितली. तात्बडतोब माझी काळजीपूर्वक चौकशी करून त्याने माझ्या इच्छेनुरूप तंबूमध्ये राहण्याची उत्तम सोय केली. जंगलातून प्रवास करीत असताना हाडा-मासाचा व इतर घाणीचा विशिष्ट वास घेत सबंध रस्त्याची मजल मारली होती, तेव्हा येथे थोडी स्वच्छता पाहून बरे वाटले.

प्रवाशांमुळे हिंस्त्र पशू दूर गेले

सकाळी एका हत्तीवर बसून मी जंगलात हिंस्त्र पशू पाहावयास निघालो. माहुताला आड वळणाने जावयास सांगितले. इकडून तिकडून पुष्कळ हिंडलो. परंतु एकही हिंस्त्र पशू पाहावयास मिळाला नाही. अखेर उघड्यावर आलो तेव्हा तेथे हरीण, सांबर व रानडुक्कर पाहावयास मिळाले तेवढेच. बहुधा या कॅंपमध्ये प्रवाशांची एकसारखी ये–जा होत असल्याकारणाने ती जनावरे येथून लांब निघून गेली असावीत. नदीच्या पैलतीरी घनदाट जंगल व डोंगर होते. तेथे वाघ, चित्ते पुष्कळ आहेत. परंतु त्यांना पाहण्यासाठी दोनतीन दिवस आत जंगलात मुक्काम करावयास हवा.

कॉरबेट नॅशनल पार्क– धीकाला जंगलमधून बाहेर पडतानादेखील मला नदी-नाल्यांचा त्रास झाला. जंगलातील विशिष्ट प्रकारच्या हवेने व गाडी ढकलण्याच्या श्रमामुळे सर्वांग दुखत होते. अंगात ताप भरला होता. फ्ल्यू झाल्यावर जसा त्रास होतो तसा त्रास होऊ लागला. त्यातच भर म्हणून वरून कडक ऊन ' मी ' म्हणत होते. मी कालागढ येथील रामगंगा धरणाच्या बांधकामावर पोहोचलो, तेव्हा तेथील सर्व कामगारांनी एकच गर्दी केली. नानाविध प्रश्नांनी ते आपले कुतूहल व्यक्त करीत होते, व आपुलकीने दोन-दोन मिनिटांनी कोणी एखादा चहाचा कप घेऊन यायचा. परंतु मला औषधाची आवश्यकता होती म्हणून

एकजण अर्ध्या मैलावरील त्यांच्या तंबूमधून गोळ्या घेऊन आला. मला फार बरे वाटले. रामगंगा धरणावरील एंजिनीयरांनी मला जागेवर घेऊन जाऊन सविस्तर सर्व काही समजावून सांगितले. माझा एंजिनीयरिंगचा अभ्यास झालेला असल्यामुळे त्यांनाही आपुलकी निर्माण झाली.

दिल्लीच्या रोखाने मी प्रवास करीत असता नूरपूर येथे सायंकाळ झाली. फोकसची काच नसल्यामुळे प्रकाश मिळणे कठीण होते, व माझ्या अंगात तापही पुष्कळ भरला होता, म्हणून मी नूरपूर गावात प्रवेश केला व चौकशी करून डॉ. कृष्णकुमार यांच्याकडे गेलो. 'पाच व्यक्तींकडे चौकशी करता सर्वांनी तुमचं नाव सुचवलं' असे मी म्हटल्यावर ते खूष झाले. अंगातील ताप १०२ डिग्री होता तरी मी हसत होतो, व प्रवास करून आलो याबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले ! त्यांनी मला दोन दिवस विश्रान्ती घेण्याचा सल्ला दिला. इतर ठिकाणी माझे राहणे इष्ट नव्हते, म्हणून त्यांच्या घरातच माझी झोपण्याची त्यांनी सोय केली. दुसऱ्या दिवशी सकाळी जरा बरे वाटल्यावर मी निघालो.

वाटेत काही लोक खांद्यावर कावड घेऊन जात असताना दिसले. ते हरिद्वारहून गंगाजळ व महादेवाच्या मूर्ती महाशिवरात्रीसाठी आपापल्या गावातील मेळ्यामध्ये घेऊन जात होते. गंगाजळ व मूर्ती ज्यात असेल ते जमिनीवर टेकवायचे नाही, असा त्यांचा 'पण' असतो. म्हणजे हे लोक रात्रंदिवस सतत चालत होते.

घनोरामंडी येथे एका दुकानासमोर गाडी लावून मी ट्रकमध्ये बसून नूरपूरला गेलो व कॅमेरा घेऊन परतलो. अंगात ताप होता. घनोरामंडीहून गाडी घेऊन निघताना एक म्हणाला, "भाईसाहब ! अपना सामान सब बराबर देख लो, कुछ गया तो नहीं है न ?– देख के निकलो।"

मी गाडी स्टँडवर लावली. त्याच्या समोर जाऊन एक हात माझ्या कंबरेवर व दुसरा हात त्याच्या खांद्यावर ठेवून बोललो, "मेरे चाचा ! इस धरती से इन्सानियत चली गई है क्या ? कि जिससे मुझे इतनी फिकर करनी पडे ? आप लोग जैसे भले आदमी मिलने पर ऐसा सोचना भी मेरे लिए पाप है।"

तो म्हणाला, "नहीं भाई ! ऐसी बात नहीं। मगर पराई जगह पर अपनी चिजों का ख्याल रख कर आगे जाना चाहिए !"

मी म्हणालो, " ख्याल रखने वाला ऊपर जो बैठा है, तो हम क्यों छोटी छोटी बातों की फिक्र करें ? उसके तो लेने के भी हजारों हाथ हैं और देने के भी....जब चाहे ले दे सकता है। हमारा उस पर भरोसा है और वह भी हमारा ख्याल रखता है।"

सर्वांना हे ऐकून फार आनंद झाला. त्यांतील एक म्हणाला, " भगवान पर भरोसा है, तभी तो इतने दिन से इतना सफर कर पाये हैं। उनकी मर्जी के सिवाय इतना होना क्या मामुली बात है? इतनी जमीन जायदाद होने के बाद भी हमने इस उमर तक रामेश्वर नहीं देखा ! " सर्वांसमवेत चहापाण्याचा कार्यक्रम झाला. त्यांतील वडीलधाऱ्या मंडळींचा आशीर्वाद घेऊन मी निघालो आणि दिल्ली गाठली.

दिल्लीत मी उभा होतो तेथे माझ्या दोन्ही बाजूंना दोन तगडे अधिकारी येऊन उभे राहिले. एक उजव्या बाजूने व एक डाव्या बाजूने. अशा पवित्र्यात होते की हात पाय पुढे करता येऊच नये. थोड्या वेळाने आमच्या समोरील दार उघडले, व समोरून पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी बाहेर पडल्या. माझ्या-जवळ पार्लमेंटमधील श्री. मोरारजी देसाईंच्या ऑफिसच्या भेटीचा पास होता. परंतु जवळून पाहण्याच्या व शक्य असल्यास चार शब्द बोलण्याच्या विचाराने मी इंदिरा गांधींच्या ऑफिससमोर येऊन उभा होतो, म्हणून तेथील त्यांच्या अंगरक्षकांनी मला अशा रीतीने वेढले होते. श्रीमती इंदिरा गांधी बाहेर पडून गाडीतून रवाना होईपर्यंत मी जागचा हालू शकलो नाही. मी सतत दोन दिवस पार्लमेंट हाउसमध्ये ये-जा करीत होतो. म्हणून तेथील अधिकाऱ्यांनी माझ्यावर संशय घेतला. त्यांच्यापैकी एकजण तर राष्ट्रपती भवन, ऑल इंडिया रेडिओ, रेल्वे भवन इत्यादी ठिकाणी दुरून माझ्यावर पाळत ठेवून होता. माझ्या निर्दोष-पणाची खात्री झाल्यावरच त्याने माझा पाठलाग सोडला.

पुण्याचे खासदार श्री. एस. एम. जोशी यांनी माझा निरोप मिळताच तेथील रिसेप्शनिस्टजवळ पार्लमेंटचा पास तयार करून ठेवला व मला देण्याची सूचना केली. " इतर काही काम आहे का ? " असाही त्यांनी सवाल फारच आपुलकीने केला, व चहापाण्यासाठी आपल्या निवासस्थानी येण्याचा आग्रह केला. राज्यसभेच्या प्रतिनिधी सौ. ताराबाई साठे यांचीही भेट झाली. त्यांनी

आत्मीयतेने आपल्या घरी जेवणाचे आमंत्रण दिले. परंतु काही महत्त्वाच्या कामानिमित्त मी जाऊ शकलो नाही. श्री. मोरराजी देसाई यांनी एका सुंदर पत्राद्वारे माझ्या प्रवासाची प्रशंसा करून गौरव केला. गृहमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण यांना भेटावयास गेलो तेव्हा ते अचानक चंडीगडला निघून गेले होते.

दिल्ली येथे पूर्वी मी दोनदा जाऊन आलो होतो. तरी या वेळेला फोटो घेण्याच्या दृष्टीने प्रेक्षणीय स्थळे पाहावयास गेलो. लाल किल्ल्यामध्ये होत असलेला नवीन धर्तीचा 'साउंड अँड लाइट' हा कार्यक्रम पाहून फार आनंद झाला. लाल किल्ल्याचा इतिहास त्यांनी ध्वनी व प्रकाश यांच्या साहाय्याने फारच उत्कृष्टरीत्या थोडक्यात वर्णविला आहे. जपानी तंत्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली नुकताच निर्माण केलेला 'बुद्धजयंती पार्क' हे एक नवे आकर्षण दिल्लीमध्ये आहे. विविध प्रकारची, इतक्या प्रचंड संख्येत, व विविध प्रकारे लावलेली फुले इतर कोठेही पाहावयास मिळत नाहीत. बागेच्या आपल्या कल्पनेला 'धक्का' पोहोचेल अशी ही सुंदर आधुनिक विशाल बाग आहे. कॅनॉट प्लेस म्हणजे भारतातील सर्वांत मोठे मार्केट आहे. याची वैशिष्ट्यपूर्ण गोल रचना इतरत्र कोठेही पाहावयास मिळत नाही.

दिल्लीतील एकान्त देणारी स्थळे

राष्ट्रपती भवन, सेंट्रल सेक्रेटरिएट, पार्लमेंट, इंडिया गेट, ऑल इंडिया रेडिओ, रेल्वे भवन, रिझर्व्ह बँक, राजघाट, शान्तिवन, नॅशनल म्यूझियम अँड आर्ट गॅलरी, इत्यादी प्रेक्षणीय स्थळे आहेत. बिर्ला यांनी बांधलेले लक्ष्मी-नारायण मंदिर, लाल किल्ल्यासमोरील गौरीशंकर मंदिर, कालकाजी मंदिर, व जैन मंदिर पाहण्याजोगी आहेत. या सर्वांपेक्षा वेगळे आकर्षण असेल व खरी शान्ती म्हणजे एकान्त प्राप्त होत असेल, तर ते हुमायून, सफदरजंग, हौजखास, अदमखान, अटगहखान, ईसाखान, लोदी, निझामउद्दीन– या सर्वांच्या कबरी जेथे जेथे आहेत तेथे व त्या बागेत. या भव्य राजधानीच्या शहरात सर्व प्रकारच्या लोकांची गर्दी झाली आहे, व नित्य नवे कार्यक्रम असतात. त्यातून एकान्त पाहिजे असल्यास वरीलपैकी एका स्थळी जावे. या सर्वांपेक्षा आगळे महत्त्व जर कोणत्या स्थळाला असेल तर तो– कुतुबमिनार !

दिल्लीच्या 'हिंदुस्थान' या हिंदी वर्तमानपत्रात माझा मोटरसायकलसह फोटो छापून आला व बातमी पण प्रसिद्ध झाली. त्यामुळे तेथील 'ऑल इंडिया रेडिओ'च्या हिंदी विभागाने मला आमंत्रण दिले व माझे छोटे भाषण २८ फेब्रुवारी १९६८ रोजी रात्री रेडिओवरून ध्वनिक्षेपित केले. दुसऱ्या दिवशी बाहेर पडणाऱ्या बजेटवरतीदेखील माझी प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे आमंत्रण तेथील डायरेक्टर श्री. रामानुजम यांनी मला दिले. बजेट प्रसिद्ध झाल्यावर मी एक प्रवासी म्हणून माझी प्रतिक्रिया व्यक्त केली. तीही ध्वनिमुद्रित करण्यात आली.


• • •

२० : हिमाचल-- सृष्टिसौन्दर्याची खाण

लाल टिब्बावरून हिमालय-दर्शन


दिल्ली सोडून मी हरिद्वार येथे मुक्काम केला. हरकी पौडी येथे गंगास्नान केले. मंदिरात भक्तिभावाने दर्शन घेतले, तांब्यात गंगाजल घेऊन सील करून घेतले. हरिद्वार येथे अनेक धर्मशाळा आहेत, व राहण्याची सोय इतर तीर्थांपेक्षा येथे फार बरी आहे. येथून सोळा मैलांवर हृषिकेश आहे, व तेथून तीन मैलांवर लक्ष्मणझुला. गंगेच्या या किनाऱ्याहून त्या किनाऱ्यावर जायला विनामूल्य नावेची सोय आहे. समोर स्वर्गाश्रम असून गीताभवनमध्ये सबंध गीता भिंतीवर कोरलेली आहे. शेजारील आश्रमात मंदिर असून सर्व प्रान्तांतील संतांच्या सुंदर मूर्ती काचेच्या कपाटात बसविल्या आहेत, व ही कपाटे थोड्या थोड्या अंतरावर बसविली आहेत. त्यामुळे प्रत्येकाकडे विशेष लक्ष जाते. बागेत पुराणातील प्रमुख प्रसंग विविध मूर्ती उभ्या करून सजविले आहेत.

हृषिकेशहून डेहराडूनला जाताना वाटेत घनदाट अरण्ये आहेत. प्रसिद्ध मोतीचूर, सेंकच्युअरी येथेच आहे. डेहराडून हे एक मोठे लष्करी छावणीचे स्थळ असून, शहरात वैशिष्ट्य असे काही नाही. हृषिकेशहून डेहराडून २७ मैल असून, तेथून मसूरी २१ मैलांवर आहे. मसूरी घाट चढताना तिरुपतीच्या रस्त्याची आठवण झाली. उटकमंड, कोडाईकनल, दार्जिलिंग, नैनीताल, सिमला, काश्मीर– या सर्वांपेक्षा मसूरी घाटाचा रस्ता फारच उत्कृष्ट आहे. इतकी सुंदर वळणे कोठेच नाहीत. वाटेत अनेक ठिकाणी थांबून मी लांब रस्त्यांकडे बघत उभा राहात असे.



हरिद्वार येथील गंगाघाट : यांस हरकी पौडी (हरी की पेढी) म्हणतात. श्रीकृष्णाने येथे तपश्चर्या केली होती असे म्हणतात. हजारोंच्या संख्येने लोक स्नान करतात म्हणून संरक्षणाची खास सोय आहे.


[फोटो : अशोककुमार स्वामीनारायण




कुफरीचा बर्फमय प्रदेश

सिमला येथील कुफ्री हे स्थळ सर्वोत्तम आहे. सबंध डोंगर हिम
पट निर्माते येथे चलचित्रणासाठी हमखास येत असतात. वरती आरामगृह सु

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण






काशी येथील काशीविश्वनाथ मंदिर

हिंदू विश्वविद्यालयाजवळील उद्योगपती बिर्लांनी बांधलेले हे नवे काशी विश्वनाथाचे मंदिर. खालून वरपर्यंत पांढरे शूभ्र असून आत भिंतींवर रंगीत पर्शियन स्टोनमध्ये पुराणांतील प्रसंग चित्रित केले आहेत.

ादित असून चित्र-
छोटी बाग आहे.



काश्मीरमधील बनिहाल घाट

चित्रात बर्फाला लागून मोटर सायकल उभी आहे. बनिहाल घाटातील ही सतान नाली. येथे अचानक बर्फाचा प्रवाह असा सुरू होतो की ट्रकच्या ट्रक दरीत वाहून जातात. बर्फाचा जो कडा दिसत आहे त्याच्या खालीही नाला आहे. त्यामधून प्रचंड वेगाने पाणी वाहाते.

फोटो : अशोककुमार स्वामीनारायण

पहाटे उठून मी मसूरीच्या लालटिब्बा या सर्वोच्च शिखरावर फिरावयास गेलो. येथून हिमालय एकदम समोरच दिसतो. गंगोत्री, जम्नोत्री व त्रिशूळ अगदी समोर आहेत. येथे एक दुर्बिण ठेवली आहे. पन्नास पैशांचे नाणे टाकले की दुर्बिण उघडते व दोन मिनिटे उघडी राहते. तेवढ्या वेळात चारी दिशांवरील लांबचे सृष्टिसौन्दर्य पाहावयाचे असते. माझे समाधान न झाल्यामुळे मी पुन्हा पुन्हा पाहिले. जवळपास तेथे त्या वेळेस कोणीच नव्हते. समोरील गंगोत्री व त्रिशूळ फारच आकर्षक वाटले. परंतु जम्नोत्री पाहून मला अतिशय आनंद झाला. टोकापासून तळापर्यंत एक सारखेच बर्फाचे आवरण. टोकावरून एखाद्याला सोडले तर तळाला येईपर्यंत काहीही लागणार नाही, याची येथून हमखास खात्री वाटते. इतका मुलायम हा पर्वत येथून दिसतो की– ज्याचे वर्णनच करता येणार नाही.

[illegible] प्रेक्षणीय स्थळे जवळजवळ होती, म्हणून मी ९ मैलांवरील [illegible]च्या धबधबा पाहावयास पायी निघालो. नऊ मैल एकसारखा उतार उतरून मी धबधब्याजवळ गेलो. 'डोंगर पोखरून उंदीर काढल्या'सारखे झाले. मी अनेक सुंदर धबधबे पाहिले होते. यापेक्षा किती तरी पटींनी सुंदर व अनेक धबधबे एकट्या खंडाळ्याच्या घाटात पाहावयास मिळतात ! इतर प्रेक्षणीय स्थळां-मध्ये गनहिल, बोटॅनिकल गार्डन, म्युनिसिपल पार्क, मार्केट, व दूरवरचे धबधबे आहेत. इतर प्रसिद्ध हिल-स्टेशन्सच्या मानाने मसूरी फारसे आकर्षक नाही. मसूरीला मी डोंगरदरीमध्ये एका दिवसात २६ ते २७ मैल चाललो.

मसूरीहून चंडिगडला जायला शहारनपूर व अंबाला येथून रस्ता आहे. पण मी ६० ते ७० मैल प्रवास वाचविण्यासाठी नाहन, कालाआम, रायपराणी, डेराबसी व चंडीगड असा रस्ता धरला. वाटेत जमुना पार करताना त्रास झाला. परंतु हिमाचल प्रदेशाचा अत्यंत घनदाट जंगलाचा भाग समजल्या जाणाऱ्या चंबल भागातून माझा प्रवास झाला, व सर्वांत वेगळा निर्जन भाग पाहण्याचा लाभ मिळाला. अस्त पावणाऱ्या सूर्याचे सौन्दर्य पाहात पाहात मी चंडीगड शहरात प्रवेश केला.

चंडीगडमध्ये संधिप्रकाशात सरदारजीसमोर जाऊन उभा राहिलो व चौकशी केली. मला पाहिजे असलेले स्थळ तेथून लांब होते. " मैं भागता हूँ, आप पीछे पीछे आइए " असे म्हणून तो ' सुटणार ' एवढ्यात मी मोठ्यानेच ओरडून त्याला थांबविले. मी शोधून घेईन असे म्हणून काही मिनिटे खाणाखुणा समजून घेण्याचा प्रयत्न केला व मी निघालो. गरजूंस सर्वरीत्या साहाय्य करण्यास प्रथम तत्पर असतील तर ते शीख लोक, असा मला पर्यटनात अनुभव आला. अनेक ठिकाणी रस्ता दाखविण्यासाठी शीखांनी फारच आपुलकीने साहाय्य केले.

चंडीगड अत्यंत आधुनिक व भारताचे सर्वोत्कृष्ट शहर आहे, असा समज लोकांमध्ये पसरलेला आहे. आधुनिक शहर म्हटले की न्यूयॉर्क, वॉशिंग्टन ही शहरे आठवतात. पण तसा काही प्रकार पाहावयास येथे मिळत नाही. येथील रस्ते व गृहांची रचना विशिष्ट रीतीने केलेली आहे एवढेच. आपल्या येथे जशा पेठा आहेत त्याप्रमाणे तेथे सेक्टर्स आहेत, व त्यांना नंबर दिलेले आहेत. समान्तर आडवे व उभे मोठे रस्ते केल्यानंतर जे लांब चौरस झाले ते सेक्टर्स. त्या लंबचौरसामध्ये राहण्याच्या सोयीची घरे व बाजार बांधले आहेत. बाजारांत वेगवेगळ्या वस्तूंची दुकाने अशा रीतीने विभागली आहेत की, सामान्यत: लोकांना सेंटरबाहेर खरेदीसाठी जावे लागत नाही. अजून पुष्कळ जमीन पडून आहे. गरजेप्रमाणे पुढे इमारती बांधण्यात येतील. हल्लीच्या इमारती पाहून डोळ्यांचे पारणे फिटेल असे काही नाही. करमणुकीचे स्थान म्हणून एक तलाव शहराच्या पूर्वेला आहे; तेथेच एक बाग आहे; व त्याच्या उत्तरेला सेक्टर नं. १ मध्ये सेक्रेटरिएट, हायकोर्ट, म्यूझियम, राजेन्द्र पार्क, लेजिस्लेटिव्ह चेंबर इत्यादी सर्व स्थळे एकवटलेली आहेत. तरुणांचे आकर्षण असलेले पोहोण्याचा तलाव मात्र पश्चिमेतील सेक्टर २३ मध्ये आहे.

चंडीगड शहरात एक आकर्षण म्हणजे तेथील युनिव्हर्सिटी. तेथे भव्य वाचनालय बांधले असून विविध विषयांसाठी व प्रयोगांसाठी नावीन्यपूर्ण इमारती आहेत. युनिव्हर्सिटीचे वेगळे उद्यान आहे. लोकांना ते आकर्षून घेते. बाकी शहरातील नेहमीची सदरे म्हणजे शाळा, कॉलेज, चित्रपटगृह, हॉटेल्स इत्यादी आहेत. परंतु पुण्या–मुंबईच्या नागरिकांना त्याचे नवल नाही. येथे खेद या गोष्टीचा होतो की, बाजार, ठराविक वेळी चित्रपट, व उद्यान अशी स्थळे सोडली तर बाकीच्या

भागात कायम शुकशुकाट असतो. घरेदेखील अशा रीतीने बांधली आहेत की, ज्यांत प्रवेश केल्याशिवाय कोणी राहात असेल असे वाटत नाही. शहरात जी धावपळ व हालचाल दिसावयास पाहिजे ती येथे दिसत नाही. सध्या शहराची वस्ती फार कमी आहे;– सव्वा ते दीड लाख. भविष्यकाळी वस्ती वाढल्यावर येथे खरा जिवंतपणा येईल, असे वाटते.

चंडीगडबद्दल मी थोडे धाडस करून टीका करतो. अत्यंत अनुभवी व कर्तबगार लोकांनी याचा मास्टर प्लॅन तयार केला आहे. त्यांनी एक चूक केल्यासारखे मला वाटते. सर्व रस्ते आडवे आणि उभे समान्तर आहेत. त्यामुळे शहराच्या एका टोकापासून समोरच्या कोपऱ्यातील टोकापर्यंत जायचे असल्यास त्यास आडवे संपूर्ण व उभे संपूर्ण अंतर कापायला हवे. परंतु या चौकोनी शहराच्या समोरील टोकांना जोडणारे शहराला भेदून जाणारे दोन भव्य रस्ते निर्माण केले असते तर फार बरे झाले असते. शहराच्याबरोबर मध्यभागी एक अत्यंत भव्य चौक निर्माण करता आला असता, व तेथून शहराच्या आठ दिशांना जाणारे लांब रस्ते फार आकर्षक वाटले असते. शिवाय जलद प्रवासाला सोयीस्कर झाले असते.

जगातील सर्वोच्च क्रिकेट मैदान

चंडीगडला गेलेला प्रवासी सिमला व भाक्रा–नांगल पाहिल्याशिवाय परतणार नाही. मी कालकाहून सिमल्याच्या रस्त्यावर प्रवास सुरू केला. कालकाच्या अलीकडे मोगलकालीन पींजोर गार्डन्स आहेत. त्या प्रेक्षणीय आहेत. कालकापासून सिमला ६० मैलांवर आहे. जावयास छोटी रेल्वे-लाइन आहे व उत्कृष्ट मोटर-रस्ता पण आहे. वाटेत कसौली, चैल व सोलान ही प्रेक्षणीय स्थळे लागतात. त्यांतील चैल जगातील सर्वाधिक उंचीवरील क्रिकेटच्या मैदानामुळे प्रसिद्ध आहे. सिमल्यापासून पन्नास मैलांवर घाट रोड सुरू होतो. श्वास रोखून धरणारा हा रस्ता व निसर्गरम्य वातावरणामुळे प्रवास फारच सुखद होतो. सिमला जवळ येऊ लागते तसतसे सृष्टीचे सौन्दर्य वाढीस लागलेले दिसते. त्यामुळे अनेक ठिकाणी मी द्विधेत पडलो. येथे पाहावे की लवकर सिमल्याला पोहोचावे ? अनेक ठिकाणी थांबून छायाचित्र घेई. सावकाश मी सिमल्याला पोहोचलो.

सिमल्यात विशेष आकर्षक स्थळ असेल तर ते स्कीइंगची सोय असलेले कुफ्री शहर. हे येथून दहा मैलांवरील ८२०० फूट उंच आहे.पर्वताच्या उतारावर बर्फ पडून असा पृष्ठभाग तयार होतो की, त्यावर घसरणे फारच आनंददायी होते. मी मोटरसायकल घेऊन निघालो. थंडी फार होती. शहरातील बर्फ नुकताच वितळलेला होता. परंतु इतर डोंगराच्या उतारावर पुष्कळ बर्फ साचलेला होता. अनेक मैल प्रवास केल्याने माझ्या बुटांना पुन्हा दुरुस्ती आवश्यक होती. म्हणून मी चपला घालूनच कुफ्रीला निघालो. गावात गाडी ठेवून डोंगर चढू लागलो. बर्फातून चालताना पाय आत चार सहा इंच जायचा. त्या वेळेस काय हाल झाले याची कल्पना करवणार नाही. परंतु अनेकदा चित्रपटात पाहिलेल्या या बर्फाचे मला अत्यंत आकर्षण होते, म्हणून मी काळजी सोडून हसतमुखाने वर गेलो. तेथील 'गझीबो 'मध्ये थोडा वेळ बसलो. बर्फाचे गोळे करून दाही दिशांना फेकू लागलो, व एकट्यानेच करमणूक करून घेतली. काही ठिकाणी आतला चांगला बर्फ काढून खाल्ला. नैनीताल येथेदेखील मी पुष्कळ बर्फ खाल्ला होता. या बर्फाचे वैशिष्ट्य म्हणजे पाण्याप्रमाणे उपयोग केला तरी अपाय होत नाही.

सहा तास मी एकटा येथे फिरलो. तेथील रस्त्यावरून बर्फ बाजूला सारणाऱ्या कामगारांशी बोललो व माझ्या अनेक जिज्ञासांचे समाधान करून घेतले; अनेक छायाचित्रे घेतली. परंतु मनाचे समाधान होत नव्हते. हे सुंदर स्थळ सोडून जावेसे वाटतच नव्हते. सूर्य पश्चिमेच्या क्षितिजावर धावू लागल्यावर मी पाय उचलला. परतताना चाकावर छोटे पंक्चर झाले होते व हवा कमी कमी होत होती. सुदैवाने वाटेतील पंपावर हवा मिळवली व ती कमी होईपर्यंत मी सिमल्याला परतलो. हिमाचल प्रदेशाच्या या राजधानीत पंक्चर काढणारा व मोटरसायकलचे चाक फिट करणारा मला कोणी न भेटल्यामुळे फार आश्चर्य वाटले. अखेर स्वतःच एकाच्या मदतीने सर्व केले.

हनुमान थांबले ती जागा

शहराला लागून असलेल्या 'जाकू' नावाच्या टेकडीवर हनुमानाचे मंदिर आहे. लक्ष्मणासाठी हिमालयावर औषधी आणावयास जात असता हनुमान येथे

थांबला होता असे लोक मानतात. अनेक भाविक येथे दर्शनाला येतात. शिवाय सृष्टिसौंदर्यही उत्तम दिसते.

सिमला येथे फारच दाटीने वृक्ष आहेत. इतके घनदाट वृक्षवन इतरत्र कोणत्याही हिल-स्टेशनवर पाहावयास मिळत नाही. उंच उंच वृक्षांच्या खालून जात असताना भर उन्हाची जाणीव होणार नाही. दरीतून जोराचा वारा जरी सुटला तरी या घरांमध्ये तो सौम्य होतो. सिमल्याला 'क्वीन ऑफ हिल-स्टेशन्स' म्हणतात ते अगदी रास्त आहे. सिमल्याचा परिसर अत्यंत रम्य, मनोहर, विलोभनीय असून, त्यांच्या नुसत्या स्मृतीनेही मी सुखावतो.

जाकू, ग्लेन, समरहिल, चाडविक, धबधबा, प्रॉस्पेक्ट हिल, तारादेवी, सन्जौली, मशोब्रा, क्रेइनानो, नलदेरा, कुफ्री, वाइल्ड फ्लॉवर होल, चिनी बंगला, फागू इत्यादी पिकनिकसाठी प्रसिद्ध स्थळे आहेत. पायवाटेने चालून सृष्टीच्या सान्निध्याचा आनंद लुटावयाचा असल्यास गंधकयुक्त पाण्याचे झरे असलेले टट्टा पानी, चब्बा, गर्द झाडी असलेले बागी, सफरचंदाच्या बागांसाठी प्रसिद्ध कदराला, हिमाच्छादित पर्वतांची माला पाहण्यास नरकंडा, मत्स्य शिकारी-साठी प्रसिद्ध रोहरू, इतर चैल, सोलन, कसौली, सबाथु, दगशाई वगैरे अनेक निसर्गरम्य स्थळे आहेत. प्रत्येक स्थळासाठी एक दिवस तरी द्यावा इतके आक-र्षण त्यात आहे. काश्मीर सोडून इतर कोणत्याही रम्य स्थळी इतकी ठिकाणे पाहावयास मिळत नाहीत.

रील म्हणून प्रसिद्ध असलेल्या सिमल्यातील मुख्य ठिकाणी संध्यासमयी लोक फिरावयास येतात व दूर दूर डोंगरांचे सौन्दर्य डोळे भरून पाहतात. येथून जवळच प्रमुख बाजार आहे. येथे अनेक शाळा असून, करमणुकीची साधने पण पुष्कळ आहेत. ५०,००० हून अधिक वस्ती सिमलामध्ये आहे. मी होटेल मरीनामध्ये राहिलो होतो. येथे फार चांगली सोय आहे. त्याहून स्वस्त व अधिक महाग अनेक होटेल्स येथे आहेत. मी गेलो तेव्हा पावसाळा तेथे संपला नव्हता, म्हणून हॉटेल्स रिकामी होती. मी असताना एका रात्री पुष्कळ पाऊस झाला.

सिमल्याच्या सुखद स्मृतींना बरोबर घेऊन मी निघालो. बिलासपूरच्या अलीकडील 'नौनी'वरून, किरतपूर, आनंदपूर साहिब व नानगल असा प्रवास

करायच्या विचारात होतो. एकसारखा डोंगर भागातून चढउतारावरून प्रवास झाला. कालकाहून येताना जसा आनंद प्राप्त झाला होता तसा येथून जात असतानाही डोंगरदऱ्यांचे आभाळ व ढगांचे सौन्दर्य पाहात असताना मी मिळवू शकलो. हिमाचल प्रदेशचा हा भाग म्हणजे सौन्दर्याची खाणच समजा. ओक व पाइनच्या उंच वृक्षांनी सुशोभित, घाटदार गोल घेर असलेल्या वृक्षांनी थंडावलेली, अनेक झऱ्यांनी व धबधब्यांनी संगीतमय झालेली, सफरचंदाच्या बागांनी समृद्ध झालेली देशाच्या व जगाच्या कानाकोपऱ्यातील प्रवाशांच्या पावलांनी पावन झालेली, हिंस्र श्वापदांची जोपासना करून साहसी शिकाऱ्यांना आवाहन करीत असलेली, व माझ्यासारख्या हौशी तरुणांना स्मृतीच्या सुंदर संग्रहाने प्रेमळ निरोप देत असलेली– ही भूमी सोडून जात असताना माझ्या हृदयाचा तीळन् तीळ तुटत होता!

• • •

२१ : बनिहाल खिंडीतून प्रवास

एकाकी प्रवासाचे कौतुक

किरतपूर, केसगड व आनंदपूर-साहब या शीखांच्या तीर्थस्थानी मेळावा भरलेला असताना मी तेथे गेलो. ही तिन्ही स्थळे जवळजवळ आली आहेत. हजारो शीख स्त्री-पुरुष तेथे जमले होते. येथील उपाहारगृहांमध्ये शाकाहार व मांसाहार असे मिश्र पदार्थ विकण्यात येत होते. आपल्या येथील मेळ्याप्रमाणे खेळण्याची दुकाने व इतर दृश्ये येथे पाहावयास मिळाली. तलवारी व भाले काहींच्या हातांत होते. परंतु छोट्या कट्यारी सर्वांच्या कमरेला होत्या. लोक या मेळ्याला लांबून मोटरी घेऊन आले होते, व त्यांच्याभोवती भिक्षुकांच्या प्रदक्षिणा एकसारख्या चालू होत्या.

काही लोकांनी मला तेथे राहण्याचा फार आग्रह केला. परंतु प्रमुख कार्यक्रमाला अजून दोन दिवस अवकाश होता. तितका वेळ देणे अयोग्य असल्याकारणाने मन मारून मी तेथून निघालो, व नानगल या गावाच्या वेशीवर आलेल्या एका स्थळी मुक्काम केला.

" आप अकेले हैं या कोई और भी है ? " असा प्रश्न विचारीत भाक्रा धरणाचा चीफ सिक्युरिटी ऑफिसर आपल्या ऑफिसमधून बाहेर आला. धरणाच्या वर जाऊन मी सामान्यरीत्या लोकांना जे दाखविण्यात येते ते पाहून आलो होतो. परंतु मला धरणाच्या खालील व भिंतीच्या पोकळीतील " गॅलेरी " पहावयाच्या होत्या. त्यासाठी या अधिकाऱ्याच्या परवान्याची गरज होती. त्याच्या

ऑफिससमोर जाता त्याने स्वतः बाहेर येऊन गाडीवरची पाटी वाचून हसत-मुखाने चौकशी केल्यामुळे मला बरे वाटले. काही प्रश्न विचारल्यानंतर तो म्हणाला, " मैं पूना में पहले था। अच्छा शहर है। वहाँ के लोक देखने में छोटे छोटे होते हैं पर बहादूर... आपको रास्ते में कोई तकली-अीफ तो नहीं हुई ? " वगैरे पुष्कळ प्रश्न त्याने मला विचारले. पास वगैरे काढण्याचा प्रश्न आता राहिला नव्हता. त्याने स्वतः बरोबर येऊन आतील सर्व व्यवस्था मला दाखविली. पॉवरहाउस दाखविले. निघण्यापूर्वी आग्रहाने अल्पोपाहार दिला. नाव व पत्त्यांची देवाण–घेवाण झाल्यावर मी तेथून निघालो.

माझ्या या एकाकी प्रवासाबद्दल सर्वाधिक आश्चर्य व कौतुक व्यक्त केले असेल तर ते सैन्यातील लोकांनी....! त्यातही शीखांनी अधिक प्रशंसा केली. पंजाबमध्ये अगदी सामान्य नागरिकानेदेखील चेहऱ्यावर आश्चर्य आणून विचारपूस केली. ते जेव्हा कौतुकास्पद उद्‌गार काढावयाचे, आपआपसांत या प्रवासातील संभाव्य अडचणी व जोखमीची चर्चा करावयाचे, तेव्हा मनातल्या मनात मी एक विनोद करून हसावयाचो की, ' इस हिरे को वो परखे, जो निगाह रखता है...'

प्रसिद्ध भाक्रा व नानगल ही धरणे पाहून मी निघालो. एका पोलिस अधिकाऱ्याजवळ चौकशी करून मी उना, अंबल, रानीतालवरून कांग्रा येथे पोहोचलो, व तेथून धर्मशाला या हिल-स्टेशनवर पोहोचलो. या रस्त्यावरून जाताना अनेक ठिकाणी नद्यांतून जावे लागले. त्या विशालपटातून प्रवास करीत असता पावसाळ्याची कल्पना केली. त्या वेळेला पाणी फारच कमी होते. पण पावसाळ्यात त्या फारच भव्य वाटत असाव्यात.

या भागातील कांग्रा व कुलू ही स्थळे फारच निसर्गरम्य आहेत. कुलू येथे तर काही ठिकाणी निसर्गाचे सौन्दर्य इतके खुलते की काश्मीरपेक्षाही अधिक आकर्षण प्रवाशांना येथील वाटते. दऱ्याखोऱ्यांतून पायी प्रवास करून आनंद लुटण्यासाठी हे उत्तमोत्तम स्थान मानण्यात येते. सफरचंदाच्या बागांनी रंगीत व हिमाच्छादित धौलाधर पर्वतमालेने शुभ्र अशी ही भूमी फारच आकर्षक आहे. कांग्रा, जोगीन्दरनगर, धर्मशाला, कुलू आणि मनाली ही या दऱ्यांमधील प्रमुख निसर्गरम्य स्थळे आहेत.

धर्मशालाचा परिसर सुंदर आहे. येथून वरती पर्वतावर मॅकलीन्टोक या स्थळी तिबेटचे दलाई लामा यांचा मुक्काम असतो. त्यांना भेटण्यासाठी माझा प्रयत्न होता. पण काही अडचणी मुद्दाम उभ्या करण्यात आल्या व मला त्या गोष्टीचा फार राग आला. नीट उत्तरे मिळत नव्हती व वेळ वाया जात होता. अखेर मी दलाई लामांच्या चिटणिसांना एक पत्र पाठवून त्याचे उत्तर मागविले. मला नंतर आत जाण्याची संधी मिळाली. त्यांच्याशी बोलणे झाले. " बाहेरगावच्या अनेक तिबेटी लोकांसमोर ते येऊन उपदेश करणार होते. तेव्हा त्यांना माझ्याशी बोलावयाला वेळ मिळणार नाही " असे त्यांचे म्हणणे होते. मी लांबून पाहण्याचा आग्रह धरला व त्या लोकांमध्ये जाऊन उभा राहिलो. काही लोक आपआपसांत चर्चा करून माझ्याजवळ आले व त्यांनी मला बाहेर जाण्याची विनंती केली. त्यांना काही संशय असल्यास ते माझी झडती घेऊ शकतात असे मी त्यांना सुचविले. परंतु तरीही त्यांनी मी बाहेर जाण्याचा आग्रह धरला. नाइलाजाने मी तेथून निघालो. वाटेतील अक्षुनाथ महादेवाचे दर्शन घेऊन धर्मशाला येथून सामान बांधून चंबाच्या रोखाने प्रवास सुरू केला.

पठाणकोटला रात्री मुक्काम करून मी जम्मूला पोहोचलो. येथील रघुनाथजींचे मंदिर फार जुने असूनही आकर्षक आहे. सबंध भारतात हे एकच मंदिर आहे की,– जेथे राम लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न या चारी भावांच्या वेगवेगळ्या मूर्ती पाहावयास मिळतात. आवारातील महादेवाचे मंदिर लहान पण स्वच्छ, सुंदर आहे. येथे सकाळ संध्याकाळ भाविक स्त्री-पुरुष एकत्र बसून महादेवाचे स्तुतिगान करतात. मंदिरात एकसारखी लोकांची ये-जा चालू होती.

पंडित भीमसेन जोशी यांनी आपल्या मित्राला माझ्यासाठी पत्रे दिली होती. म्हणून मी श्री. बाली व तेथील डी. आय. जी. श्री. भाक्री यांना भेटलो. त्यांनी श्रीनगरला डी. आय. जीं.ना माझा परिचय करून देणारे पत्र दिले.

श्रीनगरच्या मार्गावर

जम्मू ते श्रीनगर हा रस्ता अति बिकट मानला जातो. परंतु पाकिस्तानच्या आक्रमणानंतर आता सेनाधिकाऱ्यांनी हे काम आपल्याकडे घेतले असून, हा रस्ता

तयार करीत आहेत. जम्मू ते उधमपूर हा ४४ मैलांचा रस्ता त्या वेळेस तयार झाला होता. सबंध भारतातील हा सर्वोत्कृष्ट रस्ता आहे, असे मी म्हटल्यास मुळीच गैर होणार नाही. प्रवासाला इतका सोईस्कर रस्ता इतर डोंगराळ भागात दिसत नाही. जम्मूपासून ६६ मैलांवरील कुंद या गावी प्रमथच गाडी थांबविली. येथून जेवण करून मी पुढे निघालो. कुंद ते बटोद व बटोद ते बनिहाल हा रस्ता खाचखळग्यांचा असल्याने प्रवासात फार त्रास झाला. एकसारखे चढउतार व वळणे असल्याकारणाने जपावे लागत होते. त्यातूनही पठाणकोटच्या पलीकडील दोभा या गावातील एका सद्‌गृहस्थाने असे स्पष्ट आवाहन केले होते की " भाईसाब ! पहले एक अंग्रेजी अफसर जाता था मोटरसायकलपर । अपने लोग नहीं जा सकते, और इस वक्त तो ठंड बहुत है, बर्फ पड रही है, जान का खतरा है ! साब सोच के निकलो ! ' हे त्याचे शब्द राहून राहून आठवत होते.

वाटेत तीन ठिकाणी डोंगर ढासळल्यामुळे रस्ता बंद झाला होता. प्रत्येक ठिकाणी तास दीड तास थांबल्यावर पुढे जावयास मिळाले. तेदेखील अतिशय काळजीपूर्वक जावे लागले. काही ठिकाणी रस्त्यातील मोठमोठ्या शिलांना हालविणारी व रस्ता साफ करणारी मशिन्स उभी करण्यात आली होती. रस्त्यातून ठिकठिकाणी अनेक कामगार बर्फ हालवून रस्ता साफ करण्याचे काम करीत होते. जेथे सूर्याची किरणे पडू शकत होती, तेथे बर्फ वितळू लागला होता. परंतु डोंगरांच्या सावलीच्या भागात बर्फ अजून जशाचा तसा पडला होता. बर्फ वितळल्यामुळे रस्त्याने लागणाऱ्या छोट्या झऱ्यांना पाणी आले होते. दरीतून वाहणाऱ्या नदीमध्ये अनेक छोटे-मोठे धबधबे जाऊन मिळत होते. भर उन्हातदेखील बर्फावरून वाहणारे वारे अंगाला झोंबत होते. काही ठिकाणी स्वच्छ बर्फ पाहून वरील बाजूला करून, आतला एकदम स्वच्छ बर्फ काढून मी खाल्ला. कामगारांशी तेथील हिमवर्षा, प्रवाशांचा येण्याचा काळ, इत्यादी विषयांवर बोललो. अनेक मैलांचा प्रवास झाला होता. तरी काळजी कमी झाली नव्हती. कारण मला जवाहर टनेल मधून प्रवास करावयाचा होता.

बनिहालला थांबून चहा घेतला. अंगात तरतरी आली. बनिहाल घाट व जवाहर टनेलबद्दल विचारपूस केली व निघालो. जसजसा मी वर जात होतो, तसतशी थंडी वाढत होती. डोंगरावरील बर्फाचे प्रमाण वाढत होते. दरी खोल वाटू

लागली. डाव्या उजव्या बाजूच्या बर्फमय पर्वतांचे स्पष्ट दर्शन घडू लागले. सतत वितळणाऱ्या बर्फामुळे रस्त्यावरून वाहणाऱ्या पाण्याचा आवाज आला. मी त्या दिशेने पाहिले. टोकापासून रस्त्याच्या कडेपर्यंत सबंध डोंगर बर्फाने भरला होता. रस्त्याच्या डाव्या बाजूला त्या बर्फाच्या खाली एक नाली होती व तेथून प्रचंड वेगाने पाणी वाहात होते. चौकशी करता समजले की, त्या नालीचे नाव 'सैतान नाली' आहे !

पावसापाण्याचे दिवस असले की अनेक मैलांच्या अंतरावरून ड्रायव्हरना ही नाली आठवते. त्यांच्या डोळ्यांसमोर ती कोणत्या स्वरूपात असेल याचेच सतत दृश्य उभे राहते. कल्पना करीत करीत चिंताग्रस्त होऊन तो पुढे सरकत असतो. या नालीतून पाणी रस्त्यावर वाहू लागले तर त्याचा वेग इतका प्रचंड असतो की, मालाने भरपूर भरलेला ट्रकदेखील सहज वाहून जातो व खोल दरीत जाऊन पडतो. अशा या सैतान नालीवर त्या वेळेला कमीत कमी १० फूट जाडीचे बर्फाचे आवरण होते. उन्हाने बर्फ कडक झाल्यामुळे मी निश्चित होऊन वरती चढलो, व बर्फावर काही मिनिटे झोपण्याचा आनंद मिळविला. वर ऊन व खाली बर्फ–काय आल्हाददायी प्रसंग होता म्हणून सांगू ! मी थोडी हिंमत करून डोंगरावर १५ ते २० फूट चढलो व गडगडत खाली आलो. तो थेट रस्त्यावरच पडलो. मला थोडेसे लागले. परंतु अलभ्य लाभ मला मिळाल्याचा आनंद प्रचंड होता. येथे थांबून मी बर्फ उकरून आतला स्वच्छ बर्फ खाल्ला. त्याच्यावरच तहान भागविली व पुढे निघालो.

जवाहर टनेलमधील दिव्य

पर्वताच्या शिखरावर बांधलेले जवाहर टनेल ८६८० फूट उंच असून, सबंध बर्फमय आहे. तेथे काही सैनिक व अधिकारी संरक्षणासाठी राहतात. मी त्यांच्याकडे गेलो, त्यांनी माझे स्वागत केले. त्या अधिकाऱ्यांशी मी 'ल्युडो'-चे दोन तीन डाव खेळलो. हसण्यात, गप्पा मारण्यात व चहापाण्यात एक तास केव्हा होऊन गेला समजलेदेखील नाही. मला पत्र लिहिण्यास वेळ न मिळाल्यामुळे मी चिंताग्रस्त होतो. त्या अधिकाऱ्याला सुरुवातीलाच पत्ता देऊन त्यांस पत्र लिहावयास सांगितले व त्यानेही आपुलकीने ते कबूल केले.

अडीच मैल लांबीच्या जवाहर टनेलमध्ये गाडीला भरपूर प्रकाश असल्या-शिवाय प्रवास करणे अशक्य. माझ्या गाडीचा प्रकाश अल्प होता. म्हणून मला फार काळजीपूर्वक प्रवास करावा लागला. समोरून थंड वारा येत होता. टनेलच्या वरून बर्फाचे पाणी पाझरत होते व थेंबाथेंबाने अंगावर पडत होते. ते पाणी जेव्हा अंगाच्या उघड्या कातडीवर पडावयाचे तेव्हा शहारे यायचे. चटकन त्या भागावरून हात फिरवावयाचा, व हात सुटल्यामुळे तोल संभाळण्याची काळजी-देखील वाटावयाची. रस्ता ओला झाल्यामुळे चाके घसरण्याची पण फार भीती होती. या चिंतेने गाडी हळू चालवावी तर प्रकाशही कमी पडायचा. अशात जर गाडी घसरली व पडलो तर या काळोखात काय करावे ही मोठी काळजी लागली होती. हळूहळू मी पुढे जात होतो. अडीच मैलांचा प्रवास पंचवीस मैलांसारखा वाटला. अखेर लांब एक छोटासा पांढरा गोल दिसला. जवळ जवळ जाता तो मोठा मोठा होऊ लागला, व मी काही वेळात टनेलच्या भुयाराच्या बाहेर पडलो. या भुयारी रस्त्यातून बोगद्यातून सुखरूप उघड्या उजेडात आल्यावर मी फार प्रसन्न झालो. येथे जाण्यासाठी व येण्यासाठी वेग-वेगळे रस्ते आहेत, हे फार बरे आहे.

जवाहर टनेलच्या पलीकडे मी रस्त्याच्या उजव्या बाजूला दरीत बर्फामध्ये अनेक ट्रक व जीप गाड्या पाहिल्या. बर्फातून प्रवास करीत असताना त्या घसरून दरीत जाऊन पडल्या होत्या. वाटेत मी अनेक ठिकाणी थांबलो. छायाचित्रे घेतली. जवळचे व लांबचे हिमाच्छादित पर्वत पाहिले. बर्फामध्ये स्पष्ट दिसणारी सुरूची, पाइनची झाडे पाहिली. लांब दरीत छोटे छोटे तलाव पाहिले. दूरपर्यंत दृष्टीस पडणारा सर्पाकार रस्ता पाहिला. निळ्या आभाळात विखुरलेले शुभ्र कापसासारखे ढग पाहिले. मावळत्या सूर्याच्या सोनेरी किरणांनी निर्माण केलेली त्या ढगांची एका बाजूची सोनेरी किनार पाहिली. शुभ्र स्वच्छ बर्फाच्या पार्श्वभूमीसमोर शान्त उभी असलेली माझी सुंदर मोटर सायकल पाहिली. मी अतिशय प्रसन्न झालो. तेथील गार वारा विसरलो. थंडी विसरलो. दाही दिशांकडे नजर फिरवीत मी सृष्टिदेवीचे हे अति आगळे सौन्दर्य डोळे भरभरून पाहू लागलो.

● ● ●

२२ : भारताचा मुकुट– काश्मीर

मोहून टाकणारे निसर्ग- सौन्दर्य

' भूमंडळावरील स्वर्ग ' या उपमेने कवींनी ज्याचे गुणगौरव केले असा काश्मीरचा प्रदेश हा भारताचा मुकुट आहे. या भूतलावर एकही माणूस सापडणार नाही, ज्याने काश्मीरबद्दल ऐकले असून काश्मीर पाहण्याची मनीषा ज्याला निर्माण झाली नसेल. नीलवर्ण आकाश आणि गगनचुंबी हिमाच्छादित धवल गिरि- शृंग, विविध रंगांनी नटलेली धरा व स्फटिकासम शुद्ध जल वाहून नेणारे ते संगीतमय झरे, तो हृदयस्पर्शी मंद अनिल– या अमृतसम सृष्टीच्या सान्निध्याचा हेवा कोणाला वाटणार नाही ?

मी पोहोचलो त्या रात्री अतिशय पाऊस झाला. नदीला पाणी वाढले. रस्ते ओले होऊन चिखल निर्माण झाला. वाऱ्याचा वेग वाढून थंडीच्या तीव्रतेत भर पडली. गुलमर्ग, खिलनमर्ग, सोनामर्ग या भागात बर्फ पडला असेल असे लोक म्हणू लागले. पावसाळा केव्हा थांबतो आणि ऊन केव्हा पडते हे कोणी सांगू शकत नव्हते. दिवसादेखील राहून राहून पर्जन्यवृष्टी व्हावयाची, त्यामुळे बाहेर पडावे की नाही असा प्रश्न डोळ्यांसमोर होता. खोलीच्या बाहेर पाय पडला व वारा अंगाला झोंबला की तत्क्षणी सर्वांगी शहारे यायचे. एका खोलीत सुरतवाला यास पत्र लिहावयास बसलो. फुलस्केप ४० पानी पत्र लिहून झाले, नंतर बाहेर पडण्यासाठी जीव अगदी कासावीस झाला होता, म्हणून त्या थंडीत बाहेर पडलो.

आठ दिवसांच्या काश्मीरच्या मुक्कामातील सर्वप्रथम डोळयांसमोर राहणारा प्रसंग असेल तर तो गुलमर्ग येथील हिमवर्षाव. त्या सकाळी मी निश्चय करून निघालो. पाऊस पडला तरी हरकत नाही, परंतु गुलमर्गला जरूर जाणार. बारामुल्लाच्या रस्त्यावरून मी गुलमर्गकडे वळलो. रस्ता स्वच्छ सुंदर होता. झकसे ऊन पडले होते. सकाळच्या गुलाबी थंडीत प्रवास आल्हाददायी वाटला. मी परमेश्वराचे आभार मानीत असतानाच पावसाच्या हलक्या सरी सुरू झाल्या. काळजी वाटू लागली. परंतु मी ओला होण्याअगोदरच टनमर्ग गावी पोहोचलो. तेथील पर्यटन माहिती खात्याच्या कचेरीत कर्मचाऱ्यांबरोबर 'फायर प्लेस' जवळ बसलो व माहिती घेतली.

टनमर्गपासून चढ सुरू होतो. गुलमर्ग ८५०० फूट उंच आहे, व त्याच्यापुढे खिलनमर्ग २००० फूट अधिक उंच आहे. टनमर्गहून निघण्यापूर्वी मी लांब बुलनचा कोट भाड्याने घेतला. एका घोड्यावर बसून निघालो, अधूनमधून बर्फ पडत होता. सबंध पहाड बर्फाने झाकला गेला होता. मार्गांवर अतिशय बर्फ पडला होता, त्यामुळे घोड्यालादेखील चालणे कठीण जात होते. अधिक बर्फाच्या वजनाने वृक्षांच्या फांद्या लवल्या होत्या. काही काही फांद्यांवर अधिक बर्फ पडला की, ती फांदी एकदम वाकायची व सर्व बर्फ धोधो खाली पडायचा. माझ्याबरोबर असलेला गाइड लांबून लक्ष ठेवीत होता. तसे वाटले की तो घोडा थांबवावयाचा व झाडावरचा बर्फ खाली पडल्यावर आम्ही पुढे सरकत होतो. बर्फाखाली अनेक लोक जखमी होतात असे तो म्हणाला.

पडणारा बर्फ खाऊन आनंद

सुरुवातीला हिमपात किंवा बर्फाचा पाऊस पाहण्याची फार गंमत वाटली. या पावसाची मजा, म्हणजे तो पडत असताना मुळीच आवाज होत नाही. डोळे मिटले तर पत्ता लागणार नाही की पाऊस पडत आहे. जणू काही आभाळात कोणी पिंजारी शुभ्र कापूस पिंजत असताना त्यातून थोडा अस्ताव्यस्त उडून या पवित्र भूमीवर येऊन पडावा त्याप्रमाणे वाटते. डोक्यावर, खांद्यावर हळूहळू बर्फ साचत होता, व जेव्हा त्याचे प्रमाण वाढावयाचे तेव्हा लक्षात यायचे. लहान मुले जशी पावसाचे पाणी घेण्यासाठी हात पुढे करून

उभी राहतात त्याप्रमाणे मी हात धरला. हळूहळू हातात बर्फाचा एक हलका गोळा तयार झाला. मी तो खाल्ला, आणि काय प्रसन्न वाटले म्हणून सांगू? जिभेवर ठेवल्याबरोबर वितळणारा मुलायम बर्फ कितीही खाल्ला तरी समाधान होत नाही !

आठ आठ– दहा दहा फूट उंच बर्फाच्या पृष्ठातून जो तीन चार फुटी रस्ता तयार केला होता, त्यातून मी जात असता डाव्या उजव्या बाजूच्या त्या बर्फाच्या भिंतींमधून पाय फिरायचा. परंतु पायाला काही घासल्याचा भासदेखील होत नव्हता. मी मुद्दाम हात फिरविला. बर्फातून हात फिरवला,– जणू काही हवेतूनच फिरवला. तेथील अनेक छोटी घरे बर्फाखाली अक्षरशः दबली होती. जी मोठी होती त्यांची छते झाकली गेली होती, व समोर अर्ध्या भिंतीपर्यंत बर्फाचे ढीग होते. बर्फमय वातावरण झाल्यामुळे, धुकेही पुष्कळ होते. म्हणून दूरवरचे काहीच दिसत नव्हते. मी चोहोकडे पाहात उत्साहाने पुढे सरसावत होतो.

कडक थंडीने गारठून टाकले

परंतु काही वेळाने या आनंदाचे पर्यवसान थोडे काळजीत झाले. बर्फ वितळल्यामुळे हातापायाचे मोजे ओले झाले, बूट ओले झाले, व अंगावरील वुलनचा कोटदेखील ओला झाला. हात पाय गारठले, त्यात भर म्हणजे उंचीवर वाराही जोराने वाहात होता. हात एकमेकांवर घासून थोडी उष्णता निर्माण करण्याचा प्रयत्न केला, परंतु पायाच्या खालच्या बाजूच्या थंडीवर उपाय नव्हता. जसजसा वेळ गेला तसतसे अंग अधिकाधिक थंड होत गेले. पाय छाटून द्यावा असे वाटू लागले. बर्फमय प्रदेश आणि बर्फाचा पाऊस हे काय आहे, हे त्या दिवशी बरोबर लक्षात आले.

गुलमर्गवर असलेल्या क्लबमध्ये मी जेवण घेतले, सैनिक अधिकाऱ्याशिवाय तेथे कोणीच नव्हते. त्यांच्या सहानुभूतीमुळे मला फार बरे वाटले. हातापायांचे मोजे, अंगावरील कपडे, बूट इत्यादी विस्तवासमोर (फायरप्लेस) ठेवून कोरडे करून घेतले.

‘ नव्या सीझनचा उद्घाटक प्रवासी ’ असे संबोधन वापरून गुलमर्गच्या मॅनेजरने मला निरोप दिला. परतताना सुदैवाने पाऊस थांबला होता. वातावरण

स्वच्छ झाले होते. सूर्याची किरणे बर्फाच्या पृष्ठभागावर पडल्यामुळे बर्फ लकाकत होता. खोल दरी स्पष्ट दिसत होती, धुके जाऊन आजूबाजूचे डोंगर उघडे पडले होते. पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येऊ लागला होता. लांबपर्यंतचे वृक्ष स्पष्ट दिसू लागले होते. आभाळ स्वच्छ होऊन त्याने नीलवर्ण धारण केला होता. विखुरलेले ढग हळूहळू उंच जात होते. सूर्यांची किरणे हिमाच्छादित डोंगरावर पडल्यामुळे त्याच्या शुभ्रतेवर गुलाबी छटा निर्माण झाली होती. दरीतील टुमदार चिमुकली घरे सूर्यकिरणांत नहात असताना पाहून माझे मन थयथय नाचू लागले. या सुखद प्रसंगाची आठवण चिरस्थायी व्हावी याकरता, एकेका दृश्याचा स्पष्ट ठसा स्मृतिपटावर मुद्रित करण्याचा मी तन्मयतेने प्रयत्न करू लागलो.

श्रीनगर शहराची वैशिष्ट्ये

श्रीनगर ही काश्मीरची राजधानी आहे, म्हणून येथे वस्ती पुष्कळ आहे. शहर अस्वच्छ आहे. शहरापासून प्रेक्षणीय स्थळे सर्व लांब लांब आहेत. प्रविष्ट होताच उजव्या हातावरील ' शंकराचार्य पहाडी ' प्रवाशांचे लक्ष खेचते. ' सम्राट अशोका 'चा पुत्र जालुका याने येथे शिवालय बांधले आहे, ते पहाडावर १००० फूट उंचीवर आहे. शहराचे वैशिष्ट्य म्हणजे मधून वाहणारी झेलम नदी. त्यावरील नऊ पूल, व नदीच्या प्रवाहात उभ्या असलेल्या हाउस बोटी; आणि या दृश्याला जिवंतपणा देणारे शिकारे.

चश्माशाही, निशात, शालिमार, नसीम ही चार मोगलकालीन उद्याने., नेहरू पार्क हे नंतरचे. चश्माशाही शहरापासून ५ मैलांवर आहे. शहाजहाँने निर्माण केलेल्या या बागेत एक पाण्याचा झरा आहे. त्या पाण्यात फार औषधी गुण आहेत असे म्हणतात. ही बाग सर्वांत छोटी आहे. येथून दाल सरोवर लांब असले तरी स्पष्ट दिसू शकते.

चश्माशाहीपासून अडीच मैलांवर निशात आहे. नूरजहाँचा भाऊ असफजहा याने ही बाग तयार केली. डोंगराच्या उतारामुळे या उद्यानात दहा जिने अंतरा-अंतरावर बांधण्यात आले आहेत. मधून वाहणाऱ्या पाण्यामुळे सौन्दर्यात फार भर पडते. कृत्रिम फुलझाडांच्या रांगा आहेत; पण त्यात नैसर्गिक भव्य वृक्षांमुळे बागेची शोभा द्विगुणित होते.

शालिमार हे निशातपासून दोन मैल लांब दलच्या काठोकाठ जाणाऱ्या रस्त्यावर आहे. हे उद्यान जहांगीर बादशहाने तयार केले. येथे जहांगीर आणि नूरजहाँ यांच्या बसण्याच्या जागा कुशलतेने निवडण्यात आल्या आहेत. तेथून जास्तीत जास्त सौन्दर्य पाहावयास मिळते.

नसीम उद्यान शालीमारपासून तीन मैलांवर आहे. हे उद्यान अकबरने तयार केले. हे एकच उद्यान असे आहे की, जेथे पाण्याचे झरे, फवारे, किंवा फुलांची रोपे दिसत नाहीत. परंतु चिनार वृक्षांचा भव्य समूह व त्यापासून निर्माण होणारी सावली पाहून माणूस खूष होतो.

ही सर्व उद्याने पाहून मी निघालो. बागेतील बर्फ नुकताच वितळला होता. जमीन ओलसर वाटत होती व तीवर छोटी छोटी पांढरी फुले आपले डोके उंचावून वाऱ्याशी खेळत होती. बागेत सर्वत्र शान्ती पसरली होती. उंच भव्य वृक्षांवरील पाने मधूनच हालून बागेतील जिवंतपणा दर्शविण्याचा प्रयत्न करीत होती. प्रवेशद्वाराच्या समोरील दल सरोवराच्या संथ पाण्यात क्वचित एखादा शिकारी येऊन जायचा व पाण्यात लांब लांब पट्टे निर्माण करायचा. उद्यानाच्या मागे भव्य हिमाच्छादित पर्वत निश्चल उभे होते. या जागेत प्रवाशांची वर्दळ चालू असताना काय दृश्य निर्माण होत असेल याची मी कल्पना करू लागलो. शालिमार उद्यानाच्या मागच्या बाजूला वाहणाऱ्या एका छोट्या नदीकाठी जाऊन मी सुंदर एकान्त स्थळाचा आनंद लुटला.

सौन्दर्यात भर टाकणारी सरोवरे

उद्यानाप्रमाणे येथे सरोवरेदेखील पुष्कळ आहेत. जगप्रसिद्ध दलची लांबी ५ मैल व रुंदी अडीच मैल आहे. येथे पोहण्याची, नौकाविहाराची व सर्फ रायडिंगची उत्तम सोय आहे. दलला लागून नगीन हा एक सुंदर तलाव आहे. याव्यतिरिक्त वुलर, कौंसरनाग, मानसबल, औंचर, अफरबल, गंगाबल, शेषनाग, नीलनाग, विष्णुसर, तथा कृष्णसर, तारसर आणि मान्सर इत्यादी तलाव व सरोवरे प्रेक्षणीय आहेत. येथील सर्व तलावांमध्ये पाणी स्वच्छ व आकर्षक आहे. वेगवेगळ्या उंचीवर व अंतरावर आलेली ही सरोवरे सौन्दर्यात अमूल्य भर घालतात.

इतर नयनरम्य स्थळांमध्ये पहलगाम अति सुंदर आहे. श्रीनगरपासून ते साठ मैल दूर आहे. उंची ७२०० फूट असून चारी बाजूंना उंच उंच पर्वतांनी पहलगामला वेढले आहे. मध्ये छोटी लद्दर नदी वाहात असून तीवर लहान पूल बांधला आहे. पाइन, चिनार वृक्षांची शोभा पाहावी तर ती पहलगाम येथेच. नदीच्या दोन्ही काठांवरची हिरवळ पाहिली की तीवर पळत सुटावे असे वाटते. सुंदर मुलायम गालिचाच पाहून घ्या. अधिक उंचीच्या स्थळांमध्ये सोनामर्ग, शेषनाग, अमरनाथगुफा, नारसर, शाहू, लिद्दरबठ व कोलाहाई ग्लेशियर आहेत. पहलगाम येथे गोल्फ खेळण्याची चांगली व्यवस्था आहे.

इतर प्रेक्षणीय स्थळांमध्ये लोलाबघाटी, गंजीबास, गांदरबल, यूसमर्ग, कुकरनाग, अनंतनाग, वेरीनाग, मार्तंड, अच्छबल, अवन्तीपूर इत्यादी आहेत. तसे पाहिले तर सबंध काश्मीर हे इंग्लंडहून क्षेत्राने थोडे छोटे असलेले असे अतिविशाल उद्यानच आहे.

परतताना अनंतनाग अच्छबल वेरीनाग या रस्त्यावरून मी सरळ जवाहर टनेलजवळ आलो. हा रस्ता नव्यानेच होत असल्यामुळे कच्चा व अति बिकट होता. वाटेत अनेक मैल कोणी भेटले नाही. माहिती खरी मिळाली का खोटी अशी शंका निर्माण झाली. अशात काही बिघाड झाला असता तर फार पंचाईत झाली असती. जवाहर टनेलवर पुन्हा त्या सैनिकांची भेट घेतली व मी निघालो. बनिहालपासून एक मैलावर मागचे चाक पंक्चर झाले. आजपर्यंत अशा प्रसंगी गाडी ढकलण्याचा प्रसंग यायचा. परंतु येथे उतार असल्याकारणाने गाडीचा वेग न वाढता जायचे होते. गाडी ओढून धरावी लागत होती व अधूनमधून ब्रेक लावावा लागत होता. जेमतेम बनिहालला पोहोचलो. मेकॅनिक नसल्यामुळे तेथील दोघांची मदत घेऊन अति श्रमानंतर पंक्चर काढले व गाडी तयार केली. परंतु संध्याकाळ झाल्यामुळे रात्री तेथेच मुक्काम करावा लागला.

अमृतसरला कोणत्याही परिस्थितीत रात्रीपर्यंत पोहोचण्याचा माझा निश्चय होता. पर्वतराजीतून प्रवास करण्याचा असल्याने हे कठीण होते. परत रस्ता निर्वेध आहे की नाही ही शंका होती. म्हणून घाईघाईने सकाळी निघालो. शक्य तितक्या जलद गतीने प्रवास सुरू केला. वाटेत एके ठिकाणी डोंगर घसरून रस्ता बंद झाला होता. अनेक गाड्या पलीकडे दूरपर्यंत उभ्या होत्या. प्रवासी

यायची सुरुवात काही दिवसांनी होणार होती, म्हणून मालाची वाहतूक श्रीनगरच्या रोखाने वाढली होती. दोन तास ताटकळत उभे राहावे लागले. रस्ता साफ झाल्यावर निघालो. चिखलात रुतलेले चाक वेग वाढवून काढण्याच्या प्रयत्नात तोल गेला व गाडी दरीच्या रोखाने थोडी पळाली. परंतु चपलतेने मी तोल सांभाळला व एक बाका प्रसंग टळला ! दुसऱ्या बाजूला उभे असलेले ट्रक मोजले– ती संख्या ६४० झाली !

उधमपूरहून पठाणकोटकडे सरळ बांधलेल्या नव्या रस्त्यावर मी प्रवास केला. रात्री पुलाच्या अलीकडेदेखील सुरुंग लावल्यामुळे दोन ते अडीच तास उभे राहावे लागले. रात्री पुलाजवळ मला तेथील सैनिकांनी अडविले. रस्ता फक्त सेनेसाठी आहे. त्यांना सर्व कागदपत्र दाखविले तरीही जाऊ देत नव्हते. म्हणून मी तेथेच मुक्काम करणार असे सांगितले. अखेर एका अधिकाऱ्याने जाऊ दिले. हा मार्ग अतिशय दुर्गम आहे. येथे रस्ता तयार करण्यात सेनेचे कौशल्य दिसून येते. एकशे तीस किलोमीटरच्या या रस्त्यात तीस ते पस्तीस लहानमोठे पूल आहेत.

पठाणकोटपर्यंत मला सबंध डोंगराळ भाग, चढउतार व एकसारखी वळणे असलेल्या प्रदेशातून प्रवास करावा लागला. तो एकंदर २६५ मैल झाला. येथून अमृतसर ७० मैल असून रस्ता सपाट असल्यामुळे काळजीचे विशेष कारण नव्हते. सायंकाळी सात वाजता थंड मलईयुक्त लस्सीचा एक भलामोठा पेला घेतला. थंड झालो व अमृतसरच्या रोखाने निघालो. गावाच्या वेशीपासून एका सरदारजीने सायकलीवरून माझ्याबरोबर प्रवास सुरू केला व तीन चार मैलांवरील प्रसिद्ध सुवर्णमंदिर व गुरुद्वार दाखविला. तेथील महंताला त्याने माझ्याबद्दल सांगितले व शिफारस केली. मी माझे सामान सोडून आत येतो न येतो तो तो तेथून निघून गेला होता. त्याच्या त्या निःस्वार्थी निष्काम सेवे-बद्दल मनात त्याच्याबद्दल आदर निर्माण झाला. मनोमन त्याच्याबद्दल शुभेच्छा व्यक्त करून, प्रार्थना करून मी माझ्या सोयीसाठी गुरुद्वाराच्या महंतजींसमोर जाऊन उभा राहिलो.

● ● ●

२३ : सुवर्णमंदिराचे दर्शन

मंत्रमुग्ध करणारी भजने

अमृतसर येथील सुवर्णमंदिरात श्रवणीय शास्त्रोक्त भजने मी मंत्रमुग्ध होऊन ऐकत होतो. भजनातील आलापी, हार्मोनियमचे अखंड सूर व ढोलकीच्या तालबद्धतेतून निर्माण झालेल्या नादब्रह्माचा वरील गॅलरीमध्ये उभा राहून मी दीर्घकाल आनंद लुटला. एका बाजूला 'माइक'समोर वाद्यवृंद व गायक बसले होते व इतर तीन बाजूंना स्त्रीपुरुष बसून योग्य वेळी पद उचलून भजनाच्या गोडीत भर घालीत होते. अनेक भाविक एकसारखे ये–जा करीत. दर्शन घेताना साहजिकच त्यांचे लक्ष त्या गायकाकडे जायचे. लोक काही क्षण स्तब्ध होऊन पाहायचे. त्यांच्या नजरेतून प्रशंसा ओसंडत असलेली स्पष्ट दिसायची. परंतु ती मंडळी ईशस्तुतीमध्ये इतकी गर्क होती की, किती आले– किती गेले...या गोष्टीकडे त्यांचे यत्किंचितही लक्ष नव्हते. मी मात्र मनोमन या सर्वांचे त्यांच्या भावुकतेबद्दल कौतुक करीत होतो. महाराष्ट्रातील कीर्तनकार व भजनी मंडळी यांची सातत्याने आठवण झाली.

'शीख' म्हटले की भाला, तलवारी, ढाल, बंदूक, तोफा, रणगाडे, बॉबफेकी विमाने, युद्धनौका वगैरे डोळयांसमोर उभे राहते. बहाला, जालंदर इत्यादी गावांचा विचार केला तर त्यांची कारखानदारी आठवते. मुंबई येथील ऑपेरा हाउसचा विचार केला की त्यांचा मोटरीच्या सुट्या सामानाचा व्यापार आठवतो, व पुणे म्हटले की दोन-चार जळाऊ लाकूड व कोळशांच्या वखारींची आठवण

होते. त्यामुळे मी या सुवर्णमंदिरातील संगीत ऐकल्यावर आश्चर्यमुग्ध झालो. याही क्षेत्रात यांच्यापैकी काही तरबेज आहेत याची मला नव्याने जाणीव झाली. त्या भजनांचा विचार करीत असताना मला आणखी एक आश्चर्याचा धक्का बसणार होता याची कल्पना नव्हती. गॅलरीतील तैलचित्रे व डिझाइन पाहात पाहात मी एका खांबाजवळ आलो. पाहतो तर तेथे एक सरदारजी काही रंग व ब्रश घेऊन भिंतीवर फुला-पानांच्या आकृत्या रंगवीत होता. तेथील काही भाग बिघडल्यामुळे पुन्हा चित्रित करावयाचे काम चालले होते. ऐतिहासिक रंगकामाची हुबेहूब नक्कल करीत होता तो. रंगसंगतीमध्ये यत्किंचितही फरक नव्हता.

सुवर्णमंदिराची कलात्मक उभारणी पाहात पाहात माझा चेहरा प्रसन्न झाला होता. येणाऱ्या-जाणाऱ्यांपैकी अनेकांना माझ्याकडे पाहून आनंद झाला. त्यांच्या-पैकी काही लोक माझ्याजवळ येऊन माझी चौकशी करायचे व सुवर्णमंदिराची प्रशंसा मजजवळ करून अभिमानाने त्याचा इतिहास सांगायचे. मी त्यांच्या संभाषणात मध्येच 'वाह वाह' म्हटल्यावर त्यांची मान अभिमानाने ताठ व्हायची. अमीर मीनाइ शायराची एक ओळ मला आठवली. तो म्हणतो, "सौ बोतलोंका नश्शा है एक वाहवाह में।"

सुवर्णमंदिराबद्दल अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. बाहेरून सोन्याच्या पत्र्याने मढविलेले हे मंदिर उन्हात फार लकाकते व सर्वांची दृष्टी आकर्षून घेते. या सोन्याच्या पत्र्यावर सुंदर डिझाइन एम्बॉस केलेली आहेत. कलेची आवड असलेल्या व्यक्तीचे ताबडतोब लक्ष जाईल इतकी सुन्दर ही कृती आहे. संगमरवरी भिंतींनी वेढलेल्या, तलावाच्या मध्यभागी असलेल्या या मंदिरात जाण्यासाठी सुंदर रस्ता तयार केला आहे. प्रवेशद्वार भव्य आहे. हजारो स्त्री-पुरुष बसू शकतील अशी या तलावाभोवती सोय आहे. आवारातील एका इमारतीत पुराणवस्तू संग्रहालय आहे. तेथील युद्धप्रसंगावरील तैलचित्रे जिवंत वाटतात. क्रौर्य आणि करुणा दोन्ही भाव एकाच ठिकाणी इतक्या प्रभावीरीत्या चित्रित केले आहेत की, पाहणाऱ्याच्या चेहऱ्यावरही नजरेबरोबर भाव क्षणोक्षणी बदलतात.

सुवर्णमंदिरासमोरील गुरुद्वारामध्ये राहण्याची उत्तम सोय आहे. वेगवेगळ्या खोल्या, खाट, गादी, चादरी व रजया सर्व काही विनामूल्य मिळते. सायकली

ठेवण्यासाठी वेगळी खोली असून बिल्ला दिला जातो. माझी मोटरसायकल पण त्या खोलीत ठेवण्याची व्यवस्था झाली. त्यामुळे मी निश्चित होतो.

मंदिराच्या प्रवेशद्वारासमोर पादत्राणांचा स्टॉल आहे. तेथील सेवक पादत्राणे घेऊन बिल्ला देतात. मंदिरप्रवेशापूर्वी तेथे वाहात असलेल्या नालीमधील पाण्याने पाय धुवावे लागतात व उघड्या माथ्याने आत जाता येत नाही. शीखांचेच नव्हे तर सबंध राष्ट्राचे भूषण म्हणून या मंदिराचा उल्लेख झाल्यास वावगे होणार नाही.

प्रसिद्ध जालियनवाला बाग शहराच्या मध्यवस्तीत आहे. एका छोट्या गल्लीमधून या बागेत प्रवेश आहे. जुन्या भिंती जशाच्या तशा असून, विहीर पण आहे. इतर भागात सुधारणा करून छोटी बाग तयार करण्यात आली आहे. मध्यभागी लाल दगडांमध्ये येथे शहीद झालेल्यांचे स्मारक केले आहे. याव्यतिरिक्त पाहण्याजोगे येथे दुर्यांना मंदिर आहे. तेदेखील तलावाच्या मध्ये बांधले असून संगमरवरचे उभारले आहे.

अमृतसरच्या तोडीचे छोटे रस्ते इतर कोणत्याही शहरात पाहावयास मिळणार नाहीत. जेमतेम १० फुटी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दुकाने असल्याकारणाने संध्याकाळी येथे फारच गजबज होते. अशा एका रस्त्यावरील हनुमान मंदिरासमोर शनिवारी सायंकाळी मी अफाट गर्दी पाहिली. अनेक स्त्री-पुरुष हातात पुष्पहार घेऊन रांगेत उभे होते. हे पाहून माझ्यातील ' बजरंग-भक्ती ' जागृत झाली व मीदेखील अतिशय परिश्रम घेऊन दर्शन घेतले.

अमृतसरचा पुलावरील चौक

अमृतसर येथील सुभाष चौक हे एक शहराचे वैशिष्ट्य आहे. हा चौक एका पुलावरती आहे. दोन समान्तर पुलांना मिळणारा तिसरा एक पूल पहिल्याला छेदून जातो व दुसऱ्याला जाऊन मिळतो. त्यामुळे पाच दिशांतून येणारे रस्ते वर मिळतात. अशा प्रकारचे स्थळ इतर कोठेही पाहावयास मिळत नाही.

रात्रीचे नऊ वाजले होते. अमृतसरमध्ये एक प्रसिद्ध व लोकप्रिय स्थळ पाहावयाचे राहिले होते. दुसऱ्या दिवशी निघावयाचे होते. म्हणून त्याच रात्री तो कार्यक्रम उरकणे आवश्यक होते. एका पादचारीवर विश्वास ठेवून मी विचारले, " सरदारजी, " मी पुढे बोलतो न बोलतो तेवढ्यात तो म्हणाला, " हाँ जी...

हाँ जी ! फर्माओ.... हुक्म करो....क्या सेवा करे ? " चाळिशीच्या घरातील त्या व्यक्तीने इतक्या नम्रपणे सौम्य शब्दात माझ्याशी संभाषण केले; त्यामुळे मला फार बरे वाटले. मी विचारले, " सरदारजी... केसर–का–ढाबा कोनसे रस्ते पर है ? " तत्क्षणी त्याने उत्तर दिले, " यहीं दो ढाई मील पर है ! चलो हम बता देते हैं...आओ आओ ! " असे म्हणून मी काहीही बोलण्याआधी तो पुढे चालू लागला. तेथे पोहोचल्यावर मी त्याला जेवणाचे आमंत्रण दिले. तो म्हणाला, " नहीं जी, माफ कीजिएगा । घरपे रास्ता देखते होंगे । आप शौक से आराम से खाना खाइए । मैं चलता हूँ । " त्याच्या जागी कोणी समवयस्क असता तर " अरे यार– ! " म्हणून मी दंड धरून त्याला ओढीत नेले असते. परंतु त्या प्रौढ इसमाच्या आणि माझ्या वयांतील अंतरामुळे माझा नाइलाज होता. ' केसर का ढाबा 'बद्दल फार ऐकले होते. परंतु प्रत्यक्षात भ्रमनिरास झाला. एखाद्या कारखान्याच्या सुट्टीमध्ये कँटीनचे स्वरूप असते तसे या खाणावळीचे होते. जेवण साधे होते, परंतु लोक अत्यंत आवडीने घेत होते. त्या लोकांचे वैशिष्ट्य त्यात सामावलेले होते. त्याची आवड पाहावयाची असल्यास येथे जरूर एकदा जावे. समोरील दुकानात ' फिरनी रबडी ' इत्यादी मिष्टान्नांचा आस्वाद घेऊन मी निघालो.

अमृतसर ते बिकानेर असा रस्ता आहे की नाही ? हा प्रश्न मी अनेक ठिकाणी सरकारी प्रवासी माहिती केन्द्रामध्ये विचारला होता. परंतु मला कोठेही त्याची माहिती मिळाली नव्हती. सर्वजण खुशाल सांगावयाचे, दिल्लीला जाऊन परत बिकानेरकडे जावे लागेल. सरहद्दीवरील या दोन मोठ्या शहरांना जोडणारा रस्ता नसावा हे कसे शक्य आहे ? असा मी एकसारखा विचार करीत होतो. पाकिस्तानच्या आक्रमणानंतर तरी रस्ता बांधणे जरूरीचे. भाक्रा येथील माहिती केन्द्रावरील एकाने अंधुक कल्पना दिली होती, व अमृतसरच्या एस. टी. स्टँडवर मला एका अनुभवी वृद्ध ड्रायव्हरने पूर्ण कल्पना दिली. नैनीताल, दिल्ली, मसुरी, सिमला, डेहराडून इत्यादी सर्व माहिती केन्द्रांची मला कीव आली. आजपर्यंत असा प्रश्न कोणीच विचारला नाही असे म्हणून सर्वजण आपले अज्ञान झाकण्याचा प्रयत्न करीत होते.

अमृतसरहून निघून मी तरनतरन, तलवंडी, फरीदकोट, कोटकपुरा, मुक्तसर, उबवाली, चुराला, संगरीया, हनुमान गढ, सुरतगढ, महाजन, लालगढ, व बिकानेर

असा प्रवास केला. त्यात मला अनेक ठिकाणी फार त्रास झाला. रस्ता कच्चा, काही ठिकाणी नुसत्या वाळूतून जाणारा, व काही ठिकाणी नुसती खडी टाकून ठेवलेला असा हा रस्ता भर उन्हात नकोसा वाटू लागला. उन्हामुळे व गरम वाऱ्यामुळे घामाने अंग भिजत होते, व त्यात भर म्हणून गाडी ढकलण्याचे श्रम. गाडी ढकलून ढकलून अंग दुखू लागले. अनेक वेळा वाळूत चाक फसले व तेथून काढता काढता नाकी नऊ आले. काही ठिकाणी दूरवरच्या झोपड्यांतून मुले पळत आली व त्यांनी प्रामाणिकपणे हातभार लावला. असेच एकदा एका मुलाने मदत केल्यानंतर मी त्यास पन्नास पैसे दिले. ते पाहून त्याला इतका आनंद झाला की तो आनंदाने विचित्रपणे आरडत ओरडत धूम ठोकीत पळत सुटला. त्याचा आनंद पाहून व ओरडणे ऐकून त्या श्रमात मला हसू आवरेनासे झाले.

वाटेत अनेक ठिकाणी रस्ता तयार करणाऱ्या मजुरांनी गाडी ढकलण्यास हातभार लावला. पाण्याची सोय करून दिली. अशा रीतीने मी एकदाचा महाजन या छोट्या गावी पोहोचलो. येथे खाणावळ तर नव्हती. जे काही मिळेल ते छोट्या दुकानातून घेऊन पोटाची खळगी भरली. येथे अनेक लोक माझ्याभोवती गोळा झाले व नानाविध प्रश्न विचारू लागले, “ क्यों साब, आपको गव्हर्नमेंट कुछ पैसा देती है ? कितने दिन हुए ? कितना खर्च हुआ ? सब पैसा खुद का खर्च किया ? ” अशा प्रकारची प्रश्नोत्तरे पूर्वी अनेक ठिकाणी झाली होती. परंतु येथे मला ते विशेष रूपाने जाणवू लागले. पैशाच्या व्यवहाराबाबतीत या लोकांबद्दल अनेक प्रकारे मी पूर्वग्रह केलेला असल्याकारणाने मला येथे त्या प्रश्नांनी संतप्त केले. वास्तविक भारताच्या बहुतांशी जनतेने मला खर्च व सरकारचे साहाय्य याबद्दल प्रश्न विचारले होते. आपल्याकडे पर्यटक म्हणजे लोकांच्या किंवा सरकारच्या मदतीवर प्रवास करणारा असा विलक्षण गैरसमज लोकांमध्ये आहे. इतर चिकित्सक प्रश्न त्यांच्या डोक्यात येतच नाहीत. काय विशेष पाहिले ? कोणकोणती सुंदर स्थळे पाहिली ? गाडी बिघडल्यावर काही त्रास झाला का ? भाषेच्या अडचणी आल्या का ? पाहण्याजोगे कोठे काय आहे ? अशा माहितीप्रद प्रश्नांची विचारपूस मोजक्या लोकांनी केली.

वाळवंटातून थोडा प्रवास केल्यावर मी दुपारच्या भर उन्हात बिकानेर शहरात प्रवेश केला. येथील स्वच्छ सुंदर रस्ते पाहून मी खुष झालो. लाल

दगडाच्या काही भव्य इमारती सोडल्या तर इतर बहुतेक छोटी छोटी घरेच आहेत. सायंकाळी प्रेक्षणीय स्थळे पाहावयास निघालो असता काही कॉलेज विद्यार्थ्यांनी मला सोबत दिली. येथे लालगढ, जुनागढ, देवीमंदिर, जैन मंदिर, विष्णु व महादेवाचे मंदिर, व वस्तुसंग्रहालय ही पाहण्याजोगी स्थळे आहेत. महाराजांचे व सरकारचे बिनसल्यामुळे सध्या लालगढ पाहावयास मिळत नाही. या राजमहालावर लाल दगडावरील नक्षीकाम पाहण्याजोगे आहे. जुनागढ हा प्रशंसनीय छोटा किल्ला आहे. देवीचे मंदिर पाहात असता त्याची महती ऐकली. युद्धाच्या वेळेला सर्व सैनिक येथून देवीचे दर्शन घेऊनच पुढे गेले. येथील महादेवाचे मंदिरदेखील वैशिष्ट्यपूर्ण आहे. शान्त एकान्त जागेतील या मंदिराच्या आवारात सुंदर छोटा तलाव आहे. कुंड म्हटले तरी चालेल. तेथे पाण्याचा उगम होतो, व ते पाणी फार गुणकारी आहे, अशी त्याची प्रसिद्धी आहे. येथे राहात असलेल्या एका महंताच्या देहान्तानंतर त्याच्या पोपटाने पाण्याविना राहून प्राण सोडले हे ऐकल्यावर मी शून्यमनस्क झालो !

बिकानेर येथे एक जैन सरस्वतीचे मंदिर आहे. शुभ्र संगमरवरामधील ही मूर्ती अतिशय सुंदर मनोहारी आहे. येथील वस्तुसंहाग्रलय छोटे असून प्रशंसनीय आहे. तेथे महाराजांच्या 'सलून'चे– प्रवासाचा डबा – मॉडेल ठेवले आहे. या मॉडेलमध्ये छोटे छोटे फर्निचर इतके कलात्मकरीत्या लावले आहे की बघतच राहावे असे वाटते. अशा सलूनमध्ये प्रवास करायला मिळाला तर काय मजा येईल असा विचार प्रेक्षकांच्या मनांत न आला तर नवल ! इतर वस्तूंमध्ये काही तैलचित्रे, युद्धाची साधने, वाघ, चित्ता, हरिण इत्यादींची शिकार, महाराजांचे वैभव दाखविणारे गालिचे, फर्निचर इत्यादी आहे.

भारताच्या एका सरहद्दीवरील वाळवंटावरील या शहराच्या परिसरात अनेक उंट मोकळे हिंडताना दिसतात. शहरापासून लांब हरिणांचे अनेक कळप पाहावयास मिळतात. मी प्रवास करीत असताना काही हरीण मुद्दाम रस्ता ओलांडून येथून तेथे पळत सुटायचे. मुद्दाम समोरून भर्रदिशी पळत सुटण्यात त्यांना बहुधा भूषण व शौर्य वाटत असावे. तसेच मोर हे या भागातील एक वैशिष्ट्य आहे. त्यामुळे राजस्थानच्या बहुतेक प्राचीन चित्रांमध्ये राजा-महाराजांसमवेत मोर असलेले पाहावयास मिळतात. एकंदर भारताच्या एका कोपऱ्यात वसलेले हे छोटे सुंदर स्थळ अवश्य पाहण्यासारखे आहे.

बिकानेरहून जैसलमीरला जाण्याचा विचार होता. परंतु तसा रस्ता तयार नसल्यामुळे मला जोधपूरला जावे लागले. वाटेत नागोर येथील प्राचीन किल्ला पाहिला. सध्या येथे मिलिटरी कॅम्प असल्यामुळे तेथील अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागली. या किल्ल्यातील काही जुनी भित्तिचित्रे सोडली तर बाकी काहीही पाहण्यासारखे नाही. या चित्रांमध्ये जलक्रीडा करीत असलेल्या स्त्रियांचे चित्र म्हणजे अक्षरशः कॅमेऱ्याने घेतलेली छायाचित्रेच ! इतके वास्तविक आणि आकर्षक हे चित्र आहे. बोजा, नागोर व खीवसर या मार्गात मला वाळवंटाचा उन्हाळा अनुभवावयास मिळाला. अनेक मैल प्रवास केल्यावर एखादे खेडे दिसायचे. तेही रस्त्यापासून लांब, त्यामुळे पाण्याचा त्रास जाणवला. त्यात भर म्हणजे माझ्या गाडीत दुरुस्ती करण्याची वेळ आली. कडक उन्हात ती करीत असता एका पान्याची गरज भासली. त्यासाठी बस थांबवली, परंतु तो ड्रायव्हर जास्त विचारपूस न करता निघून गेला ! जेमतेम तेथून निघालो.

कलांचे शौकीन असलेले राजे

जोधपूर येथील मंडारे गार्डन मी पाहिलेल्या सर्व स्थळांत विशेष आहे. येथील सुंदर शिल्प असलेली देवळे, जवळ फवारे असलेली बाग, जवळील छोट्या टेकडीवरील बाग, व उपाहारगृह, एकाच पहाडातून कोरलेल्या सोळा महाराजांच्या मूर्ती इत्यादींमुळे हे स्थळ एक रमणीय पर्यटनकेन्द्र बनले आहे.

मद्रास राज्यातील त्रिचनापल्लीची आठवण करून देईल असा येथे भर वस्तीतील किल्ला फार प्रशंसनीय आहे. एका बाजूला संगमरवरी महाल व महाराजांची समाधी, आणि दुसऱ्या बाजूला या किल्ल्यातील मंदिर व राजांचे महाल. या महालांचे दहा विभाग आहेत. त्या प्रत्येकाचे आगळे महत्त्व आहे. येथील संगीत महालमधील भिंतींवर चित्रित केलेल्या रागरागिणींची चित्रे इतरत्र पाहावयास मिळत नाहीत. राजे गायन, वादन, नर्तन व चित्रकलेचे शौकीन होते, हे या महालावरून स्पष्ट होत आहे. एक एक भव्य खंड, तेथील रंगकाम, आकर्षक फर्निचर व तेथील विषयाला साजेलशी तैलचित्रे पाहून डोळ्यांचे पारणे फिटते. शस्त्रास्त्रांचे समूह व हिऱ्यामोत्यांचे दागिने पाहून डोळ्यांच्या भुवया उंचावतात. किल्ल्यातून खाली पाहण्याच्या खिडक्यांमधून शहराचे अनुपमेय दर्शन घडते. छोटी छोटी खेळण्या-

सारखी घरे फार गमतीदार वाटतात, आणि पाहताच भीती वाटते की हा किल्ल्याचा कडा जर कोसळला तर सरळ त्या घरावर जाऊन त्यांचा चेंदामेंदा करून टाकील.

याव्यतिरिक्त येथे दोन तलाव आहेत. कैलान व बालसमैद यांचे मनोहर दृश्य अविस्मरणीय आहे. हे सर्व दाखविण्यासाठी माझ्याबरोबर गावातील एक तरुण आला होता. स्वतः होऊन बरोबर आला. सुरुवातीलाच त्याने एका दुकानी नेले व तेथे दोन तीन पेले भांग घेतली. किल्ल्यावर पोहोचेपर्यंत त्याचा चेहरा हिरवा पडला. तेथे बोलण्याची शुद्ध न राहिल्यामुळे दरवानाशी त्याचे भांडण झाले. या नव्या मित्राला घेऊन मी गावात आलो. एक नवा अनुभव मला मिळाला होता. त्याच्या आग्रहाने त्याच्या घरी गेलो. घरांतील लोकांनी विलक्षण चौकशी केली. बाहेर आल्यावर जवळच्याच दुकानी पुनश्च भांग मारली व पैसे नंतर देईन म्हणाला. दुकानदाराने दम देताच तो म्हणाला, "देख, रामलाल! मुझ जैसे भंगेडी के साथ झगडा मोल लेना ठीक नहीं होगा!" मी मुक्कामाकडे निघालो. तेवढ्यात तो मागाहून पळत आला व म्हणाला, "भाईसाब, फिर दुबारा आये तो मेरे घर जरूर आना!" मी म्हणालो, "क्यों नहीं, क्यों नहीं!" नंतर स्वगत उद्गारलो, "बाबा रे, इथे भेटलास तो भेटलास ...!"

२४ : जैसलमीरचे वैशिष्टयपूर्ण शिल्प

जैसलमीर शहराचे वैशिष्ट्य

जैसलमीरला जाण्यासाठी एकच मार्ग आहे. तो जोधपूरहून जातो. अंगोलाई, डोचु व पोकर्णहून जैसलमीरला जाणाऱ्या या रस्त्यानेच जोधपूरला परतावे लागणार होते. म्हणून मी जोधपूरलाच सर्व सामान ठेवून जैसलमीरला जाऊन येण्याचा विचार केला. एका दिवसात हा कार्यक्रम उरकावयाचा होता. रात्री झोप न आल्यामुळे सकाळी निघायला उशीर झाला. नऊ वाजेपर्यंत ऊन कडक झाले असताना मी निघालो. सकाळची मोडलेली वेळ भरून काढावी म्हणून मध्ये न थांबता बरोबर ७८ मैलांवरील डोचु या गावी जाऊन थांबलो. येथून पुढे पोकर्णला पेट्रोल भरून घेतले. कारण इतर कोठेही मध्ये पेट्रोल पंप नव्हता.

जैसलमीरला ऊन मी म्हणत होते. उन्हाच्या प्रवासानंतर थोडा फराळ करून अर्ध्या तासातच किल्ला पाहावयास निघालो. आधी काहींनी सांगितले होते की, जैसलमीर येथे काहीही पाहण्यासारखे नाही. त्याच्या अगदी विरुद्ध काहींनी उत्कृष्ट म्हणून अतिशय प्रशंसा केली होती. मी प्रत्यक्षात जेव्हा सर्व पाहिले तेव्हा मला दोन्ही मते दूषित वाटली. जैसलमीर येथे पाहण्याजोगे वैशिष्ट्यपूर्ण शिल्प आहे. असे शिल्प भारतात इतर कोठेही पाहावयास मिळत नाही. त्यामुळेच ज्यांना शिल्पकलेची आवड आहे, त्यांना ते नाविन्यपूर्ण व प्रशंसनीय वाटणे साहजिकच आहे. परंतु ज्यांना म्हैसूर राज्य येथील बेलूर, हळेबीडसारखी उत्कृष्ट शिल्पाकृती असलेली देवालये, व राजस्थान येथील देलवाडाची सुंदर देवालये

आकर्षू शकत नाहीत त्यांच्यासाठी येथे काहीच पाहण्यासारखे नसल्यामुळे जैसलमीरची भेट निरर्थक वाटणे साहजिकच आहे.

जैसलमीरच्या अगदी अरुंद गल्ल्या गलिच्छ असल्या तरी त्यांतील घरावरील कोरीव शिल्प माणसाला जागच्या जागी उभे राहण्यास भाग पाडते. खालून वर-पर्यंत घराचा दर्शनी भाग अति बारीक व विविध शिल्पाने भरलेला असतो. त्यात भर म्हणजे ऐतिहासिक अनेक इमारती आहेत, व त्यांना त्या कालातील ‘ जरोखे ’ असल्यामुळे विशेष सुंदर वाटतात. या दगडाचा रंग पिवळा आहे. उन्हात तो उठून दिसतो, व बारीक शिल्पाकृतींच्या सावलीचा भाग काळा असल्या; मुळे जो विरोधाभास निर्माण होतो त्यामुळे इमारती अधिक कलापूर्ण वाटतात.

येथील महाराजांचा महालदेखील प्रेक्षणीय आहे. मोर, पोपट इत्यादी पक्षी व फळाफुलांचे रंग दर्शविण्यासाठी त्याच रंगाच्या काचांचे जोडकाम करून भिंती आकर्षक करण्यात आल्या आहेत. पिवळ्या दगडावरील शिल्प येथे अधिक वैशिष्ट्यपूर्ण वाटते. महालाच्या वरील गच्चीवर झोपाळ्यासाठी उभारलेली कलात्मक कमान पाहताक्षणीच नजर स्थिरावते. आश्चर्याची गोष्ट ही की, या महालाच्या आजूबाजूला एकही फूल किंवा वेल दिसत नाही !

जैसलमीर येथे सर्वोत्कृष्ट काय असेल तर ते जैन मंदिरांचा समूह. अनेक छोटी-मोठी देवळे असून प्रत्येक सुंदर शिल्पाने नखशिखान्त आकर्षक आहेत. लहान-मोठ्या ठराविक मापाच्या चौकड्या, फूल-पान व फळांच्या डिझाइन्स या शिल्पात पाहावयास मिळतात. त्यातील एकरूपतेमुळे ते आकर्षक वाटते. परंतु त्यात असे वैशिष्ट्य नाही की, जे वर्णन करून डोळ्यांसमोर चित्र उभे करता यावे. येथे एक मंदिर तलावाच्या मध्यभागी आहे, ज्याचा आकार खालून वर वाढत जातो. म्हणजे एखादा पिरॅमिड मधून कापावा व उलट करून जमिनीवर ठेवावा तसे हे देऊळ दिसते. अशी रचना इतर ठिकाणी कोठेही नाही.

जैसलमीरपासून एक मैलावरील पेट्रोल पंपावर उभा राहून मी शहराकडे दृष्टिक्षेप केला. पिवळ्या रंगाच्या मातीचे ‘ वारूळ ’च पाहून घ्या. या वारुळात अनेक लहान-मोठे रस्ते, घरे, किल्ल्यांचे बुरूज, देवळे, हजारो गाई—म्हशी व स्त्री-पुरुष राहात असतील असे मुळीच वाटत नाही. शहराच्या अगदी जवळ गेल्यावर आणि मुख्य दरवाजातून आत गेल्यावरच या शहराची कल्पना येईल.

पोकर्णच्या अलीकडे डाव्या बाजूच्या रस्त्यावर वळून ८ मैलांवरील बाबा रामदेवरा यांच्या तीर्थक्षेत्राला जाऊन आलो. मुख्य रस्त्यावर येईपर्यंत दिवे-लागण झाली होती. हळूहळू अंधार पसरू लागला. रात्री साडेआठनंतर चोहोकडे काळोख पसरला. वाळवंटातून अंधाऱ्या रात्री प्रवास करण्याची ही माझी प्रथम वेळ होती. गाडीच्या प्रकाशाचा झोत पडेल तेवढा पांढरा पट्टा सोडून सर्व काळोख होता. दिवसा निदान अधून मधून हरीण, उंट दिसायचे, व अनेक सरडे रस्ता ओलांडून सर्रकन् बिळात शिरत असताना पाहायला मिळायचे. तसेच इतर ठिकाणी झाडेझुडपे असल्यामुळे वातावरण जिवंत वाटायचे. येथे एक वारा सोडला तर बाकीचे सारे वातावरण मृतवत होते. मध्ये कोठे विश्रान्तीसाठीदेखील थांबावेसे वाटेना.

अंधारात रस्ता चुकण्याची भीती

अंगोलाई येथे रात्री एका छोट्या हॉटेलमध्ये दूध घेऊन निघालो. पुढे दोन रस्ते फुटत होते. मी येताना कोणत्या रस्त्याने आलो हे धड आठवेना. कारण येताना मी इतक्या घाईत होतो की, दुसऱ्या बाजूने येणारा रस्ता पाहिला नव्हता. चारी बाजूंना प्रकाशाचा झोत टाकला. एक शिकारीची पाटी दिसली. जाताना मी ही पहिली होती, ती त्या वेळेस कशी दिसली हे आठवून मी प्रत्येक रस्त्या-वरून तिच्याकडे पाहिले व तुलना करून माझा मार्ग निश्चित केला. पुढे अनेक मैल गेलो तरी कोठे वस्ती दिसेना. शंका फार विचित्र असते. रात्रीचे ११ वाजले होते. रस्ता चुकलो तर नाही ना ? असा राहून राहून प्रश्न उभा राहिला. लांब नजर टाकली. परंतु तिळमात्र प्रकाश दिसेना. लांबून एखादा आवाज आला तरी तेथे जाऊन चौकशी करता यावी म्हणून गाडीचे एंजिन बंद करून उभा राहिलो. परंतु काहीही उपयोग झाला नाही. अखेर त्याच दिशेला पुढे प्रवास करण्याचा निश्चय करून निघालो, आणि आठ–दहा मैल गेल्यावर थोडा चढ चढून खाली उतरल्याबरोबर समोर एक छोटे गाव दिसले. रेल्वे लाइन दिसली, व स्टेशन दिसले.

मुक्कामी पोहोचलो तेव्हा साडेअकरा वाजले होते. अल्पोपाहार व दूध या-पलीकडे सबंध दिवसात काहीही घेतले नव्हते. जवळजवळ ४०० मैलांचा प्रवास झाला होता. त्यामुळे भुकेने व्याकूळ झालो होतो. एका हॉटेलवाल्याला ताबडतोब

काही तरी करून द्यावयास सांगितले. तेथे अर्धा तास थांबल्यावर गरम पुरी, भाजी व दही मिळाले. जिवात जीव आला. हायसे वाटले.

उदयपूरकडे प्रवास करताना रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वृक्षांच्या रांगा पाहून बरे वाटले. गेल्या काही दिवसांत असा रस्ता पाहायला मिळाला नव्हता. रस्ता चांगला होता म्हणून प्रवासाला तसा त्रास झाला नाही. परंतु उन्हाचा गरम वारा नाकात झोंबायचा व आग व्हायची. रात्री थंड हवेत नाक शिंकरले की गोठलेले रक्त बाहेर यायचे, असा नवा व विचित्र अनुभव या वाळवंटाच्या प्रवासात आला.

जोधपूरहून पाली, संडेराव वरून फालना येथे आलो. पुन्हा पुन्हा पाणी प्यावेसे वाटत होते. संडेराव येथे मी जसे पाणी प्यालो तसे सबंध भारतात इतर कोठे प्यावयास मिळणार नाही. तुरट म्हणावे की कडवट, परंतु त्यामुळे जीभ एकसारखी खालीवर व्हायची. जणू काही अति सौम्य विषपान केल्याने विव्हळ झाली होती. कोठून तेथे पाणी पिण्याची दुर्बुद्धी झाली असे वाटू लागले होते. कोणाला सांगितले तर खरे वाटणार नाही, पण हे सत्य आहे की, फालना येथे येऊन मी पाच-सहा मोठे पेले पाणी घेतल्यावरच माझी व्याकुळता कमी झाली.

राणकदेवी जैन मंदिर म्हणजे माउन्ट अबूजवळील देलवाडा येथील जैन मंदिरांची हुबेहुब नक्कल. देलवाडापेक्षा येथील मंदिरे भव्य आहेत ! मध्येच एक मोठा व चार बाजूंना चार गुंबज आहेत, व वरती जाऊन घुमटांच्या आतील नक्षी पाहण्याची सोय आहे ! तशी सोय देलवाडा येथे नाही. सौन्दर्याच्या दृष्टीने पाहिले तर देलवाडा सरस आहे; कारण तेथे संगमरवराला पॉलिश केले असून सर्व मूर्ती मऊ आहेत, व लकाकतात ! राणकदेवी येथे पॉलिश नसल्या-मुळे तेथील शिल्प खरबरीत वाटते. मुख्य देवळासमोर दुसरी दोन देवळे आहेत. या देवळांवरील शिल्पात ओरिसाच्या कोणार्क येथील सूर्यमंदिर व मध्य प्रदेशाच्या खजुराहोच्या विषयाला स्पर्श केलेले असून जैनमंदिरावर असे शिल्प पाहून थोडे आश्चर्य वाटले. त्यामागील हेतू समजावून घ्यावयाचा होता. परंतु तेथे इतर कोणी माहितगार नव्हता. खजुराहो येथील जैन मंदिरावरदेखील असे शिल्प आहे.

देसूरीच्या पुढे कांकरोलीपर्यंतचा अरवली पर्वत मालेचा घाट अंधारात चढावा लागला. लांच उतार किंवा चढ व मध्येच एकदम विचित्र वळण, थोडा सपाट रस्ता, व थोडी वस्ती– अशा प्रकारचा एकदम वेगळाचा घाट मला या प्रवासात पाहावयाला मिळाला. मोगलांना सळो की पळो करून सोडणाऱ्या राजपुतांना लढायांसाठी पोषक व फायदेशीर असा हा भाग आहे. त्यातून अंधारात प्रवास करीत असताना मी थोडा काळजीत होतो. कांकरोलीच्या पुढे रस्ता सपाट व चांगला लागला. रात्री ९–३० वाजता मी नाथद्वार या वैष्णवांच्या तीर्थक्षेत्री पोहोचलो.

" चलो भाईसाब ! जल्दी करो. ये लो... छूना मत...दूर ही से लो.... हाँ... बहनजी, यह तुम्हारा परसाद लो.... " मी आवाजाच्या दिशेने पाहात होतो. रात्री ढेकूण व डासांच्या उपद्रवाने डोळे फार जड झाले होते. परंतु येथे काही विशेष पाहण्याजोगे आहे असे वाटल्याने मी टक लावून पाहात होतो. एक माणूस भंडारमधून प्रसादाचा मोठा लाडू घेऊन दोन्ही हातांनी फेकीत होता व समोरील भक्त एकामागून एक ते झेलीत होते. त्याने लाडू फेकल्यावर त्याच्यावरील माशांचा कळप एकदम उडायचा व त्या भक्ताने तो झेलल्यावर तो जात असतानाच पुन्हा त्या लाडवावर जाऊन बसायचा. या फेकाफेकीत गुरुत्वाकर्षणाने जो थोडा भाग जमिनीवर पडायचा त्याची अनेक माशा मिळून मेजवानी करीत होत्या. तेथून ये-जा करणाऱ्या प्रत्येक पुजाऱ्याजवळ व पंड्याजवळ छोटा रुमाल असायचा, व त्यावाटे तो माशांना आपल्याजवळून उडवायचा राहून राहून प्रयत्न करीत होता.


" डीं...डों...डीं....डों... " घंटा झाली. दार उघडले, व अनेक दर्शनप्रेमी स्त्री-पुरुष भक्तांनी मंदिरात धाव घेतली. उंच होऊन होऊन लोक अति श्रद्धेने दर्शन घेऊ लागले. मी शान्त चित्ताने दर्शन घेतले व चटकन या गर्दीतून बाहेर पडलो. पाच सहा रुपये सेवा फंडात भरून मागच्या दाराने आत गेलेले भक्त माझ्या आधी दर्शन घेऊन बाहेर पडले होते. तेथून एका गाइडबरोबर जाऊन तेथील वैभव पाहिले. केशर कस्तुरी दळण्यासाठीची चांदी व सोन्याची जाती पाहिली ! शुद्ध लोणकढ्या तुपाची विहीर पाहिली, व त्यातून तूप काढण्यासाठीची बादली इत्यादी पाहिले ! बेसन, मैदा, रवा, साखर इत्यादी वस्तूंचे गुदाम पाहिले. परतताना पायाचे तळवे चिकट झाले होते.



पहलगाम येथील निसर्ग

काश्मीर येथील एक अति उत्कृष्ट निसर्गरम्य स्थळ. नदीच्या काठावर उभे राहून घेतलेला फोटो. कॅमेऱ्याच्या मागे नदी आहे. समोरील दृश्यात एका भागाची कल्पना येते. समोर मागील डोंगरावर बर्फ आहे.


फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण



जेसलमीर येथील शिल्प

जेसलमीर हे ऐतिहासिक स्थळ आहे. चित्रात एका भव्य जुन्या नख-शिखांत शिल्प असलेल्या इमारतीचा दरवाजा व कमान दिसत आहे. येथील पिवळ्या दगडावरील शिल्प फारच कोरीव व प्रेक्षणीय आहे. अनेक इमारती येथे पहावयास मिळतात असे हे एकमेव शहर आहे.


फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण



माल वाहणाऱ्या गाड्या जयपूरला उंटाच्या असतात.

वरील चित्र एका हमरस्त्यावरचे आहे. फोटो : अशोककुमार स्वामीनारायण

ग्वाल्हेर किल्ल्यावरील "सासू आणि सून" यांचे हे मंदिर फार प्रसिद्ध आहे. इतके भव्य मंदिर इतर कोणत्याही किल्ल्यावर पहावयास मिळत नाही. विशाल प्रवेशद्वाराला आधार म्हणून दोन भले मोठे खांब बसविलेले आहेत. शिल्प कोरीव व आकर्षक आहे.



ग्वाल्हेर किल्ल्यातील देवालय

फोटो : श्री. अशोककुमार स्वामीनारायण

रबडीची रसिकतेने विक्री

नाथद्वारा येथे रबडीची विक्री फार कलात्मकरीत्या होत असते. पुरीबरोबर भाजीचे दोन घास घेतल्यावर पाणी पाणी असा आवाज आला की तेथील सेवक पाणी देऊन हळून विचारतो, " साहब रबडी दूँ ? बहुत बढिया है । " आदल्या रात्री मी हा अनुभव घेतला होता. रात्री ढेकूण व डासांचा पुण्यप्रसाद अनायासे प्राप्त झाला होता, व सकाळच्या दर्शनाने माझी भूक मुळी नाहीशी झाल्यामुळे मी तसाच निघालो व उदयपूरच्या वाटेवरील १४ मैल अलीकडे असलेल्या सुंदर एकलिंगजी महादेवाच्या दर्शनासाठी थांबलो.

गाभाऱ्यासमोर मंडपात प्रवेश करण्यासाठी सुंदर कमान आहे. त्यावर चांदीचा सुंदर नक्षीदार पत्रा मढविण्यात आला आहे. गाभाऱ्याचे प्रवेशद्वारही तसेच आकर्षक; त्याच्या दोन्ही बाजूंच्या चांदीच्या दरवानांच्या मूर्तीमुळे वैभव वाढते. खांबावरती आनंद तांडव, गौरी तांडव इत्यादी नटराजांच्या चित्रांच्या फ्रेम्स् लावल्या आहेत. त्यांकडे पाहातच राहावे असे वाटते. जवळील मीराबाईच्या देवळावर सुंदर नक्षी असून विविध शिल्पाकृती आहेत. या मंदिराच्या आवारात इतरही अनेक देवळे आहेत.

दर्शन घेऊन मी बाहेर आलो असता एक एस. टी. बस तेथे आली व सर्वांनी तेथील हलवायाच्या दुकानावर हल्ला केला. मला पुणे–मुंबईचा सकाळचा डेक्कन क्वीनचा प्रवास आठवला. लोणावळा व कर्जत येथे आबालवृद्धांनी बटाटेवड्यासाठी चालवलेली प्लॅटफार्मवरील धावपळ आठवली. मी पण त्या गर्दीत सामील झालो. कचोरी व सामोसा खाल्ल्यानंतर मात्र मला ती ' हातघाई ' अनाठायी वाटली नाही.

" शेठ ! जयपूरवाले दिल्लीवालों के पैर दबा के हीरामोती, सोनाचांदी उठा लाते थे ! उदयपूर में जो वैभव है वह तो खून का पसीना कर के पैदा किया गया है ! राणा संग और महाराणा प्रताप जैसे टेकीले लोगों का यह शहर है ! " श्री गणेशलालजींच्या चेहऱ्यावर स्वाभिमानाचे रक्त सळसळत होते. राजदरबारातून पेन्शन मिळालेल्या या राजपुताला त्याच्या उज्ज्वल इतिहासाचा फार गर्व वाटत होता.

त्या दिवशी राजस्थान येथील प्रसिद्ध व लोकप्रिय गणगौरचा सण होता. मी एकटा पिचोला तलावाकाठी उभा होतो. गणेशलालजी दिसल्यावर परिचय करून घेतला. त्यांनी आग्रह केल्यावर मी तलावाच्या मध्यावरील बैठकीकडे नावेत गेलो. गणगौरच्या सणाबद्दल त्यांनी माहिती दिली, व पूर्वेतिहास सांगता सांगता वरील शब्द त्यांच्या तोंडून निघाले.

हळदीघाट ओलांडून उदयपूरला प्रवेश करताना मी प्रसन्न झालो होतो. त्यात भर म्हणून येथील महाराजा पॅलेस व तलावाच्या मध्यभागी असलेले संगमरवरी 'लेक पॅलेस' पाहून अधिक प्रसन्न झालो. या महालाचे वैभव त्या काळी केवढे असेल याची कल्पनाच करावी. मला या महालांत सर्वाधिक आवडले असेल तर तेथील काचेचे काम. हिरव्या, निळ्या, तांबड्या, पिवळ्या अशा भडक रंगांच्या काचा सर्व खिडक्यांच्या तावदानाला लावल्या आहेत. एकामागून एका रंगातून बाहेर पाहिले की सबंध देखावा रंगीत वाटतो. अशा विविध रंगांनी नटलेले उदयपूर येथून पाहताना लहान मुलांना वाटतो तसा निष्पाप आनंद झाल्याशिवाय राहात नाही. बाकी येथे सर्व प्रकारचा थाट आहे, व मोझेकच्या रंगीत तुकड्यांनी भिंतीवर चित्रित केलेले मोर हे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

अनेक उद्यानांपैकी सहलियों की बाडी रम्य आहे. खांबावरील फिरत्या चिमणीच्या तोंडातून उडणारा फवारा व इतर फवारे आकर्षक आहेत. सुजनगढ या छोट्या टेकडीवरून फतेहसागर तलावाचे दर्शन घेत असता पुण्याच्या पर्णकुटीची आठवण होते. उदयपूर येथे पुण्याप्रमाणे चारी बाजूंना लहान लहान टेकड्या आहेत, व नेहमी गार वारा वाहात असतो. अहार या खेड्याजवळील महाराजांच्या समाध्या पाहण्याजोग्या आहेत. तसेच जगन्नाथ मंदिर शहरापासून ३०–३२ मैलांवरील जयसमंद व राजसमंद तलाव प्रेक्षणीय आहेत. त्यांतील जयसमंद जगातील सर्वात मोठा कृत्रिम तलाव आहे.

उदयपूर २५०० फूट उंचीवर असल्यामुळे हवामान साधारण पुण्यासारखे आहे. फळभाज्या येथे पुष्कळ मिळतात. बाजारात फिरत असता लालबुंद टॉमेटो पाहून मी खूष झालो. लहान मुलांप्रमाणे एक भला मोठा टॉमेटो रस्त्यातून खात जात असता लोक कुतूहलाने माझ्याकडे पाहात होते. परंतु प्रवासात वेळेच्या अभावी शिष्टाचार बाजूला ठेवून अशा प्रसंगाला खिलाडी वृत्तीचा आव आणून वागावे लागत होते.

राजस्थान म्हटले म्हणजे सर्वप्रथम चितोडगढ डोळ्यांसमोर उभा राहतो. भव्य सात कमानींतून चढ चढताना कठीण घाटांची आठवण होते. एक मैल सतत प्रवास केल्यावर गडावर पोहोचता येते. वरपर्यंत सुंदर रस्ता आहे, व वरतीदेखील पक्के रस्ते आहेत. मी मोटरसायकल घेऊन वर गेल्यामुळे वरील ५–७ मैलांचा प्रवास माझा लवकर होऊन सगळे व्यवस्थित पाहून झाले.

किर्तिस्तंभ ७५ फूट उंच आहे; व खालून वरपर्यंत नक्षीदार आहे. वर चढताना फार जपावे लागते ! मी एकदा उभा राहावयास गेलो व डोक्याला जोरात लागले ते विसरणे शक्य नाही. विजयस्तंभ १२२ फूट उंच असून जवळून फार आकर्षक वाटतो. वर जाण्यासाठी दोन वेगवेगळे रस्ते आहेत, व पायऱ्यादेखील विशिष्टरीत्या गोल फिरत वर चढतात. येथे दोन मार्ग निर्माण करण्यात फार कौशल्य वापरले आहे. वरून लांबपर्यंत पाहता येते. या स्तंभासमोर वीरजी व संत मीराबाईची देवळे आहेत. अन्य मंदिरांत नीलकंठ महादेवाचे भव्य मंदिर आहे, व कीर्तिस्तंभाजवळ छोटे जैन स्मारक असून एक कालीमातेचे मंदिरही या गडावर आहे.

गडावरील मोठ्या तलावासमोर राजा भीमसिंगचा महाल आहे. पद्मिनी येथे राहात होती. तिचे प्रतिबिंब आरशात पाहिल्यावर अल्लाउद्दिन खिलजी तिच्या अनुपमेय सौन्दर्यावर भाळला होता. पद्मिनीच्या कथा फार प्रसिद्ध आहेत.

अजमेरच्या दिशेने प्रवास करता रात्रीचे नऊ वाजले म्हणून मी विजयनगर येथे प्रवेश केला. मुक्कामाच्या आधी मी डॉक्टरला भेटलो व ताबडतोब एक झोपेची गोळी बरोबर घेऊन निघालो. गेल्या तीन-चार रात्रींपासून डासांमुळे व अन्य चिंतेमुळे झोप मिळाली नव्हती.

• • •

२९ : ब्रह्माचे एकमेव स्थान– पुष्कर

ब्रह्माजींचे प्रेक्षणीय मंदिर

"गंगा, गोदावरी, नर्मदा, सरस्वती, मही, तुंगभद्रा, कावेरी, अन्नपूर्णा, गया, गोमती, पुष्करतीर्थस्नानं समर्पयामि... ॐ भगवते वासुदेवाय स्नानं समर्पयामि !" असे नेहमी सकाळी स्नान करताना म्हणणारा मी पूर्वी कधी पुष्कर कोठे आले म्हणून विचार केला नव्हता. खरे पाहिले तर तेवढी तरी चिकित्सक बुद्धी असणे फार आवश्यक आहे. असा विचार मनात आल्यावर मला माझ्या चिकित्सेच्या कक्षेची मनोमन लाज वाटू लागली. परंतु प्रत्यक्ष पुष्करच्या कुंडात स्नान करण्याची संधी लाभली म्हणून आनंद झाला. वास्तविक या कुंडाची अवस्था पाहिल्यावर थोडे कसेसेच वाटले. परंतु मी 'शंकाशील विनश्मीत' या उक्तीची आठवण करून कर्मकांडाच्या जास्त वादात न शिरता त्या कुंडात प्रवेश केला. एका ब्राह्मणाला गीतेतील काही श्लोकांबद्दल विचारले. तो अभ्यासू वाटल्यावर आवश्यक विधीसाठी सल्ला विचारला, व तो विधी आटोपला. सबंध भारतात ब्रह्माचे जर स्थान कोठे असेल तर पुष्कर येथे, व म्हणून या तीर्थक्षेत्राला आगळे महत्त्व आहे.

येथे ब्रह्माजींचे सुंदर मंदिर आहे. मंदिराचे आवार छोटे असून तेथे हनुमान, गणपती इत्यादी छोटी देवळे आहेत. एका बाजूला असलेल्या झाडावरची फुले जमिनीवर विखुरलेली होती. त्यांच्या मंद सुगंधाने वातावरण प्रसन्न झाले होते. जमीन झाडून पुसून एकदम स्वच्छ केली होती. मंदिराचा गाभारा-

देखील ठराविक वस्तूंनीच सुशोभित केला होता. आवश्यक तेथे सौम्य रंगांनी हे मंदिर नटविले होते. कलात्मकरीत्या एका कमानीला लहानमोठी घंटा लावली होती. बाहेर फक्त गुलाबाच्या फुलांची सुंदर माळ विकत मिळाली. अबीर, गुलाल, बुक्का, हळदकुंकू, अक्षता व काही फुलं-पानांचा समूह इत्यादी काही-देखील मिळाले नाही.

लाल गुलाबाची माळ घेऊन आत गेलो, दोन हात जोडून नमस्कार केला. ईशस्तुती करावी असे वाटले, परंतु माझे या देवाविषयी काहीच पाठान्तर नव्हते याचे दुःख झाले. लहानपणी रामभक्त हनुमान हा चित्रपट पाहिला होता. त्यात रावणाचा भाऊ इंद्रजित हनुमानावर ब्रह्मास्त्र फेकतो तेव्हा अनेक अस्त्रांचा बीमोड करून उभा ठाकलेला हनुमान उद्गारतो, " ब्रह्माजी का तो मान रखना ही होगा " असे म्हणून तो नम्रभावे डोळे मिटून प्रणाम करतो, व इंद्रजित त्याला कैद करून दरबारात हजर करतो. या प्रसंगावरून मी ब्रह्माजींचे महत्त्व समजलो,– तेवढेच काय ते लक्षात होते. अंतिम ' सर्व धर्मान्परित्यज्य मामेकं शर व्रजणे । '

" पश्यामि देवांस्तव देव देहे
सर्वांस्तथा भूतविशेषसंघान् ॥
ब्रह्माणमीशं कमलासनस्थ
मृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान् ॥ "

इत्यादी आठवले व मी त्या देवदेवेश्वराचेच स्मरण करून बाहेर पडलो. ज्या देवावर श्रद्धा असावी त्याचे एकही स्तुतिसुमन जवळ नसावे ?– असा विचार स्पर्श करून गेला. अजमेरहून ७ मैलांवरील या तीर्थक्षेत्री जायला थोडा डोंगराळ भागातून प्रवास होतो. पण राजस्थानच्या इतर भागांपेक्षा येथे हिरवळ जास्त पाहावयास मिळते. मी तेथून अजमेरला परतलो तेव्हा दुपार झाली होती, पण जेवणाची आठवण झाली नाही. कारण अजमेरला येता येता वाटेतील नसीराबाद येथे मी माझ्या दृष्टीने एक अत्यंत नवा पदार्थ खाल्ला होता. तो थोडा हैराण करीत होता. बिकानेर येथे प्रसिद्ध बिकानेरी शेव व भुजिया खात असताना तेथील हलवायाबरोबर गप्पा मारीत होतो. चौकशी करता समजले होते की, नसीराबाद येथे ' कचोरा ' मिळतो. हा ' कचोरा ' इतर कोठेही होत नाही. ताटाच्या आका-

राचा व खाजासारखा दिसणारा हा पदार्थ फारच मसालेदार असतो. त्यात उड-दाची डाळ व इतर मसाला, तसेच दुसऱ्यात खमंग बटाट्याची भाजी, मसाला म्हणून भरलेली असते. हा कचोरा एका मोठ्या कढईत सोडतात व तळून घेतात. पचायला अत्यंत भारी अशी या पदार्थांची प्रसिद्धी आहे. त्याला तेथलेच पाणी पाहिजे असे लोक अभिमानाने सांगतात !

अजमेरच्या दर्ग्यातील बडवे

तारागड या प्रसिद्ध डोंगराच्या पायथ्याशी आलेले अजमेर फार प्रसिद्ध शहर आहे. " काकाजी अजमेर गये हैं " अशी तार वाचण्यात चूक करून " काकाजी आज मर गये हैं " असे वाचून एकाने हंबरडा फोडल्याचा विनोद मी पूर्वी ऐकला होता ! येथे अनासागर हा सुंदर तलाव आहे; व शहाजहानने बांधलेले पाच संगमेश्वरी छोटे महाल आहेत. एक भव्य तीन मजली देऊळ आहे. त्यात लहान वस्तुसंग्रहालयदेखील आहे. त्यात सर्वाधिक प्रसिद्ध अशी दोन स्थळे आहेत, ती म्हणजे– 'ढाई दिन की झोपडी' व 'दरगाह' ख्वाजासाहेब. 'ढाई दिन की झोपडी' ही एक जुनी छोटी मस्जिद आहे,– जिचे बांधकाम लाल दगडातून कोरीव शिल्प निर्माण करून पूर्ण करण्यात आले आहे. सध्या हे ऐतिहासिक स्मारक म्हणूनच मानले जाते.

दरगाह ख्वाजासाहेब म्हणजे प्रसिद्ध मुस्लिम संत मोइन-उद-दीन चिस्ती यांची कबर. प्रयाग व मथुरेचे पंडे यांची जशी ख्याती आहे तशीच तेथील काही मुस्लिमांची आहे. गेल्याबरोबर " जनाब, कहाँ से पधारे ? वालिद का नाम, वालिद के बाप का नाम ..." वगैरे चौकशी सुरू होते. पूर्वी येऊन गेलेल्या लोकांची त्यांच्याकडे माहिती असते. सर्व-धर्म-समान भावनेने आत गेलो. बाबांना नमस्कार करायला वाकलो. वरून एकाने मोरपिसांची चवरी फिरवली. एक ओरडला, " डाल दे बाबा की झोली में पाँच दस रुपिया । " दुसरा म्हणाला, " कोई एक सो एक देता है, कोई इक्कावन देता है । " मला पंढरपूरची आठवण झाली. मागे मी एकदा दर्शनाला गेलो असता हार नारळ दिल्यावर तो ब्राह्मण मोठ्याने खेकसला, " अहो ! सव्वा रुपया काढा. " मी हे ऐकण्याच्या तयारीतच होतो, म्हणून तत्क्षणी उत्तरलो, " असानं ते सगळं परत करा ! " हात पुढे केल्यावर मात्र

तो गप्प झाला. मी दर्शन घेऊन उरलेला विधी उरकून बाहेर पडलो. अजमेरच्या दरग्यात तेच पाहून ' हम सब एक हैं ' याची यथार्थता पटली.

आकाशवाणीचा पंचरंगी कार्यक्रम विविध भारतीमध्ये ' हवा महल ' सदराखाली नियमितपणे लागतो. हवामहल ही कल्पना नसून प्रत्यक्ष प्रेक्षणीय स्थळ आहे. राजस्थानची राजधानी जयपूर येथे हमरस्त्यावर हा महाल आहे. उन्हाळ्यात वाळवंटावरून येणारी हवा त्रासदायक असते. तेव्हा सर्व प्रकारच्या ऋतूंमध्ये मंद वारा लाभावा म्हणून येथे हा महाराजांनी बांधला होता. जयपूर-देखील उदयपूरप्रमाणे लहान लहान टेकड्यांनी वेढलेले आहे. हवामहलसारख्या उंच इमारतीवरून लांबपर्यंतचे दृश्य पाहण्याचा आनंद येथे मिळतो.

जयपूर शहर जुने जरी असले तरी पूर्वीपासून त्याची रचना इतकी उत्कृष्ट आहे की, नव्याने येणाऱ्याला ही नवी उभारणी वाटावी. रुंद व लांब सरळ रस्ते दोन्ही बाजूंना एकसारख्या आकाराच्या व बहुधा समरंगाच्या इमारती, त्यांची तावदाने मिश्र, परंतु सुरळीतपणे चालू असलेली रहदारी, यामुळे शहराची शोभा फार वाढते. येथे ज्याप्रमाणे बैलगाड्या आहेत. त्याप्रमाणे तेथे उंटगाड्या आहेत. सामान्य लोकांचे साधन सायकल. तिचा येथे बराच वापर आहे. जयपूरचे संस्थापक महाराजा जयसिंग यांचा ग्रहनक्षत्रांचा चांगला अभ्यास होता. त्यासाठी त्यांनी एक भव्य वेधशाळा बांधली. ती आजही जशीच्या तशी आहे. ' जंतर-मंतर ' म्हणून प्रसिद्ध असलेल्या या वेधशाळेत आजही अनेक लोक येऊन अभ्यास करतात. येथील महाराजा पॅलेस म्हणजे सिटी पॅलेस. येथे जुन्या शस्त्रास्त्रांचा, गालिच्यांचा, हस्तलिखितांचा, चित्रांचा व हिऱ्यामोत्यांच्या दागिन्यांचा सुंदर संग्रह आहे. हा पॅलेस पाहण्यासाठी चार रुपये तिकिट ठेवले आहे. विद्यार्थ्यांना येथे अल्प फीत पाहण्याची सोय आहे.

राजवाड्यात शाही हॉटेले

इतर प्रेक्षणीय स्थळांमध्ये रामनिवास उद्यान, पूर्वी राजमहाल होता व सध्या हॉटेल करण्यात आलेला रामबाग पॅलेस हॉटेल, बक्षीखाना, आल्बर्ट हॉल व म्यूझियम आहे. रामबाग पॅलेस हॉटेल अति उत्कृष्ट आहे. येथे बहुतेक पाश्चात्त्य राष्ट्रांतील प्रवासी मला पाहावयास मिळाले. मी तेथल्या व्यवस्थापकाला भेटून खास

माणसासोबत सर्व पाहण्यास सोय करून घेतली. हॉटेलच्या समोर एका मोठ्या हॉलमध्ये पोहण्याचा छोटा तलाव बांधला आहे. खोल्या सर्व सुंदर फर्निचरने सुशोभित केल्या असून बहुतेक वातानुकूल आहेत. तेथील विक्रीकेन्द्र म्हणजे एक छोटेसे संग्रहालयच पाहून घ्या. शहरातील संग्रहालयदेखील उत्कृष्ट व भव्य आहे. मुंबई, मद्रास, कलकत्ता, हैद्राबाद, पाटणा, अलाहाबाद, दिल्ली, श्रीनगर यांसारखे हेही प्रशंसनीय आहे. वरच्या मजल्यावर प्रवेशद्वाराच्या शेजारीच प्रस्थानद्वार आहे. त्यासमोरील कपाटात चित्रांचा संग्रह असून त्यात कृष्णलीलेवर आधारित गोपींचे एक सुन्दर चित्र आहे. मी अनेक संग्रहालये पाहिली, परंतु या चित्रासारखे वैशिष्ट्यपूर्ण इतर कोठेही पाहावयास मिळाले नव्हते.

जयपूरपासून सात मैलांवरील आमेर किल्ला न पाहिलात तर जयपूर शहरात न गेल्यासारखे होईल. निसर्गरम्य परिसरातील हा आमेरचा किल्ला अकबरचा मेव्हणा राजा मानसिंग याने बांधला. येथील गणेश हे प्रमुख प्रवेशद्वार सुंदर रंगांनी चित्रित केलेले असून, प्रथमदर्शनी माणूस गड चढल्यावर लागलेला सर्व थकवा विसरतो. चेहऱ्यावर फुटलेला घाम पुसण्याचेदेखील तो विसरतो. आत बांधलेले शीशमहाल किंवा जयमंदिर हे सुंदर रंगांनी नावीन्यपूर्ण आकृत्यांनी डिझाइनने रंगविले आहे. येथे वापरलेल्या रंगीबेरंगी काचांमुळे याची शोभा अधिकच खुलून दिसते. मध्यभागी छोटीशी बाग असून कारंजे आहे. त्या कारंजातले पाणी उडताना विखुरणारे तुषार बागेतील फुलांच्या पाकळ्यांवर जाऊन बसतात. हळूहळू त्यांचे सुंदर जलबिंदूमध्ये रूपान्तर होते,– हे पाहण्याची मला फार गम्मत वाटली. भर उन्हात या फवाऱ्यामुळे येथे आल्हाददायक गारवा जाणवतो.

राजा मानसिंगाचा महाल म्हणजे एक ' भुलभुलैया 'च आहे. येथे केलेली राहण्याची सोय वैशिष्ट्यपूर्ण आहे. जयमंदिरदेखील सुंदर आरशांनी सजविलेले आहे. जवळ असलेले सुखनिवास येथे पाण्याची नाली तयार केली असून, त्यावरून येणाऱ्या वाऱ्यांमुळे गारवा निर्माण होतो. त्याव्यतिरिक्त गणेशद्वाराजवळ एक सोहाग मंदिर आहे. हे राजघराण्यांतील स्त्रियांसाठी होते, व येथील सभेवरच्या जाळीतून त्या दरबाराचे अवलोकन करीत असत. या गडाच्या मागच्या बाजूला वैष्णवांचे जगतशिरोमणी मंदिर आहे. त्याच्यासमोर एक सुंदर कमान आहे.

तेथून प्रवेश करताना कोणीही तेथे सहज थांबेल इतके कोरीव व आकर्षक शिल्प या कमानीवर निर्माण केले आहे.

आमेर व जयपूरच्या रस्त्यावर इतिहासप्रसिद्ध राजा-महाराजांच्या संगमेश्वरातील समाध्या आहेत. कित्येक राण्यांच्याही आहेत. ज्यांनी जोहार करून चितेत प्राणार्पण केले त्यांचेही येथे स्मारक आहे. या प्रेक्षणीय स्थळांव्यतिरिक्त जयपूर दागिन्यांसाठीच्या खड्यांसाठी फार प्रसिद्ध आहे. येथील टूरिस्ट बंगल्यांतदेखील त्यांची विक्री होत असते.

भरतपूरचा रहस्यमय किल्ला

दक्षिणेतील त्रिचिनापल्लीपासून श्रीनगर येथील किल्ल्यापर्यंत अनेक किल्ले पाहिले, परंतु भरतपूरसारखा रहस्यमय किल्ला कोठेच पाहायला मिळाला नाही. मी भरतपूर येथे पुष्कळ हिंडलो, फिरलो; अखेर वैतागून एकाला विचारले, "की किल्ला आहे तरी कोठे ?" तो म्हणाला, "भाईसाब, आप किल्लेमें ही खडे हैं, और दूसरा तो कोई भी किल्ला यहाँ पर नहीं है।" पर्यटन माहितीखात्याने प्रशंसिलेला किल्ला शोधताना माझी ही फसगत होईल असे मला वाटले नव्हते. दुधाची तहान ताकावर भागवून मी जवळील घाना येथे गेलो. पक्ष्यांच्या शिकारीसाठी जगप्रसिद्ध असलेले हे स्थळ म्हणजे एक विशाल डबके आहे. त्यात लहान-मोठे वृक्ष व झाडेझुडपे आहेत. हिवाळ्यात सर्व प्रकारचे पक्षी देशा-देशांतून येथे येतात. त्या वेळेस त्यांच्या कलरवाने हे रम्य स्थान दणाणून उठते. नानाविध पक्षी येथे पाहावयास मिळतात. त्याचप्रमाणे लहानमोठी हिंस्र श्वापदेही या जंगलात आहेत. मला वाटेत एक लांडगा दिसला. गाडी थांबवून मी त्याचा पाठलाग केला. कॅमेरा सज्ज करून व बॅगेमधला चाकू खिशात टाकून मी झाडा-झुडपांत पळत सुटलो. तो काही हाती लागला नाही. पण तेथून लांब मला एक त्यांचे छोटे कुटुंब दिसले. हळूहळू पुढे सरसावलो, परंतु ते सर्वच्या सर्व चाहूल लागताच पळून गेले.

भरतपूर ते मथुरा हा रस्ता अत्यंत वाईट, खाचखळग्यांचा व दगडा-विटांचा असल्याकारणाने फार काळजी लागली. चाकांचे टायर्स झिजून झिजून त्यांच्या आतील धागेदोरे बाहेर आले होते. साधारण टोकदार खडादेखील लागला तर

पंक्चरं होण्याची शक्यता होती. आग्र्याला टायर्स थोडे स्वस्त मिळतील म्हणून घेतले नव्हते, परंतु वाटेत जर गाडी पंक्चर होती तर ते अधिक महाग पडणार होते. फार जपत जपत एकदाचा मी मथुरेला पोहोचलो,—देव पावला.

वृंदावनातील रम्य वातावरण

मथुरेपेक्षा वृंदावनचे वातावरण बरे वाटले. तेथील स्वच्छ मंदिरांमुळे मी प्रसन्न झालो. रंगनाथस्वामींच्या मंदिरातील दाक्षिणात्यांची आरती पाहून काही वेळ मद्रास राज्यात आल्याचा भास झाला. समोर वैकुंठनाथाचे मंदिरदेखील लाल दगडांचे भव्य व सुंदर आहे. काचेचे मंदिर एक वैशिष्ट्य आहे. इतर अनेक देवळे आहेत. संगीत सम्राट तानसेन व त्यावर विजयी झालेला बैजू या दोघांचे गुरुस्वामी श्री हरीदास यांची आठवण झाली. त्या काळचे वृंदावन कसे असेल ? कोणत्या परिस्थितीत येथे त्यांनी संगीताची साधना कशी केली असेल ? असे विचार मनात डोकावून गेले, व काही क्षण मी त्या रम्य कल्पनासृष्टीत वावरलो.

ताजमहालवर चांदणे पडले होते. परंतु बागेत सर्वत्र अंधार वाटत होता. त्या शीतल, मऊ गालिच्यासम हिरवळीवर पडून मी ताजमहालाकडे टक लावून पाहात होतो. सूर्यास्तापूर्वी आलेला मी पावणेदहा वाजले तरी येथून निघण्याचा विचार करू शकलो नव्हतो. जास्तीत जास्त वेळ येथे काढावा असे वाटत होते. प्रवेशद्वाराजवळील छोट्या दिव्याखाली दोन व्यक्ती, व ताजमहाल येथे दोनतीन राखणदार यापलीकडे तेथे अन्य कोणी नव्हते. ती सुखद निशाकालीन सौम्य निशा मी जन्मभर विसरू शकणार नाही.

ताजमहालबद्दल लिहावे तितके कमी. रात्री खालील कबरीजवळ जाऊन हलका आलाप घ्यावा व पाहावे काय आनंद होतो ते ! कबरीवरील संगमेश्वरी शिलेच्या एका बाजूला बॅटरीचा झोत टाकला असता दुसऱ्या बाजूची डिझाइन स्पष्ट दिसू लागते. ताजमहालाच्या भिंतीची जाडी २८ फूट आहे. हे एक वैशिष्ट्य. पार्शियन स्टोनमध्ये घुमट सोडून नखशिखान्त सजविलेला हा ताजमहाल म्हणजे जगांतील सर्व पर्यटकांचे आकर्षण-केन्द्र आहे. मुख्य इमारतीच्या उजव्या बाजुला मस्जिद असून डाव्या बाजूला तशीच एक इमारत बादशहाच्या खास पाहुण्यांना राहण्या-

साठी बांधली आहे. मागे यमुना वाहात असून डाव्या बाजूला लांब आग्र्याचा किल्ला दिसतो. एका ठराविक दिवशी त्या कबरीवर घुमटातून पाणी टपकते ! याचे रहस्य आजपर्यंत कोणाच्या लक्षात आले नाही असे म्हणतात. रहस्याने सजलेला व रम्य कथांनी नटलेला हा ताजमहाल सदैव आनंद व प्रेरणादायी आहे.

राधास्वामी यांचे दयाळबाग हे एक येथील नवे आकर्षण आहे. हुबेहुब फुलांचा गुच्छ व द्राक्षांची वेल वाटावी असे कोरीव काम येथे संगमरवरी शिलांवर केले आहे. शिवाय पर्शियन स्टोनच्या साहाय्याने रंगीत चित्रे पण तयार केली आहेत. अजून हे अर्धवट असून पूर्ण व्हावयास पुष्कळ कालावधी लागेल. संत राधास्वामी व त्यांचे अनुयायी हे मंदिर उभारीत आहेत. जैन लोक हे बांधतात अशी अफवा पसरलेली मी काही वर्षांपूर्वी ऐकली होती व आजही काही लोक बोलतात.

आग्र्याचा किल्ला दिल्लीच्या लालकिल्ल्याची आठवण करून देतो. दिल्लीप्रमाणे येथेदेखील संगमरवरी बांधकाम पुष्कळ असून रंगीत दगड बसवून सुंदर डिझाइन्स तयार करण्यात आली आहेत. येथे बसविलेल्या एका छोट्या आरशातून ताजमहाल स्पष्ट दिसतो; व तो पौर्णिमेच्या रात्री दिसावा तसा भर दिवसा या आरशात दिसतो.

नदीच्या पलीकडे इत-मद-उद-दौला यांची कबर आहे. शहरापासून पाच मैलांवरील सिकंदरा येथे अकबरची कबर आहे. साधी पण आकर्षक अशी भव्य इमारत येथे बांधण्यात आली आहे. इमारतीच्या एकदम वर गेल्यावर गार वारा घेत गप्पा मारीत किंवा गाणी म्हणत बसावे असे वाटते. शान्त एकान्त स्थळ म्हणून मी याला विसरणार नाही. आवारात छोटी सुंदर बाग तयार करून मोगल युगाचे स्मरण करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

तेवीस मैलांवरील फत्तेपूर शिक्री येथील जगप्रसिद्ध बुलंद दरवाजा पाहून भुवया उंचावतात. येथील शेख सलीम चिस्ती याच्या आशीर्वादाने अकबरला मुलगा झाला, त्या मुस्लिम संताची कबर आहे. पंचमहाल हे त्या वेळचे वैभव दाखविणारे स्थळ आहे. इतिहासप्रसिद्ध तानसेन व बैजू यांची गायनाची स्पर्धा झाली ती जागा अजून येथे पाहावयास मिळते. थंड व उष्ण हवामानात अनुकूल होतील अशा खोल्यांचे बांधकाम प्रेक्षणीय आहे.

ग्वाल्हेर येथील किल्ल्यात राजा मानसिंहाचा महाल सोडला तर विशेष काही नाही. संगीत मैफलीसाठी खंडमंदिर, व स्त्रियांनी आतून पाहावे पण बाहेरच्याला दिसणार नाही अशा खास रचनेची दगडाची जाळी– हे येथील वैशिष्ट्य आहे. गावात तानसेनची कबर आहे. मी तेथे जाताच एकजण आला व माहिती सांगू लागला. त्याला मी येथील काड्या, विड्यांचे थोटूक, इतस्ततः उडालेला रंग, व विखुरलेली पाने दाखविली. तथाकथित रखवालदार तेथून निघून गेला. इतिहासात उज्ज्वल परंपरेने गाजलेले ग्वाल्हेर सध्या तरी कीव येण्यासारखे झाले आहे.

• • •

२६ : खजुराहोची मंदिरे

खजुराहोच्या शिल्पाचे आकर्षण

भारतीय सेनेच्या ताब्यात असलेला झाशीचा किल्ला पाहण्याचा परवाना काढावा लागतो ! मी तसाच सरळ किल्ल्यावर गेलो. तेथील अधिकाऱ्यांना परिस्थिती समजावून जेमतेम किल्ल्यात प्रवेश मिळविला. मूळ केरळमधील एकाने मला किल्ला दाखविल्यावर डोंगर पोखरून उंदीर काढल्यासारखे वाटले. ग्वाल्हेर व झाशी या स्थळांना मुद्दाम भेट देण्यासारखे काहीही आकर्षण नाही.

भर उन्हात खजुराहोच्या दिशेने प्रवास करीत असताना वाटेत तीन नद्या लागल्या. पुलावर गाडी थांबवून मी नदीचे पात्र निरखून पाहिले. खाली संथ हिरवे पाणी, आजूबाजूला हिरवळ, दूरवरचे छोटे डोंगर, एका छोट्या पाण्याच्या डबक्यात खेळत असलेले काही पक्षी, गळ्यात घंटा बांधलेल्या गाई आणि म्हशी–सारे वातावरण शान्त, संथ वाटत असूनही जिवंत होते ! एप्रिलचा प्रखर उन्हाळा अंगाला चटका देत होता. पुलावरून खाली पाणी पाहिल्यावर तशीच पाण्यात झेप घ्यावी असा विचार स्पर्शून गेला.

खजुराहो येथील मंदिरांना जागतिक कीर्ती प्राप्त झाली असून, अनेक परदेशी प्रवासी येथे येऊ लागलेत. मी गेलो तेव्हादेखील अनेक परदेशी पाहुणे आले होते.

खजुराहो येथे एक सर्किट हाउस आहे. शेजारी द्वितीय श्रेणीचे विश्रान्तीगृह आहे, व समोर प्रथम श्रेणीचे वातानुकूल विश्रान्तिगृह आहे. उत्कृष्ट सोय असलेल्या सर्किट हाउसमध्ये मी उतरलो. डनलॉप गादी, उशी, स्वच्छ चादरी व

पांघरूण, पंखा, ट्यूबलाइट, लिहिण्याठी एक व ड्रेसिंगसाठी एक टेबल, आरसा, आरामखुर्च्या, गालिचे, पडदे इत्यादींनी सज्ज, आणि सोईस्कर असे स्नानगृह इत्यादी असलेले हे सर्किट हाउस खाद्य, पेय इत्यादी सोयींनी सुखदायक आहे. सपाट प्रदेशात हे स्थळ आहे. डोंगर, नदीनाले किंवा तलाव येथे नसल्यामुळे सृष्टिसौन्दर्य पाहावयास मिळत नाही. परंतु येथील हवा व पाणी प्रकृतीला पोषक असावे.

खजुराहो येथील शिल्प आकर्षक व आगळे आहे. कोणार्क, भुवनेश्वर, मार्तंड, राणकदेवी, एकलिंगजी, महादेव, इत्यादींची आठवण येथे झाल्यावाचून राहात नाही. मंदिरावरील शिल्प कलात्मक आहे. प्रियकराला पत्र लिहीत असलेल्या प्रियेच्या चेहऱ्यावरचे भाव, आरशात पाहून गंध लावीत असलेली दर्पणसुन्दरी पायात लागलेला काटा उभे राहून काढण्याचा नर्तकीचा विविध कलात्मकरीत्या होत असलेला प्रयत्न, मांडीवर येऊन पडलेल्या विंचवाला पाहून भयग्रस्त व घाईघाईने कपडे काढून दूर फेकण्याच्या प्रयत्नातील सुन्दरी, फळेफुले इत्यादी घेऊन जाणारी तरुण पुजारीण, कडेवर घेण्याचा आग्रह करणारे बालक व जवळ उभी असलेली त्याची माता, उजवा हात डाव्या बगलेंतून पाठीवर नेऊन पाठ खाजविण्याचा नर्तकीचा कलापूर्ण प्रयत्न व त्या वेळेस तिच्या पाठीवर व कमरेवर स्पष्ट उमटून दिसणारे नाजूक स्नायू, सध्या प्रचलित असलेल्या डोळ्यांचे कोपरे रंगविण्याचा प्रयत्न करीत असलेली सुन्दर नर्तकी, एक प्रणयी युगुल गुजगोष्टींमध्ये गर्क असताना हातात छोटी काडी घेऊन त्यांच्या सुखात उपद्रव निर्माण करीत असलेले एक माकड, खेडयातील एक मास्तर शिकवीत असताना त्याच्या अवतीभोवती घोळका करून गोंधळ माजविणारी लहान मुले, डोळ्यांत गेलेला कचरा हलक्या हाताने काढण्याचा प्रयत्न करणारी तरुणी, वेणी सोडण्याच्या प्रयत्नात असलेली विरहिणी, रुसलेल्या प्रियेची समजूत घालीत असलेला प्रियकर, इत्यादी अनेक रसपूर्ण विषय डोळ्यांसमोर ठेवून निर्माण केलेले हे शिल्प अभ्यसनीय आहे. चेहऱ्यावर हास्य, करुणा, वेदना, शृंगार, राग, भक्ती, वात्सल्य, भय इत्यादी विविध भाव स्पष्टपणे उमटविण्यात शिल्पकार फारच यशस्वी झाले आहेत.

याव्यतिरिक्त नर्तक बालगणेश, गौरीशंकर, सरस्वती, विष्णु–रुक्मिणी, जगदंबा, इत्यादी अनेक देवदेवता, ऋषिमुनी इत्यादींच्या आकर्षक शिल्पाकृती

आहेत. या सर्वांपासून वेगळे म्हणजे येथील कामक्रीडेवरचे शिल्प. यामागील हेतू काय ?– असा प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होतो. त्याची दोन उद्दिष्टे आहेत असे सांगतात. एक म्हणजे मंदिरप्रवेश करताना सर्व प्रकारच्या कामना आपण बाहेर ठेवून गाभाऱ्यात जा, व शान्त– प्रवित्र चित्ताने परमेश्वराचे दर्शन करा, असे सुचविण्याचे आहे. दुसरे असे की, वीज ही एक पवित्र देवी आहे. ती अशुभ स्थळी जात नाही अशी लोकांची कल्पना आहे. ही वीज कोसळल्यामुळे पूर्वी अनेक मोठमोठ्या इमारती उद्‌ध्वस्त होत असत. त्यावर उपाय म्हणून असे शिल्प येथे निर्माण करण्यात आले. त्यामुळे या अपवित्र शिल्पावर वीज कोसळू नये व मंदिर जास्तीत जास्त काळ टिकून राहावे हा उद्देश.

खजुराहो येथे लांबलांब अंतरावर मंदिरे आहेत. चौसष्ट योगिनी, कंदरिया महादेव, महादेव मंदिर, चित्रगुप्त, विश्वनाथ व नंदी, लक्ष्मण, वराह, ब्रह्मा, वामन; जैन मंदिरात घंटाई, आदिनाथ, पार्श्वनाथ, हनुमान, दुलादेव व चतुर्भुज इत्यादी देवळे येथे आहेत. या सर्व मंदिरांची मी १७५ छायाचित्रे घेतली. मंदिरावरील शिल्पाचे जवळून छायाचित्रीकरण करताना फार त्रास झाला. वरून पडल्यास जिवाला धोका होता. दोन-तीनदा पडता पडता वाचलोदेखील. माझी खजुराहो भेट फारच यशस्वी झाली, याचा मला आनंद झाला.

दोन दिवस राहून सायंकाळी निघालो. रात्री छत्रपूर जिल्ह्यातून प्रवास केला. दहाच्या सुमारास एका रस्त्याच्या वळणावर समोर काही लोक काठ्या घेऊन उभे असल्याचे दिसले. मी लांबून सावध झालो. गाडी थांबविली व हातातील घड्याळ, आंगठी व गळ्यातील सोन्याची चेन हळूच पेट्रोलच्या टाकीत सोडून दिली. पुढे गेल्यावर त्यांनी अडविले. मी थांबलो. मी प्रवासी असून, गावोगावी काम करून पैसे मिळवून प्रवास करीत आहे असे खोटे सांगितले. हातात घड्याळ, आंगठी नाही. कपडेदेखील खाकी व मळकट वाटल्याने त्यांनी मला उपद्रव न करता जाऊ दिले. धैर्य व आत्मविश्वासाने त्यांना उत्तरे दिल्यामुळे कठीण प्रसंगातून मी वाचलो होतो. पुढच्या गावी थांबलो तेव्हा तेथील एका महाराष्ट्रीय सरकारी अधिकाऱ्याने पुढे प्रवास न करण्याचा सल्ला दिला. आदल्याच दिवशी एक्झिक्युटिव्ह इंजिनीयरचा खून झाल्याचे त्याने सांगितले. पण कोणास ठाऊक का, मनातली भीती एकदम नाहीशी झाली होती. जिवाची पर्वा नव्हती. मी पुढे

गेलो. वीस एक मैलांवर आठवले की पेट्रोल संपत आले असावे. मी शेरगढ येथे थांबलो. पेट्रोल मिळाले नाही. तेथील हॉटेलवाल्याने एका मैलावरील डाक बंगला दाखविला. चौकीदार बाहेर यावयास तयार नव्हता. हॉटेलवाल्याला अखेर तेथे नेऊन त्यास बोलवावे लागले. अंधाऱ्या बंगल्यात त्याने कंदील लावून दिला. विलक्षण मनःस्थितीत मी झोपलो.

सांचीकडे जात असता वाटेत ग्यारसपूरला थांबलो. मायादेवीचे भव्य मंदिर पाहिले. डोंगरापलीकडील या मंदिराजवळ पायवाटेवर मोटरसायकल घेऊन जाताना त्रास झाला. परंतु तेथील लोकांवर विश्वास नसल्याने पायी जाणे योग्य नव्हते. येथील जुन्या कमानी, व खांब उत्कृष्ट आहेत. हे प्रसिद्ध स्थळ नाही; परंतु वाटेत लागल्यास जरूर पाहण्याजोगे आहे.

सांची येथील भव्य स्तूप पाहून समाधान झाले. येथील शिल्प विशिष्ट विषयाला अनुसरून आहे. कोणी अभ्यासू बरोबर असल्यास ते पाहण्याचा आनंद लुटता येईल. डोंगरावर असलेल्या या स्तूपाकडे जाण्यास सुन्दर रस्ता आहे. वरती छोटी बाग असून, चांगले पर्यटन-केन्द्र तयार झाले आहे. भोपाळच्या अलीकडे वैशाली नावाच्या लेण्या आहेत. परंतु पाहण्यासारखे काहीच नाही. एकही सुन्दर लेणे नसून, आकर्षक मूर्ती नाही. फक्त जागा लेण्यासाठी आहे. भोपाळ येथे दोन तलाव आहेत, या व्यतिरिक्त विशेष काहीही नाही.

इंदोर येथील काचेचे जैन मंदिर फारच आकर्षक आहे. प्रवेश करताच आत भव्य आरसे भिंतींवर दिसतात. जमीन व छत सर्व काचेचे सजविले आहे. भिंती व खांब रंगबेरंगी काचेच्या तुकड्यांनी आकर्षक डिझाइन निर्माण करून तयार केली आहेत. सोन्याची मूर्ती फार आकर्षक आहे. याव्यतिरिक्त इंदोरमध्ये काहीही नाही. तसेच उज्जैन येथे अनेक देवळे असली तरी गावाबाहेरील नीलकंठ महादेवाचे मंदिरच आकर्षक आहे. छोटे असून स्वच्छ सुंदर आहे. जयपूरप्रमाणे येथेदेखील जंतरमंतरसारखी वेधशाळा आहे. मी तेथे गेलो असताना कुंभमेळा भरला होता.

इतिहासप्रसिद्ध मांडवगड

मांडवगड इतिहासप्रसिद्ध आहे. तेथे जाण्याचा मार्ग बिकट आहे. संरक्षणाच्या दृष्टीने हे अतिशय महत्त्वाचे असावे असे खास वाटते. येथे एक परिचारिकागृह

आहे. राजमार्गावरून हलक्या ने हाक मारली तरी ती लांबवरील या घरात बरोबर ऐकू जाते व तिचा प्रतिध्वनीही ऐकू येतो. हे येथील वैशिष्ट्य. बाकी सर्व खंडेर आहेत. बाग येथे लेणी आहेत. परंतु विशेष काहीही पाहण्याजोगे तेथे नाही. महाराष्ट्रातील लेण्यांच्या मानाने ही सामान्य आहेत.

गुजरातच्या सीमेवर प्रवेश करताना तेथील काही पोलिसांनी मुद्दाम माझे सामान तपासले. माझ्या सबंध प्रवासात मला फक्त येथेच अडविण्यात आले. मराठी व गुजराती दोन्ही भाषा बोलणाऱ्या येथील शिपायांनी आपल्या कर्तव्या-बद्दल जागरूकतेचा जो आव आणला व दारूबंदी कायद्याच्या पालनात जी तत्परता दाखविली, त्याबद्दल मला फारच आश्चर्य वाटले. मीच सामान सोडून सर्व दाखवावे असा त्यांचा आग्रह होता. मी स्पष्ट नकार दिल्यावर त्यांनी स्वतः सामान पाहिले.

डाकोर येथील श्री. रणछोडराय यांचे दर्शन घेऊन मी निघालो. रस्ता उत्कृष्ट असल्यामुळे प्रवास बरा झाला. अहमदाबादला रात्री पोहोचलो. मला पाहून माझ्या नातेवाइकांना आनंद झाला. कौटुंबिक जीवनाचा अनेक दिवसांनी मला लाभ मिळाला.

माझ्या माहितीप्रमाणे अन्य शहरांपेक्षा अहमदाबादचा विकास फार झपाट्याने झाला आहे. भव्य स्वच्छ रस्ते, साबरमतीवरील मोठे पूल, एलिस ब्रिज, नदी-पलीकडील नवी वस्ती इत्यादी डोळे दिपवणारे आहे. येथे जुन्या काही मशिदी पाहण्याजोग्या आहेत. प्रसिद्ध झुलते मनोरे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. एकावरून भिंतीला दाब दिला की दुसरा मनोरा हालतो. हिंडण्याफिरण्यासाठी कालरीया तलावाचा परिसर मनोहर आहे. येथील बालवाटिका सबंध भारतातील अशा प्रकारचे एकमेव स्थळ आहे. शिवाय बाग व प्राणिसंग्रहालय आहेतच. अहमदा-बाद येथील अनेक लोक खाण्यापिण्याचे शौकीन आहेत. माणिक चौक येथे रात्री उशिरापर्यंत भेळपुरी, कचोरी, समोसा, कुलपी, आइसक्रीम, फळे व इतर अनेक चांगल्या पदार्थांची विक्री होत असते.

भावनगर येथील गांधी-स्मृती या इमारतीमध्ये असलेली गांधी जीवनावरील छायाचित्रे पाहताना डोळे पाणावले. गांधींचे सान्निध्य ज्यांना लाभले ते किती

भाग्यशाली होते !– असा विचार मनाला स्पर्शून गेला. येथे अनेक लहान-मोठ्या गृहरचना संस्था आहेत, व सुंदर आधुनिक टुमदार घरे पाहावयास मिळतात. छोट्या तलावाचा परिसर संध्यासमयी हिंडण्याफिरण्यासाठी उत्कृष्ट आहे.

आपल्याकडे जसे सातान्याचे कंदी पेढे फार प्रसिद्ध आहेत, तसे सिहोरचे पेढे फार प्रसिद्ध आहेत. सौराष्ट्रात दूध विपुल. दुधाचे पदार्थ, दही, ताक, लोणी, तूप इत्यादींचा उपयोग आहारात मोठ्या प्रमाणात होतो. काही मागासलेल्या जमाती वगळता येथील स्थानिक लोक पूर्ण शाकाहारी आहेत.

पालीटाणातील जैन मंदिरे

पालीटाणा येथील डोंगर चढत असताना मी एका जैन साधूबरोबर शर्यत लावली. पन्नास– पंचावन्न वयाचा तो साधू इतक्या सहजतेने पायऱ्या चढत होता की, मला आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नाही. त्यांच्या बरोबरीने चढायला मला बरेच श्रम घ्यावे लागले. वर अनेक जैन मंदिरे आहेत. स्वच्छ सुंदर मंदिरात इतक्या मूर्ती आहेत की मोजायला बसलेला कंटाळून अर्धवट सोडील. मंदिराची विशिष्ट बांधणी पाहून भुवया उंचावतात. येथे राहण्याची उत्कृष्ट सोय आहे.

जुनागडकडे जाताना मी चुकीच्या रस्त्यावर गेलो. पुढे अंधार पडला आणि रस्ता सुचेनासा झाला. खाचखळग्यांच्या या रस्त्यावर फार त्रास झाला. चोहोकडे अंधार पसरलेला होता. रानातून जात असलेल्या या रस्त्यावर अनेक लहान-मोठे खड्डे आहेत. खड्ड्यांत उतरताना दिव्याचा झोत जमिनीवर पडायचा, परंतु चढताना तो आभाळाकडे गेल्यामुळे रस्ता मुळीच दिसत नव्हता. तेव्हा ब्रेक मारून एकदम वेग कमी करावा लागत असे व चढताना अचानक वाढवावा लागत असे. क्लच, ॲक्सिलरेटर व ब्रेकचा पुनः पुन्हा वापर करून हातपाय दुखायला लागले.

प्रमुख काळजी होती ती जंगलाची. येथे सिंहांचा फार सुळसुळाट आहे हे प्रसिद्ध आहे. तेव्हा मी कोणत्या दिशेला चाललो होतो हे कळत नसल्यामुळे फार काळजी वाटत होती. परंतु पुढे जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते, सतत दोन तास रात्रीच्या अंधारात प्रवास केल्यावर मी चरबवावडी या जंगलामधील छोट्या वस्तीत पोहोचलो ! तेथील पोलिस स्टेशनवरील सब इन्स्पेक्टरने फार आश्चर्य

व्यक्त केले, परंतु राहण्याची सोय केली नाही. मला राग आला. तसाच तेथून निघालो. पुन्हा एकदा मार्ग चुकला, परंतु रात्री एका वस्तीत चौकशी करून योग्य मार्गावर प्रवास चालू केला. काळोखातून छोट्या कच्च्या रस्त्यावरून प्रवास करताना जिवात जीव नव्हता. पाणी प्यावेसें वाटले, पण मिळणार कोठे ? न थांबता मी एकसारखा प्रवास केला. सुदैवाने पुढे एक गुराखी भेटला, त्याने राजमार्गाला मिळणारा एक जवळचा रस्ता दाखविला, व मी सुरक्षितपणे प्रवास करून जुनागडला पोहोचलो.

जुनागडचा किल्ला पाहण्यापेक्षा त्याचा इतिहास ऐकण्यात विशेष आनंद मिळतो. आजही तेथे काही वैशिष्ट्ये पाहावयास मिळतात. त्यांची हकीकत ऐकताना माणूस स्वतःला विसरतो. हल्ली येथे दोन मोठे तलाव बांधून शहराला पाणी पुरविण्याची योजना आखण्यात आली आहे. किल्ल्यातून समोर गिरनार पहाड दिसतो. हा पहाड गर्द झाडी व घनदाट जंगलाने आच्छादित आहे. येथे वाघ–चित्त्यांचा सुळसुळाट आहे. सूर्यास्तानंतर कोणी गढ चढत नाही वा उतरत नाही. हा गढ चढणे फारच कठीण आहे. मी आदल्या दिवशी पालीटाणा चढलो होतो म्हणून मला थोडा त्रास झाला. येथील डॉक्टरांचा सल्ला घेऊन गोळ्या घेतल्या व पुढच्या प्रवासाला लागलो.

सौराष्ट्रमधील शारदाश्रम हे एक आधुनिक परंतु प्राचीन प्रथेवर आधारलेले उत्कृष्ट शैक्षणिक केन्द्र आहे. अरविंदाश्रम व शान्तिनिकेतनची आठवण करून देणारे आहे. येथील व्यवस्थापक अत्यंत सौजन्यशील असून, प्रवाशांची फार आपुलकीने सर्व सोय करतात. पुढे पोरबंदर इत्यादी शहरे प्रसिद्ध आहेत; परंतु पर्यटकाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची नाहीत.

द्वारकेहून जामनगरला माझा प्रवास व्हावयाचा होता. वाटेत एक अपघात झाला. दुसऱ्या मोटर सायकलस्वाराची गाडी माझ्यावर आदळली. मी तत्क्षणी ब्रेक्स मारले, पण वेग इतका होता की मी पंधरा ते सतरा फूट लांब फेकलो गेलो. सुदैवाने हातापायाला खरचटण्याव्यतिरिक्त काही लागले नाही. त्या प्रवाश्याला मी उठवून बसविले व त्याच्या गाडीखाली सापडलेल्या कुत्र्यास वाचविण्यासाठी गाडी उचलली. तेवढ्यात चवताळलेला तो कुत्रा पायावर आला व त्याने जोराचा चावा घेतला. हातातील गाडी निसटली. दुसऱ्या पायाने मी त्यास

लाथ मारली. तो पळून गेला. पायातील मोजे व बूट रक्तबंबाळ झाले होते. त्यावर खास इंजेक्शन घेणे आवश्यक होते. मी सरळ राजकोटच्या रोखाने निघालो. सतत दीडशे मैल प्रवास करून सरकारी हॉस्पिटलमध्ये गेलो. चार टाके जखमेवर आले. तेथे एक दिवस राहून अहमदाबादला आलो. वाटेत उन्हात काही ठिकाणी मृगजळ पाहावयास मिळाले. अक्षरशः नदी वाहात असल्याचा भास झाला.

ता. २२ एप्रिलला मी सकाळी फक्त चहा घेऊन निघालो. सुरतेला १२ वाजता आलो. हॉटेलमध्ये सामान ठेवून कुत्र्याच्या चावण्यावरील इंजेक्शन घ्यावयास सिव्हिल हॉस्पिटलला गेलो. सर्जनना भेटून सोय केली. दोन वाजता जेवणासाठी जात असता वाटेतील मित्राच्या दुकानी जरा थांबलो. मन आधीच फार अस्वस्थ झाले होते. अशात त्याने अत्यंत करुणाजनक वृत्त मला कळविले. माझे परम मित्र श्री. सुरेशचंद्र सुरतवाला यांचे तीर्थस्वरूप श्री. बाबुभाई सुरतवाला यांचे पुण्याला निधन झाले होते. मी प्रवासात असल्यामुळे माझ्या प्रवासात व्यत्यय येऊन मी अर्धवट सोडून पुण्याला निघून येऊ नये म्हणून श्री. सुरेशने मला हे वृत्त कळविले नव्हते. मी हतबुद्ध झालो.

श्री. बाबुभाई मला मुलाप्रमाणे मानीत. ते स्वर्गवासी होऊन दोन महिने उलटले होते, व त्या काळात मी गावोगावी चैन करीत फिरत होतो, याचे मला फार वाईट वाटले. तोंडातून ' ब्र ' फुटत नव्हता. मित्रांनी माझी तेथे समजूत घातली व सान्त्वन केले. मी ताडबतोब तेथून निघालो. पुण्याला तार केली. हॉटेलवर जाऊन सामान बांधले व तीन वाजता उन्हात प्रवास सुरू केला. वाटेत एक थेंब पाणी घेतले नाही. जीव पुण्याला पोहोचला होता. देह त्या दिशेने खेचला जात होता. सुरेश, त्याच्या पूज्य मातोश्री– यांचे चेहरे राहून राहून डोळ्यांसमोर उभे राहात होते.

सूर्यास्त झाला...काळोख पसरला. मी शून्यमनस्क होऊन धापा टाकीत पुण्याकडे जात होतो. पेट्रोलसाठी थांबलो तेवढीच विश्रान्ती. मनावर कारुण्याचे दडपण इतके वाढले होते की श्रम व थकवा लक्षातच आला नाही.

खंडाळा घाटात घाईघाईने दोनदा घसरलो. अपघातातून वाचलो. परंतु मला त्याची काळजी नव्हती. मनात जे विलक्षण वादळ उठले होते ते मला पुण्याच्या

रोखाने ओढीत नेत होते. अगदी अनपेक्षित अवस्थेत मी परतत होतो ! पूर्वी नानाविध सुखद कल्पना केल्या होत्या त्या छिन्नविछिन्न झाल्या होत्या. मलाही ते नकोसे झाले होते.


घरात पाय ठेवला..... धरण फुटून पाणी वहावे तसे मनाचे बांध तोडून रडू कोसळले,– व या आर्त नादात प्रवासाच्या सर्व सुखद स्मृती वाहून गेल्या. या यशस्वी प्रवासानंतरचा आयोजित आनंदोत्सव दुःखाच्या ज्वालांमध्ये जळून भस्म झाला. पूज्य बाबुभाईंचे आशीर्वाद राहून राहून कानात गुंजन करीत होते : " सांभाळून प्रवास कर व सुखरूप परत ये. " पण—


मी परतण्याअगोदर ते स्वतः माझ्याहून अधिक लांबच्या अज्ञात प्रवासाला निघून गेले होते... ! !

● ● ●

लेखक

प्रकाशक





कन्याकुमारी ते काश्मीर

व

कजिरंगा ते कांडला

स्वतः प्रवास करून लिहिलेले स्वानुभवावर आधारित

एकमेव अतुलनीय पुस्तक

'रविवार सकाळ 'मध्ये उच्चांक गाठला त्या लेखमालेवर आधारित

ज्यामुळे पुणे महानगरपालिकेने लेखकाचा सत्कार केला

पद्मभूषण डॉ. नानासाहेब परुळेकर

पद्मभूषण प्रो. ना. सी. फडके

स्व. आचार्य अत्रे

भारताचे गृहमंत्री यशवंतराव चव्हाण

श्री. बाळासाहेब देसाई

अनेक प्रभूतींनी ज्याबद्दल प्रशंसोद्‌गार काढले ती कृती